कृपाबाई सत्यनादन

अनुवाद : रोहिणी तुकदेव

# कमल



# कमला

मूळ लेखिका
कृपाबाई सत्यनादन

अनुवाद
रोहिणी तुकदेव

राजहंस प्रकाशन

या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात
पुन:प्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी लेखक आणि प्रकाशक
दोघांचीही लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.

कमला
मूळ लेखिका : कृपाबाई सत्यनादन
अनुवाद : रोहिणी तुकदेव

संपादक : नीलिमा गुंडी

प्रकाशक
दिलीप माजगावकर
राजहंस प्रकाशन प्रा. लि.
१०२५, सदाशिव पेठ
पुणे - ४११ ०३०
फोन - (०२०) २४४७३४५९
फॅक्स : २४४३३७१९
E-mail : rajhans1@pn2.vsnl.net.in
Website : www.rajhansprakashan.com

मुद्रक
रोहन एंटरप्रायझेस
१६/२, 'स्वोजस'
सहवास सोसायटी
कर्वेनगर
पुणे - ४११ ०५२

Kamala
Krupabai Satyanadan
Translator : Rohini Tukdev

© रोहिणी तुकदेव
जी-३ खरे ग्रुप हौ. प्रोजेक्ट
धामणी रस्ता, सांगली - ४१६४१५
फोन : (०२३३) २३२१११
भ्रमणध्वनी : ९८२३२९९९९०

अक्षरजुळणी
मानस एंटरप्रायझेस
अंकिता अपार्टमेंट्स, विठ्ठलवाडी,
हिंगणे, पुणे ४०० ०५१
फोन : ९७६५६३२१२४

मुखपृष्ठ : रविमुकुल

आवृत्ती पहिली : जानेवारी २०१२

ISBN 978-81-7434-562-2

**किंमत : ₹ १५०/-**

# 'कमला' सादर करताना...

*कृपाबाई सत्यनादन यांची 'कमला' (१८९५) ही कादंबरी मराठीत अनुवादित होणे अनेकदृष्ट्या गरजेचे होते. एकोणिसाव्या शतकात ज्या अगदी मोजक्या महाराष्ट्रीय स्त्रिया इंग्रजीतून लेखन करीत होत्या, त्यापैकी कृपाबाई या एक होत्या. कृपाबाईंची पुस्तकरूपाने प्रकाशित झालेली पहिली कादंबरी 'कमला' ही आहे. ही कादंबरी आणि तिच्या लेखिका या दोहोंना सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्व आहे. अगदी सुरुवातीला मुंबई इलाख्यातून धर्मांतरित झालेल्या (ख्रिश्चन धर्म स्वीकारलेल्या) हरिपंत व राधाबाई या दांपत्याची कृपाबाई ही कन्या. विवाहानंतर कृपाबाई त्या वेळच्या मद्रास प्रांतात राहिल्या. तेथे त्यांनी मुस्लीम मुलींसाठी शाळा काढली. बुद्धीचे वरदान लाभलेल्या कृपाबाईंनी स्वतःच्या प्रकृतीशी कडवी झुंज देत लेखनही केले.*

*एकोणिसाव्या शतकातील आपल्याकडील सामाजिक स्थित्यंतराचे प्रत्यंतर त्यांच्या लेखनातून येते. 'कमला'मध्ये बालविवाह, स्त्रीशिक्षणाविषयीची समाज मनातली धास्ती, एकत्र कुटुंब पद्धतीतील कुचंबलेले वातावरण, कुटुंबातील पुरुषी वर्चस्ववाद आणि परंपरा व आधुनिकता यातील मूल्यसंघर्ष यांचे चित्रण येते. आत्मसन्मान राखत पतीचा त्याग करणारी यातील नायिका कमला, ही त्या काळच्या चौकटीत बंदिस्त झालेली नायिका नव्हती. तिचे वेगळेपण आज विशेष उठून दिसते. या कादंबरीतील प्रसंगचित्रण, निसर्गवर्णन आणि भाषाशैली हे घटकही वाचकांना आकर्षित करतील, असे आहेत.*

*महाराष्ट्रातील समाजजीवन आणि निसर्ग यांची पार्श्वभूमी लाभली असतानाही*

*'कमला' आजवर मराठीत अनुवादित झालेली नव्हती. (तिचा तमीळमध्ये अनुवाद झाला आहे.) 'कमला'चे हे साहित्यिक व सांस्कृतिक असे दुहेरी महत्त्व डॉ. रोहिणी तुकदेव यांनी अचूक हेरले. इतकेच नव्हे, तर त्यांनी अतिशय प्रवाही शैलीत, आशय-आविष्काराचा पोत जपत, रसाळ अशा मराठीत तिचा अनुवाद केला. हा अनुवाद आपल्या वाङ्मयीन परंपरेमध्ये नक्कीच मोलाची भर घालणारा ठरेल. अभ्यासकांबरोबरच सर्वसामान्य रसिकांचीही दाद या अनुवादाला मिळेल, असा आम्हांला विश्वास वाटतो.*

**डॉ. नीलिमा गुंडी**

# १.

भारताला 'मूर्तिमंत स्वर्ग' म्हणता नाही यायचं कदाचित, पण स्वर्गीय म्हणता येतील अशी अप्रतिम सुंदर आणि भव्य स्थळं भारतात विखुरलेली आहेत, हे मात्र निश्चित. दखखनच्या नाशिक जिल्ह्यातील पर्वत रांगांतील गंगागोदावरीचं उगमस्थान हे एक असंच स्थळ आहे. तिथल्या निसर्गाचं देखणेपण अतुलनीय आहे आणि त्यात एक प्रकारचा राकट, कणखरपणा आहे. तिथं एका मागोमाग पसरलेल्या टेकड्यांच्या रांगा. काही हिरव्यागार तर काही, उजाड आणि उघड्या-बोडक्या. पावसाळ्याच्या दिवसांत त्यांच्या पोटातील गुंफांमधून आणि घळींमधून धबधबे फुंसाटतात. तिथेच टेकड्यांच्या रांगांनी बनलेल्या त्या सुरेख पश्चिम घाटाच्यां अगदी जवळच एक पवित्र नगर वसलं आहे. त्याला आपण शिवगंगा म्हणू.

संध्याकाळची वेळ आहे. टेकडीवरच्या मैलोगणती पसरलेल्या उजाड माळावर मावळतीच्या रंगानं न्हालेल्या, विविध आकारांच्या ढगांची अद्‌भुत मोहिनी पसरली आहे. एका बाजूला जुनी-पुराणी वठलेली, वाऱ्या-वादळानं झोडपलेली झाडं आणि खडकाळ टेकड्या आहेत, तर दुसऱ्या बाजूला नजर व्यापून जाईल इतक्या अंतरावर शिवगंगा वसलं आहे. गावातील देवळांच्या घुमटांवर, कळसांवर, चमचम करणाऱ्या तलावाच्या पाण्यावर, धुकट धूळभरल्या घरांवर सरत्या सूर्यकिरणांची प्रभा पसरली आहे. जवळच्याच एका टेकडीवरील काही झाडं जणू आपल्या फांद्यांमध्ये मावळत्या सूर्याचे किरण पकडून ठेवताहेत आणि त्यातून लुकलुकत बाहेर पडणारा रक्तिमा सगळीकडे पसरला आहे. झाडांमधून घरंगळणाऱ्या मावळत्या सूर्यप्रभेत एका लहान मुलीची छबी अगदी स्पष्टपणे नजरेत भरतेय. तीच कमला-वृद्ध ब्राह्मण तपस्व्याची मुलगी कमला. डोंगरमाथ्यावरच्या पडक्या देवळाजवळ कमला उभी आहे. तळहातावर हनुवटी टेकवून डोळ्यांत प्राण आणून खाली पसरलेल्या निळसर पठाराकडे ती अगदी टक लावून पहातेय. अखेरीस ती एक निःश्वास टाकीत पुटपुटते, 'बाबा तर कुठंच दिसत नाहीत. छे, बाई! कधी येतील ते घरी?' देवळातील भव्य महाकाय

मूर्ती तिच्याकडे रोखून पाहते आणि डोक्यावरच्या झाडांच्या फांद्या उदासपणे सळसळतात. बिचारी कमला. यावेळी तिच्या मनात काय कालवाकालव चालली होती, त्याचं वर्णन करणं कठीण आहे. तिचं आणि तिच्या म्हाताऱ्या आजीचं मुळीसुद्धा पटत नाही. आजीच्या रागाच्या तडाख्यातून तिला सोडविणारे आणि शेजारच्या देवळातल्या दक्षिणेवरून पुजाऱ्यांमध्ये चाललेला भांडण-तंटा, गलका शांत करणारे तिचे बाबा आत्ता तिथे नाहीयेत. बाबांची नेहमीची वाट तिला माहीत आहे. यापूर्वी कितीतरी वेळेला ती त्यांच्याबरोबर त्या वाटेने, भाजी म्हणा किंवा धान्य म्हणा आणण्यासाठी शहरात गेली आहे आणि संध्याकाळच्या वेळी भाताच्या हिरव्यागार शेतातून, चमचम करणाऱ्या पाण्याच्या पाटाच्या कडेनं परत आली आहे. त्यावेळी संध्याकाळच्या त्या धूसर प्रकाशातही, गडद रंगाचा ताठ उभा असलेला आपला डोंगर दुरूनसुद्धा तिला स्पष्ट ओळखू येई आणि मग ती चिमुरडी, आपल्या बाबांच्या गळ्यात हात टाकून त्यांच्या पाठकुळीवर बसे आणि अचंबित होऊन कितीतरी गोष्टींबद्दल विचार करीत राही. 'या वाढणाऱ्या काळोखात अजूनही तिथल्या झाडांमध्ये लाल प्रकाश असेल का? आपला खेळगडी वारा तिथे असेल का? आणि चांगल्या हेतूनं असलं तरी काय झालं, सतत करवादणारी म्हातारी आजी तिथं असेल काय? ती काय करीत असेल?' अशा अनेक विचारांत गुरफटलेली असताना, अचानक तिचं लक्ष वर जाई तेव्हा, बाकी सर्वत्र गडद अंधार आणि त्यातच झाडांमध्ये चमचम करणाऱ्या काजव्यांचा लाल प्रकाश तिला दिसे. त्या स्वागतशील प्रकाशामुळे एक आनंदाची, सुखाची लहर तिच्या शरीरात उचंबळून येई. जणू जिवाभावाच्या सवंगड्यानं आपला शब्द पाळला आहे आणि तो तिची वाट पाहतो आहे, असे वाटे. मग ती खूष होऊन टाळ्या पिटे, आपलं डोकं बाबांच्या खांद्यावर टेकवे आणि गाढ झोपी जाई! – खरंच! पुढे कितीतरी वर्षं या आठवणींनी तिचा पाठलाग केला होता. कितीदातरी तिच्या मनात येऊन गेलं होतं की, 'पूर्वीप्रमाणेच आपल्याला बाबांच्या खांद्यावर डोकं टेकवता यावं, भविष्याचा, नंतर काय काय घडलं याचा विचारही मनात न आणता, पूर्वीप्रमाणेच बाळपणातील ती निभ्रांत झोप घेता यावी.'

तिला बाबांची फार वेळपर्यंत वाट पाहावी लागली नाही. काही अंतरावरच भाताच्या शेतातून वाट काढत येणारी व्यक्ती तिला दिसली आणि उत्साहभरानं उड्या मारीत जाऊन ती त्या वृद्ध माणसाला बिलगली. त्यांनी तिला वर उचललं आणि खांद्यावर बसविलं. मायेनं आपलं हात त्यांच्या गळ्याभोवती गुंफून, कापऱ्या आवाजात ती म्हणाली, "तीऽन दिवस बाबा, तब्बल तीन दिवस मी तुमची सतत वाट पाहत होते आणि तरी तुम्ही आला नाहीत. खूप अंधार पडला होता, देवळातली मूर्ती माझ्याकडे रोखून पाहत होती, घुबडं घूंऽघूं ओरडत होती आणि मी अगदी एकटी होते."

"बरं बाळा, शांत हो. घर आलंच आपलं."

ते अगदी झोपडीवजा घर होतं. स्वच्छ झाडून, शेणानं सारवलेलं अंगण आणि भोवताली झाडी असं त्याचं रूप होतं. समोरच एक तुळशीवृंदावन होतं, अंगणाच्या कडेला एक विहीर होती, तिच्या पारावर लखलखीत घासलेल्या तांब्या-पितळेच्या घागरी ठेवल्या होत्या. बापलेकीनं घरात पाय टाकताक्षणीच म्हातारी गुरगुरली, "किती वाह्यात झालीय कार्टी, हे दिसतंच आहे. अगं भटकभवाने, बाबा घरी येणार आहे, हे बरं ऽ कळलं तुला!"

बाबा हसले आणि लहानग्या कमलेने आपला चेहरा त्यांच्या खांद्यावर घुसळला. अगदी मृदू, मायाळू आवाजात बाबा म्हणाले, "आमची लाडूबाई बिघडलीय की काय?"

"पुरती बिघडलीय!" प्रत्युत्तर आले. 'तुझ्याच लाडानं बिघडलीय. कुणी मुलाचं करत असतील, त्याहीपेक्षा जास्त लाड चाललेत तिचे. डोक्यावर चढवून ठेवलयन् तर काय!' पुटपुट करीत म्हातारी त्या दोघांसाठी जेवणाचं आणायला आत गेली. तोवर बाबा विहिरीवर जाऊन हात-पाय धुऊ लागले आणि कमला आतुरतेनं त्यांच्या येण्याकडे डोळे लावून बसली. मग केळीच्या पानावर वाढलेलं साधं वरण-भाताचं जेवण दोघे बाप-लेक मोठ्या मजेत, हसतखेळत जेवले.

ज्या छोट्याशा टेकडीच्या माथ्यावर त्यांचं घर होतं ती टेकडी एका सुप्रसिद्ध यात्रा-स्थळ असलेल्या टेकडीचा भाग होती. अवतीभोवतीचा परिसर निसर्गरम्य आणि ओळखीचा वाटावा असा होता. पण देवळाच्या आसपास मात्र काहीसं गूढ, अलिप्त आणि वेगळंच वातावरण होतं. झाडं वठली होती. घरं कसली, झोपड्याच त्या आणि त्याही पडक्या देवळाच्या विटा, माती, दगडांचा वापर करून बांधल्या होत्या. जवळच एक नितळ, स्वच्छ पाण्याचं तळं होतं. पर्वतात उगम पावणाऱ्या कितीतरी जिवंत पाण्याच्या झऱ्यांचा पुरवठा असल्यामुळे ते तळं काठोकाठ भरून, ओसंडून वाहत होतं. त्यातून बाहेर पडणारा पाण्याचा धबधबा, गर्जना करीत, दगडा-धोंड्यावरून दरीत कोसळत होता, सोसाट्याचा वारा देवळाभोवती सूंऽऽ सूं करीत शीळ घुमवीत होता आणि रिकाम्या पटांगणात घूंऽघूं करीत जोरात घोंघावत होता, झाडांत अडकला की गोंधळून जाऊन जोरानं फांद्या हलवीत होता. मग तिथून निसटून डोंगरावरच्या उघड्यावाघड्या खडकांवर धडका देत होता आणि ओढ्याकाठी विलक्षण करुण, आर्त गीत गात होता. त्याचा आवाज झऱ्याच्या आवाजात मिसळून एक निराळीच, गूढ, उदास लय तयार झाली होती. तिथंच एक डोंगरी गुहा होती. तिच्या भिंती गोट्यासारख्या गुळगुळीत झाल्या होत्या, त्यावरून पूर्वी एखादा झरा नक्की वाहत जात असला पाहिजे, हे सहज लक्षात येत होतं. त्या गुहेच्या जवळच कमलेची झोपडी होती. तिची झोपडी अगदी मध्यभागी होती. भोवती इतर काही झोपड्या पसरल्या होत्या आणि मध्ये कडुनिंबाची दाट झाडी होती. दाट

झाडीत रात्रंदिवस वाऱ्याची शीळ घुमत राही. वाऱ्याच्या सोबतीमुळे कोणाला एकटं म्हणून वाटत नसे. तिथूनच एक रस्ता थेट मुख्य श्रीक्षेत्र टेकडीकडे जात होता. अनेक मंदिरं, सभामंडप, ओवऱ्या यांनी ते पवित्र श्रीक्षेत्र अगदी गजबजून गेलं होतं. दुरून मृदुंगांचे, इतर वाद्यांचे, झांजांचे आणि घंटांचे नाद वाऱ्याबरोबर वाहत येत असत.

लहानगी कमला एकुलती एक मुलगी होती आणि तिचं आपल्या वडलांवर खूप प्रेम होतं. ती अगदी तान्ही असताना तिची आई देवाघरी गेली होती. आईबद्दल तिला फारच थोडं आणि तेही धूसर-अस्पष्ट असं आठवत होतं. टपोऱ्या पण उदास डोळ्यांची, एक उंच, शेलाटी सुंदर स्त्री तिच्या स्वप्नात नेहमी येई. तिचं थोपटणं, जोजवणं, कुरवाळणं किंवा लाडाकोडानं निरनिराळ्या नावांनी बोलावणं असं काहीतरी अंधूक अंधूक तिला आठवे. खरं पण हे सगळं फार पूर्वी घडून गेलं आहे, असं तिला वाटे. आईचे टपोरे, पाणीदार डोळे मात्र तिला स्पष्ट दिसत. त्या डोळ्यांतून पाझरणारी मायेची मधुर प्रभा स्वप्नात तिच्याभोवती पसरे. कधीकधी चांदण्या रात्रीही तिला असाच भास होई. आपल्या अगदी फार जिव्हाळ्याचं कुणीतरी आपल्या सोबत आहे, अशा स्वर्गीय कल्पनेत रममाण होऊन ती गाढ झोपी जाई.

कमलेचं आतापर्यंतचं आयुष्य अगदी साधं, सरळ होतं. त्यात नेहमीपेक्षा वेगळं असं फारसं काही घडलंच नव्हतं. तिच्या प्रत्येक दिवसाची पहाट येताना, शेजारच्या देवळातील चौघड्याचा आवाज, ब्राह्मणांचे सुदीर्घ आरोह-अवरोह असलेलं मंत्रपठण, पुजाऱ्यांनी खास हेल काढून म्हटलेल्या दबक्या आवाजातील काकडआरत्या आणि पायथ्याशी असलेल्या, नुकत्याच जाग्या होऊ लागलेल्या शहरातील वेगवेगळे आवाज या सगळ्यांनी मिळून तयार होणाऱ्या नादाच्या ललकाऱ्या देत येई. कमलेला पक्ष्यांची किलबिल आवडे खरी पण त्याहीपेक्षा; अनाकलनीय असले तरी ब्राह्मणांचे मृदुमधुर मंत्रोच्चार तिला फार आवडत आणि ते ऐकल्यावर तिच्या मनात भक्तीची व समर्पणाची भावना उचंबळून येई. अशा प्रकारे झोपेतून जागी होता होताच ती आपल्याला चांगलं आयुष्य देणाऱ्या ईश्वराची उपासना करू लागे. सकाळच्या वेळी घराच्या अवतीभोवती असलेल्या कुरणात गाई-गुरे, शेळ्या-मेंढ्या चरायला घेऊन येणाऱ्या कष्टकऱ्यांच्या मुलींचा तिला लळा होता. त्यांच्याकडून ती घरकामाच्या अनेक गोष्टी शिकली. त्या आपणहून तिला घरकामात मदत करीत. त्यांच्या बोलण्यातून तिच्या कानावर कितीतरी गोष्टी पडत. पंचक्रोशीत घडणाऱ्या अनेक घटनांची भरपूर- मीठ-मसाला घातलेली अतिशयोक्तीची वर्णनं, त्यावर अंधश्रद्धाळूपणे केलेली शेरेबाजी, भाबडी मतं, दंतकथा असं पुष्कळ काही तिच्या कानावर पडे आणि ते तिच्या डोक्यात ठाण मांडून बसे. पण या सगळ्यापेक्षाही तिचं जास्त ध्यान वडलांकडे असे. त्यांचा चंबू पाण्यानं भरून ठेवणं, जेवायच्या वेळी त्यांचं केळीचं पान नीट, स्वच्छ पुसून ठेवणं, ही सारी कामं ती मनापासून करे. तुळशीला पाणी

घालून आणि म्हाताऱ्या आजीच्या हाताखाली इतर घरगुती कामं आटोपून झाली की ती लगेच वडलांकडे जाई. देवळालगतच असलेल्या झाडांच्या दाट सावलीत बसणाऱ्या आपल्या बाबांना बिलगून त्यांचे इतरांबरोबर चाललेले तात्त्विक विषयांवरील संभाषण ती दिवसभर ऐकत बसे. अशा प्रकारच्या दिनक्रमामुळे तिच्या वयाच्या इतर मुलींपेक्षा ती अगदी वेगळीच झाली होती. काहीशी बुजरी, संकोची आणि निष्पाप-निरागस.

अधूनमधून जवळच्या शहरगावी जाण्यानं तिच्या एकसुरी आयुष्यात क्वचित काही बदल होई खरा; पण त्याहीपेक्षा मोठा बदल घडवणारी एक घटना घडली ती म्हणजे शेजारच्या देवळातील देवीची जत्रा! त्या दिवशी अगदी उजाडता उजाडता सणासुदीचे, ठेवणीतले कपडे घातलेल्या मुलींचा एक घोळका डोंगर चढून वर आला. त्यांच्या सोबत काही पोक्त, विधवा स्त्रिया होत्या. दर दहा वर्षांनी भरणारी वायुदेवता अंजनीची जत्रा होती ना! देवळाभोवती राहुट्या, तंबू उभे केले होते. रात्रीच्या वेळी तर थेट शहरापर्यंतच्या वाटेवर सुरेख मांडव घातला होता. देवळातून वाद्यांचा गरज ऐकू येत होता आणि तो थांबला की मृदुंगाच्या थापेनं वातावरण भरून जात होतं. किती विलक्षण योगायोग, वाराही त्या दिवशी जरा जोरात डोंगराच्या दिशेनं वाहत होता. सदोदित एका बाजूला पडलेली निर्मनुष्य, वैराण टेकडी आता आनंदी आणि उत्साही लोकांनी गजबजून गेल्याचं दृश्य फारच सुखद वाटत होतं.

जत्रा तशी स्थानिक पातळीवरील असल्यानं तिचा फारसा बोलबाला नव्हता हे खरं पण तरीही आपल्या पाठोपाठ ऊन, वारा, पाऊस घेऊन येणाऱ्या देवीची दर दहा वर्षांनी पूजा करून ओटी भरल्याशिवाय, तिथल्या पायथ्याशी असलेल्या शहरातील बाया-बापड्यांना चैन पडत नसे. जत्रेला आलेल्या लोकांनी तळ्यात स्नान करून आपापल्या चंबूत स्वच्छ पाणी भरून घेतलं. मुलींनी देवीला वाहण्यासाठी आपल्याबरोबर फुलं, तांदूळ, कुंकू अशा काही काही गोष्टी आणल्या होत्या आणि मनातल्या मनात नवस बोलत त्या देवळाकडे चालल्या होत्या. रस्त्यात कुणी देवीच्या नावानं भिक्षा मागत फिरणारा भिक्षेकरी तोंडानं पुंगी वाजवीत, चित्रविचित्र हावभाव करीत, नाचत कडुनिंबाच्या झाडाभोवती फिरत होता आणि बदल्यात, गंमत बघणाऱ्या बघ्यांकडून तांब्याची नाणी मिळवत होता. देवळाजवळ प्रामुख्यानं, बैरागी व गोसावी लोक होते. त्यांच्या हातात एकेक पितळी थाळी आणि एक ओबडधोबड वाद्य होतं आणि ते जोरजोरात वाजवीत होते. देवळाच्या गाभाऱ्यात, देवीच्या मूर्तीच्या शेजारी, कपाळावर मोठ्ठे भस्माचे पट्टे असलेले पुजारी गंभीर मुद्रेनं बसले होते. काही स्त्रिया व पुरुष अगदी मनोभावानं देवीपुढे नतमस्तक होत होते. त्या गाभाऱ्यातील काळोखात, समईच्या वाऱ्यानं हलणाऱ्या ज्योतींमुळे वातावरण मंगल आणि उदात्त बनलं होतं.

नेमकं काय करावं ते लक्षात येत नसल्यामुळे गोंधळून गेलेली, बुजरी कमला

आपल्या झोपडीजवळ उभी होती. इतके दिवस जे देऊळ तिला फक्त आपलं आहे असं वाटत होतं, त्या तिच्या देवळात इतके लोक जमलेले ती प्रथमच पाहात होती. हा तिच्या आयुष्यातील एक नवा, अनोखा अनुभव होता. इतर ठिकाणच्या जत्रांना ती गेली होती पण इथल्या जत्रेची गोष्टच वेगळी होती. या जत्रेत आपण हिरिरीनं सामील व्हायला पाहिजे, असं तिला वाटत होतं. कारण तिचे बाबाच तिथले मुख्य होते ना? आणि आजूबाजूच्या पंचक्रोशीतील लोक त्यांना मान देत होते ना? ठेवणीतला पोशाख घालून घराबाहेर पडताना तिचा ऊर अभिमानानं भरून आला होता. पण आपल्याच वयाच्या मुलींचा एक घोळका आपल्याकडे टक लावून पाहतो आहे, असं लक्षात येताच ती भांबावली. त्या मुलींनी तिच्याभोवती गराडा घालून प्रश्नांचा भडिमार केला नसता, तर तिनं बहुधा तिथून पळ काढला असता आणि कुठेतरी आडोशाला जाऊन ती लपून बसली असती. पण आता ते शक्य नव्हतं. तिच्याभोवती गोळा झालेल्या त्या मुली, तिला काय वाटेल याची मुळीसुद्धा पत्रास न बाळगता तिच्या पोशाखावर, दागिन्यावर खुशाल शेरेबाजी करीत होत्या. चोहोबाजूंनी प्रश्न विचारले जात होते- 'तू कुठं राहतेस?', 'कुठून आलीस?', 'त्या संन्यासीबुवांची तर तू मुलगी नाहीस ना?', 'वय किती तुझं?' आणि 'तू अजूनही बिनलग्नाची कशी राहिलीस?' पहिल्यापासून इथंच राहतेस की काय?', 'काय पण कपडे तुझे आणि काय ते ध्याऽन!' अशा प्रकारे एक ना दोन, अनेक प्रश्नांचा तिच्यावर नुसता भडिमार चालला होता. इतक्या सगळ्यांच्या नजरा तिच्याकडेच वळल्यामुळे ती अगदी घाबरून आणि भांबावून गेली. डोळ्यांत पाणी आणून, काकुळतीला येऊन तिनं सभोवताली पाहिलं. तेवढ्यात त्यांच्यातीलच पण थोडी मोठी आणि बाकीच्यांपेक्षा अधिक समजूतदार मुलगी पुढे झाली. तिनं तिला किंचित बाजूला केलं आणि तिचा पत्कर घेत म्हणाली, "पुरे गं! ती किती घाबरून गेलीय हे दिसत नाही का तुम्हांला?"'

तरीही पुढे होत एका मुलीनं विचारलंच, "तू तुझ्या बाबांबरोबर, खाली, शहरात राहायला येणार आहेस म्हणे, खरं का गं?"

"मला नाही माहीत. दादांनी मला तसं काही सांगितलेलं नाहीय!"

"म्हणे दादा! किती वयस्कर आहेत ते, ते तुझे वडील असूच शकणार नाहीत." डोळे मिचकावत, थट्टेच्या सुरात एक मोठी मुलगी बोलू लागली. "त्यांनी तुला कुठून तरी उचलून आणलं असेलन् तर काय!" आता मात्र कमलेचे डोळे पाण्यानं डबडबले आणि रागानं थरथर कापत, ठाम स्वरात ती म्हणाली, "ते माझेच दादा आहेत. 'ते माझे दादा नाहीत असं कुणी म्हणायचं काम नाही.' "

"तुझी आई कुठं आहे?"

"आई! मला आई नाही पण आजी आहे." या उत्तरावर खि: खि: करून साऱ्या मुली हसल्या. "ती म्हातारी बाई तुझी आजी आहे, हे बरीक आम्हाला मुळीच

पटायचं नाही. आम्हाला चांगलं माहीत आहे की ती गणेशची आजी आहे.'' मुलींच्या टिंगल-टवाळीनं फजीत पावलेली कमला अगदी गांगरून गेली. पुन्हा एकदा मघाशी तिची बाजू उचलून धरणारी थोराड मुलगी तिच्या सुटकेला धावून आली व म्हणाली, ''जाऊ दे, तू नको मनावर घेऊ एवढं - तुला खरंच माहीत नाहीय की तू जरी तिला आजी म्हणत असलीस तरी ती तुझी खरी आजी नाही आहे.''

''हो का, मग ती माझ्या आईची आजी आहे,'' बिकट परिस्थितीतून वाट काढण्याचा प्रयत्न करीत, जरा आवाज उंच चढवून कमला म्हणाली, ते ऐकून तर मुलींनी आणखीनच गलका केला. पण लगोलग तो ओसरलाही. कारण त्या उंच मुलीनं एकदा सभोवार नजर टाकली आणि सगळ्यांना चापत म्हणाली, ''मूर्खासारख्या खिदळताय काय? तिला काहीच ठाऊक नाही, हे दिसत नाही का तुम्हांला?'' मग कमलेच्या गळ्यात हात टाकून अगदी मायेनं, मृदू आवाजात तिनं विचारलं, ''अगंबाई, हा पाणीदार मोत्यांचा हार कुणी दिला तुला? हे अगदी खरे मोती आहेत, हे ठाऊक नाही की काय तुला?''

तिच्याकडे तो एकच हार होता आणि तो मौल्यवान आहे, याची फारशी तमा न बाळगता दादांनी तिला तो घालायला दिला होता. आता मुलींचं लक्ष हाराकडे गेलं. त्या तिच्या गळ्यातील हार चाचपू लागल्या. 'अय्या ऽऽ हे खरे मोती आहेऽऽत?' असं विचारू लागल्या. पण कमला त्या थोराड मुलीला – काशीला – बिलगत अगदी सहज स्वरात म्हणाली, ''हे मोती तर नेहमीच माझ्या गळ्यात असतात. मला तर वाटतं, की अगदी जन्मापासून ते माझ्या अंगावर आहेत आणि मी खूपदा खेळतेसुद्धा त्यांनी!'' एवढं झाल्यावर आपल्या भोवतीच्या मुलींपासून थोडंसं बाजूला होऊन तिनं एकीकडे हात दाखविला आणि म्हणाली, ''ते बघा, ते बघा ते कोणी आई-बाबा आपल्या मुलांना घेऊन आपल्याकडेच येताहेत.'' ती हसली, त्यासरशी इतर मुलीही हसल्या आणि तिला त्या उंच मुलीबरोबर तिथंच सोडून पुढे चालू लागल्या. काशीनं मग, पुनः पुन्हा सांगून, तिच्याकडून शहरांत येण्याचं व तिला भेटण्याचं कबूल करवून, वदवून घेतलं. ''रामकृष्णपंतांची मुलगी माझी मैत्रीण आहे, असं बाबांना सांग म्हणजे ते तुला आमच्याकडे नक्की घेऊन येतील. ते माझ्या बाबांना चांगले ओळखतात.'' ती म्हणाली. तिचं ते बोलणं ऐकून कमलेनं एवढ्या विश्वासानं व आनंदानं तिच्याकडे पाहिलं, की न राहावून काशीनं तिला चटकन मिठीच घातली.

आता अजून प्रदक्षिणा घालायच्या होत्या. मुलींनी देवीला फुलं वाहिली, तीर्थ घेतलं आणि अंगारा लावून देवीच्या पायावर मनोभावे माथे टेकले. या सगळ्यात काशीचा अगदी पुढाकार होता. ती जसं करील, तसं साऱ्या करीत होत्या. सगळं यथासांग झाल्यावर परत निघताना काशीनं काही फुलं घेऊन मोठ्या कौतुकानं

कमलेच्या केसात माळली आणि शहरात येण्याची तिला पुन्हा एकदा आठवण करून दिली.

आता सूर्य माथ्यावर आला आणि टेकड्यांवर, माळा-पठारांवर ऊनच ऊन झालं. वारा पडला आणि सकाळचा उत्साहही संपल्यासारखा झाला. आता घरी गेल्यावर जत्रेच्या गमतीजमती सांगू आणि शहरात येण्याचं आमंत्रण देणाऱ्या मैत्रीणीबद्दलही सांगू असा विचार करीत कमला आपल्या झोपडीत परत आली.

✿

## २.

शिवगंगा नगरातल्या काशिनाथपंतांच्या परसदारातील विहिरीवर मुलींचा घोळका जमलेला दिसतोय. विहिरीच्या दगडी पारावर आपल्या पितळेच्या घागरी ठेवून त्या मुली आपापसात मोठ्या रंगात येऊन गप्पागोष्टी करताहेत. त्यांच्या एकंदर हावभावांवरून काहीतरी खास घडलेलं असावं, असं वाटतंय. आपला उतू जाणारा उत्साह आणि मधूनच वाढणारा आवाज कमी करण्याचा त्यांचा व्यर्थ प्रयत्नही चाललाय. तरीही, तारुण्यसुलभ हास्याच्या उकळ्या फुटायच्या काही थांबत नाहीत. इतक्यात कमरेवर भलीथोरली घागर घेऊन एक थोराड बांध्याची मुलगी तिथं येते, तशा सगळ्याजणी उत्स्फूर्तपणे तिचं स्वागत करतात. "ये, ये बरं झालं बाई भागिरथी तू आलीस. आम्ही तुझी वाटच पाहत होतो. आता बरोबर सातजणी झालो."

जशा सप्ततारका, सात राजकन्या, तशा आपण सातजणी! आपल्या पाणीदार डोळ्यांचा इकडेतिकडे अर्थपूर्ण दृष्टिक्षेप टाकीत एक मुलगी म्हणाली,

"असंच काही नाही. दुर्दैवाचे सात अवतार असतात आणि साथीच्या रोगांची संख्याही सातच!" दुसरी मुलगी हसत हसत बोलू लागली, "एवढंच काय, इंद्राला सात आकड्याची भीती वाटत होती म्हणून तर आठव्या अर्जुनाचा जन्म झाला."

"पुरे झाली तुमची चर्पटपंजरी. तुम्हांला अर्जुनाबद्दलही नीट माहिती नाही आणि वरुणाबद्दलही नाही," शास्त्रींची मुलगी म्हणाली.

"मी सांगते ना, मला सगळं अगदी व्यवस्थित माहिती आहे." मघाशी तिरकस बोलून आडवं लावणारी हरणी सांगू लागली, "कालच आमच्या घरी पुराण लावलं होतं. खूप माणसंही जमली होती. अगंबाईऽ, एक विसरलेच होते की मी, तुम्ही त्या संन्याशाच्या मुलीला, कमलेला पाहिलंत का इतक्यात? काल, रामकृष्णपंतांची काशी, तिला घेऊन आमच्या घरी आली होती."

"हो. कमला म्हणजे तिची जिवलग मैत्रीण झालीयं आजकाल. जिथे जाईल तिथे तिला घेऊन मिरवीत असते नुसती." छद्मी हसत, ओठ गर्विष्ठपणे मुरडत

एकजण उद्गारली.

तिच्या हो त हो मिळवीत ठेंगण्या-ठुसक्या गंगीनं नाक मुरडलं आणि म्हणाली, "हो, हो, काल जणू काही माझी आईच तिच्यात संचारली होती. त्या लाडावून ठेवलेल्या चढेल मुलीला कुरवाळीत काय होती, तिच्या केसात फुलं काय माळत होती. बघून मला वैताग आला होता नुसता! सगळा वेळ आपली तिची एकच टुरटुर की, कमला अशी आहे आणि कमला तशी आहे, ती किती चांगली आहे, तिला आई नाहीय आणि हे आणि ते! सारखं तेच तेच! मला वाटतंय, तिला जणू तिची आईच व्हायचंय!"

हः, हः, खिः, खिः, खुः, खुः - "आई नसेल काही, पण सासू व्हायचं असेल!" सगळीकडे एकच हशा पिकला. "तुला एक भाऊ आहे ना गं? कुठंसा शिकायला गेलाय ना? मऽऽग झालंऽऽ तर!"

"ती, आणि माझ्या भावासाठी? नाही बरंऽऽ एक दिवससुद्धा ती घरी आलेली खपायचं नाही मला." गंगी उत्तरली. "रूपवान म्हणे, खरं तर कमला मुळीच रूपवान दिसत नाही. ती तर बुजरी, भित्री आणि बुद्दू वाटते. नागरी वस्तीत जणू वावरलीच नाही कधी अशी दिसते."

"तिचे वडील आपला अर्ध्याहून अधिक काळ जंगलात घालवतात, तेव्हा तुम्ही तिच्याकडून आणखीन वेगळ्या कशाची अपेक्षा ठेवू शकता? मला तर ती अशी झालीयं याचं मुळीच नवल वाटत नाहीयं," असे सांगत भागिरथी पुढे म्हणाली, "माझ्या बाबांनासुद्धा तिच्या वडलांबद्दल फार आपुलकी वाटते. गरीब बिचारे! एकेकाळी गडगंज श्रीमंत होते म्हणतात. कुणास ठाऊक खरं काय ते!"

"मला यातलं एक अक्षर पटत नाही" मान उडवीत गंगा म्हणाली आणि आपली पाण्यानं भरलेली घागर उचलून तिनं घरची वाट धरली. तिच्या त्या अवताराकडे बघून बाकी साऱ्या जणींना जोराचं हसू फुटलं. मग घागरी उचलून त्या मुकाट्यानं आपापल्या घराकडे निघाल्या. इतक्या मुकाट्यानं त्या चालल्या होत्या की जणू यापूर्वी कधी एकमेकींना भेटल्याच नव्हत्या.

संध्याकाळ झाली आहे. डोंगराळ भागात नेहमी दिसतं तसंच दृश्य आहे. सभोवतालचं जग काळोखात बुडतं आहे पण इथे डोंगरमाथ्यावर मात्र सूर्यप्रकाश थोडा थोडा रेंगाळतोय. डोक्यावरच्या विशाल आकाशात, हळूहळू तारका डोकावू लागल्या आहेत. अशा वेळी तिथल्या झाडीत कमला एकटीच बसली आहे. झाडांच्या बुंध्याच्या गर्दीतूनही मधूनमधून ती पश्चिम क्षितिजावरील रंगांची गंमत टिपते. गडद होत जाणाऱ्या काळोखात, अवतीभोवतीचे भुऱ्या जांभ्या दगडांचे उघड्यावाघड्या खडकांचे आकार बदलू लागले आहेत. ते अजस्र आकार धारण करू लागलेत असे तिला वाटते आणि झाडातील खसफस, सळसळ ऐकून तिच्या मनात अशुभाची पाल चुकचुकते. आजूबाजूच्या निर्मनुष्य परिसराकडे ती एक नजर

टाकते खरी, पण तिच्या मनाचा थरकाप उडतो. प्रत्येक झाडावर एकेक रहिवासी असतो असा विचार तिच्या भोळ्याभाबड्या मनात येतो आणि घरापासून अगदी प्रथमच इतकी दूर गेल्यामुळे की काय, स्वभावत: धीट असूनही तिला थोडी थोडी भीती वाटू लागते.

दगड-धोंड्यातून आणि काटेरी झुडपातून वाट काढीत पुढे जाऊन तिनं समोरच्या दरीत, खाली डोकावून पाहिलं आणि दादाऽ दादाऽऽ अशी साद घातली. एका धनगरानं, तिचे वडील त्या बाजूनं येताना पाहिल्याचं सांगितलं होतं, म्हणून ती हाका मारीत होती. मघाशी घरी तीन पाहुणे आले होते आणि त्यातल्याच एका पाहुणीनं "जा, पटकन तुझ्या दादांना बोलावून घेऊन ये." असं सांगितल्यामुळे ती इकडे आली होती. हळूहळू अंधार वाढू लागला होता आणि त्यामुळे भोवतीचे सगळे अस्पष्ट आणि विचित्र दिसत होते. आता घरी परत जाण्यासाठी ती वळणार, इतक्यात त्या अंधाऱ्या दरीतून एक मनुष्याकृती वर येताना तिला दिसली. एक सुळका चढून तो वर आला आणि तिला तिथे पाहून तो आश्चर्यचकितच झाला. त्यानं एक क्षणभर तिच्याकडे पाहिलं आणि काहीतरी अंधुक अंधुक आठवण्याचा प्रयत्न करीत, तो तसाच स्तब्ध उभा राहिला आणि कमलाही तो काहीतरी बोलेल, त्यानं काहीतरी बोलावं म्हणून वाट पाहत थोडा वेळ उगीच, गप्प उभी राहिली. तो काहीच बोलत नाही म्हटल्यावर, ती अगदी सहज स्वरात म्हणाली, "माझे वडील आले आहेत की काय, म्हणून बघायला मी आले होते. आता इतका उशीर झालाय त्यांना! तुम्हांला येताना कुठं दिसले का ते?"

"तुझे वडील? म्हणजे, कुणाची मुलगी तू? मी फार दूरवरून, औषधी वनस्पती, जडीबुटी गोळा करीत इथे आलोय. येताना तरी वाटेत मला कुणी दिसलं नाही पण तू भिऊ नकोस, माझी आणि तुझ्या वडलांची ओळख असावी; असं मला वाटतंय, सांग बरं कोण आहेत ते? काय करतात?"

"माझे वडील संन्यासी आहेत. आम्ही दोघे इथेच राहतो."

"हं, हो, हो, मी ओळखतो ना नारायणबुवा संन्याशी महाराजांना. ते कुठं राहतात, तिथे मला घेऊन चल बरं. मला वाटतंय की ते तिथेच असतील. अगं भिऊ नकोस अशी, मी मित्रच आहे त्यांचा!"

काहीही न बोलता कमलानं काहीशा अविश्वासानं त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं, पण त्याची धीरगंभीर, आश्वासक मुद्रा आणि मायाळू नजर पहाताच तिचा धीर चेपला आणि 'चला तर' असं सहजपणे म्हणत ती पुढे चालू लागली. तोही तिच्या पाठोपाठ गेला.

ते घरी पोहोचले तर कमलेचे दादा त्यांच्यापूर्वीच तेथे आले होते. ती धावतच त्यांच्याकडे गेली आणि म्हणाली, "दादा, दादा, कुणीतरी आलंय, तुमच्याकडे, बाहेर थांबले आहेत ते आणि पाहुणे कुठं आहेत? मी शोधलं दादा खूप तुम्हांला,

पण तुम्ही मला सापडलाच नाहीत. मी त्या वीज कोसळून पडलेल्या झाडाजवळ होते ना, तेव्हा त्या पाहुण्या माणसाला पाहिलं. ते बाहेर उभे आहेत.''

''असं तू इतक्या दूर जायला नको होतंस! असं इतक्या दूर नाही जायचं ऽ बाळ हं. मी भेटलो त्या मघाच्या पाहुण्यांना. पण आता हा नवा पाहुणा कोण आलाय? पाहिलं पाहिजे.'' असं म्हणत तिचे दादा उठले आणि बाहेर गेले.

कमलेचे दादा असे एकदम वाकलेले आणि अगदी म्हातारे झाल्यासारखे का दिसत होते? आणि बाहेर गेल्यावर त्या पाहुण्याला पाहताक्षणी एकाएकी त्यांच्यात बदल होऊन ते खुश का बरं झाले? त्यांचा चेहरा उजळला आणि डोळे आनंदाने चमकू लागले. त्यामुळे क्षणभरापूर्वी असलेली उदासीनता जाऊन ते एकदम उत्साही दिसू लागले. एक वेगळाच आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसू लागला. संध्याकाळचा उजेड अगदी झपाट्यानं कमी होत होता. तसा काळोखच होता, पण त्या पाहुण्याच्या चेहऱ्याकडे पाहताच नारायणबुवांनी अगदी चटकन त्याला ओळखलं. मित्राला भेटल्याचा आनंद त्या पाहुण्याच्याही चेहऱ्यावर ओतप्रोत उमटला. त्या वृद्ध संन्याशानं शेजारच्या कडुलिंबाच्या झाडाला गच्च पकडलं आणि काही क्षण त्या तरुण पाहुण्याकडे पाहत राहिला. मग त्याच्या तोंडातून शब्द फुटले, ''आलास बाबा एकदाचा! पण अगदी आत्ताच यायला हवं होतं का? हीच वेळ बरी सापडली तुला!''

''शूऽऽऽ बोलू नको काही.'' पाहुणा उत्तरला. ''आपण त्या तिथे पलीकडे झाडी आहे तिथे जाऊ आणि मग बोलू. ती तुझी मुलगी की काय?'' म्हाताऱ्या नारायणबुवांना अगदी गलबलून आलं होतं. पाहुण्याच्या बोलण्याकडे मुळीच लक्ष न देता ते स्वत:शीच पुटपुटले, 'आता फार उशीर झाला मी तरी काय करू?'

आपले वडील इतके व्याकूळ का बरं झाले आहेत? असं काय त्यांना करायचं होतं? असं स्वत:लाच विचारीत कमला पुढे झाली आणि वडलांच्या जवळ जाऊन उभी राहिली. पण ''आत जा पाहू कमला आणि संध्याकाळच्या वेळी अशी एकटी दुकटी भटकू नको. समजलंऽ?'' असं चढ्या आवाजात सुनावून त्यांनी तिला आत पिटाळलं.

थोड्या वेळानं नारायणबुवा एकटेच घरी परतले. मघाचा तो पाहुणा त्यांच्याबरोबर नव्हता. कमला चुलीजवळ बसून आजी स्वयंपाक कशी करतेय ते अगदी लक्षपूर्वक, टक लावून पाहत होती. नारायणबुवा आत येताच त्यांनी कमलेला तिथून उठवलं आणि तिला घेऊन ते बाहेर आले. ते दोघे घरासमोरच्या ओसरीवर जाऊन बसले. आता रात्र झाली होती. आकाशात चांदण्या चमकू लागल्या होत्या. चंद्राचा प्रकाश झाडांच्या फांद्यांमधून झिरपत होता आणि झऱ्याची खळखळ जोरात ऐकू येत होती. कमलानं आपल्या वडिलांच्या मांडीवर डोकं टेकलं आणि ते तिला थोपटत, थोपटत मनातलं गुपित सांगू लागले. ''तुझं लग्न करायचं आता. माझा इलाज

नाही. जनरूढी आहे ही. मघाशीच ठरवलं तुझं लग्न. ते पाहुणे खरं तर तुला पाहायला आले होते. माझी जरा पंचाईत झाली होती पण आता ते सगळं बोलण्यात काही अर्थ नाही. सगळं ठरलंय आता. तुझे सासरे मोठे विद्वान, पंडित आहेत. माझ्या माहितीतले आहेत. त्यांची पत्नी पंडितीणबाई आल्या होत्या मघाशी. तुला मान्य आहे ना बाळा?'' नारायणबुवांनी कळवळून, कापऱ्या आवाजात विचारलं.

लग्नाची कल्पना कमलेला अगदीच नवी नव्हती. आपलं कधीतरी लग्न होणार आहे हे तिला माहीत होतं. म्हातारी आजी उठता-बसता तिचं लग्नाचं वय झालंय, लग्नाचं वय झालंय असा घोषा लावे आणि आता उशीर होतोय, वय वाढतंय म्हणून कुरबुर करीत राही. बाबाही कधीकधी तिची री ओढऽत आणि गमतीनं म्हणत, ''हं ऽऽऽ दिवसेंदिवस ती फारच त्रास द्यायला लागलीय. एकदा लग्न करून दिलं म्हणजे सुटलो मी!''

लग्न म्हणजे आपल्या भावी आयुष्यातील एक छान उत्सवाचा दिवस एवढीच त्या चिमुरडीची लग्नाबद्दलची कल्पना होती. त्यामुळे तिला समजेचना, की आपले वडील असं कळवळून आणि अजिजीनं का बोलताहेत आणि एकदमच ते असे का बरं दिसू लागले आहेत आणि असं तरी ते का बरं म्हणाले असतील, की 'माझा नाइलाज होता. मी मनात दुसरंच योजलं होतं. आता तुला जायला हवं आणि चारचौघींप्रमाणे वागायला हवं, स्वयंपाकाचं खटलं सांभाळायला हवं आणि इतरांच्या आज्ञेत राहायला हवं,' म्हणून.

कष्टच करायचे ना, मग त्यात नवीन काय होतं? आतासुद्धा कष्ट करीत करीतच ती मोठी झाली होती. तिला स्वयंपाकपाणी येत नव्हतं असं थोडंच होतं? आश्चर्यानं डोळे विस्फारून तिनं आपल्या बाबांकडे पाहिलं आणि म्हटलं, ''हो, दादा, मला सगळं काम येतं. तुम्हीच मुळीच घाबरू नका की चिंता करू नका.''

नारायणबुवा तिची नजर चुकवीत म्हणाले, ''नको गं, अशी बघू!'' ती जेव्हा जेव्हा शोधक नजरेनं त्यांच्याकडे बघत असे, तेव्हा तेव्हा ते हमखास असे उद्गार काढीत आणि आपल्या वडलांना अस्वस्थ करणारं असं काय आपल्या डोळ्यांत आहे, याचं तिला भारी आश्चर्य वाटत असे. पण मग त्यांनी तिला जवळ घेऊन कुरवाळलं आणि म्हणाले, ''माझी शहाणी बाळ ती. जिथं जाईल तिथं माझं नाव काढील!''

दुसऱ्या दिवशी लग्नाची तयारी सुरू झाली. त्या दिवशी कमलेच्या विरोधात तावातावानं बोलणाऱ्या गंगीची आई आता कमलाची सासू होणार होती. कमला जिच्याकडे वारंवार जात असे त्या काशीला, कमला गंगीच्या घरात सून म्हणून जावी, ही कल्पना मुळीसुद्धा पसंत नव्हती आणि आपलं वजन वापरून हे लग्न मोडा असं तिनं आपल्या बाबांना सांगितलंही असतं पण आता सगळं ठरलं होतं. लग्न मोडायची वेळ टळून गेली होती.

लग्नाचा दिवस जवळ जवळ येत होता. ज्या दिवसाकडे ती मोठ्या उत्सुकतेनं डोळे लावून बसली होती असा तो तिच्या आयुष्यातील फार महत्त्वाचा दिवस होता. लग्न म्हणजे काय याबद्दल ज्यांना नीटसं काही माहीत नसतं आणि एखादा सण-समारंभ एवढाच अर्थ ज्यांच्या लेखी असतो अशा मुलांना लग्नाचा तो सगळा थाटमाट आणि उल्हास हवाहवासा वाटत असतो. आपल्या लग्नाच्या तयारीकडे कमलाही याच नजरेनं पाहत होती. अखेरीस सीमांतपूजनाची वेळ उगवली. तो सगळा दिवस अगदी धामधुमीचा होता. कमला उत्सवमूर्ती असल्यानं सगळ्यांचं लक्ष तिच्याचकडे होतं आणि त्यामुळे मोठ्या मुश्किलीनं तिला घराबाहेर पडता आलं. त्यामुळे साहजिकच ती काहीशी खट्टू झाली. गेले काही दिवस सतत चाललेल्या घडामोडी, समारंभ यांचा एक चमत्कारिक ताण तिच्या मनावर आला होता आणि त्यात पुढील काळात तिच्या आयुष्यात जो बदल होणार होता त्याच्याबद्दलच्या आशंकेची भर पडली होती. तिच्या भावी सासूनं तिला बोलावून, निष्काळजीपणाबद्दल आणि बेपर्वाईबद्दल वारंवार सुनावलं होतं. तशी ती कमलेला परकीच होती. पण ज्या दोन-पाच वेळा ती कमलेला आपल्या घरी घेऊन गेली होती त्यावरून सून म्हणून आपल्याला त्या घरात काय स्थान असेल याची कल्पना तिला आली होती. आणि आता त्यांनी अंगावर जिन्नस घालून तिला नटवलं असलं आणि तिला कुठे ठेवू, कुठे नको असं करीत असले तरीही तिला या सगळ्याचा ताण आणि थकवा जाणवत होता. पडक्या देवळाजवळ ती थोडीशी रेंगाळली, त्याच्या समोरच्या तलावातल्या स्फटिकवत पाण्याकडे तिनं निरखून पाहिलं, शेजारच्या झऱ्याचा आणि वाऱ्याचा आवाज तिनं कानात भरून घेतला आणि पुन्हा घराकडे वळताना तिचे डोळे एकाएकी पाणावले. आता लवकरच जे घर तिला सोडावं लागणार होतं ते पूर्वी कधीही वाटलं नव्हतं, एवढं तिला प्रिय वाटू लागलं आणि तिची काळजी घेणारी खाष्ट म्हातारी आजीसुद्धा तिला आता आवडू लागली आणि तिचे दादा – त्यांना सोडून जाण्याच्या कल्पनेनं तिची छाती दडपून गेली. ते अगदी निराळेच वडील होते – इतरांपेक्षा खास वेगळे. तिला त्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणाचं प्रेम ठाऊकच नव्हतं आणि जो जिव्हाळा तिला मिळाला होता, तो केवळ असामान्य होता. तिच्या बालपणापासूनच तिचे वडील हेच तिचं सर्वस्व होतं. परिचारक, आधार आणि मार्गदर्शक अशी तिन्ही नाती त्यांच्यात एकवटली होती. पण आता? बिच्चारी कमला!

भविष्यात पुढे काय वाढून ठेवलं आहे याची तिला मुळीच कल्पना नव्हती. एक मात्र तिला माहीत होतं की, आता त्या अवाढव्य पसरलेल्या नवख्या शहरात आपल्याला जावं लागणार आणि अनोळखी, परक्या लोकांबरोबर राहावं लागणार; असा विचार करीत ती जवळच्याच एका दगडावर बसली. पण ही तिची अवस्था फार काळ टिकली नाही. थोड्याच वेळात काही लहानलहान मुलं दंगामस्ती करीत,

'कमला', 'कमला' असं ओरडत तिच्याकडे धावतपळत आली आणि 'तुला आत बोलावताहेत' असा निरोप त्यांनी दिला. दागिने अंगावर घालून पाहायचे होते आणि ते मापाचे आहेत की नाहीत ते पाहून, कमी-जास्त करून देण्यासाठी सोनार थांबला होता. फुलं तर केव्हाच आली होती. 'केवढाले ढीग आहेत फुलां'चे कुणीतरी मोठ्या कौतुकानं उद्गारलं आणि "बरं का कमला लोकही पुष्कळ जमले आहेत. समोरचा मंडप आणि घराभोवतीचे दोन्ही तंबू, सगळं गच्च भरलंय!"

'आणि पदार्थ तरी किती!' आणखी कुणी तरी बोललं, "परसदारी पोळ्या आणि लाडू चाललेत. अक्षरश: ढीगच्या ढीग लागले आहेत त्यांचे. मी आता तिकडे जरा डोकावून आले. तांदळाची पोतीच्या पोती येताहेत. येशीचे गाववाले, दशरथाचा पाटील आणि तो म्हातारा धनगर – सगळ्यांनी तांदूळ, डाळ, तूप आणखीन काय काय खूप आणलंय. "चल, चल, खूप मजा मजा चाललीय. वाजंत्री वाजतेय आणि बरं का, सतत तीन दिवस वाजतच राहाणार आहे."

एवढ्यात आणखी एक घोळका आला आणि श्वासाचाही अवधी न घेता भराभरा आपण काय पाहिलं, ऐकलं ते सांगण्याचा त्यांनी सपाटा लावला. कमलेलाही मजा वाटली आणि तीही मोठमोठ्यानं हसू लागली. त्यातल्याच दोन छोट्या मुलांचे हात पकडून ती आत पळत चाललीच होती, एवढ्यात तिला खालच्या रस्त्यावरून काशीची आई, काशी आणि दोन-तीन मुली आपल्या घराकडे येताना दिसल्या. कमलेला, पाहताच त्या मुली ओरडून तिला हाक मारीत म्हणाल्या, "अगं ये, ये ना इकडे. तिकडे काय करते आहेस? नवरी मुलगी अगदीच खरंच लपून बसलीय की काय? बघ, आम्ही तुझ्यासाठी काय आणलंय!"

कमला त्यांना भेटण्यासाठी धावत सुटली खरी पण काशीच्या आईची धीर-गंभीर मूर्ती पहाताच ती किंचित थबकली, तिनं डोक्यावर पदर घेतला आणि अगदी नम्रपणे, वाकून तिच्या पायावर डोकं ठेवलं. वडीलधाऱ्या माणसांना आणि थोरामोठ्यांना नमस्कार करण्याची रीतच होती तशी. "ऊठ मुली, अशी लाजू नको." असं म्हणून त्या वयस्कर बाईंनी तिला जवळ घेऊन थोपटल्यासारखं केलं, तेवढ्यात त्या मुलींनी चांदीच्या वाटीतून आणलेली चंदनाची उटी कमलेच्या हातापायाला, चेहऱ्याला लावायला सुरुवात केली. "पुरे पुरे! हे सगळं करायला उद्या खूप वेळ आहे. चला आत." असं म्हणत त्या घरात गेल्या. आत जाताच, तिथे जमलेल्या सगळ्या बायकांनी काशीच्या आईला वाकून नमस्कार केला, शिवगंगापूरच्या मामलेदारांची पत्नी होती ना ती! मग त्या तिला बायकांसाठी खास तयार केलेल्या लोड-तक्क्यांनी सजवलेल्या बैठकीकडे अदबीनं घेऊन गेल्या.

"या लग्नप्रसंगी तुम्ही आलात हे खरंच आमचं भाग्यच म्हणायचं" गंगीची आई म्हणाली.

"छे, हो, तसं काही नाही. कमला मला माझ्या मुलीसारखीच आहे. आम्हा

सगळ्यांची ती फार लाडकी आहे. मग तिच्या लग्नाला आल्याशिवाय मी कशी बरं राहिले असते? हे बघा, तिच्यासाठी काय भेटवस्तू दिलीय ती.'' असं म्हणत म्हणत तिनं एक हार बाहेर काढला आणि तो गंगीच्या आईकडे दिला.

''अगंबाई, कशाला एवढं ते! कमला, ऊठ बाळा आणि त्यांना अगदी वाकून नमस्कार कर हो. काशीबाई, तुझ्यामुळे कमला बरीच छान नटली हं!''

कमलेनं पुढं होऊन काशीच्या आईला वाकून नमस्कार केला आणि त्यांच्याजवळ जाऊन बसली. तिच्या डोळ्यांत दाटलेला आर्त भाव आणि तिची करुण, गंभीर मुद्रा बघून त्या बाईंनी तिला जवळ ओढलं आणि म्हणाल्या, ''बिच्चारी गं! आता तुझी आई असती, तर तिनं काही करायचं बाकी ठेवलं नसतं बरं!'' तिची खाली घातलेली मान वर उचलीत त्या पुढे म्हणाल्या, 'मी घालते हा हार तुझ्या गळ्यात.''

इतरही काही दागिने नवरीच्या अंगावर चढविताना, काशीची आई म्हणाली, ''हिची आई, नक्कीच थोरामोठ्याकडची, श्रीमंत असली पाहिजे. गरीब माणसं आपल्या मुलीबाळींच्या अंगावर असे हिऱ्या-मोत्यांचे दागिने घालीत नाहीत. बाकीचे दागिने कुठं गेले असतील, याचंच मला नवल वाटतंय?''

''हिचे वडील इतके विक्षिप्त आहेत की त्यांना काय म्हणावं तेच समजत नाही.'' कुणीतरी उद्‌गारले.

''आणि दागिन्यांबद्दल तर त्याला काहीच माहिती नसणार.'' कमलेची काळजी घेणारी म्हातारी आजी पुटपुटली, ''त्याला पितळ आणि सोनं यातला फरकसुद्धा समजत नाही. पैशाच्या बाबतीत इतका बेफिकीर आणि निष्काळजी माणूस मी जन्मात कधी बघितला नव्हता. तो असं विरक्त आयुष्य जगतोय यात काही नवल मुळीच नाही. कमलेलाही त्यानं अगदी एखाद्या मुलासारखं वाढवलंय आणि तीही अगदी बापासारखीच आहे. कितीतरी पुस्तकांतील आशय सांगेल ती तुम्हांला. अगदी बापावर गेलीय.'' ते ऐकून सगळ्यांनी कमलेकडे पाहिलं आणि त्या हसू लागल्या.

मंडपाच्या बाहेरच्या दर्शनी अर्ध्या भागात पुरुषमंडळी बसली होती. त्यांच्यासमोर फराळाच्या, मिठाईच्या जिन्नसांची ताटं आणि विड्याच्या पानांची तबकं होती. कमलेचे वडील तिथे होते खरे, पण ते जरा मागेमागेच होते. संन्यासी असल्यामुळे पाहुण्यांचे आगत-स्वागत किंवा आदरातिथ्य त्यांनी करणं अपेक्षित नव्हतं. एवढंच काय खाशी-खाशी पाहुणे मंडळी मुद्दाम, आपणहून त्यांच्याजवळ जात आणि बोलत बसत. त्या विरक्त माणसात आता बदल झाला होता. त्यांचे नम्र मस्तक उन्नत झाले होते आणि भव्य कपाळ, काळेभोर तीक्ष्ण डोळे यांनी विचारमग्न वाटणारी त्यांची चर्या अधिकच धीरगंभीर वाटत होती.

✿

# ३.

दुसऱ्या दिवशीच्या समारंभाची तयारी करण्यात रात्र केव्हाच उलटून गेली. साऱ्या पंचक्रोशीतील लोक जमले होते. नवरदेवाकडचे आप्तेष्ट, मित्र-परिवारातील लोक, संन्यासी महाराजांचे खास अतिथी, पायथ्याशी असलेल्या शहरातील शास्त्री-पंडित मंडळी आणि त्यांचे कुटुंबीय, शेजारच्या देवळातील पुजारी अशी सारी मंडळी जमली होती आणि वरकड कामाला मदत करण्यासाठी कष्टकरी[१] लोकही मोठ्या संख्येनं आले होते. आपल्या कष्टकरी मैत्रिणींना, विशेषत: येशीला आणि तिच्या घरादाराला वेगवेगळ्या कामाच्या निमित्तानं या समारंभात सहभागी होताना पाहून कमलेला समाधान वाटत होतं. अगदी बालपणापासून ती त्यांना ओळखत होती. तिच्या आजूबाजूला असलेल्या जंगलाचा, टेकड्यांचा आणि दऱ्याखोऱ्यांचा तो एक हिस्साच होता जणू! दऱ्याखोऱ्यांत घुमणाऱ्या त्यांच्या कुऱ्हाडी-कोयत्यांच्या आवाजाच्या प्रतिध्वनी बरोबरच त्यांच्या गळ्यातून बाहेर पडणारी सुस्वर गीतं नेहमी तिच्या कानांवर पडत. काम करताना चाललेल्या त्यांच्या मोठमोठ्या आवाजातील गप्पांमधून तिला बाहेरच्या जगाविषयी पुष्कळ माहिती मिळे; आणि जेव्हा वाऱ्यावर डुलणारी पायथ्याची हिरवीगार शेतं पिकत तेव्हा ती मोठ्या उत्सुकतेनं, अगदी मन लावून कापणी, झोडपणी, मळणीची कामं ती निरखत बसे आणि त्या काम करणाऱ्यांत आपली जिवलग मैत्रीण येशी आणि तिची भावंडं कुठं दिसतात का ते शोधत राही. त्यांचे वृद्ध वडीलही तिला आवडत. ते काहीही काम करीत नसत पण तरीही, रात्री जेवताना जे चांगलेचुंगले पदार्थ असत ते त्यांना हवे असत. त्यांना त्यांचे आवडते कालवण करून घालणं हे येशीच्या आईचं कामच होतं आणि ते जर नाही मिळालं तर ते येशीच्या आईला मारझोड करीत, पण ती तो मार मुकाट्यानं सहन करे. कधी

१ टीप - मूळ मजकुरात 'शूद्र' असा शब्द आहे. तो मनुष्यजातीला अवमानकारक असल्यामुळे कष्टकरी हा शब्द वापरला आहे.

कधी येशीचा चेहरासुद्धा सुमारल्यासारखा दिसे आणि "का गं, आज चेहरा असा सुजलाय का?" असं विचारलं तर ती हसून म्हणे, "हां, ते व्हय, तसं काही न्हाई. बाबाला कालवण मिळालं नाही, म्हणून मायेबरोबर मलाबी मार पडला." आणि मग आपल्या चेहऱ्यावर हात फिरवून विचारे, "लईच वंगाळ दिसतं काय?' आणि वर हसे. अगदी साधीसुधी माणसं. त्यांच्या त्यांच्या काही बऱ्या-वाईट चालीरीती आणि सवयी होत्या म्हणा; पण एकंदरीनं, ती अत्यंत नेक, प्रामाणिक, कष्टाळू माणसं होती. आपल्याशी चांगलं वागणाऱ्यांच्या जिवाला जीव देणारी होती.

लग्नाच्या दिवशी सकाळी सप्टेंबर महिन्यात एरवी असतो, तसाच हवाहवासा वाटणारा सुखद गारवा होता. सूर्याचे तिरपे किरण टेकड्यांवर पसरले, पानावरचे दवबिंदू चमकू लागले आणि थंडगार, ताज्या वाऱ्याच्या झुळकीनं पानं सळसळू लागली. लालभडक पानांची झुडुपे कडुनिंबाच्या आणि लवलवणाऱ्या कोवळ्या बांबूच्या बेटात मिसळून गेली होती. डोक्यावर सर्वत्र डेरेदार पळस फुलला होता. त्याचा लाल-पिवळ्या पानांचा हिवाळी बहर उठून दिसत होता. आजीची सक्त ताकीद असूनही दरीतील ती सुंदर सकाळ पाहताच खाली उतरण्याचा मोह कमलेला आवरता आला नाही. दवधुतल्या दगडांवरून ती चालत होती. इकडची-तिकडची रानफुलं गोळा करून तिनं ती आपल्या गालावर किंचित दाबली आणि वाऱ्याच्या प्रत्येक झुळकीसरशी ती इतकी हरखून गेली, की आपण नवरी आहोत हे ती जणू विसरूनच गेली. पक्ष्यांची मधुर किलबिल सुरू झाली, चिव-चिव आवाजानं आसमंत भरून गेले, दऱ्या-खोऱ्यांतही तो आवाज घुमू लागला. आता कमलाच्या नसानसांत नृत्य संचारले आणि ती आनंदानं स्वत:शीच गुणगुणत झाडाभोवती नाचत फिरू लागली. घरातली पाहुणी मंडळी आणि नोकरमाणसं आदल्या रात्री खूप उशिरापर्यंत काम करून झोपली होती. ती अजून उठायची असल्यानं कमला घराबाहेर पडू शकली होती आणि मनाला वाटेल तसं वागण्याची मोकळीक अनुभवत होती. एखाद्या बकरीच्या कोकराप्रमाणे या दगडावरून त्या दगडावर उड्या मारत आणि बागडत खुशीत येऊन, ओठावर येईल ते ती गुणगुणत होती.

कमलेचं हे सगळं वागणं कुठल्याशा झाडाच्या आडोशाला उभी असलेली एक व्यक्ती पाहत होती. आदल्या रात्रीच्या मुलीचं हे अगदी अनोखं आणि अनपेक्षित असं दर्शन होतं. कालची ती इतकी बुजरी होती, की तिनं आपली मानही वर केली नव्हती. आयुष्यातील आनंदाला जणू संपूर्ण रामराम ठोकला आहे, असा भाव तिच्या चेहऱ्यावर होता. मघापासून तिच्याकडे पाहणाऱ्या तिच्या सासऱ्याच्या मनावर आताचं हे तिचं रूप कोरलं गेलं. त्यामुळे कमलेच्या स्वभावाची अधिक चांगली कल्पना त्यांना आली. मोठ्या समाधानानं हसत ते पुढे झाले. त्या नवख्या माणसाकडे तिनं चकित होऊन पाहिलं आणि जेव्हा ती व्यक्ती कोण, हे तिच्या

लक्षात आलं, तेव्हा संकोचानं आणि भीतीनं तिच्या काळजाचा ठोका चुकला. 'आपण नाचलो, गायलो यात आपलं काही चुकलं तर नाही? बाकीच्या सगळ्यांना हे कळलं तर ते काय म्हणतील?' या विचारासरशी टिंगलटवाळी, थट्टामस्करी करणाऱ्या मुलींचे चेहरे तिच्या डोळ्यांपुढे तरळले. म्हणून झटकन मान खाली घालून ती किंचित बाजूला सरकली. मामंजींनी प्रेमभरल्या आवाजात बोलायला सुरुवात केली नसती, तर ती पळूनच गेली असतील हे निश्चित!

"अग, थांब, थांब मुली, अशी पळून जाऊ नको. मला वाटतं हा तुझा, सकाळचा नित्यक्रम आहे." कमला त्यांना यापूर्वी एकट्यांना अशी कधीच भेटली नव्हती. इतरांबरोबर त्यांना जेव्हा तिनं पाहिलं होतं तेव्हा ते तिला धीरगंभीर, करारी, कडक आणि दूरस्थ वाटत. पण आताचा त्यांचा प्रसन्न, हसरा चेहरा पाहून तिचा धीर चेपला आणि ती म्हणाली, "खरं म्हणजे मी इथे यायलाच नको होतं. आजीनं फार दूर जाऊ नको असं मला सांगितलं होतं, पण धावता धावता आपण किती दूर आलो ते मला कळलंच नाही." तिच्या या सारवासारवीवर ते हसले आणि म्हणाले, "असू दे. असू दे. बाळ जा तू आत आता."

कमलेला त्या दिवशी अनेक धार्मिक विधींमध्ये सहभागी व्हावं लागलं पण त्यातील रात्रीचे विधी अधिक महत्त्वाचे होते. नवऱ्या मुलाच्या शेजारच्या पाटावर ती बसली होती, सभोवती पितळेच्या समया तेवत होत्या आणि समोर होमाचं कुंड पेटलं होतं. भटजी जे मंत्रपठण करीत होते, त्यातलं अवाक्षरही त्या दोघांना समजत नव्हतं. त्यांच्याजवळ फक्त सासू-सासरे होते आणि त्या मंगल मुहूर्तावर, त्या दोघांची आयुष्यं सांधणारी, कधीही न सुटणारी रेशीमगाठ, ब्रह्मगाठ बांधली गेली. आता यापुढे जिवंतपणीच नव्हे, तर मृत्यूनंतरही, तो जो कुणी माणूस असेल त्याची ती पत्नी आणि मालमत्ता झाली, असं शास्त्रवचन होतं आणि ते मोडायचं नाही, असा दंडक होता. त्या रात्री आणखी एक हृद्य धार्मिक समारंभ पार पडला. त्यानुसार नवरा-नवरी बाहेर चांदण्यात फिरायला गेले आणि त्यांनी आकाश धुंडाळून चंद्राची सखी रोहिणी शोधून काढली. रोहिणी सापडली, की जोडी अक्षय टिकते आणि संसार सुखाचा होतो, अशी समजूत होती.

त्या दिवशी नवरा-नवरी हा थट्टेचा, नर्म विनोदाचा आणि हास्याचा विषय होता. नवरा-नवरीनं उखाण्यातून नाव घेण्याचा प्रसंग हिंदू लग्नात सगळ्यांच्या आनंदाचा आणि करमणुकीचा असतो. त्यावेळीही असंच झालं. भोवती जमलेल्या सगळ्या मुलींनी एकदम गिल्ला केला. नाव घेतल्याशिवाय त्या दोघांना त्या पाटावर बसू द्यायला तयार नव्हत्या. नवऱ्या मुलाकडे प्रथम मोर्चा वळला. 'बायकोचं नाव घ्या पटकन, पाहुणेमंडळी जेवायची खोळंबलीत' त्या म्हणाल्या.

त्या तरुण मुलाकडे काही मार्गच नव्हता. त्यानं यमक जुळवून उखाणा बनविण्यासाठी काहीतरी अक्षरांशी झटापट केली खरी, पण त्याला ते काही जमेना.

अर्धी, पाऊण ओळ त्यानं उच्चारली की हास्याचे फवारे उडत. 'अरे, तो लाजतोय तिला' कुणी एखादा पोक्तपणे शेरेबाजी करे, 'बायकोचं नाव, छानशा उखाण्यात गुंफता येत नसेल, तर त्यानं तिला न नांदवलेलं बरं.''

पुष्कळ चिडवाचिडवीनंतर, अखेरीस त्यानं एक उखाणा कसातरी जमवून म्हटला, 'ताऱ्यात ताऱ्यात माणके, फुलात सर्वश्रेष्ठ फूल कमल, माझी पत्नी!' उखाणा ऐकून हास्याचा आणखी एक फवारा उडाला. 'ताऱ्यात माणके कुणीतरी कधी पाहिली आहेत काय आणि फुलात सर्वश्रेष्ठ फूल गुलाबाचं असतं, तुझं कमळ नव्हे. आजकालची तरुण मुलं अतिशयोक्ती फार करतात' कुणीतरी म्हातारी बाई उद्गारली. ते ऐकून कमला लाजून चूर झाली आणि डोळ्यांच्या कोपऱ्यांतून आपल्या नवऱ्याकडे चोरटा कटाक्ष टाकून तिनं नवऱ्याची प्रतिक्रिया आजमावली. तेवढ्यात तिची पाळी आली आणि तिची अवस्था आणखीनच कठीण झाली. आपल्या नवऱ्याचं गणेश हे अगदीच गद्य नाव लयबद्ध उखाण्यात कसं बसवावं हे तिला मुळीच समजेना. जवळच असलेल्या कुणीतरी कानमंत्र दिल्यावर तिनं उखाणा घेतला–

'वर्षातून एकदाच येते लंबोदराची स्वारी
पण यजमान गणेशपंतांसाठी सज्ज रोज अंबारी.'

कमलेला वाटलं, आपण या प्रसंगातून अगदी सहीसलामत सुटलो, पण तिच्या हे मुळी लक्षातच आलं नाही, की तिच्या नवऱ्यानं ज्या रीतीनं तिचं नाव घेतलं अगदी तसंच तिनं त्यांचं नाव उखाण्यात गुंफलं. ऐकणाऱ्यांना हा मोठाच धक्का होता. एकदम आरडाओरडा आणि हशा यांचा गदारोळ माजला. 'शिव! शिव! सगळे एकजात उद्गारले, "नारळ वाढवा. नारळ वाढवा! तिनं आपल्या नवऱ्याचं नाव घेतलंय, ती अगदी बेमुर्वतखोर पत्नी होणार पुढे, असं दिसतंय. आपल्या यजमानांचं नाव उच्चारतेय!"

"अग, गधडे, तुला माहीत नाही का," एक म्हातारी तिला गदागदा हलवीत म्हणाली, 'नवऱ्याचं नाव बायकोनं ऐकायचं असतं नुसतं, पण उच्चारायचं नसतं कधीच. त्यानं तुझं नाव घेतलं तर चालतं पण तू नाही घ्यायचंस. आता केल्या कर्माचं प्रायश्चित्त घे." अशा तऱ्हेनं त्या प्रकरणावर पडदा पडला.

पुढचे तीन दिवस जेवणावळी आणि मेजवान्यांच्या धामधुमीत गेले. मग कमलेला वरातीतून इतमामानं नवऱ्याच्या घरी-सासरी आणण्यात आलं. तिकडे जायला निघण्यापूर्वी तिच्या वडलांनी तिला बाजूला बोलावलं आणि ते म्हणाले, "मी काही आत्ता तुझ्याबरोबर येत नाहीय. पण जेव्हा तुला माझी आठवण येईल तेव्हा एका शब्दानं हाक मारलीस तरी मी लगेच निघून येईन." एवढं बोलून त्यांनी तिला मिठीत घेऊन तिचा पापा घेतला. त्यांच्या गळ्यात पडून, ती म्हणाली, "हे

काय दादा, तुम्ही का येत नाही आहात?''

आवंढा गिळत, कापऱ्या आवाजात ते म्हणाले, ''इथून पुढे, *माझ्याशिवाय* राहण्याची तुला सवय करायला हवी बाळा.'' वियोगाच्या या क्षणी तिथे *कोणीही* हजर नव्हते. सासरी जाईपर्यंत या वियोगाचा खरा अर्थ त्या मुलीच्या लक्षातच आला नव्हता. तिथं गेल्यावर आपण काय गमावून बसलो आहोत हे तिच्या ध्यानात आलं आणि मग आपले सर्वस्व असलेले दादा परत मिळावे अशी निष्फळ इच्छा तिच्या मनात वारंवार निर्माण होऊ लागली.

एका लांबसडक रस्त्याच्या दोन्ही बाजूला शिवगंगा नगरातल्या ब्राह्मणपुरीतील जाडजूड भिंतीची बैठी घरं दाटीवाटीनं वसली आहेत. प्रत्येक घराला पुढे एक छपरी, ओसरी आहे. त्यातच काही थोडी मोठी घरं, वाडे उठून दिसत आहेत. त्यातील काही एक मजली, तर काही दुमजली! थेट नदीकाठापर्यंत ही घरं विस्तारली आहेत. तिथे त्यांची स्वतंत्र न्हाणीघरं आहेत, शिवाय इतर सर्वसामान्यांसाठी घाटही बांधले आहेत. घरांच्या चौथऱ्यावर, लंगोट नेसलेली, भिकबाळी घातलेली आणि शेंडीची गाठ मारलेली किंवा ती तशीच मागे रुळत सोडलेली, गोरीगोमटी मुलं दिसताहेत. समोरून ती घरं अगदी लहान आणि किरकोळ दिसताहेत *पण मागे मात्र मोठे* परसू आहे, पडघर-सोपा आहे आणि बागही. या घराघरांना जोडणारे बोळ होते आणि पुष्कळवेळा बायका आपली कामं उरकता उरकता या बोळाच्या कठड्याच्या अलीकडून पलीकडून शेजारणीशी चार, दोन शब्द बोलत असत. परसातल्या विहिरींवर नेहमीच वर्दळ असे. विशेषत: गोड्या पाण्याच्या विहिरींवर, तर जवळच्या आणि लांबच्या अंतरावरूनही स्त्रिया आणि मुली आपल्या पितळेच्या, तांब्याच्या, मातीच्या घागरी घेऊन जात.

सकाळची वेळ होती. नदीवर स्नानाला गेलेले पुरुष आणि स्त्रिया ओलेत्यानं आणि हातात पाण्यानं भरलेले चंबू घेऊन घाईघाईनं कुठे-कुठे चालले होते. हवेत तेच तेच आवाज घुमत हाते. चारी दिशांनी जोरात आवाज ऐकू येत होते, 'भाजी घ्याऽ भाजी, दही घ्याऽऽदहीऽऽ.'' फळविक्रेतेसुद्धा मोठ्या जोमदारपणे आपल्या मालाची जाहिरात करीत होते, गमतीशीर आवाज काढीत विशिष्ट लयीत ओरडत होते.

'हंऽऽ, काय आणलंय?' उंच्यापुऱ्या, तगड्या, खास ब्राह्मणी ढंगाची तुच्छता आणि अहंकार यांचं मिश्रण असलेली मुद्रा असलेल्या ब्राह्मणानं विचारलं. त्या रस्त्याला लागून असलेल्या एका मोठ्या वाड्याच्या ओसरीवर तो उभा होता आणि एक कष्टकरी, आपली पायताणं काढून हातात घेऊन मोठ्या नम्रतेनं एक पत्र त्याच्या पुढे करीत होता. मोठ्यानं 'हऽ' असं म्हणून त्या ब्राह्मणानं ते पत्र घेतलं आणि आत गेला. पत्र आणण्याऱ्यानं लगेचच चंची काढली. एका हातावर विड्याची पानं ठेवून त्यावर चुना, कात ठेवून त्यानं पान जमवलं आणि मोठ्या

संतोषानं, स्वत:वरच खूष होऊन, डोक्यावर घागर घेऊन चाललेल्या गवळणींकडे तसेच आडदारानं परसात शिरणाऱ्या फळविक्रेत्याकडे बघून हसू लागला. घराच्या वळचणीला वाढलेल्या मोगऱ्याच्या झाडाच्या मुळाशी खुरप्यानं उकरणाऱ्या माळ्याबरोबर त्यानं हास्य-विनोदही केला.

"आनमान झ्याक हाय, बक्षिसी बी झ्याक मिळणार – पत्तुर नेणारं दादा येत्यालंच इतक्यात" पत्र आणणारा म्हणाला.

"काय, पास झालं का?''

"व्हय. एकदम पास." दुसरा आपल्याला खात्रीशीर माहिती असल्याच्या आविर्भावात बोलला. नोकरमाणसं इंग्रजी शब्द वापरताना जसा विशेष प्रौढीचा आव आणतात, तसाच त्याचा एकंदर झोक होता.

त्याच वेळी तिथे एक बैलगाडी येऊन थांबली आणि एकच धांदल उडाली. गाडीवानानं जोरात हाका मारायला सुरुवात केली, "राम! राम! गोपाल! अरे बाईसाहेब आल्यात."

माळ्यानं टुणकन उडी मारली आणि तो बैलगाडीकडे धावला. त्यानं तीन अर्धे-मुर्धे कपडे घातलेल्या मुलांना उतरवून घेतलं आणि मग वेगवेगळ्या आकाराची लहान-मोठी गाठोडी तो बाहेर काढू लागला. तेवढ्यात घरातली बाकीची मंडळी दारापर्यंत येऊन थांबली होती.

'कोण आलं? कोण आलं? रमाबाई आली की काय?' असा एकच गलका झाला आणि मग कमलाची सासू म्हणवणारी पोक्त बाई पाऊलभर पुढे झाली तशी ती नुसत्या गंज्या घातलेली लहान मुलं धावत जाऊन तिला बिलगली. तिनं त्यांना कडेवर घेऊन त्यांचे पापे घेतले. बैलगाडीतून उतरणाऱ्या पुरुषाकडे पाहून डोक्यावर पदर घेतला आणि साऱ्यांचे कुशल-मंगल विचारलं. सगळी गाठोडी खाली काढल्यावर आईनं रमाबाईलाही हात देऊन खाली उतरण्यास मदत केली. तिची मोठी मुलगी आणि जावईबापू आले होते ना! व्हरांड्यातून खाली मान घालून जाता जाता रमाबाई आदरपूर्वक आपल्या वडलांच्या प्रश्नाला उत्तर देत म्हणाली, "हो प्रवास चांगला झाला."

"छान! छान!" ते वृद्ध गृहस्थ म्हणाले, "आता, आत जाऊन जरा आराम करा. तुम्हांला विश्रांतीची गरज आहे. बरं, मग धनगराच्या खाणावळीच्या तिथे थोडं थांबला होतात की नाही?'

"नाही. आम्ही थेट इकडेच आलो."

"हं, तेही एक परीनं चांगलंच म्हणा. रस्त्यावरच्या वाटमारीच्या आणि दरोड्याच्या रोज नव्या नव्या बातम्या कानावर येताहेत अलीकडे." या वेळेपर्यंत रमाबाईच्या नवऱ्यानं सारं सामान आत आणून ठेवलं आणि तो सासऱ्यांना भेटायला पुढे झाला. तो एक ठेंगणा ठुसका आणि काहीसा बेंगरूळ माणूस होता. ब्राह्मणांत अंमळ

काळाच ठरेल असा होता. रमाबाई लगबगीनं पुढे झाली आणि तिनं हसतमुखानं तिच्याकडे येणाऱ्या काळ्या, लठ्ठ गंगीला, आपल्या लहान बहिणीला मिठी मारली. या सगळयाच्या खूप मागे मधल्या चौकाजवळ एक सुंदर, नाजूक चणीची मुलगी उभी होती. ती पुढे आली नाही पण मान वाकवून रमाबाईकडे पाहू लागली.

"अगंबाई ही कमला वाटतं?" साडीचा पदर सावरीत आणि सामान ठेवलेल्या खोलीकडे नापसंतीचा कटाक्ष टाकीत रमाबाई म्हणाली. तिची तिन्ही मुलं कमलेच्या भोवती गोळा झाली आणि तिच्याकडे टक लावून पाहू लागली. काय करावं ते न उमजून कमला शेजारच्या, रमाबाईचं सामान ठेवलेल्या खोलीत शिरली. रमाबाई काही गाठोडी सोडण्याच्या तयारीत होती इतक्यात गंगी काहीशा चढ्या आवाजात म्हणाली, "आधी बांधून ठेव ते सगळं आणि इतक्यात बाहेर नेऊ नको.' आईही तिथेच होती. सगळ्यांच्या मोठ्या उत्साहानं गप्पागोष्टी चालल्या होत्या. उंबऱ्याशेजारी एकटीच उभी राहून कमला हे सारं पाहत होती.

✿

# ४.

सासरी येऊन कमलेला आता सहा महिने उलटून गेले होते. हे नव्या नवलाईचे तिचे दिवस मोठे सुखाचे होते. गंगी तिच्यावर नाखुष होती हे खरं पण सासूबाई आणि मामंजी हे दोघेही तिच्याशी प्रेमानं वागत. बऱ्याच बाबतीत कमला आपल्यापेक्षा सरस आहे त्यामुळे आपल्याला डावललं जातंय ही भावना गंगीला सहन होईना. सर्वांना आपलंसं करण्याचं कोणतं वैशिष्ट्य कमलेकडे होतं बरं? तिला जरी कुणी कडक शब्दांत बोललं तरी तिच्या भावुक डोळ्यांची छाप ऐकणाऱ्यावर पडे. तिचं मान वेळावणं आणि एकंदर आविर्भाव असा काही विलक्षण असे, की अवतीभोवतीच्या चारचौघांत ती सरस आहे, हे अगदी स्पष्ट होऊन जाई. काही काळापुरती तर गंगीसुद्धा तिच्या मार्दवानं आणि कुठलंही सोपविलेलं काम हौसेनं करण्याच्या स्वभावानं कोड्यात पडत होती. अतिशय काबाडकष्टाची कामंसुद्धा कमला अगदी सहजपणानं करीत होती; कारण तिच्या दृष्टीनं ही कामं ती आपल्या वडलांसाठी करीत होती. तिनं कुठलंच काम करताना मागेपुढे पाहिलं नाही, असंच त्यांच्या कानावर गेलं पाहिजे असं तिला वाटे. तिचे मामंजी खूपसे तिच्या दादांसारखेच होते. कारण एकतर ते शास्त्री होते आणि त्यांनाही जुन्या पोथ्यापुराणांची आवड होती. आपल्या दादांकडे ती ज्या ओढाळ उत्सुकतेनं पाहत बसे तशाच नजरेनं मामंजीकडे पाहिलं, की ते तिच्या पाठीवर मायेनं हात ठेवीत आणि मग पित्याचा सहवास तुटलेली ती आपोआप त्यांच्याकडे ओढली जाई. मामंजींनाही तिच्या वागण्याचं सुरुवातीसुरुवातीला नवल वाटे. त्यांच्या बारीकसारीक गोष्टींकडेही लक्ष पुरविण्याची तिची रीत, तिचे निर्व्याज-निष्कपट वागणं आणि सासऱ्याच्या आणि सुनेच्या नात्यात सामान्यत: जो प्रेमापेक्षा भीतीचा किंवा धाकाचा भाग असतो त्याकडे तिनं संपूर्णपणे केलेलं दुर्लक्ष या सगळ्याचंच त्यांना नवल वाटे. खास त्यांच्यासाठी बनविलेल्या त्यांच्या अभ्यासिकेत पाऊल टाकण्याचं धाडस करण्याची घरातील कोणाची प्राज्ञा नव्हती पण ती मात्र आपलं काम उरकल्यावर निर्भयपणे तिथे जाई,

शांतपणे तिथले ग्रंथ नीट लावे आणि अभ्यासात, चिंतनात मग्न असलेल्या मामंजींकडे मोठ्या लाघवीपणे पाहत राही. सुरुवातीसुरुवातीला तिच्या या वागण्यानं ते अस्वस्थ होत पण हळूहळू त्यांना सवय झाली आणि नंतर तर ते ती केव्हा येईल याची वाट पाहू लागले. त्यांच्या वाचनामध्ये, अध्ययनामध्ये मदत करावी यासाठी तिची धडपड चालू असे आणि अशातच एके दिवशी पुस्तकात काय आहे, याचीही तिला माहिती आहे हे कळल्यावर तर त्यांना फारच आश्चर्य वाटलं. झालं असं की, एकदा ग्रंथ साफसूफ करून लावण्याचं काम करीत असताना ती अगदी सहजपणे म्हणाली, "मी हा ग्रंथ वरच्या फळीवरील उत्पत्तीविषयक श्लोकांच्या रांगेत ठेवू का की तो आज लागणार आहे तुम्हांला?" प्रश्न ऐकताच गर्रकन वळून त्यांनी विचारलं, "तुला या श्लोकांबद्दल काय बरं माहिती आहे?" थोडंसं बिचकून तिनं वर पाहिलं आणि म्हणाली, "हो, मला माहीत आहेत ते श्लोक. माझ्या दादांना ते खूप आवडत असत. मला अन्वयार्थही येतो लावता त्यांचा."

ओह! काळेभोर टपोरे डोळे. निर्व्याजतेचं, प्रेमाचं आणि विश्वासाचं विश्वच जणू त्यांतून प्रस्फुटत होतं. ती नजर आपल्या अंत:करणातून आरपार विंधते आहे असं त्यांना वाटलं. अगदी मृदू भाषेत त्यांनी विचारलं, "श्लोक समजतात तुला? म्हणजे वाचता येतं तुला?"

"येतं थोडं थोडं" नि:श्वास टाकून ती म्हणाली, "पण खरं म्हणजे दादा मला खांद्यावर टाकून, झोपवत असत ना, तेव्हा हे श्लोक पुन:पुन्हा म्हणत असत. अगदी तेव्हापासून ते मला माहीत आहेत."

"आणि वाचायला कुणी शिकवलं बरं तुला?"

"मला ठाऊक नाही, कसं शिकले ते. लहानपणी मला वाळूत रेघोट्या मारण्याचा खेळ खेळायला खूप आवडायचं. तसं खेळताना शेजारी बसवून दादा अक्षरं गिरवायला लावायचे. माझं चुकलं की दुरुस्त करायचे आणि म्हणायचे, 'ग्रंथांचं सतत वाचन करणाऱ्या माणसाच्या मुलीलाही वाचता यायला पाहिजे बरं!' आणि पुढे म्हणत की लक्ष्मीलासुद्धा वाचता येत होतं."

"आणि ही लक्ष्मी कोण?" मामंजी.

"ते माझंच दुसरं रूप असावं, कारण ते मला कित्येकदा लक्ष्मी म्हणून हाक मारीत आणि जणू ती फार पूर्वी होऊन गेली असावी असं काहीतरी तिच्याबद्दल बोलत असत. माझी सावली आहे ती असं मला वाटे, कारण त्यांच्यापुढे कमला असे आणि तिच्यामागे लक्ष्मी – तिची सावली! मजेदार वाटतंय ना हे सगळं?" असं म्हणून हसत तिनं आपल्या ओंजळीत चेहरा लपविला. तिच्या निरागस वृत्तीबद्दल मनातल्या मनात नवल करीत ते तिच्या डोक्यावर हळुवार थोपटीत राहिले.

कुणा सुनेनं आपल्या सासऱ्याबरोबर एवढ्या सलगीनं बोलणं आणि त्याच्या

विशेष मर्जीतील असणं, हे एकंदरीनं रीतीला आणि कुटुंबातील सासरा-सून संबंधाबाबतच्या शिष्टसंमत रिवाजाला धरून नव्हतं. कमलाच्या वागण्याचा गैर अर्थ काढण्यासाठी गंगीला हे आयतंच निमित्त सापडलं. तिनं कमलावर नाही नाही ते आरोप केले, भलतीसलती दूषणं दिली. 'कमला तिला आणि तिच्या आईला पाण्यात पाहते, ती कमालीची उद्धट आणि चढेल आहे. आपला तोरा लपविण्यासाठी तिनं नम्रतेचा खोटा बुरखा पांघरला आहे. ती भराभरा कामं उरकते कारण तिला सासऱ्याजवळ नणंदेच्या आणि सासूच्या चहाड्या सांगायच्या असतात,' अशा अनेक तक्रारी गंगीनं जमेल तिथे, जमेल तेव्हा ज्याच्या त्याच्यापुढे केल्या. सुरुवातीला गंगीच्या कागाळ्यांकडे तिच्या आईनं फारसं लक्ष दिलं नाही. उलट कमलेचा कैवार घेतला. ती म्हणे, "अगं, बिच्चारी मुलगी. वडिलांच्या प्रेमाला दुरावलीय. त्यांच्याकडून मिळतंय पितृप्रेम तर घेऊ दे ना, बापडी!"

गंगीची आई ही एक साधी-सरळ, सहजपणे दुसऱ्याच्या बोलण्यात येणारी, चटकन कुणाच्याही कह्यात जाणारी, इतरांच्या तंत्रानं वागणारी आणि एखाद्या प्रसंगी भावनेच्या आहारी जाऊन अद्वातद्वा बोलण्याची सवय असलेली बाई होती. त्यामुळे गंगीच्या सतत चाललेल्या भुणभुणीचा तिच्यावर परिणाम झाला आणि ती 'घराकडे लक्ष नसल्या'बद्दल नवऱ्याला टाकून बोलू लागली. कमलाच्या विरुद्ध त्यांचे कान फुंकू लागली. "दिसत नाही का तुम्हांला, कमलापुढे गंगी अगदीच सुमार दिसते ते? आणि तरीही तुम्ही तिला उजवण्याची काहीच खटपट करीत नाही. तिचे जिन्नस, दागदागिने काय किंवा कपडे काय अगदीच कमी किमतीचे आहेत, पण तुम्हांला त्याचं काय पडलंय? तुमचं सगळं लक्ष सुनेकडे! ती घरातच राहाणार आहे ना? लोकांचं बोलणं ऐकून ऐकून तर कान किटले माझे. म्हणे काय, तर तुम्हांला किती चांगली सून मिळालीय, किती सुंदर आहे. कुठं मिळाली इतकी चांगली सून तुम्हांला? पण माझ्या मुलीकडे कुणाचं लक्षच नाहीय, कुणी तिची विचारपूस करीत नाही. आता आपला मुलगाही तुमच्या पावलावर पाऊल ठेवून वागू लागला तर काय होईल, काही कल्पना आहे का? ती त्याला आपल्यापासून दूर करील आणि मग आपल्याला कोण आहे? कुठं जायचं आपण? तो आपल्याकडे ढुंकूनही पाहायचा नाही. छे, बाई कुठल्या कुमुहूर्तावर तिनं या घराच्या उंबऱ्यावरचं माप ओलांडलं, असं झालंय मला. नातेवाइकही कुजबुजू लागलेत. गंगीच्या मनात कमीपणाची भावना निर्माण झालीय." असं बडबडत राहून ती त्या वृद्ध माणसाच्या मनात विष पेरू लागली. त्यानं मंदिरात जाताना कमलेला सोबत नेण्याचं बंद केलं. तसंही हा मान घरातल्या इतर कुणालाही न मिळता फक्त कमलेलाच मिळाला होता. आता कमलाच्या बारीकसारीक वागण्याकडेसुद्धा संशयाने पाहिलं जाऊ लागलं आणि मामंजींनीही तिच्या बाबतीत अलिप्ततेचं धोरण स्वीकारलं. गंगीचा विजय झाला आणि कमला उदासीन होऊन कुठल्यातरी कोपऱ्यात बसून मूक अश्रू ढाळू

लागली. ती करू तरी काय शकत होती? मामंजींचं मन दुखावणारं असं तिच्याकडून काहीतरी झालं होतं हे नक्की; कारण जेव्हा जेव्हा ती मोठ्या उत्साहानं त्यांच्याकडे जाई तेव्हा तेव्हा ते तिला दूर सारत आणि एखादं काम सांगत. ती त्यांच्याकडे वारंवार नजर टाके आणि त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न करी; पण ते म्हणत, "वडीलधारी माणसं काम करीत असताना मुलींनी शांत बसलं पाहिजे." ही तशी किरकोळ बाब होती. पण त्यामुळे तिचा निर्व्याज आनंद करपून गेला आणि उत्साहावर विरजण पडलं.

आपल्या नवऱ्याबद्दल तिला फारशी माहिती नव्हती. लग्न झाल्या झाल्या लगेचच तो शेजारच्या शहरात शिकण्यासाठी म्हणून निघून गेला होता. परीक्षा संपवून मगच तो येणार होता. लग्नाच्या वेळी त्याच्याजवळ उभी राहताना किंवा जेवायच्या पंक्तीत त्याच्या शेजारी बसल्यावर तिला अगदी अवघडून गेल्यासारखं वाटलं होतं, एवढंच नव्हे, तर तिथून पळ काढण्याच्याही ती प्रयत्नात होती; असं तिला अंधुक अंधुक आठवत हातं. तिला माहीत होतं की त्या समारंभानं आणि नंतरच्या गोंधळाने त्यांना कुठल्यातरी रहस्यमय रीतीने एका गूढ धाग्यात गुंफून टाकलं होतं. पण तिला त्याची आठवण येत नव्हती किंवा त्याला भेटण्याची फारशी उत्सुकताही वाटत नव्हती. बाहेरचं जग तिला वारंवार खुणावत होतं, तिचं लक्ष खेचत होतं. आपल्या वयाच्या मुलींमध्ये ती मिसळू लागली आणि त्यांच्या गप्पांमधून तिला एका नव्याच पण भयंकर जगाचं दर्शन घडलं. तिचं आयुष्य आता बालपणीचं निर्व्याज आयुष्य राहिलं नव्हतं. तेव्हाचं ते निष्पाप, निरागस स्वातंत्र्य आता संपुष्टात आलं होतं. तिला समजलेल्या अनेक गोष्टींनी ती अगदी गांगरून, घाबरून गेली होती. आश्चर्यानं आणि भीतीनं तिचे डोळे विस्फारत आणि ती अधिकच गुमसुम, अधिकच एकलकोंडी होई.

कमलेच्या चार खास पट्ट मैत्रिणी होत्या. त्या अगदी शेजारीच राहत असत आणि ती त्यांना वरचेवर भेटत असे. सुरुवातीला या दागिन्यांनी नटलेल्या नव्या नवरीला आपल्यात सामील करून घ्यायला त्यांनी बरीच टाळाटाळ केली. त्यांना आतून तिचा हेवाही वाटत होता. पण तिनं आपल्या मनमोकळ्या निष्कपट वागण्यानं त्यांची मनं जिंकली. एके दिवशी ब्राह्मण कुटुंबात सहसा न घडणारी गोष्ट केल्याबद्दल, म्हणजेच सासू-सासऱ्यांचं मन जिंकल्याबद्दल त्यांनी तिची खूप थट्टा-मस्करी केली. 'तू त्यांना आपल्या बोटाच्या इशाऱ्यावर नाचवतेस' त्या म्हणाल्या, "आम्ही तर ऐकलंय, की तुमच्या घरात साखरेच्या पाकाचे झरे वाहाताहेत म्हणे. आईवडील दोन्ही नसतानाही तुला कसं बरं जमतं हे? असा काय जादूटोणा केलास तू?"

"नाही गं, मी तसलं काही केलेलं नाही." डोळ्यांत पाणी आणून कमला पुढे म्हणाली, "आणि तुम्ही म्हणता, तसंही काही नाहीय गं."

“हो, आम्हांला आधीच कल्पना होती, की या तुझ्या स्थानावरून खाली यायला तुला फार वेळ लागणार नाही. तशीच प्रेमळ (!) नणंद लाभलीय ना तुला.”

“नाही, तसं नाही.” असं बजावून कमला पुढचं काही स्पष्टीकरण देण्याच्या तयारीत असतानाच, त्यांच्यातल्या वयानं थोडी मोठी असलेल्या उंच, सावळ्या भागिरथीनं तिला चूप केलं आणि म्हटलं, “हो, हो, आम्हांला ठाऊक आहे सगळं. आम्ही सगळ्यासुद्धा या सर्वातून गेलो आहोत. आम्हांला आश्चर्य वाटतं ते तुझ्या मूर्खपणाचं आणि त्यांच्यावरील विश्वासाचं. तेव्हा बाई गं, अशी निराश, नाराज होऊ नकोस. आमच्या प्रत्येकीच्या संसारात काही ना काही कटकटी आहेत आणि कुणालाही तुला वाटतात तसे प्रेमळ सासू-सासरे आणि नणंद नाही समजलं? आणि हे पण समजून अस की, आज ना उद्या, कधी तरी असेही दिवस येतील, की त्यांचा किंवा नवऱ्याचा मार खाल्ल्याशिवाय तुझा दिवस मावळणार नाही. नाहीतर ते तुझ्या अन्नात विष कालवतील. अशी डोळे विस्फारून काय बघतेस? तुझ्या आईनं यातलं काहीच सांगितलं नाही का तुला? हो, पण तुला आई नाहीय ना. बिच्चारी! फारशी मारपीट सहन करण्याची ताकद दिसत नाही तुझ्यात.”

“पण सगळ्यांनाच या दिव्यातून जावं लागतं. तेव्हा घाबरू नकोस. स्त्रीचं प्राक्तन आहे हे. म्हणतात ना, स्त्री जन्मा ही तुझी कहाणी.” शास्त्रींची मुलगी रूक्मा म्हणाली.

“पण ते मला का म्हणून मारतील?”

“अर्थातच, तुझ्या गैरवर्तनाबद्दल. गैरवर्तन हेच नेहमी कारण असतं. समजा, तुझ्या नणंदेनं तूप सांडलं असलं आणि तू नुसती जवळपास जरी असलीस तरी, ते तूच सांडलं असं होईल. तो तुझाच अपराध ठरेल.”

“बरं का, काल रात्री मला मार पडला.” बारा वर्षांची, ऋजू स्वभावची, देखणी हरणी डोळ्यांत पाणी आणून सांगू लागली, “कारण माझे यजमान जेवले नाहीत. सासूबाई म्हणाल्या, “माझ्यामुळे झालं असं.” रडून, ओरडून, त्यांच्या पाया पडून सांगितलं, की मला यातलं काही माहीत नाही तरी त्यांनी मला मारलं आणि उपाशीही ठेवलं.”

“हे काहीच नाही.” भागीरथी म्हणाली, “जरा आणखीन मोठी हो, मग यजमानांच्या वागण्याबद्दल तुला काय काय सोसावं लागतं पाहा.” पलीकडच्या गल्लीतल्या सीतेबद्दल ऐकलंस ना? बिच्चारी मुलगी. तिच्या यजमानानी तिच्याजवळचे दागिने मागितले. आता ते दागिने काही तिचे नव्हते हो. तिच्या सासूबाईंनी तात्पुरते तिच्या अंगावर घातले होते ते. तिनं दिले नाहीत म्हटल्यावर त्यांनी चक्क कोल्हाटीणच आणलीन घरी तर काय आणि सीतेनं दागिने दिल्याशिवाय ही इथून जाणार नाही म्हणाले.”

हे ऐकताच अभावितपणे कमलेचा हात आपल्या गळ्यातल्या हाराकडे गेला

आणि ते पाहून सगळ्या खो खो हसू लागल्या.

"नाही, नाही, असला जिन्नस नव्हे गं. हा अगदीच लहान बाळाच्या गळ्यात शोभण्यासारखा आहे. तुझ्या यजमानांचं लक्ष नाही जायचं बरं त्याच्याकडे."

"पण त्यांना हवा असेल तर लगेच देऊन टाकीन मी." कमला सहजपणे म्हणाली, "म्हणजे मग ते मला मारणार नाहीत."

कमलेच्या या निर्व्याजतेनं भागीरथीचं मन हेलावून गेलं. तिनं तिला जवळ ओढलं आणि म्हणाली, "नाही बाळा, कुणी नाही मारणार तुला. कोणी मारेल, तर त्या एकेकाचं बघून घेईन मी. खरं म्हणजे, आम्हीच तुला हे सगळं सांगायला नको होतं. देव तारी, त्याला कोण मारी? तू जा आता घरी आणि ते सांगतील त्याप्रमाणे वाग आणि आपल्याला मार पडेल असं मनातही काही आणू नको."

"किती साध्या, सरळ मनाची आहेस गं." आतापर्यंत घडत असलेलं सगळं शांतपणे पाहत असलेली लठ्ठ, थोराड बांध्याची भीमा कमलेच्या जवळ जात म्हणाली, "चल तुझी माझी गट्टी."

"मी पण तुमच्या गट्टीत" देखणी हरणीपण म्हणाली; आणि मग त्या चौघीजणी कमलाजवळ आल्या. त्यांनी क्षणभर स्तब्ध होऊन एकमेकींच्या हातावर हात ठेवले. त्यांच्या त्या खऱ्या मैत्रीच्या आविर्भावाकडे पाहून कमलाच्या डोळ्यांत अश्रू चमकले.

घरातल्या मंडळींनी कितीही कान फुंकले, तरी कमलेच्या मामंजींना कमलेबद्दल जिव्हाळा वाटत होता. त्यांच्या मनात तिच्याबद्दल एक हळवा नाजूक कोपरा होता. आपल्याला तिच्याबद्दल काही वाटत नाही, असा त्यांनी केवळ आव आणला होता. तसे ते मनाचे पक्के निश्चयी होते आणि एकदा एखादी गोष्ट त्यांना पटली, की मग ते ती सहजासहजी बदलत नसत. आपली सून चारचौघींसारखी नाही, हे त्यांना उमजून चुकलं होतं आणि म्हणूनच त्यांनी मनोमन तिचं पालकत्व पत्करलं होतं. तिच्या लग्नाच्या दिवशी सकाळी पाहिलेला प्रसंग त्यांच्या स्मृतिकोशात पक्का रुतून बसला होता. तिचं सृष्टीशी एकरूप होणं आणि निसर्गाच्या सहवासात निर्भरतेचा अनुभव घेणं हे केवळ अनोखं आहे, चारचौघींसारखं नाही याची त्यांना खूण पटली होती आणि म्हणूनच बाकी काही गुणदोष अंगी असले तरी ती ठकवाठकवी करील, यावर त्यांचा विश्वास बसत नव्हता. तरीसुद्धा केवळ बायकोच्या म्हणण्याखातर त्यांनी कमलेला वारंवार अभ्यासिकेत येण्याची मनाई केली होती. पण या घरात माप ओलांडून आल्या दिवसापासून जेवणापूर्वी हात धुण्यासाठी कमलेनं त्यांच्या हातावर पाणी घालावं आणि त्यांचं जेवण होईपर्यंत त्यांच्या शेजारी बसावं असा त्यांनी रिवाज ठेवला होता. त्यांच्याजवळ बसायला तिलाही मनापासून आवडे आणि जरी घरात बाकी कितीतरी बदल झाले असले, तरी हा परिपाठ मात्र चालूच राहिला होता. पण अगदी आलेल्या दिवशीच तिच्या नणंदेनं, रमाबाईनं कमलेला आत जाऊन उभी राहण्यास फर्मावलं. कमला नसल्याचं लक्षात येताच

तिच्या सासऱ्यांनी चौकशी केली. तसा त्या मुलींना बापचा फार धाक होता. त्यामुळे आपण कमलेशी नीट वागत नाही हे वडलांना समजू नये म्हणून उत्तरादाखल रमाबाई तत्परतेनं पुढे येऊन म्हणाली, "हं, ती बसेल आमच्याबरोबर बायकांच्या पंक्तीला."

"नीट लक्ष द्या तिच्याकडे. ती बिच्चारी अगदीच कमी जेवते." असं म्हणून मामंजींनी कमलेला बाहेर बोलावलं. पण तिच्याकडे दुसरं कुठलं तरी काम सोपविलं होतं. त्यामुळे त्या वेळी आणि त्यानंतर कधीच कमला मामंजीच्या जेवणाच्या वेळी त्यांच्यासमोर गेली नाही.

एके दिवशी घरातल्या सगळ्यांनाच संध्याकाळी कुठल्याशा समारंभाचं आमंत्रण होतं. दोघी बहिणी-बहिणी चांगल्याचुंगल्या साड्या नेसल्या. 'कमलेलाही न्या गं बरोबर' आई म्हणाली. "कमलाची तिथे कोणाची ओळखपाळख नाही, तेव्हा नेऊन काय उपयोग?" असं त्या दोघींनी उत्तर दिलं. "आम्ही कमलेचे काही दागिने घालून जाऊ का?" असं त्यांनी आईला विचारलं. म्हणून मग कमलानं आपले सगळे दागिने, अगदी दादांनी दिलेला हार आणि कुड्यासुद्धा त्यांना देऊन टाकल्या. हार आणि कुड्या गंगीनं घातल्या. नटून-थटून दोघी बहिणी बाहेर पडल्या. तेवढ्यात काशी घरी आली. कमलेला अगदी हताश-उदास वाटत होतं पण काशीला पाहताच तिचा चेहरा उजळला आणि ती तिच्याकडे धावली पण काशीनं काहीशा रागानं तिला दूर ढकललं.

"तुला असला मूर्खपणा करायला कुणी सांगितलं होतं? त्या कार्टीला दागिने द्यायचं काय नडलं होतं? मी आत्ताच तिला बाहेर पाहिलं. आता मी तुला कशी माझ्याबरोबर नेऊ! रामचंद्रपंतांकडच्या उत्सवाला तुला बरोबर घेऊन जावं म्हणून इतक्या दुरून मी आले. फार मोठा उत्सव आहे आणि सगळं जग जमतं तिथे. म्हातारे-कोतारे, आंधळे-बहिरे आणि विधवा सोडून अख्खं गाव येतं तिथे! अगंबाई आणि हे गं काय? असं डोळ्यांत पाणी का तुझ्या? आणि चेहरा का, उतरलाय एवढा? काही होतंय का? बरं नाही का वाटत?"

"हं! मला कुठ्ठं जायची इच्छा नाही. तू थोडा वेळ माझ्याजवळ बैस म्हणजे झालं. का कुणास ठाऊक, मला उदासउदास वाटत होतं. माझी तिथे कोणाशी ओळखपाळख नाही म्हणून मी जायचं नाही म्हणे! असं मला आधी कधीच झालं नव्हतं. आपल्या माहेरी जावं असं मला फार वाटतंय."

"खरी गोष्ट अशी आहे, की या घरातले लोक तुझ्याशी प्रेमानं वागत नाहीयत आणि कुठंतरी, काहीतरी बिनसलंय. काहीतरी पाणी मुरतंय. पण ते जाऊ दे. आता वेळ घालवून चालणार नाही." असं म्हणून काशीनं आपल्या अंगावरचे दोन हार काढले आणि तिला देत म्हटलं, "हं. हे घाल पटकन हं आणि आता छान दिसतेस. चल पटकन! या अगदी थोड्या दागिन्यातही तू किती साजिरी दिसतेस. आता मजाच

करू त्यांची आपण.''

''पण सासूबाई...?''

''मी आधीच त्यांना विचारून परवानगी काढलीय. त्या तुला ने म्हणाल्यात.'' कमलेचे डोळे आनंदानं चमकले आणि सारं दु:ख विसरून ती काशीबरोबर गेली. ती संध्याकाळ तिनं काशीबरोबर मोठ्या मज्जेत घालविली.

रमाबाई आल्यापासून घरात चांगलीच गडबड उडाली होती. ती सारखी वर-खाली, इकडे-तिकडे धावपळ करी आणि सगळ्यांशी मोठमोठ्या आवाजात गप्पा गोष्टी करी. ती वारंवार आईला आपल्या खोलीत घेऊन जाई आणि तिथे नाना प्रकारचे बेत करी. तिचा नवराही नेहमी तिच्याबरोबर असे आणि तोही चर्चेत भाग घेई. एखादे वेळी तो विरोधही करी, पण क्वचितच. एरवी, तिच्यासारखी त्याचीही बडबड चाले. रमाबाईच्या नवऱ्याला कमला लग्न होऊन या घरी आलेली मुळीच आवडलेलं नव्हतं, कारण त्याच्या मनात दुसरीच कुणीतरी या घरी सून म्हणून यावं असं घोळत होतं. म्हणून ज्या प्रकारे हे सगळं घडलं ते सगळं चुकीचंच झालं असं त्याला वाटत होतं. त्याला आपल्या चाणाक्षपणाबद्दल फार गर्व होता आणि त्यामुळेच कमलाच्या चांगल्या वागण्यामध्ये आणि गुणांमध्येही तो काही ना काही खोड शोधत होता, त्याचे वाईट, वेगळे अर्थ लावीत होता. ''वा:! छान, चांगल्या प्रतिष्ठित गृहस्थाचा एकुलता एक मुलगा आणि त्याचं लग्न कुणाशी तर, कुणा भणंगाच्या मुलीशी! आईचा पत्ता नाही, कोण कुठली माहीत नाही आणि बाप भटकतोय दारोदार! काही तोलामोलाचं बघायला नको? पण नाही, किती पायऱ्या खाली उतरायच्या याला काही नेम? आणि अशी इतकी काय घाई होती? मला वाटलं होतं तुम्ही थांबाल एखादं दुसरं वर्ष! पण नाही! काय तर म्हणे, लिहिता-वाचता येतं. नवऱ्यापेक्षा बायको हुशार! असेच दिवस येणार आता. आत्ताच ती घरातली मानाची मालकीण होऊन बसलीय आणि उद्या तो नवरा म्हणवणारा आला म्हणजे आणखी काय काय करामती करेल, कोण जाणे!'' अशी पुष्कळ बडबड तो करीत राही. आपण सुचविलेल्या मुलीशी लग्न न केल्यामुळे घराचं केवढं मोठं नुकसान झालंय, तेही वारंवार सुनावत राही.

''ती तालेवाराची, थोरा-मोठ्याची लेक आहे.'' तो म्हणे, ''तिच्याशी योग जुळून आला असता, तर तुमचा मुलगा कुठल्या कुठं गेला असता. आता अजूनसुद्धा, मला कसं सांगावं ते कळत नाही, पण जरा कठीणच आहे.'' असं काहीतरी, सूचक बोलून तो थांबे. त्याच्या मनात अजूनही काहीतरी घोळत असावे असे वाटावे अशा संदिग्ध भाषेत तो बोले. कमलेचं पूर्वी कोणाशी तरी लग्न ठरलं होतं आणि ते लग्न न झाल्यामुळे तो माणूस भलताच निराश झाला आहे, असंही काही त्याच्या बोलण्यात येई.

या सगळ्या चर्चा आणि तावातावानं होणाऱ्या गप्पा यांचं गमक काही कमलेच्या

लक्षात येत नसे. या सगळ्यात तिचे मामंजी मुळीच नसत. एवढंच नव्हे, तर ते जवळपास दिसले तरी सगळे धाकानं बसल्यासारखे गप्पगार होत. रमाबाई मात्र त्यांच्यासमोरसुद्धा काहीकाही माणसांबद्दल आणि.घडून गेलेल्या प्रसंगाबद्दल खुशाल शेरेबाजी करीत असे. तिची उत्साही आणि धडपडी वृत्ती कमलेला आवडत असे. पण मग आपला उत्साह आणि धडपड कुणी का लक्षात घेत नाही याचं तिला नवल वाटे. एकदा अगदी नकळतपणे ती त्यांच्या गप्पा चालल्या होत्या तिथे गेली तर, जणू त्यांच्यावर आरिष्ट कोसळलं असे चेहरे करून सारेजण तिच्याकडे पाहू लागले. तिच्या चालण्याकडे आणि आविर्भावाकडे सगळेजण रोखून पाहू लागले. त्यामुळे तिला इतकं संकोचल्यासारखं, वरमल्यासारखं झालं की, ती झटकन एका कोपऱ्यात जाऊन बसली. आपणच त्यांच्या गप्पांचा आणि चर्चांचा मुख्य विषय आहोत, हे तिला माहीत नव्हतं आणि याचीही कल्पना नव्हती,. की तिचे यजमान परीक्षेत पास होऊन त्यांना सरकारी नोकरी मिळाली होती. त्यामुळे चर्चेचा ओघ त्यांच्याकडेही वळत होता.

✿

# ५.

रात्रीची वेळ होती. एकामागोमाग एक उभ्या असलेल्या डोंगरांचे उग्र, उत्तुंग सुळके पार आभाळात घुसून आभाळ भेदत होते. चंद्राचं पिठूर चांदणं साऱ्या वातावरणाच्या विलोभनीयतेत आणि विश्रब्धतेत भर घालीत होते. पाठोपाठ उभ्या असलेल्या डोंगरांच्या विशाल कातळ कड्यांवरील चांदण्याच्या अद्‌भुत आवरणामुळे ती जणू काही बर्फाच्छादित पर्वतरांग आहे, असा भास होत होता. सारेच कसे भव्य-दिव्य आणि अपरा सृष्टीतले, अपूर्व वाटत होते. जवळच्या घनदाट झाडा-झुडपातून टिमटिम प्रकाश झिरपत होता. डोंगराच्या उतारावरील झाडांनी कडेकपारी-खोल खबदाडे आणि हिडिस विवरं या सगळ्यांवरच पानांच्या मऊ पिसाऱ्याचं पांघरूण घातलं होतं. खाली पायथ्याला किर्रर, दाट जंगल होतं. इतस्तत: विखुरलेली चंद्रकिरणं एखाद्या एकट्या पडलेल्या झुडपाला किंवा उभ्या कड्यावर एकाकीपणे उभ्या असलेल्या झाडाला अलगद स्पर्श करीत होती, सुखवीत होती. अलीकडच्या पलीकडच्या डोंगरातून व टेकड्यांतून वाहणारे, चंद्रप्रकाशात वितळलेल्या रूप्याप्रमाणे भासणारे पाण्याचे धबधबे, धो-धो आवाज करीत खाली कोसळत होते आणि गर्द झाडीनं भरलेल्या दरीत लुप्त होत होते. या सगळ्या दृश्यात मधोमध असलेले पठार उठून दिसत होते. त्या पठारावर जप-तप, ध्यान-धारणा करणाऱ्या काही विरागी, संन्यासी लोकांचे मठ होते. तिथे आता दोन माणसं अगदी गंभीरपणे परस्परांशी बोलत बसली होती. त्यातला एक होता कमलेचा पिता. उंच, हडकुळी अंगकाठी, मानेला आणि पाठीला पोक आणि शून्यात डोळे लावून बसण्याची लकब ही सगळी वैशिष्ट्यं नेहमी आपल्याच तंद्रीत आणि आपल्याच स्वप्नांच्या प्रदेशात वावरणाऱ्या नारायणबुवांची होती! असं काय घडलं होतं की ज्यामुळे त्यांनी आपलं अर्धं अधिक आयुष्य अशा या निर्जन डोंगरकपारीत एकांतवासात घालवलं? या ध्यान-धारणेत, जप-तपात असा कोणता सुखाचा साठा त्यांना गवसला होता? त्यांचं पूर्वायुष्य होतं तरी कशा प्रकारचं? आणि इतर बैरागी, संन्याशांना असते तशी धन, भेटी आणि

देणग्यांबद्दल त्यांना काडीमात्रही फिकीर का बरं नव्हती? त्यांच्याबरोबर गप्पा मारीत बसलेला माणूस म्हणजे दुसरातिसरा कोणी नसून कमलेच्या वाङ्‌निश्चयाच्या दिवशी संध्याकाळी अनपेक्षितपणे भेटलेला त्यांचा तरुण मित्रच होता.

'रामचंद्रा' नारायणबुवा म्हणाले, "मला तुझंही आणि माझंही फार वाईट वाटतंय. पण आता फार उशीर झालाय. झालं ते झालं, आता यापुढे तू कमलेला भेटणार नाहीस असं वचन हवंय मला आणि हे बघ हे गुपित कुणाला कळता कामा नये. फक्त तुझ्या-माझ्यातच राहायला हवं. सुख काही संपत्तीवर, पैशावर अवलंबून नसतं आणि कमलेनं आहे या परिस्थितीत सुखी असावं असं मला वाटतं. माझा स्वत:चाच अनुभव आहे तसा. मी लौकिक, व्यावहारिक जीवनशैलीचा त्याग केल्यानंतरही, थेट काळानं, यमानं माझ्या पत्नीला ओढून नेईपर्यंत मी अगदी सुखात होतो. खरंच, तू माझा मुलगा असतास तर किती छान झालं असतं, पण नशिबातच नाही, त्याला कोण काय करणार? तीच एक आशा होती पण तीच संपल्यावर हृदय पिळवटून गेलं आणि वाटलं की, सगळं सगळं आपण गमावून बसलो. कमलाचाच काय तो एक लिप्ताळा आहे, पण तिला भेटायचीही भीती वाटतेय मला. वाटतं की, ती आपल्याजवळच राहावी असं पुन्हा वाटायला लागेल आपल्याला आणि आता तिला माझ्याशिवाय राहता यायला हवं, पण तिच्या वाङ्‌निश्चयाच्या दिवशी तू भेटलास हे एक नवलच झालं. सांग ना, मी तुझ्यावर पूर्णपणे विसंबून राहू ना?"

"हो, अर्थातच!" भावविवश होत तो तरुण म्हणाला, "मी उद्याच शिवगंगा सोडून जायचं म्हणतोय. पण मी काही लोकांना सांगून ठेवलंय. ते कमलाकडे लक्ष ठेवतील आणि तिची सगळी खबर इथे या निर्मनुष्य डोंगरावरही येऊन तुम्हाला नक्की देत राहातील. फार दिवस सुखानं गुंगारा दिला तुम्हाला, आता ते तुमच्या पदरात पडू दे. येतो मी आता!" त्या तरुणाचा चेहरा दु:खानं आणि निराशेनं विकल झाला होता.

कमलेचा नवरा गणेश शिक्षणासाठी गेला होता ते रामपूर गाव शिवगंगा गावापासून फारसं दूर नव्हतं. तिथं एक चांगली शिक्षणसंस्था होती आणि अनेक विद्यार्थी दूरदूरच्या प्रांतातून तिथे शिक्षण घेण्यासाठी येऊन राहत असत. बाजाराच्या जवळचा भाग स्वस्त आणि सोयीस्कर असल्यामुळे सामान्यत: ते तिथेच चार-चार, पाच-पाच जणांचा गट करून राहत असत. रामपूरसारख्या शहरातील अगदी अरुंद बोळ असलेल्या आणि दाट वस्ती असलेल्या भागातील दृश्यांचे आणि आवाजांचे जरा सविस्तर वर्णन करू. ठीकठिकाणी भाजीवाले आणि फळवाले आपला माल विकत बसलेले दिसताहेत. रस्त्याच्या एका बाजूला ओळीनं मिठाईची दुकानं आहेत. दुरून कुठूनतरी लोहाराच्या ऐरणीच्या घणाचा कर्कश आवाज आणि पितळेच्या भांड्यांवर दिलेल्या ठोक्यांचा मंजुळ नाद ऐकू येतोय. त्यातच अधूनमधून जोरजोरात

चाललेला आरडाओरडाही ऐकू येतोय. एकतर हा गोंगाट कुठल्यातरी गच्च भरलेल्या बैलगाडीतून एखादं धान्याचं पोतं खाली पडल्यामुळे चाललाय किंवा कुणातरी दोन गाडीवानांच्या गाड्या एकमेकींच्या समोर आल्यामुळे रस्ता अडलाय आणि आता गाडी कोणी मागे घ्यायची यावरून दोघांची बाचाबाची चालल्यामुळे चाललाय हे पाहत उभं राहाणाऱ्या बघ्यांपैकी कुणीतरी 'बळी तो कानपिळी' असं शाश्वत सत्यही बोलून दाखवतंय. लोक मोठमोठ्यानं सांगताहेत - 'अरेऽअरेऽऽ बास, पुरेऽऽ आता, हे, पाहा तू आधी जा आणि हा नंतर जाऽऽईल! झालंऽऽ ना' धट्टेकट्टे आणि सहज हालचाल करतानाही श्रम वाटावेत इतकी चरबी वाढलेले तुपकट चेहऱ्याचे दुकानदार सुपारी चघळत चघळत समोरचं दृश्य निर्विकारपणे बघताहेत. रस्ता फरसबंदी आणि खाचखळग्यांनी भरलेला आहे. त्यामुळे त्यावरून खडखडत जाणाऱ्या बैलगाड्यांच्या आवाजानं कानठळ्या बसताहेत. लाल खडावा, धोतराचं सोगे आणि एखाद्या छोट्या छत्रीसारख्या दिसणाऱ्या पगड्या घातलेले ब्राह्मणांचे घोळके इतस्तत: दिसताहेत. काहीजणांनी आपल्या गळ्याभोवती उपरणं पांघरलं आहे, तर काहीजणांचा पोशाख तितकासा चांगला नाही. त्यांनी केवळ पंचा गुंडाळला आहे आणि त्यांच्या गळ्यात खांद्यापासून कमरेपर्यंत लटकणारं जानवं दिसतं आहे.

या बाजाराच्या रस्त्याकडे तोंड करून एक लहानसं, काहीसं अंधारं वाटणारं आणि अगदी लहानलहान पण गजाच्या खिडक्या असलेलं माडीचं घर उभं होतं. सर्वसाधारणपणे अठरा ते चोवीसच्या दरम्यानचं वय असलेले तीन तरुण त्या घरात राहात होते. त्यापैकी दोघेजण हलणाऱ्या खुर्चीत बसून समोरच्या टेबलावर पाय पसरून, पुस्तक वाचण्यात गढून गेले होते. तिसरा खिडकीच्या शेजारीच जाडजूड गादीवर डोक्याखाली तक्क्या घेऊन पहुडला होता. हातातलं वर्तमानपत्र त्यानं खाली टाकलं आणि उगाच खिडकीबाहेर बघत बसला. थोड्या वेळानं टेबलापाशी पुस्तक वाचत बसलेल्यांपैकी एकानं पुस्तक खाली टाकलं आणि वैतागून म्हणाला, "हा मूर्खांचा बाजार आहे. तुझं बरंय गणेश, तू आपला मजेत, आराम करतोयंस. मी तुझ्याजागी असायला हवा होतो. पास झाल्यावर लगेच कलेक्टर कचेरीत नोकरी मिळण्याची खात्री आणि शिवाय आता सुट्टी घालवायला आपल्या घरी जाणार!" हे वाक्य ऐकताच गणेशनं त्याच्याकडे हसून पाहत जांभई दिली आणि अंग ताणून लांबलचक आळस देत म्हणाला, "काल आपण जी अदा पाहिली, तिनं मला अगदी खलास करून टाकलंय. परीक्षेनंसुद्धा इतकं मांद्य आलं नव्हतं, श्रांत-क्लांत वाटलं नव्हतं."

"हो, आम्हांला कळत होतं ना, किती पाघळला होतास ते. जपून बरं का, गणेश."

"आपली कशी काळजी घ्यायची ते चांगलं कळतं मला. तुम्ही ते मला

सांगण्याची आणि सावध करण्याची गरज नाही. मी दुरून फक्त तिच्या विनोदाला आणि खुबसूरतीला दाद देत होतो. विनोदाचा केवढा तरी साठा होता तिच्याकडे आणि किती आत्मविश्वास! प्रसंगावधानही खूप होतं तिच्याकडे. केवळ संभाषणाच्या कलेनं तिनं तीनएक जणांना तरी आपल्याभोवती घुमवत ठेवलं होतं, गुंतवून ठेवलं होतं. तिचं माझ्याकडे लक्ष गेलं असेल असेही मला वाटत नाही. तसा मी खूप लांब होतो, पण देवाशपथ सांगतो, मला तिथून हलावंसंसुद्धा वाटत नव्हतं.''

''तिचं लोकांकडे लक्ष असणार नाही? ती डोळ्यांच्या कोपऱ्यातून लोकांकडे पाहते, त्यांना बरोबर हेरते आणि एखादं माणूस जाळ्यात सापडलं, असं जाणवलं की त्याला सोडत नाही. अरे, ती काय चारचौघींसारखी साधीसुधी बाई नाही. मोठमोठाली राज्यं उलथून टाकण्याची किंवा पुन्हा उभी करण्याची क्षमता असलेल्या बायका असतात ना, तशी बाई आहे ती.''

''नाही, तोच तर फरक आहे आणि त्यातच खरी मेख आहे, पुरुषांवर तिचा प्रभाव पडण्याची.'' गणेश म्हणाला, ''पण खरंच ती एक असाधारण बाई आहे. माहिती आहे का तुम्हांला, मी तर असं ऐकलंय की तिच्याकडे भिल्लांची एक टोळीच आहे. ते सगळे अगदी गुलामासारखे तिचे हुकूम पाळत असतात आणि म्हणे ती अगदी भरपूर बिदागीही देते. आता हे जरा गूढ आणि संशयास्पद वाटतंय खरं तर. पण प्रत्येक माणसाची काही ना काही अगदी खाजगी बाब तिला माहीत असते म्हणे. म्हणजे इतर कुणालाही माहीत नसलेल्या गोष्टींची बित्तंबातमी तिला असते.''

''खरंच, फार भयानकच स्वभाव म्हणायचा'' आपल्या हातातील पुस्तक खाली ठेवून, गप्पांमध्ये सामील होत तिसरा तरुण म्हणाला, ''सगळ्या जगाला ठाऊक आहे सई! तिच्या चरित्राचा छडा लावायला पाहिजे, मजा येईल, आवडेल बाबा मला.''

''हं, चांगला उद्योग आहे. पण महाशय, जरा थांबा आधी गणेशसारखं पास व्हा आणि मग तो चरित्राचा छडा का काय लावायचा ना, ते करा.'' दुसरा म्हणाला, ''आता, गणेश तू घराकडे चाललायस, ते बाकी छान आहे.''

''हो, आणि तिथे 'ति'च्या जाळ्यात फसण्याची भीती नाही.'''

''ते पाहू ना आम्ही, कळेलच खरं काय ते!'' असं म्हणत म्हणत ते दोघे उठून अंघोळीला निघाले, कारण आता जेवणाची वेळ झाली होती.

गणेश एका पंडिती वळणाच्या घराण्यातील होता. त्याचे वडील आणि आजोबा प्रख्यात शास्त्री होते. विद्वत्तेबद्दल आणि कर्मठपणाबद्दल त्यांची ख्याती होती. पण सध्याच्या काळात संस्कृत पांडित्याला फारशी किंमत नव्हती. होतकरू, बुद्धिमान तरुणांनी आश्रमात, गुंफात जाऊन, व्युत्पन्न शास्त्री-पंडितांच्या पायाशी बसून शिकण्याचे, कषाय वस्त्रं परिधान करून, भिक्षांदेही करीत आणि मंत्र, स्तोत्रं, ऋचा

म्हणून ईश्वराची उपासना करण्याचे दिवस आता राहिले नव्हते. आश्रम हे आता चातुर्याचे, फायद्याचे किंवा उत्तम भविष्यकाळाचे निदर्शक राहिले नव्हते. संस्कृत शिकणं आता तुच्छ मानलं जात होतं आणि इंग्रजी शिक्षणाला सर्वतोपरी महत्त्व प्राप्त झालं होतं, कारण त्यानं आर्थिक फायदा होत होता आणि म्हणून मनात नसतानाही शिवगंगाच्या त्या वृद्ध शास्त्रीबुवांनी आपल्या मुलाला म्हणजे गणेशला इंग्रजी शाळेत घातलं होतं. खरं म्हणजे, शास्त्रीबुवा मनातून इंग्रजी शिक्षणाच्या विरोधीच होते. त्यांना ते शिक्षण जुजबी आहे असंच केवळ वाटत नव्हतं, तर ते हिंदुधर्माच्या विरोधी आहे असं वाटत होतं. पण कालाय तस्मै: नम: असं मानून त्यांनी आपल्या मुलाला इंग्रजी शिक्षण दिलं होतं. आता त्याला परीक्षेत यश मिळाल्यावर त्यांना थोडं समाधान वाटलं होतं, यात संशय नाही. पण या नव्या शिक्षणामुळे आपल्या तरुण मुलाच्या धर्मश्रद्धेवर आणि एकंदर वागण्यावर काय परिणाम होईल याबद्दल ते सचिंत होते.

शिवगंगेतील संध्याकाळ. रस्त्यावर कमालीची शांतता होती. फक्त बैलगाडीच्या खडखडाटाचा किंवा तब्बेतीत गाडी हाकणाऱ्या गाडीवानाचा भलरी गीताचा आवाज तेवढा ऐकू येत होता. प्रकाश झरझर कमी होत होता आणि गल्ल्याबोळ आणि सावल्यांचे प्रदेश अधिकाधिक गडद आणि गडप झाल्यासारखे वाटत होते. फक्त नदीच्या घाटावर आणि तीरावरील मोकळ्या मैदानावर अजून प्रकाश रेंगाळत होता. थोड्या मुलीं गटागटानं जमून आपापल्या परसात खेळ खेळत होत्या. पुरुष मंडळी एकतर नदीच्या काठी फिरायला गेली होती किंवा बाजारात फेरफटका मारायला गेली होती. तशी ही गप्पा मारण्याची मोक्याची ठिकाणं होती. बायकासुद्धा झुळझुळीत, चांगले चुंगले कपडे घालून कपडे धुण्याच्या, पाणी आणण्याच्या अथवा संध्याकाळच्या देवदर्शनाच्या मिषाने बाहेर पडल्या होत्या. कमला तेवढी घरात राहिली होती. सोबत नुकत्याच चरून परतलेल्या गाईंची देखभाल करणारी मोलकरीण तेवढी होती. तिला अगदी उदास वाटत होतं. फार खडतर प्रसंगांतून तिला जावं लागत होतं आणि या जगात आपल्या गरीब बापुड्या जिवावर कुणीच प्रेम करीत नाही असं तिला वाटत होतं. कुणालाच तिच्याबद्दल काही वाटत नव्हतं. तिचे बाबा तर एकदासुद्धा तिला भेटायला आले नव्हते. तिला अगदी सुनं सुनं वाटत होतं आणि हे सगळं संपणार तरी कधी असं तिला झालं होतं. घरातील सर्वेसर्वा बनलेल्या रमाबाईंची मर्जी संपादन करण्याचा तिनं अटोकाट प्रयत्न केला होता पण ते सगळं निष्फळ ठरलं होतं. एरवी हसऱ्या, प्रसन्न दिसणाऱ्या आणि खेळीमेळीत वावरणाऱ्या त्या बाईजवळ आपल्या नणंदेची मर्जी संपादन करण्यासाठी धडपडणाऱ्या कमलेसाठी एखादा मायेचा शब्दसुद्धा नव्हता. स्वयंपाक करताना, भाकरी-भाजी करताना रमाबाईला जे काही लहानसहान वरकड जिन्नस लागत ते कमला आपणहून

तत्परतेनं नेऊन देई. पण या तिच्या आपणहून केलेल्या कामाचाही काही उपयोग झाला नाही. 'मी अमुक करू का, गोळे करून देऊ का?' अशा कमलेनं आर्जवानं, कापऱ्या आवाजात वारंवार, पुन:पुन्हा विचारलेल्या प्रश्नांना केवळ घुश्शात आणि नाइलाज झाल्यासारखं होकारार्थी उत्तर मिळे आणि मग कणिक मळताना, पोळ्या लाटताना ती कौतुकाच्या स्मिताची निष्फळ अपेक्षा करीत राही. आत्ता या तिन्हीसांजेला ती परसदारातील एका कोपऱ्यात काही झाडं होती, तिथे नदीकडे पाहत बसली होती. तिनं मनातील विचारांना मुक्तपणे वाट करून दिली होती पण हळूहळू तिची उदासीनता नष्ट झाली. जणू आपण आपल्या डोंगरावरच्या घरात गेलो आहोत असं तिला वाटलं आणि मग, येशी आणि इतर मित्रमंडळी, ती शेतं, ते खडक, ती फुलं असं सारं सारं कल्पनेतच अनुभवून तिला शांत शांत वाटू लागलं. तिचं मन विश्रब्ध समाधानानं भरून गेलं. आहे या परिस्थितीतही कोणत्या सुखद घटना घडणं शक्य आहे, याची ती विचार करू लागली. रमाबाईही लवकरच वश होईल. मी तिचं मन सांभाळण्यासाठी किती धडपडते, हे पाहिल्यावर तीही माझ्यावर प्रेम करू लागेल आणि मग गंगीही मैत्रीण बनेल आणि मग सुख-समाधानाचे दिवस येतील, असा विचार करताच आपण आपल्या सोबत्यांबरोबर गंमतजंमत करीत यात्रेला, उत्सवाला चाललो आहोत, आपले दादाही बरोबर आहेत. सारे आपल्यावर भरभरून प्रेम करताहेत, अशा सुखस्वप्नात ती गुंगून गेली. मध्येच आपल्या नवऱ्याचाही विचार तिच्या मनात डोकावला; पण त्याला मित्र मानावं की नाही, हे काही तिला ठरविता येईना त्यामुळे ती गोंधळून गेली. अशाच प्रकारच्या विचारांत गुंग होऊन ती कितीतरी वेळ तिथे बसली होती. मग तिला काही तरी गजबज ऐकू आली आणि घरातली मंडळी परत आली आहेत याची, खात्री पटली. ती उठून घरात जायला निघालीच होती इतक्यात तिच्या कानावर काही शब्द पडले आणि त्यासरशी विषण्णतेची, वेदनेची कळ तिच्या हृदयात उमटली. ती स्तंभित झाली आणि मघाशी तिनं पाहिलेली सारी स्वप्नं एका क्षणात धुळीला मिळाली. तो आवाज रमाबाईचा होता. ती आपल्या नवऱ्याच्या प्रश्नाला तिरस्कारपूर्ण आवाजात उत्तर देत होती, "कोण तिची आई होती, कुणाला माहितीय? आणि आता ही भिक्कारडी अशी आमच्या डोंबलावर येऊन बसलीयं. बिचाऱ्या माझ्या वडलांनी काय म्हणून तिला घरात घेतलं कुणास ठाऊक. पण अगदी सुवर्णसंधी चालून आली होती की नाही! काय छान जोडा शोभला असता आणि मग गंगीलाही मोठ्या घरात देता आलं असतं. पण कुठलं काय? आता हिच्यापासून सुटका मिळणं अशक्य दिसतंय."

अर्थ अगदी स्वच्छ, स्पष्ट होता. ते कमलेबद्दलच बोलत होते. ते शब्द कानांवर पडताच तिचा चेहरा विदीर्ण झाला आणि दूर कुठंतरी पळून जावंसं वाटलं. पण ती

जाणार तरी कुठं? मुळात आपण जन्माला तरी कशाला आलो अशा प्रकारच्या विचारांची घालमेल मनात चालू असताना अभावितपणे ती मामंजींकडे गेली. त्यांनीच तर तिच्या लग्नाची खटपट केली होती. तेव्हा आता त्यांच्याजवळच मन मोकळं केलं पाहिजे असं वाटून एका दमात मधला चौक ओलांडून ती मामंजी नेहमी ज्या खोलीत बसत असत त्या खोलीत शिरली. थरथर कापत तिनं त्यांचे पाय धरले. "तुम्ही आपल्या मुलाशी माझं लग्न का लावून दिलंत, का तुम्ही पैशाबद्दल विचारलं नाही? मी दरिद्री-भिक्कारडी आहे हे तुम्हांला ठाऊक होतं ना? मग असं का केलंत? आता बघा माझ्यावर काय परिस्थिती ओढवलीय ती. कुण्णी-कुण्णी माझ्यावर प्रेम करणार नाही. मला माझ्या दादांकडे जाऊ द्या." कमला उद्वेगानं आणि कळवळून बोलत होती.

"अरे, काय झालं बाळे?" एवढ्या काकुळतीला का आली आहेस? त्या सात्त्विक पुरुषाने अगदी आश्चर्यचकित होऊन विचारलं. पुढे वाकून तिला उठवीत ते म्हणाले, "अशी रडू नको बरं. कुणी सांगितलं तुला तू दरिद्री आणि भिकारडी आहेस म्हणून? ते आमचं आम्ही पाहून घेऊ जा आणि आपलं काम कर पाहू." ती एखाद्या लहान मुलाप्रमाणे त्यांच्याकडे धावत आली होती आणि रडत तक्रार करीत होती. त्यामुळे तेही क्षणभर तिचं वाढाळू वय विसरले आणि तिच्या गालावर चापटी मारीत म्हणाले, की असल्या वेडगळ विचारांना तिनं आपल्या डोक्यात मुळीच थारा देता कामा नये. शास्त्रीजींच्या मुलीला हे असं शोभत नाही. तिनं आपल्या सासूची मर्जी सांभाळली पाहिजे, तिला खूष ठेवलं पाहिजे.

'हंऽऽ मला किती आणि काय काय सहन करावं लागतंय हे त्यांना माहीत नाही आणि पुढे कधी समजणारही नाही.' कमलेच्या मनात आलं. 'दादाही असंच म्हणतील.' असा विचार करीत कमला आपल्या खोलीत गेली आणि हुंदके देऊन रडू लागली. तिला आता सारं स्पष्ट दिसत होतं. ती इतरांना त्रास देण्यासाठीच जन्माला आली होती. जणू ती त्यांच्या मार्गातील धोंड होती. ती एका दरिद्री बापाची मुलगी होती आणि त्यांना नकोशी झाली होती. दारिद्र्य हेच तिला दूर लोटण्याचं कारण होतं आणि आता आपला नवराही असंच आपल्याला दूर करील. आपले दादा पैशाबद्दल किंवा धनदौलतीबद्दल काही कधी बोलले होते का, हे आठवण्याचाही तिनं पुष्कळ प्रयत्न केला. त्यांच्याजवळ काही पैसाआडका आहे काय? आणि समजा तिनं काही मागितलं तर ते देतील काय? कुणालाच कशी ही माहिती नाही?" सगळंच कसं अस्पष्ट आणि धूसर वाटत होतं. तिन्हीसांजेच्या प्रकाशाच्या जोडीनं तिचा आनंदही मावळू लागला आणि तिच्या मनावर दुःखाचं सावट पसरलं. अशा विचारात ती गढली असतानाच कुणीतरी खोलीत आलं. त्या तरुणाच्या चेहऱ्यावर आणि छबीवर खिडकीचा उजेड पडला. 'आईऽ आईऽऽ' अशी त्यानं हाक मारली आणि कमलेनं वळून पाहिलं. 'येणार, येणार' असं सगळे म्हणत होते तो

आपला नवरा खरंच घरी परत आला की काय? असा विचार तिच्या मनात चमकला आणि लगेचच, आता हाही आपल्याला दूर लोटेल, हिडिस फिडिस करेल अशा कल्पनेनं विकल होऊन अगदी क्षीण आणि विव्हल स्वरात ती म्हणाली, "आई इथे नाहीत."

"आणि या अंधारात तू कोण बसून राहिलीयेस? ऊठ पाहू" कमला संकोचून उभी राहत म्हणाली, "मी आहे." ती उभी राहिली तसा तिच्या चेहऱ्यावर खिडकीचा प्रकाश पडला आणि मूर्तिमंत सौंदर्य म्हणजे काय याचा प्रत्यक्ष बोध त्याला झाला. आपल्या नवपरिणित वधूला सोडून जाऊन गणेशला तब्बल दोन वर्षं झाली होती आणि आता तो एक उंच, शिडशिडीत बांध्याची, गोऱ्या गालावर आणि काळ्याभोर डोळ्यांत अश्रू चमकत असलेली सुंदर युवती पाहत होता. चंद्रकिरणात न्हाऊन निघावा तसा तिचा चेहरा शीतल आणि आल्हाददायक दिसत होता. "तू कमला का?" असं त्यानं विचारताच कमलानं त्याच्याकडे थेट डोळ्यांत डोळे घालून आरपार पाहिले. तिची नजर लहान बालकासारखी विलक्षण निष्पाप आणि निरागस होती. तिच्यात एक प्रकारचा अटळ विश्वास होता. एक प्रकारच्या बेफिकीर आविर्भावात तो मागे वळला खरा पण; त्या गोंधळलेल्या मुलीशी चार आपलेपणाचे, जवळिकीचे शब्द बोलावे, असं त्याला उत्कटतेनं वाटलं.

✿

# ६.

नवरा घरी परत आल्यामुळे कमलाच्या वाट्याला चार चांगले दिवस आले, असं काही झालं नाही. उलट तिच्या दैनंदिन कामाचा धबडगा अधिकच वाढला आणि ती अधिकच मागे, कोपऱ्यात ढकलली गेली. अगदी सकाळी सकाळी कमला कामाला लागे. अगदी छताला लागून एकच खिडकी असलेल्या अंधाऱ्या, कोंदट आणि पुष्कळ कोनाडे असलेल्या आपल्या सासूच्या खोलीत ती झोपत असे. त्यातल्या एका कोनाड्यात तिनं कुंकवाचा करंडा, फणी, लहान आरसा असं वेणीफणीचं साहित्य ठेवलं होतं. दुसऱ्या कोनाड्यात जास्वंदीच्या, शेवंतीच्या फुलांचे गजरे, विड्याच्या पानांची चंची, तबक असं साहित्य ठेवलेलं असे. खोलीत, तिचे कपडे वाळत घालण्यासाठी भिंतीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत टांगलेली दांडी आणि दोन लाकडी पेट्या एवढंच काय ते लाकडी सामान होतं. तिथेच एका अंधाऱ्या कोपऱ्यात कमलाच्या कपड्यांचं लहानसं गाठोडं आणि त्याच्या शेजारीच गुंडाळून ठेवलेली तिची वळकटी असे. तांबडं फुटायच्याही आधी घर जागं होई आणि सासूबाई आपल्या जवळच झोपलेल्या कमलेला उठवीत. उठल्या उठल्या कमला लगबगीनं परसदारी जाऊन घागरी, घंगाळी घासून घरातील लोकांच्या सकाळच्या स्नानासाठी पाणी उपसून ठेवी. त्यानंतर मग स्वयंपाकघर शेणानं सारवणं, चुलीला पोतेरं घालणं, अंगणात शेणाचा सडा घालणं आणि त्यावर सगळ्या हिंदू मुली सुबक रांगोळी रेखतात तशी पांढऱ्या शुभ्र रांगोळीनं नाजूक फुलांची नक्षी रेखणं अशी सारी कामं ती करीत असे. त्यानंतर ती दारावर भाजी विकायला येणाऱ्या लोकांकडून भाजी विकत घेई आणि स्वयंपाकघरात काम करणाऱ्या वडीलधाऱ्यांना स्वयंपाकात मदत करी. या शिवाय तेल, साबण इ. गोष्टी जागच्या जागी आहेत, की नाहीत हे पाहून तिला घरातल्या सगळ्यांच्या स्नानाची तयारी करावी लागे. त्यात काही चुकून विसरलं गेलं किंवा कमी-अधिक झालं तर पुष्कळ बोलणी खावी लागतं. सर्वांना जेवायला वाढण्याचं काम रमाबाईचं असे

आणि त्यावेळी कमला दरवाजाच्या पाठीमागून पाहत उभी राही. दुपारच्या वेळी घरातील वडीलधारी माणसं बहुधा वामकुक्षी करीत तर मुली वेणी-फणी करीत. त्या वेण्या घालीत किंवा अंबाडा-खोपा अशा केशरचना करीत, त्यावर फुले, गजरे माळीत आणि कपाळावर कुंकू रेखीत. घरातील कामाचा सर्वाधिक बोजा कमलेवर पडे आणि ती मोठ्या आनंदानं तो उचलेही. पण; जेव्हा सगळं काम आटोपल्यावर तिची सासू तिला येऊन म्हणे की, "काम करून करून बिचाऱ्या गंगीची पाठ अगदी मोडून गेलीय, तुझं हातातलं काम आटोपलं की गंगीला जरा मदत कर," तेव्हा मात्र कमलेला वाईट वाटे. मग रमाबाई कमलेनं पानात अन्न टाकल्याची तक्रार सांगत येई. "नाटकं आहेत सगळी. सासरची माणसं दुष्ट आहेत, तिला उपाशी ठेवतात असं लोकांनी म्हणावं म्हणून चाललंय सगळं. आपला छळ चालल्याचा ती असा काही आव आणते, की तिचं हे ढोंग बघून, तिचे डोळेच बाहेर काढावेत असं वाटतं." हे ऐकल्यावर कपाळावर आठ्या घालून रागारागानं कमलेकडे पाहत जाता जाता तिची सासू म्हणे, "खरंय बाई, ही कैदाशीण आणखीसुद्धा काय काय करील!" अशा प्रकारे खोट्यानाट्या वावड्या उठत गेल्या आणि आता काय बोलावं, करावं तरी काय, आपल्यावरचे वृथा आरोप खोडून कसे काढावे, हे काही कमलेला उमेजना. आपल्या नणंदांचा खोटारडेपणा पाहून तिला धक्का बसला होता आणि त्यांच्यापुढे ती अगदी किंकर्तव्यमूढ होऊन गेली होती.

भोळ्या धर्मश्रद्धेमुळे, वाट्याला आलेला एक भोग म्हणून का होईना, पण कमलेनं आहे ते जीवन मुकाट्यानं स्वीकारलं होतं. पुराणिकबाबांच्या पायाशी बसून ऐकलेल्या राम-सीतेच्या आणि पांडवांच्या कथांची शिकवण तिनं आत्मसात केली होती. भूत-पिशाच्चांच्या, राक्षसांच्या आणि त्यांनी माणसांना पछाडल्याच्या, दुष्टाव्यानं त्रास दिल्याच्या अनेक आख्यायिका, पुराणकथा तिनं ऐकल्या होत्या. कानाला गोड वाटणारे संस्कृत श्लोक ऐकत ऐकत पुष्कळ वेळेला ती झोपेच्या स्वाधीन झाली होती. चांदण्या रात्री अर्धवट झोपेत आणि अर्धवट जागृतावस्थेत असताना म्हाताऱ्या आजीनं सांगितलेल्या बोधकथा तिच्या मनात रुतून बसल्या होत्या. त्या कथांमधील नद्या, टेकड्या किंवा झाडंही माणसांसारखी वागत होती आणि पशू-पक्षी माणसांच्या भाषेत बोलत होते. या सगळ्यातून ती माणुसकीचा एक फार मोठा धडा शिकली होती. प्रेम आणि कर्तव्याची शिकवण तिनं आत्मसात केली होती. कथा म्हणून त्या जरी सुमार दर्जाच्या असल्या, तरी त्या सगळ्यांतून असंच दाखवलेलं असं की, कसं, चांगल्या वागण्याचं फळ नेहमी चांगलं आणि वाईटाचं फळ नेहमी वाईट मिळतं, या जन्मीच केवळ नाही तर पुढच्या जन्मीही या जन्मीच्या वागण्याचं कसं फळ भोगावं लागतं, नम्रतेला कसं एक ना एक दिवस चांगलं बक्षीस मिळते इत्यादी इत्यादी. प्रेम, निष्कलंक चारित्र्य, दुसऱ्याचा मान राखणं, वडीलधाऱ्या माणसांचा आदर ठेवणं यांसारख्या गोष्टींना त्या कथांमध्ये जीवनमूल्यांचं स्थान असे. कमलाची

नीतीविषयक जाणीव अशा प्रकारची होती आणि या जाणिवेतून सद्वर्तनाची आकांक्षा तिच्या मनात निर्माण झाली होती. पण या सगळ्याला आणखी एक बोधाचा पदर होता. तो म्हणजे तिचं आयुष्यं कसंही असो, ती गरीब असो की श्रीमंत, सुखी असो की दु:खी, तिनं त्याबद्दल 'ब्र' काढता कामा नये. वाट्याला आलेले भोग मुकाट्यानं सहन केले पाहिजेत, कारण तेच तिच्या दैवात होतं. या विचारांमुळे तिला सांत्वन तर मिळालं नाहीच उलट; तिच्या आशाआकांक्षा कोमेजून गेल्या, जीवनातल्या छोट्या छोट्या आनंददायक बाबींनाही ती पारखी झाली, कारण तिच्या दृष्टीनं जीवन ही केवळ चैतन्यहीन बाब बनली होती. सटवाईनं तिच्या कपाळावर जे लिहिलं होतं तेच घडणार होतं. त्यातलं अणुमात्रही ती टाळू शकत नव्हती. सीता-सावित्रीसारख्या स्त्रियांच्या पावलावर पाऊल टाकून जगण्याची तिची इच्छा होती; पण त्यांनाही दैवाला शरण जावं लागलं होतं आणि त्यांचाही उचित गौरव झाला नव्हता त्यांच्या मोठेपणाला साजेसं जीवन लाभलं नव्हतं आणि म्हणूनच आपल्या नणंदांचे टोमणे आणि वाग्बाण मूकपणे सहन करता करताच ती स्वत:शीच विचार करू लागे, की एवढं सगळं सहन करावं लागतं हे खरं, पण तरीही जेव्हा आपण आकाशाच्या निळाईकडे, मावळत्या सूर्याच्या रक्तिम्याकडे किंवा दुथडी भरून वाहणाऱ्या नदीकडे पाहतो, तेव्हा आनंदी होतो, खूष होतो. हे काय कोडं आहे? त्या असीम आकाशात हरवून जावे, त्या विश्रब्धतेत अनेकानेक स्वप्नं रंगवावी आणि आकाशधरेच्या संबंधाचा अद्भुत, भव्यदिव्य आशय मनात जागवावा अशी इच्छा अजूनही आपल्या मनात कशी काय निर्माण होते आहे, याचा ती मनातल्या मनात खल करीत राही.

कमला काही फक्त आपल्याच दु:खात चूर होती असं नाही. आपल्या मैत्रिणींच्या जगण्या-वागण्याबद्दलही तिला उत्सुकता व आस्था होती. शेजारपाजारच्या समवयस्क मुलींना कोणत्या कोणत्या दुर्धर प्रसंगांना आणि दिव्यांना तोंड द्यावं लागतं आहे, त्याच्या अनेक कहाण्या तिच्या कानावर पडत आणि कित्येकदा तर असे प्रसंग तिच्या समोरही घडत. या सगळ्याचा तिला धक्का बसे आणि तिचं काळीज वेदनेनं चिरून जाई. उदाहरणार्थ, समोरच्या घरातील भागीरथीचा तिच्या तापट नवऱ्यानं छळ मांडला होता. ती त्याची पत्रासही ठेवत नाही, असं त्याचं मत होतं आणि सासरच्या घरातून बाहेर पडून तिनं त्याला उघड उघड डिवचलं होतं. खरं तर ती थोडं फार शिक्षण घेतलेली, हुशार, चुणचुणीत मुलगी होती. तिचा नवरा श्रीमंत होता खरा पण ठार निरक्षर होता. तो तिचा दुस्वास करे, तिला कमी लेखण्याची एकही संधी तो सोडत नसे. तिच्या शिक्षणाची, चातुर्याची टिंगल टवाळी करण्यात त्याला गोडी वाटे. अशा या मानसिक छळवादात तिनं अनेक दिवस व रात्री तळमळून काढल्या; पण जेव्हा घरात बाई आणून ठेवून त्यानं तिचा उघड उघड अपमान केला, तेव्हा मात्र त्यानं दिलेले सगळे दागिने त्याच्या तोंडावर फेकून आणि

सवाष्णीनं आयुष्यभर हातात घालायचा चुडा फोडून तिनं घर सोडलं. पण बिच्चारी भागीरथी! आता हा नवरा तिला कायमचं सोडून देईल या धास्तीनं तिला माहेरी एक दिवसही कुणी थारा दिला नाही. तिची आई रागारागानं आल्या पावली सारं स्थिरस्थावर करण्यासाठी तिला सासरी घेऊन आली. शरमेनं आणि अपमानानं तिचा पार चोळामोळा झाला होता. भागीरथी सासरी परत आली तेव्हा नेमकी कमला विहिरीवरून परत घरी येत होती. आईच्या बरोबर दारात उभी असलेली भागीरथी वेदनेनं तडफडत होती, पण त्या दोघींची साधी दखलही कुणी घेत नव्हतं. मग तिच्या आईनं मोठ्यानं गळा काढून तिला बोल लावून "बघ, तूच तुझ्यावर काय पाळी आणलीस ते" असं म्हणून आत ढकललं.

"मी आत नाही जायची आई. तू हवं तर मला तुझ्या हातांनी मारून टाक; पण मी या स्मशानात पाऊल टाकायची नाही." भागीरथी निश्चयानं म्हणाली. कमलेला हे सगळं अगदी बघवत नव्हतं. एवढ्या वेळात शेजारपाजारच्या कितीतरी बायका भोवती जमल्या होत्या. पण भागिरथीची कुणाला फारशी कणव आल्याचं दिसत नव्हतं. एकजण उपहासानं म्हणाली, "का गं, मोठ्या तोऱ्यात, तावातावानं घराबाहेर पडलीस आणि आता आलीसच ना परत?"

"तुला शोभत नाही हे मुली" दुसरी म्हणाली, "अगं, माहीत नाही का तुला, की एकदा एखाद्या माणसाशी लग्नगाठ बांधली की बांधली! मग बाईचं स्वातंत्र्य सरलं. तो गाढव जरी असला तरी त्याच्याबरोबरच नांदलं पाहिजे. तुझ्या मानेवर जू ठेवलंय! लाकडाचं झालं काय आणि सोन्याचं झालं काय, एकूण अर्थ एकच."

"केवढी चूक केलीस" तिसरी विजयाच्या आवेशात उद्गारली. 'केवढे दागिने घातले होते त्याने तुला! त्यांच्याकडे बघून तरी आहे त्यात समाधान मानायचंस ना. जा आत आता. पाया पडून मनधरणी कर त्याची."

भागीरथीनं काही उत्तरही दिलं नाही आणि हे शेरेताशेरे आपल्या कानावर पडताहेत असंही दाखवून दिलं नाही. सुरुवातीला तिच्या डोळ्यांत घृणा भरून राहिली होती. पण नंतर ती तिथेच पायरीवर गुडघ्यात मान घालून बसून राहिली. तिच्या जिवाची काय घालमेल चालली होती कुणाला कसं कळणार? कमला सारं पाहत होती. लोक काय म्हणतील या भीतीनं ती थोडी दूरच उभी होती. पण जमलेल्या बायकांचे ते विखारी बोलणं ऐकताच तिला राहावलं नाही आणि हातातल्या भरल्या घागरीनिशी ती भागीरथीकडे धावली. नेमक्या त्याच वेळी घराचा दरवाजा उघडला आणि भागीरथीच्या नवऱ्यानं बेपवाईच्या स्वरात, "काय बडबड आहे?" अशी पृच्छा केली. "शीघ्रकोपी बाई आली का परत" असं त्यानं म्हणताच, भागीरथी चटकन उठून उभी राहिली. तिच्या हृदयाची धडधड वाढली, श्वासोच्छ्वास जोरानं होऊ लागला, तिनं एक आवंढा गिळला, डोक्यावर पदर घेतला आणि घरात शिरली. तिचा चेहरा वज्रनिश्चयी दिसत होता. मलूल नजरेनं तिनं इकडेतिकडे

पाहिलं. मुलीच्या वर्तनाबद्दल क्षमा मागायला आणि रदबदली करायला लागलेल्या आपल्या आईकडे वळून ती म्हणाली, "आई, पुरे आता. काही बोलू नकोस. आता स्वत:कडे आणखी कमीपणा घ्यायची काही गरज नाही. तू मला इथे परत घेऊन आलीयस ना, मग आता मरेपर्यंत मी हे घर सोडणार नाही. जा घरी तू आता."

यावर गालातल्या गालात हसत तिचा नवरा म्हणाला, "पण तुला आत कोण घेणाराय? हिचा आवाज मोठा, बोलण्यात मानमर्यादा नाही. मेल्यावरच जो वाढवायचा असतो, तो चुडाही हिनं फोडला. आता गळ्यात मंगळसूत्र राहिलंय, तेही तोडून टाक म्हणावं."

त्या निर्दयी, निष्ठुर माणसाची घृणा आणि शिसारी येऊन कमला तिथून बाजूला झाली. एकदा एखाद्या नवऱ्यानं मनात आणलं की तो कोणत्या टोकाला जाऊन आपल्या बायकोवर जुलूम करू शकतो, तिचे हाल करू शकतो, हे ती प्रथमच पाहत होती. पण प्रेमासाठी आसुसलेल्या बायकोच्या वाट्याला जेव्हा फक्त द्वेष आणि तिरस्कार येतो तेव्हा तिच्या अंत:करणाची काय तगमग होते, हे अजूनही तिला समजलं नव्हतं. हृदयातील मृदु-मधुर भावनांचं कडवटपणात कसं रूपांतर होतं, नजरेत विखार कसा भरतो आणि प्रेमाची जागा अन्यायाची हिंस्र जाणीव कशी पटकावते, हेही तिला अजून समजायचं होतं.

कमलेच्या शेजारी अगदी घराला लागूनच हरणी राहत होती. ती सुंदर देखणी होती. तिचं माहेर चांगलं श्रीमंत होतं आणि नशिबानं नवराही चांगला मिळाला होता. पण तिची खाष्ट सासू तिला अमानुष जाच करे. ऐषारामात वाढलेली असूनही, कोणतंही कष्टाचं काम करायला हरणी मागेपुढे पाहत नसे. पण किती केलं तरी तिच्या सासूचं समाधान काही होत नसे. एवढंच नव्हे, तर हरिणी जेवढं पडतं घेई, तेवढा सासूच्या द्वेषाचा पारा वर चढे. त्या दोघींच्यात गोडवा आणि सामंजस्य निर्माण करण्यासाठी तिचा नवरा तऱ्हेतऱ्हेचे उपाय करून पाही. पण त्यानं असं काही करण्याची खोटी की म्हातारीचं अधिकच बिनसे. त्याच्या वागण्याचा ती भलताच अर्थ काढे आणि त्याचा हेतू चांगला नसल्याचा कांगावा करे. 'त्याला माझी मुळी किंमतच नाही, तिच्यावरच प्रेम करतो तो, माझ्यावर कळिकाळानं झडप घालावी, असं त्याचं मत आहे. एक-दोन वर्षांत ती मला घरातून हाकलून देईल आणि सगळं आपल्या मर्जीप्रमाणे करेल. घराची मालकीण होईल. मी त्याला वाढवलं, लहानाचं मोठं केलं, पण मीच रस्त्यावर येईन, उघड्यावर पडेन,' अशी बोलणी, हरणीला अगदी दररोज नव्हे, तासातासाला ऐकावी लागत. सकाळच्या वेळी तिची कामाची घाई गडबड चाललेली असतानाच तिची सासू तिखट आवाजात तिला विचारे, "आज कोणत्या लांड्यालबाड्या करणारेस तू? आणि सासूला काय खोटंनाटं सांगणारेस? अंऽ? काय काय चहाड्या सांगितल्यास नवऱ्याला? एकेकाळी ज्याच्या गळ्यातली ताईत होते मी, त्याला आता नकोशी झालेय मी, धूळ फेकलीस

डोळ्यांत त्याच्या तू, त्याला मंतरलेलं पाणी देऊन वश केलंयस तू. म्हणूनच आपल्या जन्मदात्या आईचाही वैरी झालाय तो.'' असं कडाकडा बोलूनही हरणीवर काहीच परिणाम होत नाही, ती शांतच आहे असं दिसताच अधिकच अस्वस्थ होऊन, झपाटल्यासारखी ती कामाकडे वळे आणि तारस्वरात किंचाळे, 'एक ना एक दिवस असा येईल, की ज्यादिवशी तू टाचेखाली चिरडली जाशील. पार तळपट होईल तुझं आणि असा दिवस फार लांब नाही' आणि या सगळ्यावर कहर म्हणून की काय ती गळा काढून रडत, ओरडत म्हणे, 'त्याच्या असल्या या चुकीच्या वागण्याबद्दल देवसुद्धा त्याला माफी देणार नाही.' आपला शेळपट मुलगा या साऱ्या प्रसंगातून अंग काढून घेऊन कामावर निघून जाईपर्यंत तिच्या तोंडाचा पट्टा चालू राही. बिचारी हरणी! रडून रडून तिचे डोळे सुजत. आपला नवरा पराभूत, विषण्ण होऊन कामावर निघून गेलेला पाहाताच ती खाणं-पिणं सोडून देई आणि त्यामुळे तिच्या सासूला अधिकच चेव चढे. सासूच्या कुरबुरी आणि कटकटी अगदीच असह्य झाल्या, की हरणी पितळेची घागर घेऊन पाणी आणण्याच्या मिषानं विहिरीवर जाई. तिथे आपल्या मैत्रिणींचे सांत्वनाचे आणि सहानुभूतीचे चार शब्द ऐकायला मिळतील, अशी तिला खात्री वाटे. त्या आपल्या भोवती गोळा होतील, काहीतरी समजुतीचे शब्द सांगतील, दोन-चार गोष्टी सांगून आपल्याला हसवतील, आनंदी राहायला प्रोत्साहन देतील अशा विचारानं ती विहिरीवर जाई. पण हे सुख अगदी थोडा काळ टिके आणि मग पुन्हा ती त्या मूर्ख, बेपर्वा सासूच्या द्वेषानं आणि हेव्यादाव्यानं कोंदट झालेल्या आणि घुसमटवणाऱ्या काळोख्या घरी परत जाई.

काशी आणि रूक्मासारख्या आपल्या संसारात सुखानं नांदणाऱ्या काही मुलीही कमलेच्या मित्रपरिवारात होत्या. त्या आपल्या मैत्रिणींच्या घरी जात आणि जातील तिथलं वातावरण आनंदानं, उल्हासानं भरून टाकीत. काशीची आई मोठी कर्तबगार, हुशार आणि सुस्वभावी होती. तिला दांभिकपणा आणि दुटप्पीपणा मुळीच खपत नसे आणि दुसऱ्याचे अंकित होऊन राहणाऱ्या बिनकण्याच्या माणसांबद्दल फारशी सहानुभूतीही वाटत नसे. आपल्या घरसंसार कसा चालवावा याची अक्कल नसलेली सासू मिळाल्याबद्दल तिला कमलेची कीव येई. या सगळ्याचा शेवट कसा होईल, नव्या नव्हेलीच्या काळातील कमलेच्या कौतुकाचे, आपल्या सुनेच्या देखणेपणाचे आधी नुसत्या थंड प्रतिसादात, परकेपणात आणि नंतर तिरस्कारात व द्वेषात कसं रूपांतर होईल, हे ती उमजून होती. कमलेच्या निरागसपणानं आणि सच्चेपणानं तिला जिंकलं होतं. कमलेबद्दल प्रथमपासूनच तिला आपलेपणा वाटे. आपल्याला मुलगा नाही, त्यामुळे आपण कमलेला सून म्हणून आपल्या घरात आणू शकलो नाही, याचं तिला भारी वाईट वाटे. आपल्या काशीसाठी नवरा शोधताना तिनं खूपच चिकित्सा आणि छाननी करून स्थळ पक्कं केलं होतं आणि याद्या, देणं-घेणं या सगळ्याच बाबतीत रीतसर, व्यवस्थित बोलणी करून दोन्ही कुटुंबांच्या दरम्यान

मतभेदाला वावर राहणार नाही, सारं सुरळीत होईल अशी काळजी घेतली होती. काशीचा नवरा तिच्यावर प्रेम करीत होता आणि सासूही आईप्रमाणे तिच्यावर माया करीत होती. त्यामुळे काशी आपल्या संसारात अगदी खुष होती. तिची सासर-माहेरची घरंही अगदी जवळजवळ होती आणि दोघी विहिणी म्हणजे तिची आई आणि सासू अगदी बहिणी बहिणीप्रमाणे वागत असत.

शास्त्रींची मुलगी रुक्मा काशीइतक्या श्रीमंत आणि तालेवार घरातील नव्हती, हे खरं पण तीही आपल्या संसारात सुखानं रममाण झाली होती. या दोघी मुली आपापल्या आईच्या करवी घरी मेजवानीचे, सण-समारंभाचे, उत्सवाचे बेत करीत आणि आपल्यासारखं समाधानी जीवन ज्यांच्या वाट्याला आलेलं नाही, त्या काहीशा कमनशिबी मैत्रिणींना चार सुखाचे, आनंदाचे उजळ क्षण अनुभवता यावेत म्हणून त्या साऱ्यांना घरी बोलवीत.

सनातनी हिंदू कुटुंबांमध्ये नवरा-बायकोमधील संबंध सामान्यत: विचित्र, गुंतागुंतीचे असतात. युरोपियन देशात असते तसे बोलण्या-चालण्याचे, वागण्या-सवरण्याचे स्वातंत्र्य त्यांना नसते. या विसंगत परिस्थितीचे मूळकारण एकत्र कुटुंबपद्धतीत दडले आहे. कुणी एखादी स्त्री लग्न झाल्यावरही आपल्या नवऱ्यासह माहेरीच राहत असेल तर गोष्ट वेगळी पण एरवी, कुणीही हिंदू सासुरवाशीण घरातील इतर व्यक्तींसमोर आपल्या नवऱ्याशी चकार शब्दही उच्चारित नाही. ते दोघं एकमेकांशी अगदी परक्यासारखं वागतात. नवरा दिसताच बायका डोक्यावर पदर घेतात, तो खोलीत आला, की लगेच खोलीच्या बाहेर तरी जातात किंवा दूर कोपऱ्यात एका बाजूला उभ्या राहतात आणि अगदी बोलण्याचा प्रसंग पडलाच, तर एकतर बोलण्याकडे मुळीच लक्ष देत नाहीत, नाहीतर मान बाजूला वळवून शक्य तितक्या दूर राहून उत्तर देतात. सासू दु:स्वास करीत असल्यामुळे, ते दोघं तिच्यासमोर मोकळेपणाने धड बोलू शकत नाहीत की वागू शकत नाहीत. आपल्या नवऱ्याबरोबर बोलण्याची कमलेचीही काही इच्छा नव्हती आणि त्याच्याकडूनही तसा काही प्रयत्न होत असल्याचं तिला जाणवलं नाही. लग्नाच्या वेळी जमलेल्या सगळ्या लोकांच्या नजरा त्या दोघांवरच खिळल्या होत्या आणि त्यावेळी जर त्यांना एकमेकांकडे पाहताना कुणी बघितलं असतं तर तो अधिकच थट्टेचा आणि टिंगलीचा विषय झाला असता. त्यानंतर कितीतरी दिवसांत कमलेची आपल्या नवऱ्याशी दृष्टिभेटही नव्हती आणि आता, तर तो समोर असताना नजर वर उचलून बघण्याची तिची हिंमतही नव्हती. हा केवळ तिचा भित्रटपणा किंवा बुजरेपणा होता असे नव्हे; तर घरामध्ये तिला जी परकेपणाची आणि दुष्टाव्याची वागणूक मिळत होती, तिचा हा परिणाम होता. त्यामुळे, जेवढं जमेल तेवढं ती नवऱ्याला टाळण्याच्या प्रयत्नात असे. पण तरीसुद्धा त्याला निरखण्याची संधी तिला मिळत असे. आईचा अगदी लाडका असल्यामुळे कितीतरी वेळा तो आपल्या आईजवळ बसून तिच्याकडून लाड

करून घेई. तो जिथे बसलेला असे त्या खोलीत काही कारणानं जाण्याचा तिला प्रसंग आला, तर तो तिच्याकडे चक्क मालकी असल्याच्या आविर्भावात पाही आणि त्यामुळे ती लाजून चूर होई पण तरीही; 'त्याला माझ्याबद्दल काही वाटत नाही. मी अगदी दरिद्री आणि भिक्कारडी आहे आणि मला जिव्हाळ्याचं, प्रेम करणारं कुणी नाही हे जेव्हा समजेल तेव्हा तोही मला दूर लोटेल,' अशा भावनेनं ती त्याचा विचार मनावेगळा करे. पण ती जितकी स्वत:ला त्याच्यापासून दूर ठेवू लागली तितकी तिच्या नवऱ्याला अधिकच आवडू लागली. ज्या वयात मुली फुलांसाठी आणि दागदागिन्यांसाठी आसुसलेल्या असतात, कुणीतरी चांगलं, सुंदर म्हणावं म्हणून झुरत असतात, त्याच वयात ती या सगळ्याच्या अगदी विरुद्ध वागतेयं याचं त्याला मोठं नवल वाटे. तसं त्याच्या आईनं वारंवार त्याला सांगितलंही होतं, की संन्याशाची मुलगी असल्यामुळे घर–गृहस्थीचं वळण तिला माहीत नव्हतं आणि त्यामुळे ती इतर मुलींपेक्षा काहीसं वेगळं वागत होती. पण हे खरंच खरं होतं का, खरंच ती भावनाशून्य होती? कमला इतर मुलींपेक्षा वेगळीच आहे, या विचारानं तो नाउमेद झाला. पण अधिक लक्षपूर्वक पाहिल्यावर त्याला समजून आलं, की निर्विकार नजर आणि ओशाळवाणा, खजिल भाव हा तिचा नैसर्गिक, मूळ स्वभाव नव्हे, तर तो आपल्या बहिणींनी बरेच दिवस मांडलेल्या तिच्या छळवादाचा परिपाक आहे. त्याला ठाऊक होतं की आई आपल्या मुलींच्या तालावर नाचते. त्यांच्या होत 'हो' मिसळते. तिनं तर त्याला पढवायला सुरुवातही केली होती की कमलाशी अगदी आपुलकीनं वागणाऱ्या त्याच्या बहिणींशी कमला मात्र तुसडेपणाने वागते. तिला मुळी त्यांच्या चांगुलपणाची किंमतच नाही. ती म्हणे, "त्या काही इतर नणंदांसारख्या नाहीत. पुढे सुद्धा संसारात तिला उपयोगी पडेल असं काम त्या तिला शिकवीत असतात. पण तिला त्याचं काहीच वाटत नाही. फटकून वागते, प्रेमच नाही वाटत तिला त्यांच्याबद्दल, अगदी परक्यासारखं वागत असते.

✿

# ७.

आपल्या बहिणी सारी कष्टाची कामं कमलेला सांगतात, हे गणेशला कळून चुकलं. तिला कामाधामात जरा टणक, कणखर बनवावं म्हणून आम्ही तसं करतो, असे त्या म्हणत. आल्या-गेल्यासमोर, पाव्हण्या-रावळ्यांसमोर 'बिचारी मुलगी, आईविना पोरकी' अशी तिची संभावना केली जाई आणि तिच्या नणंदाच सारं घर सांभाळतात असा देखावा केला जाई. कमला अशी भावनाशून्य आणि कशातच स्वारस्य उरलं नसल्यासारखी का दिसते, याचा शोध एके सायंकाळी अगदी योगायोगाने त्याला लागला. नवऱ्याला आपल्याबद्दल ओढ वाटते याचा कमलेला मुळीच पत्ता नव्हता. योगायोगानं एकदा ते तिला समजलं. उन्हाळ्यातला प्रचंड उकाडा असलेला तो दिवस होता आणि आपल्याला कसंतरीच का होतंय, ताप आल्यासारखं का वाटतंय हे तिला समजत नव्हतं. शेजारपाजारच्या सगळ्या मुली परसदारी, मोकळ्या जागेत खेळ खेळत होत्या. पण तिला खेळात सामील व्हावंसं वाटलं नव्हतं. आपल्या घराच्या आणि नदीच्या दरम्यान असलेल्या, पडक्या देवळामागच्या शांत आणि निवांत ठिकाणी ती अगदी रंजीस येऊन बसली होती. आपल्याला खूप ताप आलाय हेही तिच्या ध्यानमनी नव्हतं. आपलं ठणकतं मस्तक मांडीवर टेकवून ती कितीतरी वेळ तशीच तिथे बसून राहिली होती. तेवढ्यात कुणीतरी आलं. डोकं वर उचलण्याचं त्राणही तिच्या अंगात नव्हतं. पण मृदू आणि मायाळू हाताचा स्पर्श जाणवताच ती आश्चर्यचकित झाली. त्या पाठोपाठ ऐकू आलेले शब्दही काळजीनं आणि कणवेनं भरलेले होते.

"काय, बरं नाहीय का वाटंत? आणि इथे काय करते आहेस?" कमलेनं आश्चर्यातिरेकानं डोळे उघडले खरे, पण जसं तिनं बोलणाऱ्याच्या तोंडाकडे पाहिलं तसं आपला नवराच आपल्याजवळ उभा आहे असं लक्षात येऊन ती अगदी घाबरून गेली. "वेडपटपणा करू नको. मी तुला खातो की काय? ये इकडे अशी. पाहू बरं काय झालंय तुला. अरे बापरे! अंग केवढं तापलंय. ताप आलाय तुला." हे शब्द

ऐकताच चकित होऊन तिनं डोळे मोठ्ठे केले. जसा तो थोडा तिच्याजवळ सरकला तशी तिनं अंग चोरून घेतलं आणि मान दुसरीकडे वळवून, गोंधळलेल्या स्वरात म्हणाली, "तुम्हाला ठाऊक आहे ना, तुम्ही मला शिवायचं नसतं, माझ्याशी बोलायचंही नसतं." एकीकडे चेहरा लपविण्याचा प्रयत्न करीत ती जाऊ लागली तोच तिला अडवीत हसत हसत तो म्हणाला, "कुणी सांगितलं तुला हे असं? उगीच येडपटपणा करू नको. आता आत जा आणि काळजी घे आपली. आईला सांग तुला ताप आलाय ते आणि औषध घे. मला वाटलंच होतं, तुझा काहीतरी वेडपटपणा असणार म्हणून! म्हणूनच तुला शोधत शोधत इकडे आलो."

"तुम्ही मला शोधत होता?"

"हो, दिवसभर तू कुठंच दिसली नाहीस म्हणून मग तुला पाहिल्याशिवाय राहावलं नाही." खाली वाकून, तिच्या चेहऱ्याकडे शोधक नजरेनं पाहत तो म्हणाला. ते ऐकून ती अधिकच बुचकळ्यात पडली आणि त्याच्याकडे पाहताच तिचे डोळे चमकले आणि कापऱ्या स्वरात तिनं विचारलं, "घरातल्या बाकीच्यांसारखं तुम्ही पण मला तुच्छ मानून दूर ढकलणार तर नाही ना,"

"छे, गं, मी असं कशाला करेन? हे काय तुझ्या डोक्यात खूळ भरलंय?"

"कारण मी अगदी दारिद्री आणि भिक्कारडी आहे." ती म्हणाली, "आणि मला दुसरीकडे कुठे जायला थाराही नाही." असं बोलता बोलताच तिला हुंदका फुटला आणि ती रडू लागली. नवऱ्यानं दाखविलेल्या आपुलकीनं आणि जिव्हाळ्यानं तिचं हृदय हेलावलं आणि अभावितपणे ती मन मोकळं करू लागली. डोळ्यांतून झरझर अश्रू वाहू लागले पण आपल्याला रडताना कोणी पाहिलं तर काय होईल, अशी भीतीही तिच्या मनात उमटली नाही. मायाळू शब्दांनी आणि प्रेमळ नजरेनं आपलं काम साधलं होतं. ती सारं काही विसरली आणि मित्राबरोबर बोलावं तसं त्याच्याबरोबर बोलू लागली.

"दादा मला भेटायला आले नाहीत." ती म्हणाली.

"मी बोलावतो त्यांना तुला भेटायला आणि अशा प्रकारचं काहीतरी तू मनात आणू नकोस. कोणी तुला कमी लेखीत नाही. तुला काय कळतं पैशाचं? तो मी आणेन तुझ्यासाठी. माझं काम आहे ते." असं म्हणत त्यानं तिच्या पदरानं तिचे डोळे पुसले. त्यामुळे ती अधिकच बावरली आणि खाली मान घालून आणि अगदी अनोख्या भावना मनात वागवीत ती घरात गेली. तोही फिरायला म्हणून नदीकिनारी निघून गेला. डोकं फारच ठणकत होतं म्हणून आपल्या खोलीत जाऊन ती पडून राहिली. तिचं मन आनंदानं उचंबळत होतं. अगदी अनपेक्षितपणे तिला एक मित्र भेटला होता. तिचं डोकं अधिकच दुखू लागलं आणि तापही वाढला. पण आता तिला त्याची पर्वा नव्हती, कारण तिच्याबद्दल आपुलकी वाटणारं कुणीतरी आता तिथे होतं ना!

त्या रात्री आपल्याभोवती दिव्यांची आरास आहे आणि ते दिवे नृत्य करताहेत असं दृश्य तिच्या डोळ्यांसमोर तरळलं. अनेक हातांचा स्पर्श जाणवला पण ते हात कोणाचे आहेत, हे मात्र कळलं नाही. त्यानंतर मधल्या काही दिवसांत काय काय झालं ते तिला समजलंच नाही. एके दिवशी तिनं डोळे उघडले आणि डोंगरावरच्या निरोगी, ताज्या हवेचा स्पर्श तिला जाणवला. कुणीतरी तिची नाडी तपासत होतं. दोन डोळे तिच्याकडे रोखून पाहत होते. त्या डोळ्यांतील जादूनं तिला असं काही खिळवून ठेवलं होतं, की ती मानही वळवू शकली नाही. त्या माणसाचा एक हात तिच्या नाडीवर, तर दुसरा कपाळावर होता आणि कुठल्यातरी अद्‌भुत शक्तीच्या लहरी त्याच्याकडून तिच्यात संक्रमित होत होत्या. तिच्या मनातलं किल्मिष दूर झालं. शांत शांत, आश्वस्त मन:स्थितीत तिनं डोळे मिटून घेतले. तिच्यावरील लक्ष आणि ताबा काढून घेत तो म्हणाला, "आता पूर्वीपेक्षा बरी आहे ती. मला चांगलंच झुंजावं लागलं. आता झोपू दे तिला." तो आवाज इतका मृदू होता आणि स्पर्श इतका मुलायम होता, की कित्येक तासच्या तास ती तशीच झोपून राहिली आणि जेव्हा ती जागी झाली तेव्हा पहिल्या प्रथम तिला जाणवलं, की ती कुठल्यातरी अनोळखी जागी आहे. ते एक प्रशांत मंदिर असावं किंवा मठ असावा. मंजुळ घंटानाद चालू होता. मध्येच झांजांचा आणि शंखांचा आवाजही घुमत होता. तिची सासू, नवरा आणि काशी हे तिघेही जवळच बसले होते. मग मांत्रिक बाबा आले. त्यांनी काही मंत्र म्हटले, धूप जाळला आणि तिच्या अंगावर कडुनिंबाची फांदी फिरवीत म्हणाले, 'आता बाधा टळली' आणि अधिकच गूढ भाषेत त्यांनी सांगितलं की, "तिच्या देहाचे सात तुकडे केले होते, पण गृहदेवतेनं आणि देवी भगवतीनं त्यांचे त्यांचे भाग घ्यायला नकार दिला म्हणून बचावली. आता समोरच्या पवित्र कुंडातील पाण्यानं तिला स्नान घाला आणि देवीला पुन्हा नैवेद्य आणि हवि अर्पण करा. मांत्रिकाचं हे बोलणं आणि नैवेद्याचा आणि हविचा तपशील ऐकत असतानाच कमलेला आतून जाणवत होतं, की मंत्रतंत्रानं नव्हे तर, त्या अनोळखी माणसाच्या उपायांनी व प्रभावानं ती आजारातून बरी झाली आहे. सारा दिवसभर त्या माणसाची आणि त्याच्याकडे असलेल्या विलक्षण अद्‌भुत औषधींची तारीफ तिच्या कानी पडत होती.

"आम्हांला वाटलं होतं, तू काही आता वाचत नाहीस." तिच्या गळ्याभोवती हात टाकीत काशी म्हणाली. "कितीतरी दिवस तुझा ताप काही हटतच नव्हता. त्यांनी खूप उपाय करून पाहिले पण गुण आला नाही, शेवटी अंगात संचारलेल्या एका बाईनं सांगितलं, की तुला हडळीनं झपाटलंय; म्हणून भूत उतरवायला तुला इथे आणलं. पण इथं आल्यावर तू निश्चेष्ट झालीस. अंग थंडगार पडलं आणि मग त्यांनी मला निरोप पाठवला. मला धक्का बसला तो भयंकर निरोप ऐकून. मी लगेच बाबांना सांगितलं. बाबांना तो तरुण वैद्य माहीत होता म्हणून त्याला घेऊनच आम्ही

इथे आलो आणि बघितलंस ना, त्यानं तुला कसं बरं केलं.''

दुसरे दिवशी तो तरुण माणूस पुन्हा आला. कमलेला त्याचा काहीसा धाकही वाटला आणि त्याच्यातील कुठलीतरी अद्भुत शक्ती आपला ताबा घेते आहे, आपल्यात संचारते आहे, असं वाटलं. हा माणूस जे जे म्हणून सांगेल, ते ते आपण मुकाट्यानं आचरणात आणू असं तिला वाटलं आणि या विचारानं ती अगदी घाबरून गेली. तो जायला निघाला आणि तिला एकदम आठवलं, की आपल्याला पानं-फुलं गोळा करीत असताना भेटलेला आणि आपण ज्याला दादांकडे घेऊन गेलो होतो, तोच हा माणूस आहे. पण हे सगळं आणखी कुणाला सांगायची भीती वाटल्यामुळे ते गुपित तिनं मनाशीच ठेवलं. काही दिवसांनी तिची प्रकृती सुधारली, तिच्यात ताकद आली आणि तिला घरी परत आणलं गेलं. तिच्या नवऱ्यानं सर्वतोपरी तिची काळजी घेतली. या त्याच्या वागण्याला घरात पुष्कळ विरोध झाला. पण त्यानं तिकडे लक्षच दिलं नाही. त्याच्या शुश्रूषेमुळे कमजोर आणि अशक्त कमलेच्या मनात कृतज्ञतेची भावना निर्माण झाली. सासूला आणि नणंदांना हे पसंत नसणार हे तिला माहीत होतं. सगळी मानमर्यादा सोडून देऊन नवऱ्यानं तिची शुश्रूषा केल्यामुळे त्यांचा तिळपापड झाला होता. तिची विचारपूस करायला तो सतत खोलीत येतो, हेही त्यांना पसंत नव्हतं. पण त्यांची समजूत घालण्याचं बळ कमलात नव्हतं.

वर्षातून एकदा तरी, आपल्या अनेक देव-देवतांपैकी कुठल्यातरी दैवताचे मूळ पीठ असलेल्या तीर्थक्षेत्राची वारी करण्याची हिंदूंमध्ये प्रथा आहे. बायाबापड्या, मुलंबाळं एकत्र जमतात, पुष्कळ दिवस पुरतील एवढ्या दशम्या आणि काही गोड-धोड घेऊन, जर दूरचा टप्पा असेल तर बैलगाडीत बसून यात्रेला जातात. या सर्व तीर्थक्षेत्रांत दूधस्थळाची यात्रा करण्याकडे भक्तांचा ओढा अधिक असे. जवळपासचे लोक तर या यात्रेला जातच असत पण अगदी लांबून लांबून येणारे यात्रेकरूही पुष्कळ असत. प्रत्यक्ष दूधस्थळ हे रमणीय स्थान तर होतंच पण त्याच्या अवतीभोवती, जवळपासही पुष्कळ निसर्गरम्य ठिकाणं होती. इथे गंगा गोदावरी उगम पावते आणि एका भल्या थोरल्या खडकावरून खोल दरीत उडी घेते. त्यामुळे एक सुंदर धबधबा साकारतो. दरीतल्या खडकावर पडणाऱ्या पाण्याचे तुषार बनून ते पुन्हा वर उडतात. तेव्हा दुरून एखाद्या मऊशार, दुलदुलीत पांढऱ्या शुभ्र ढगासारखे भासतात. त्यामुळे या ठिकाणाला 'दूधस्थळ' म्हणजेच दुधासारखे शुभ्र भासणारे दुधीस्थळ असं नाव पडलं.

दरवर्षी 'शिवगंगा' मधून दूधस्थळाच्या यात्रेला एक दिंडी नेमानं जात असे. कमला आजारातून उठली ते नेमके यात्रेचे दिवस होते. म्हणून मग तीही दिंडीत सामील झाली. काशी आणि बाकीच्या अनेक मैत्रिणीही बरोबर होत्या. त्यामुळे कमला अगदी खुशीत होती. एकदा एका घोळक्याबरोबर जायचं, तर दुसऱ्या वेळी

दुसऱ्या घोळक्याबरोबर जायचं असं करीत ती अगदी मनस्वीपणे चालली होती. हिंदू कुटुंबातील संथ, पारंपरिक वळणाच्या आणि आचारविचारांच्या निर्बंधांनी जखडलेल्या वातावरणाच्या अगदी विरोधी असे स्वातंत्र्याचे आणि निर्भर आनंदाचे वातावरण या यात्रेकरूंच्या दिंड्यामध्ये असते. कमलेच्या नणंदाही दिंडीत होत्या पण इथे त्यांची तिच्यावर सत्ता चालत नव्हती. त्यामुळे त्यांना काय वाटेल याची फारशी फिकीर कमलाही करीत नव्हती. प्रवासाचा मार्ग अनेक खेड्यांपाड्यांतून जाणार असल्यामुळे तिचा निसर्गावरचा प्रेमभावही आपोआपच संतुष्ट होत होता.

भल्या सकाळी जेव्हा दिंडी दंवभरल्या झाडीतून प्रवास करी तेव्हा लाकूडतोड्यांच्या कुऱ्हाडीच्या घावांचे प्रतिध्वनी ऐकू येत आणि दूर कुठेतरी बैलांच्या साह्यानं ओढल्या जाणाऱ्या मोटांचे आवाजही कानावर पडत. फिकट हिरव्या पानांमधून ओघळणारे द्राक्षांचे घोस कुठे कुठे दिसत, तर कुठे संत्र्यांच्या आणि लिंबाच्या फुलांचा आंबट-गोड सुगंध हवेत भरून राहिल्याचं जाणवे. विहिरी-तळ्यांच्या काठांवर मोठमोठ्या वाफ्यात फळभाज्या, पालेभाज्या लावलेल्या असत आणि तिथून जाताना माणसांचे संभाषण हमखास कानावर पडे. कधी एखादी तरुण मुलगी फळांचा किंवा पालेभाजीचा मोठा हारा डोक्यावर घेऊन जाताना दिसली, तर बैलगाडी हाकणारा कुणी तरुण गाडीवान चेष्टेच्या स्वरात गाणं गुणगुणे. मागे वळून 'माझं पाणी चाख' असं तो तिला सांगे.

*'माझं पाणी पी, शमव तुझी तहान*
*होईल मुखडा ताजा, चांदणं खुलेल गाली*
*असं अद्‌भुत पाणी, मी आणलंय तुजला राणी!'*

नंतर बैलांनी वेगानं पळावं म्हणून त्यानं केलेल्या हैक-हैकचे ध्वनी-प्रतिध्वनी भोवतालच्या टेकड्यांमधून ऐकू येत राहत.

त्या तरुणीनं धाडसी तरुणाला दिलेलं प्रत्युत्तरही ती झाडाझुडपातून, वन-उपवनातून जात असताना वाऱ्याबरोबर लकेरत राही.

*संदुकीत आहे बंद*
*बंद माझं गाणं ऽऽऽ*
*लई झालं तुझ्या*
*जिभेचं वळवळणं रं ऽऽ*
*तुझ्याकडं नाही बाबा*
*शब्दांचं रं धन ऽऽ*
*काळजी घे रं बाबा*
*संदुकीत बंद माझं गाणं ऽऽ*
*चोरतील शब्द कुणी*

*माझ्या संदुकीतले ऽऽ*
*अंगाशीच येईल ऽऽ*
*इस्कोट होईल ऽऽ*

तिच्या गाण्याकडे फारसं लक्ष न देता, तरुण आपलं गाणं आळवत राही.

एखाद्या शेताजवळून दिंडी जाई, तेव्हा फुलांचा गंध किंवा पिवळ्या पडू लागलेल्या गवताचा गंध श्वासात भरे, कधी कुळवणी करून वर ढेकळं काढलेली जमीन दिसे. तिथून जाता जाता वाळलेल्या गवताचे भारे किंवा मोळ्या बांधताना एकमेकांशी खेळीमेळीनं वागणाऱ्या बाया-बाप्यांचे चाललेले संभाषण, त्यांनी घातलेले हुमणे-आहाणे-उखाणे ऐकू येत. ढोलकीच्या तालावर पावलं टाकीत गायलेल्या पुरुषांच्या गीताचे ध्वनी कानावर पडत. ते पाहा, ते शेतमजूर गवताचे भारे घेऊन घरी परत चाललेत. ऐकू या तरी त्यांचं गाणं -

चार-पाच जणांचा एक घोळका -
*हळूहळू हळूहळू, चाला पोरे होऽऽ*

*पहिला : 'आता डोंगरावरून, आता दरीमधून'*

*दुसरा : व्हय, व्हय*

*पहिला : 'आता, आपल्या घराकडे*
*जिथं भाकऱ्या असतात सस्त्या*
*आणि येड्यावाणी बायको*
*वाट बघीत बसत्या ऽऽ'*

*दुसरा : 'व्हय, व्हय.''*

तशातच कुणी देखणी बाई जवळून जाताना दिसते आणि रोख बदलतो –

*'काळ्या लुगड्यानं काम केलं का?'*
*'नाय, नाय, नाय.'*

*किंवा*

*'डोळं पाडसाचं ऽऽ, हरणीवाणी चालं ऽऽ'*
*'व्हय, व्हय, व्हय...'*

आणि मग मोठा हशा! गरीब बिचारी बाई खाली मान घालून रस्त्याच्या कडेला सरकते, मग तर गाण्यातल्या थट्टेला ऊतच येतो.

*गालावरती लाजंची लाली*

*डोळ्यांमंदी शालीनता ऽऽभारी*
*अशी नार नवेली ऽऽऽ*
*मला वाटे प्यारी ऽऽऽ*

'बास कराऽ ही वटवट नाहीतर कानाखाली आवाज निघेल' ती बाई म्हणते. तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून पुरुषमंडळी पुढे निघून जातात आणि 'व्हय व्हय'चा आवाज मात्र दऱ्याखोऱ्यात गुंजत-घुमत राहातो. दूरवर दिसणाऱ्या क्षितिजाकडे अदृश्य होत जाणाऱ्या त्या वारीच्या थोड्या फार सहवासाचा बघ्यांवर विलक्षण परिणाम होतो. कामगारांची गावं खूप दूरवर असतात. तिथे बायका-मुलं त्यांची आतुरतेनं वाट पाहत असतात. या त्यांच्या विरहामुळेच त्यांनी केलेल्या थट्टा-मस्करीकडे उदारपणे दुर्लक्ष केलं जातं. त्यांचं जीवन खडतर कष्टांनी भरलेलं असतं आणि मोकळ्या हवेतील श्वास त्यांच्यात असे काही अकृत्रिम निर्व्याज आनंदाचे क्षण निर्माण करीत असतो.

आता दिंडी एका पुष्करिणीजवळून चालली आहे. पुष्करिणीतील कमळे माना खाली घालून जणू अभिवादन करताहेत. काठावर काही जनावरं आळसावून, डोळे मिटून बसली आहेत. मधमाशांची गुणगुण सर्वत्र ऐकू येतेय. जवळच्या झाडोऱ्यात कुणा देवतेची मूर्ती आहे. तिच्यासमोर असलेल्या दगडी शिल्पांवरून ती जागृत देवता असावी असं वाटतं. तिथून फार दूर नाही अशा एका लहानशा टेकाडावर, झाडीत नजर ठेवणारी, डोळे मिटलेली, प्रशांत गंभीर बुद्धमूर्ती आहे. दिंडी पुढे जाते, तसं एक कसलं तरी आकारहीन देऊळ लागतं. त्याच्याभोवती काही वेड्यावाकड्या उभा राहिलेल्या झोपड्या असतात आणि त्यातून भस्म, विभूती लावलेले काही बैरागी माना उंच करून दिंडीकडेच पाहत राहातात. दिंडी पुढे सरकते आणि सारेजण एका वेलींनी वेढलेल्या दगडी गुहेपुढे येऊन उभे ठाकतात. गुहेच्या भिंतीतून सतत ठिबकणाऱ्या पाण्याचा टप-टप आवाज सर्वत्र घुमत असतो. गुहेत डोकावताच, एका पाठोपाठ एक येणाऱ्या थंडगार वाऱ्याच्या झुळकीमुळे ते सुखावतात आणि खाली असलेल्या कुंडातील नितळ गोड पाण्यानं त्यांची तहानही शमते. हे सीतेचे स्नान-कुंड. जवळच खालच्या बाजूला बाजेच्या आकारासारखा कापलेला खडक आहे, त्यावर शेवाळं वाढलंय आणि चहूबाजूंनी पसरलेलं नेच्याचं झाड हा तिच्या बाळाचा पाळणा. हा सगळा डोंगरी, खडकाळ भाग आहे. इथल्या महाकाय, प्रचंड वृक्षांवर माकडं इकडून तिकडे उड्या मारीत हिंडतात आणि येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांच्या अंगावर गमतीनं जांभळे किंवा कुठलीतरी फळं फेकतात. दिंडी पुढे जाते आणि यात्रेकरूंना मृदंगाची थाप ऐकू येते. या पवित्र स्थळाला साक्षात परमेश्वराचे पाय लागलेले आहेत. यामुळे इथे भाविकांची झुंबड उडाली आहे. कुऱ्हाडीनं तोडलेले एक झाड ईश्वराच्या आगमनाची ग्वाही देते आहे. पाहा ना, कुऱ्हाडीचा घाव बसलेल्या ठिकाणाहून अजून रक्त ठिबकतेय. देवाचा कोप शांत व्हावा म्हणून एका

बकरीचा बळी दिला आहे, सगळीकडे पताका लावल्या आहेत. आता लवकरच तिथे एक दगडी मंदिरही उभं राहील. कमला हे सारं पाहाते, आपल्या मैत्रिणींच्या बरोबरीनं जंगलातली फुलं गोळा करते, देवाला वाहते आणि मनापासून प्रार्थना करते, "देवी, माझ्यावर दया कर, माझ्या दादांना साहाय्य कर, त्यांचे रक्षण कर. मला सुख-समाधान लाभू दे." आपण एका शीघ्रकोपी देवीची आळवणी करतो आहोत, या विचारानं कमलेचं हृदय दडपून जातं.

दिवसाची वेळ असेल तर हे यात्रेकरू गर्द झाडीतील एखाद्या डेरेदार वृक्षाखाली किंवा तळ्याच्या अथवा झऱ्याच्या काठी आपल्या बैलगाड्या सोडत असत. चुली पेटवल्या जात आणि अगदी साधासुधा स्वयंपाक केला जाई. या कामी दिंडीतला प्रत्येकजण मदत करे. पाणी आणणं, जळण-काटक्या गोळा करणं, अशी कामं सगळेजण करीत. अशा वेळी त्यांच्यात चुरचुरीत संभाषण होई, तरुण मुले थट्टा-विनोद करीत. इतर अनेक दिंड्यांप्रमाणे याही दिंडीत स्त्रियांच्या पेक्षा पुरुषांची संख्या तुलनेनं कमी होती. पण त्या थोड्यांमध्ये एक कमलेचा नवरा होता. आपल्या मैत्रिणींच्या समोरच कमलेला नवऱ्याची काही कामं करावी लागत आणि मग तिच्यापेक्षा वयानं थोड्या मोठ्या असलेल्या काशी-भागीरथीसारख्या काही मैत्रिणी तिला चिडवून चिडवून बेजार करीत. त्या सगळ्यांच्यात एक प्रकारचा निर्मळ स्नेहभाव होता. खोल विहिरीतून पाणी शेंदायला एखादी बाई गेली, तर ती कोणत्या घराण्याची आहे याचा फारसा विचार न करता पुरुषमाणसं तिला मदत करीत. संध्याकाळचा कडोसा पडताच, रात्र होण्यापूर्वीच ते सर्व एखाद्या धर्मशाळेत थांबत आणि तिथे रात्रभर मुक्काम करीत. तेथील घरगुती वातावरण, गाई-गुरे आणि घरे-वाड्या पाहून कमलेला बरं वाटे. ती काशीच्या शेजारी बसून आकाशातील चांदण्यांकडे स्वप्निल डोळ्यांनी पाहत, धर्मशाळेत घुमणारा वाऱ्याचा आवाज ऐकत तिच्या गप्पा ऐकत बसे. संध्याकाळच्या वेळी तिचा नवरा तिला फिरायला घेऊन जाई. कधी तिच्या शेजारी बसून तिला, काशीला आणि आईला दिवसभरात काय काय पाहिलं, त्याचं वर्णन करून सांगे.

✿

# ८.

तब्बल आठ दिवस मजल दरमजल करीत, वाटेत निरनिराळ्या स्थळांना भेटी देत ती दिंडी अखेरीस शेवटच्या मुक्कामी, दूधस्थळास पोहोचली. ते अप्रतिम दृश्य पाहून आणि धबधब्याचा दमदार आवाज ऐकून कमला स्तंभित झाली, तिनं अक्षरशः डोळे मिटून घेतले. सोसाट्याचा वारा वाहत होता, त्याचा घूं-घूं आवाज घुमत होता. जंगलातून कसले कसले मोठमोठाले आवाज ऐकू येत होते आणि टेकड्यांमधून धबधब्याच्या आवाजाचे असंख्य प्रतिध्वनी उमटत होते. वाटोळ्या आणि काहीशा चपट्या पसरट दगडांनी बांधलेली काहीशी विचित्र पद्धतीची घरं सर्वत्र दिसत होती. धबधब्यापासून काही अंतरावर नदीचे पात्र रूंद होते आणि ती नदी दूरवर एकटेच उभं राहून, सभोवतालाकडे खिन्न, विषण्ण नजरेनं पाहत असलेल्या, पाषाणात कोरलेल्या नंदीच्या महाकाय मूर्तीचे पाय धूत होती. नदीपासून अगदी थोड्या अंतरावरील वृक्षांच्या घनदाट राईत ते मंदिर होतं. तिथल्याच काही बायकांचं संभाषण कमलेच्या कानावर पडलं. त्यातल्या काही स्त्रिया शिजवलेल्या भाताचा नैवेद्य नदीला अर्पण करीत होत्या, काहीजणी नारळ वाढवीत होत्या; तर काहीजणी दरीत उडी घेणारा नदीचा प्रवाह पाहून आश्चर्यातिरेकानं आरडाओरड करीत होत्या. काही श्रद्धाळू बायका, 'हरी! हरी!', 'शिव! शिव!' असे भक्तिपूर्ण उद्‌गार काढीत होत्या. 'आपल्या या पवित्र गंगामातेला धरणीनं गिळून टाकलं, सगळीकडे शत्रू भरले आहेत. अगदी धरणीमातेलासुद्धा गंगेच्या सत्कृत्यांचा हेवा वाटतो आणि म्हणून मग तिला गिळून ती गंगेच्या सत्कृत्यात बाधा आणते' असं काहीसं संभाषण ऐकत पात्रातील नदीच्या धारेला लागून असलेल्या पायऱ्यांवर माणसांच्या गर्दीत कमला उभी होती. तिथे उभी राहिल्यावर, पूर्वी कधीकाळी घडून गेलेल्या घटनांच्या जणू स्मृती चाळवल्या. आपल्या अगदी नेहमीच्या पाहण्यातलेच दृश्य आपण पाहतो आहोत की काय असा भास तिला झाला. पायऱ्या उतरून पाण्याच्या धारेला स्पर्श केल्यावर, तर तिची समजूत आणखीनच दृढ झाली. तिच्यासमोरच

एक खडक होता आणि तिला त्याची खूण नेमकी पटली. धावत्या पाण्याची खळखळही यापूर्वी तिनं नक्कीच ऐकली होती. खरंच, हे सगळं यापूर्वी तिनं नक्कीच पाहिलं होतं. पण मग तिथे झालं होतं तरी काय? तिच्या डोक्यात अशा स्वप्निल झिणझिण्या का? वेदनेची एक कळ तिच्या हृदयात उमटली. ती जणू दुसऱ्याच कुठल्यातरी अनोळखी प्रदेशात जाऊन पोहोचली होती आणि हे कोण बरं तिचा हात धरून तिला घेऊन जात होतं? हिऱ्याच्या बांगड्या घातलेली एक अत्यंत सुस्वरूप, देखणी स्त्री होती. अचानक पाण्याचा लोंढा आला. तिच्याभोवती भोवरा तयार झाला आणि एका निमिषात पाण्यात पाय घसरून ती धरेला लागली. मग ती स्त्री आपल्या मागे ओरडत, सुरकांडी मारून येतेय असा तिला भास झाला. किती भयंकर तो डोह! बाप रे! काय खोल काळाकुट्ट दिसत होता तो! तिला त्या स्त्रीनं पकडलं आणि वर ओढून घेतलं. पण हे घडलं तरी केव्हा आणि कुठे? खरोखरच असं सगळं तिच्या बाबतीत निश्चितपणे घडलं होतं का? तिला सगळं अगदी स्पष्ट आणि तंतोतंत कसं आठवत होतं? अशा विचारात ती हरवलेली असतानाच तिला एक आवाज ऐकू आला. तो तिच्या वडिलांचा आवाज होता आणि मघाशी तिच्या मन:चक्षूसमोर ठसठशीतपणे उभ्या राहिलेल्या चित्रात तो अगदी आश्चर्यकारकरीत्या मिसळून गेला होता. पार विस्मृतीत गेलेली संगीतातील एखादी तान अचानक मनात जागी व्हावी आणि सारखी गुंजत राहावी, त्यानं एक प्रकारचं भारलेपण यावं, तसा तो आवाज होता. आता तो तिच्या कानावर इतक्या जोरानं आदळला, की आपण एखाद्या स्वप्नातून जागे होतो आहोत असं तिला वाटलं. मोठ्या कष्टानं तिनं मागे वळून पाहिलं आणि आश्चर्य म्हणजे आपले वडील त्या गर्दीतून वाट काढीत निघून जाताना तिला दिसले. 'दादाऽऽ दादाऽऽ' अशी हाक मारीत ती गर्दीत घुसली. पण दादा कुठे नाहीसे झाले हे काही तिला समजलं नाही. कारण सगळी गर्दी ओसरल्यावर, गर्दीच्या अगदी शेवटच्या टोकाला ती येऊन पोहोचली तेव्हा तिच्या लक्षात आले, की वृक्षांच्या राईतील देवळाच्या पायरीवर आपण उभ्या आहोत. शंखांचा आणि झांजांचा आवाज कानठळ्या बसवीत होता. समोरचं विचित्र दृश्य आणि भोवती गोळा होऊन तिच्या चेहऱ्याकडे शोधक नजरेनं रोखून पाहणारे अनोळखी चेहरे बघून तिच्या हृदयात धडकी भरली. 'अरे बापरे इथे अशा ठिकाणी मला एकटीला पाहून माझा नवरा काय म्हणेल? सासूबाई काय म्हणतील?' अशा विचारानं ती घाबरली. भस्माचे पट्टे ओढलेले बैरागी आणि हिडिस चेहऱ्यांचे, डोळे मोठे करून, टक लावून पाहाणारे महंत पाहून ती अगदी हवालदिल, अस्वस्थ झाली. ती भीतीनं गोठून गेली. भूत-पिशाच्चांच्या करणीच्या विचारानं तिच्या मनाचा ताबा घेतला आणि ती जोरजोरात किंचाळण्याच्या बेतात होती. पण आपल्या अंगातलं त्राण गळून गेलंय असं तिला वाटलं आणि ती जमिनीवर धाडकन पडली. 'ऊठ!' प्रशांत-गंभीर आणि कडक आवाज कानावर पडताच कमलेनं थरथर कापत

मुकाट्यानं आज्ञापालन केलं. "चल, तुझ्या माणसांत चल. ही तुझ्यासाठी योग्य जागा नाहीयं. तुझे वडील गेले निघून." हे शब्द ऐकताच तिनं डोळे वर उचलून पाहिलं आणि कोण दिसावं तिला? तो तरुण वैद्य! तिला एकदम हायसं वाटलं. तिनं काहीतरी बोलण्यासाठी तोंड उघडलं पण "शू:ऽ काही बोलू नको. ही बोलत बसण्याची जागा नव्हे" असं म्हणत त्यानं तिचा हात घट्ट पकडला आणि गर्दीतून वाट काढीत काढीत तो तिला इतर सर्व लोकांच्या मुक्कामाच्या जागेपासून काहीशा लांब असलेल्या घोळक्याकडे घेऊन गेला. तो काशीचा गोतावळा होता. काशी दिसली तसा कमलेनं मोकळा श्वास घेतला.

"नारायणबुवांनी कमलेला तिच्या गोतावळ्यात पोहोचव असं तुला सांगण्यास मला सांगितलं. ते तिथे देवळात आहेत. तेच हिला पोहोचवायला येणार होते पण त्यांना बरीच कामं आहेत. त्यांनी तुला दुरून पाहिलं, म्हणून तुझ्यावर हे काम सोपविलं आहे." असं सांगून तो माणूस निघून गेला. त्यासरशी कमलेने नि:श्वास टाकला. तिच्याकडे मोठ्या कुतूहलानं राहणाऱ्या काशीशी काही बोलणं तिला शक्यच नव्हतं. ती एकदम रडू लागलेली पाहाताच काशीला वाटलं, की वडलांच्या वियोगामुळे तिला भरून आलं आहे. काशीनं तिची समजूत काढली आणि मग ते सगळेजण अजूनही नदीच्या घाटावरच बसलेल्या कमलेच्या गोतावळ्याकडे गेले. झाली घटना जरी मामुली असली तरी कमला त्यामुळे चांगलीच अस्वस्थ झाली. कमलात असं होतं तरी काय; की ज्यामुळे तिला असं काहीतरी दिसत होतं? तिनं यापूर्वी ते दृश्य खरोखरच पाहिलं होतं काय आणि तिचे दादा असे एकाएकी दिसेनासे का बरं झाले? तिनं भास, दृष्टांत, साक्षात्कार याबद्दल ऐकलं होतं पण तरीही झाली गोष्ट कुणाला सांगायची तिला भीती वाटली. गंगा-गोदावरीमातेचा तो सूचक संदेश होता का? बाईऽऽग काशीला, हे सगळं सांगितलं तर ती काय म्हणेल? आणि दादांनी काम सोपवलंय असं म्हणणारा तो माणूस तरी कोण होता? कमलेच्या मनात त्याच्याबद्दल कृतज्ञता दाटून आली, ती कमालीची वैतागलीही; पण हे सगळं तिनं मनातल्या मनातच ठेवलं.

यात्रेच्या या दिवसात गणेशला कमलेचे अनेक गुण समजले, कारण घरातल्यासारखं, एकमेकांशी वागण्याचे, रीती-भातीचे निर्बंध तिथे नव्हते. अनेक वेळा ते दोघे चोरून भेटत, परस्परांशी गप्पागोष्टी करत. परिणामी तो तिच्यात अधिकाधिक गुंतत गेला. रुबाब, डौलदारपणा, शालीनता आणि असाधारण लावण्य यांचा असा काही मिलाफ तिच्यात झाला होता, की ती तिच्या वयाच्या मुलींपेक्षा अगदी वेगळी दिसे, लाखात उठून दिसे. निरनिराळ्या गोष्टींची माहिती मिळविण्यास ती उत्सुक असते आणि तिची आकलन शक्तीही कमालीचा चांगली आहे, हे त्याला समजलं आणि स्त्रियांच्या प्रेमाबद्दल व स्त्रीशिक्षणबद्दल जी इंग्लिश कल्पना त्याच्या मनात रुजली होती, तिच्यानुसार कमलेला शिक्षण देऊन, तिच्या मनाचा विकास करून तिला

खरीखुरी जीवनसहचरी बनविण्याची अभिनव जाणीव त्याच्या मनात निर्माण झाली.

याच उद्देशानं यात्रेहून परत आल्या आल्या लगेचच कमलेला शिकवण्याचा उपक्रम त्यानं हाती घेतला. त्याच्या मार्गात मोठमोठे अडथळे होते. त्याच्या आईला आणि बहिणींना त्याचं हे वागणं मुळीसुद्धा आवडलं नाही. तो बाईलवेडा बनलाय, पौरुष विसरलाय, असं त्या म्हणू लागल्या. 'कोणी स्वाभिमानी पुरुष कधीतरी आपल्या बायकोचं असं कौतुक करतो काय? तिला शिक्षण देऊन आपल्या उंचीला, आपल्या पंक्तीला आणून कधी बसवेल काय?' असं त्या विचारीत. बायको म्हणजे ताटाखालचं मांजर, बायको म्हणजे नवऱ्याची आणि साऱ्या घराची दासी, असे उपदेशाचे डोस त्या देत. अशा प्रकारे वागून तो स्वत:चीच किंमत कमी करून घेतोय असं त्यांना वाटे. तरीही गणेश आपल्या मतावर ठाम होता आणि स्वत:च्या मर्जीनुसार वागत होता. पण त्याच्या आईनं दु:खाचा कांगावा करायला सुरुवात केली. फार मोठा आघात झाल्यासारखा चेहरा करून ती वावरू लागली. कित्येक वेळा ती आपल्या मुलासमोर घाय मोकलून रडे आणि म्हणे, "अरे, तुला असं झालंय तरी काय? त्या मुलीचे असे देव्हारे का माजवतो आहेस? तू तिला घरकाम करू नको असं सांगून पुस्तकं हातात ठेवलीस तिच्या. जणू काही, उद्या ती पैसे मिळवून घेऊन येणारेय घरात. ही असली थेरं बघायला मी जन्माला तरी का आले कोणास ठाऊक! तुझ्या बहिणींच्या मनालाही फार लागलंय. तिला मात्र आमच्याबद्दल काहीच वाटत नाही. ना आमच्याबद्दल आपुलकी, ना जवळीक. अशा मुलीला तू चढवून ठेवतोयस, मुभा देतोयस. तिला वाचायला आवडतं हे आम्हांला होतं ना माहीत!"

"अगं आई, अशी का करवादतेस? एकदम टोकाला का जातेस? अगंऽऽ सकाळच्या वेळी एखादा तास वाचण्यात घालवला, तर ती अगदी बिघडून जाईल असं वाटतं का तुला? मला तर ती माझी जीवनसहचरी व्हावी, असं वाटतं. ती तुझ्यावर कधीच हुकमत, अरेरावी गाजवणार नाही. खरं म्हणजे शिकल्यामुळे ती अधिकच विनम्र होईल आणि सकाळी थोडा वेळ अभ्यास झाल्यावर, उरलेल्या वेळी ती काम करायला मोकळीच आहे की आणि घरातल्या सगळयांसाठी इतकं सारं अन्न शिजवलं जातं, त्यातलं थोडंसं तू तिला नाही का देऊ शकत? मग असं का म्हणतेस, की तिच्यासाठी तुला राबावं लागतं म्हणून!"

गणेशच्या या बोलण्यानं तिचं मुळीच समाधान झालं नाही. ती लांबोडका चेहरा करून,कोपऱ्यात एकटीच जाऊन बसू लागली. आईचा असा दु:खीकष्टी चेहरा गणेशला पाहवेना. तिचं वागणं त्याच्या मनाला फार लागलं आणि तो तिची अधिक मनधरणी करू लागला. जेवायच्या वेळी नेहमी आई त्याच्यापुढे बसून त्याला हवं-नको ते पाहत असे पण आता तिचं वागणं बदललं. ती त्याला सोडून दुसऱ्या खोलीत जाऊन बसू लागली. गणेशाच्या बाबतीत तो काळ मोठा खडतर होता,

कारण त्याच्या वडिलांचंही त्याच्याबरोबरचं वागणं बदललं होतं. एरवी, त्याच्या वडिलांना त्याच्याबरोबर कॉलेजसंबंधी गप्पागोष्टी करायला, नव्या शिक्षणाची टर उडविण्याचा आनंद घ्यायला आवडत असे किंवा वेदांतील काही ऋचांसंबंधी ते त्याच्याबरोबर तासन्‌तास बोलत बसत असत. पण आताशा ते अगदी गप्पगप्पच असत आणि कधी गणेश काही बोलायला गेला, तर ते केवळ नाइलाजानं 'हूं, हूं' करीत. बहिणीही त्याच्याकडे दुर्लक्ष करू लागल्या. त्या आतल्या बाजूला जाऊन उभ्या राहात आणि आईशी कुजबुज करीत. त्यातल्या त्यात रमाबाईचा नवरा तेवढा त्याच्याशी पूर्वीसारखंच सहज स्वभाविकपणे वागत असे. किंबहुना गणेशला आपल्याकडे वळवून घेण्याच्या खटपटीत तो असे. अर्थातच या वातावरणाचा सगळ्यात जास्त त्रास झाला तो कमलेला. घरच्या माणसांना आपण नकोसे झालो आहोत हे त्यांच्या चेहऱ्यावरून कमलेला स्पष्ट दिसत असे. जाता-येता तिच्या कानावर लागट बोलणं, टोमणे पडत आणि ती आतल्या आत झुरत कुढत राही. पण आपण चुकलो कुठे, नेमका कुठला गुन्हा आपल्या हातून घडलाय, हे मात्र तिला पुष्कळ दिवसांपर्यंत ठाऊकच नव्हतं. रोजच्याप्रमाणे घरकामात मदत करायला ती गेली तरी कुणी तिच्याकडे लक्ष देईनासं झालं आणि एखादं लहानसं काम जरी ती करू लागली तरी तिच्याकडून ते हिसकावून घेतलं जाऊ लागलं. एके दिवशी आपलं जेवणाचं ताट वाढून घ्यायला स्वयंपाकघरात गेली; तर बायकांच्यासाठी अन्न ठेवलेलं असे, तिथे मुळी तिच्यासाठी काही नव्हतंच. ती तिथेच थोडावेळ तिष्ठत उभी राहिली पण तिच्याकडे कुणीही, अगदी मोलकरणीनंही लक्ष दिलं नाही. तिला अतिशय भूक लागली होती. पण तिनं तोंडातून एक अवाक्षरही काढलं नाही. संध्याकाळी जेव्हा ती विहिरीवर गेली, तेव्हा रूक्मानं 'असा चेहरा का उतरलाय?' म्हणून विचारलं. रूक्मानं खरं तर, काहीशा थट्टेच्या स्वरात आणि चिडवायच्या बेतानं विचारलं होतं. पण तो प्रश्न ऐकताच कमलेच्या डोळ्यांतून झरझर अश्रूंच्या धारा वाहू लागल्या आणि आपण रूक्माला सगळं काही सांगून टाकावं असं तिला वाटलं तरीही, ती फक्त एवढंच म्हणाली की, मला जेवायला मिळालं नाही, मला कडकडून भूक लागली आहे. कमलेचं हे बोलणं ऐकल्यासारशी, रूक्मानं आपली घागर खाली ठेवली, धावतच आपल्या घरी जाऊन आपण स्वत: बनविलेल्या भाकऱ्या आणल्या आणि कमलेला खाऊ घालू लागली. कसंतरी करून बळं बळं कमलानं चार घास खाल्ले पण तिच्या घशात घास फिरू लागला. "तुला का नाही वाढलं जेवायला?" रूक्माने विचारलं.

'"मला नाही माहीत. पण काहीतरी बिनसलंय. पण मला त्याबद्दल कुणाला काही विचारायची भीती वाटतेय. खूप दिवसांपासून ते कुणी मला काही कामही सांगत नाहीत की करू देत नाहीत. सगळे मला दूर लोटतात, टाळतात."

कमलेच्या सासरचे लोक असे का वागताहेत हे कोडं त्या दोघींनाही उकलेना.

थोड्या वेळाने रूक्मा म्हणाली, "हे असंच चालू राहिलं तर, तू करणार तरी काय?" कमलेला पुन्हा जोराचा हुंदका फुटला आणि ती रडू लागली. रूक्मानं तिचे डोळे पुसले आणि तिला सांगितलं, की "कुणाला सांगू नको, पण रोज घरातली जेवणं आवरली की विहिरीवर ये. मी तुझ्यासाठी भाकरी घेऊन येईन. आपण दोघी मिळून इथे खाऊ."

कमलेला इकडची काडी तिकडे करायला लागू नये म्हणून दक्ष असलेल्या तिच्या वडिलांना तिची ही अवस्था पाहून काय बरं वाटले असते? वडिलांच्या घरी असताना तिला कधी काही कमी पडलं नव्हतं की कुठली इच्छा अपुरी राहिली नव्हती. माहेरातले हे दिवस म्हणजे प्रदीर्घ असं सुखस्वप्न होतं. पण आता मात्र सरसकट सर्व हिंदू कुटुंबातील सासुरवाशिणींच्या वाट्याला येणारे सारे भोग कमलाच्या वाट्याला आले होते. मोठ्या लाड-कोडानं, कौतुकानं वाढविलेली मुलगी एकदा दिली, लग्न करून सासरी गेली की आईबापांची राहत नाही. तिच्या आयुष्यात त्यांनी लुडबुड करणं गैर असतं. मग जे तिच्या नशिबात असतं, ते घडतं!

आपलं ताट पुरुषांच्या पंक्तीत वाढून ठेवतात हे कमलेला अचानकपणे समजलं. तिचा उपाशी चेहरा न बघवल्यामुळे घरच्या मोलकरणीनं तिला हे सांगितलं. तीही कमलावर चिडलेलीच होती. त्यामुळे ती तिला म्हणाली की तिच्यावर असा प्रसंग यायला तिचं वागणंच खरं तर कारणीभूत आहे. या सगळ्याचं काय करावं, परिस्थितीतून कसा मार्ग काढावा हे कमलेला समजेना. म्हणून मग तिनं आपल्या नवऱ्याला त्याबद्दल विचारलं. तर तो म्हणाला, की "त्यानं तिला शिकवायला सुरू केल्यामुळे सगळं घडलं." कमला म्हणाली, "खरंच, मला माफ करा. तुम्हांला नाही कळायचं, मला किती आणि काय काय सोसावं लागतं ते. दया करा माझ्यावर." पण त्यानं ते काही मनावर घेतलं नाही. उलट "या बाकीच्या कशाकडे मुळीच लक्ष देऊ नकोस, तुला शिकवायचं असा माझा पक्का निर्धार आहे." असं बजावलं. घरातल्या इतक्या सगळ्यांचा विरोध असूनही, कमलेचे ते दिवस मोठे सुखाचे होते, कारण तिचा नवरा तिच्याशी अगदी प्रेमानं, गोडीगुलाबीनं वागत असे आणि तिला दररोज नियमितपणे शिकवीत असे. पण काही दिवसांनंतर त्याच्या वागण्यात बदल झाला आणि त्यानं हळूहळू तिला शिकवणं बंद केलं. कमला सकाळी त्यामुळे मोकळीच असे पण तरीही आपली खोली सोडून बाहेर पडायचा आणि दररोजच्या घरगुती कामात मदत करायचा तिला धीर होत नसे. बायकांचे टोमणे आणि लागट बोलणं सहन करण्याचे धैर्य तिच्यात नव्हतं. आपले यजमान आज येतील, उद्या येतील आपल्याला शिकवतील म्हणून तिनं खूप वाट पाहिली पण ते काही आले नाहीत. त्यांच्या या वागण्याचा तिला अर्थच उमगेना आणि ती अस्वस्थ झाली. घरातल्या इतर लोकांचं वागणं आता तिच्या अंगवळणी पडलं होतं

त्यामुळे ती ते मनावेगळे करू शकत होती परंतु; ज्याला ती आपला एकमेव जिवलग मित्र मानत होती तोही असा परक्यासारखा वागू लागल्यावर ती अगदी खचून गेली. तिच्या स्वाभिमानाला धक्का बसला होता. स्वत:च्या नजरेतूनही ती उतरली होती. आपल्या नवऱ्याबद्दल वाटणाऱ्या गाढ विश्वासाचं आता काहीशा अविश्वासात रूपांतर झालं होतं. खोलीतून बाहेर पडली की तिला टोमणे आणि लागट शेरे ऐकू येत. कुजकट हसू आणि औपरोधिक शब्द कानावर पडत, 'बघा कशी जिरली! केवढा तो तोरा, पण झाला का काही उपयोग? आणि आडून आडून रचलेल्या कारस्थानांतून तरी काही मिळालं नाहीच ना?' जखमेवर मीठ चोळल्यासारखं तिला वाटे. आपल्या नवऱ्याच्या वागण्याचं ती स्वत:च्या मनाशीच दुबळं समर्थन करण्याच्या प्रयत्न करे. 'त्यांचासुद्धा काही इलाज नसेल चालला. त्यांच्या आईच्या आणि बहिणींच्या वागण्याचे प्रताप असणार, दुसरं काय.' पण अशा विचारांनीही तिला फारसं समाधान लाभत नसे. याच दरम्यान कुटुंबातल्या इतर लोकांच्या वागण्यात काहीसा बदल घडून कमलाबद्दलचा राग आणि द्वेष उघड उघड बोलून दाखविणं त्यांनी बंद केले आणि गणेशबद्दलची नाराजी बाजूला ठेवून, ते सारेजण त्याच्याशी गोडीगुलाबीनं वागू लागले. त्याची वास्त-पुस्त करू लागले. त्याच्याशी हास्यविनोद करू लागले, हे पाहून आपल्याशी तर ही माणसं कधीच चांगलं वागणार नाहीत. निदान नवऱ्याशी चांगुलपणानं वागताहेत, हेही नसे थोडके या विचारानं कमलेला थोडंसं बरं वाटलं. हा सगळा बदल रमाबाईच्या नवऱ्यानं घडवून आणला होता. तो त्या सगळ्यांचा सल्लागार होता. 'गणेश आणि कमला यांच्यात पुढे कसे संबंध जडतील आणि गणेश घरच्यांशी कसा वागू लागेल' या संबंधी त्याचं भाकीत खरं ठरणार असं दिसताच, त्या सगळयाजणी मिळून कमलेच्या सासऱ्याकडे गेल्या आणि असली मुलगी सून म्हणून घरी आणल्याबद्दल त्यांना बोल लावू लागल्या. 'त्याचा तिच्यावर अगदी वेड्यासारखा जीव जडलाय.' आई म्हणाली, "त्याला तिच्यापुढे तुमची काय किंवा कुणाची काय, मुळीच पर्वा राहिलेली नाही. तिला असं डोक्यावर चढवून ठेवून तो आमच्या भावनांना पायदळी तुडवतोय. तिनं काऽऽही काम न करता राणीसारखं राहावं आणि आम्ही तिची चाकरी करावी असं त्याला वाटतं." अशा प्रकारची गाऱ्हाणी त्यांनी त्यांच्यापुढे मांडली.

हे सगळं ऐकून त्या घरातल्या कर्त्या वृद्ध पुरुषाला फार त्रास झाला आणि यातून मार्ग कसा काढावा अशा विचारात तो असताना रमाबाईचा नवरा त्यांच्या मदतीला धावून आला. "आता यातून पुढे काय निष्पन्न होईल, याची मला कल्पना होतीच. या सगळ्या आधुनिक कल्पना आहेत. मला हे सगळं स्पष्ट दिसत होतं आणि मी अनेकदा तुम्हांला बजावलं होतं. पण आता काय? मागील पाढे पंचावन्न असंच चालू ठेवणार की काय? तुम्ही जितका म्हणून त्याला विरोध कराल तितका तो

अधिक इर्षेला पेटेल आणि बायकोला शिकवण्याच्या निर्णयावर अडून राहील. त्याला वाटेल की तो त्याच्या हक्कांसाठी संघर्ष करतोय आणि तुमच्या या वागण्याचा परिणाम म्हणाल तर, एवढाच होईल की तो आपल्या सर्वांपासून दूर जाईल. तो कशाला पर्वा करेल? तुम्ही सगळे तिच्या विरोधात आहात असं त्याच्या लक्षात आलं, तर तो तिला आपल्या सोबत घेऊन दूर निघून जाईल. तेव्हा, आता जरा, त्याला त्याच्या मनाप्रमाणे वागू द्या. एवढंच नव्हे, तर त्याला खुष ठेवायचा प्रयत्न करा आणि त्या मुलीबद्दल वाटणारा दुरावा मनातच ठेवा. तरुण मुलांचे आपल्या बायकोवरील चित्त दुसरीकडे वळवायचे एक ना दोन हजार मार्ग आहेत. माझ्या माहितीप्रमाणे त्याला समाजात चारचौघात मिसळायला फार आवडतं. मग न्या ना जरा त्याला मंदिरात, मेजवान्यांचे बेत आखा आणि त्याच्या डोक्यातलं हे नवं खूळ काढून टाका. आपल्याला काही विरोध होत नाही म्हटल्यावर, तो जे हे बायकोला शिकवतो, शिकवतो म्हणतोय ना, ते आपोआपच सोडून देईल.''

सगळ्यांनी 'हो, हो' करत माना डोलावल्या आणि तो वृद्ध माणूस मात्र मोठ्या खेदानं, विषण्ण स्वरात म्हणाला, की ''माझा मुलगा असं मूर्खासारखं वागेल यावर माझा खरोखरी विश्वास बसत नाही आणि जिच्यावर मी एवढी माया करतो, ती कमलाही, आपल्या आईचं काही ऐकू नको असं त्याला सांगेल किंवा घरच्यांपासून त्याला तोडेल असं मला वाटत नाही.'' या संभाषणानंतर गणेशची आई त्याच्याबरोबर पूर्ववत वागू लागली. त्याचं जे वागणं खटकत होतं, त्याबद्दल नाराजी व्यक्त करणंही तिनं सोडून दिलं. आपल्या इतक्या सुस्वभावी आईला दुखविल्याबद्दल त्याचं मन त्याला खाऊ लागलं. त्याला वाटू लागलं, की आपल्या आईचं आपल्यावरचं प्रेम इतकं गाढ आहे की त्यामुळे ती आपले सगळे, अगदी अक्षम्य अपराधही पोटात घालाते. म्हणून मग आता लवकरच रामपूरला जायचं आहे, तर कमलेला शिकवण्याचं काम तिथेच करावं असं त्याच्या मनानं घेतलं आणि मग त्यानं कमलाचा अभ्यास घेणं सोडून दिलं. एवढंच नाही तर पूर्वीप्रमाणे, तिच्याबरोबर उठणं-बसणंही त्यानं बंद केलं. आणि अशाप्रकारे त्याच्या धूर्त नातेवाइकांनी मोठ्या चातुर्यानं त्याच्यासाठी रचलेल्या षड्यंत्रात तो मोठ्या आनंदानं शिरला.

✿

# ९.

कमलेच्या मानसिक स्थितीत सतत काहीना काही चढउतार होत होते. त्याची इतरांना तर नाहीच पण तिला स्वत:लाही जाणीव नव्हती. 'तिळा उघड' हा परवलीचा शब्द अजून उच्चारला गेला नव्हता. कृत्रिम बांध घालून अडवलेली वादळं अजून स्तब्ध, शांत होती. पुराच्या पाण्याची जबरदस्त ओढ, ताकद अजून कुणी अनुभवली नव्हती आणि त्याचा माथेफिरू झपाटा, आवेगही अजून जाणवला नव्हता. त्यामुळे स्वभावत: स्वप्नाळू, शांत, सहनशील असलेली कमला, परिस्थितीच्या हातातलं बाहुलं बनून, हे सारे नशिबाचे भोग आहेत अशा विचारानं सारा जुलूम मुकाट्यानं सहन करीत होती. रोज येणारं नवं दु:ख शांतपणे झेलत होती. ती ज्या पद्धतीनं हे सारं ओढत होती, त्याचं तिला स्वत:लाच नवल वाटत होतं. तिला सांगितलेल्या साऱ्या गोष्टी, सारे काबाडकष्ट ती एखाद्या मुक्या जनावराप्रमाणे, 'कशाला' किंवा 'का' असा कोणताही प्रश्न न विचारता, बिनतक्रार करीत होती.

कसं का होईना, पण आता घरच्यांच्या वागण्याचा तिला फारसा त्रास होत नव्हता. हळूहळू तिचे डोळे उघडले होते आणि एकदा त्यांच्या मनाच्या हलकेपणाचा आणि ओठात एक, तर पोटात एक वागण्याचा तिटकारा आल्यावर आता ती त्यांच्याकडून चांगल्या वागण्याची अपेक्षाही करीत नव्हती; आणि त्यांचं वागणं काही जगावेगळं आहे, असंही मानत नव्हती. पण गणेशची गोष्ट वेगळी होती. अजून तरी त्याच्याविषयी तिच्या मनात प्रणयभावना निर्माण झाली नव्हती. तरी ती त्याला आपला सखा, सवंगडी मानू लागली होती. सासरच्या इतर माणसांपेक्षा तो वेगळा आहे, असं तिला वाटत होतं. त्याचे वागणंही तिला हा विश्वास सार्थ करणारं होतं. असा नवरा लाभणं हे सहसा न मिळणाऱ्या सुखाचं निधानच नव्हतं का? असा विचार करून ती आपल्या हृदयाची धडधड थोपविण्याचा प्रयत्न करी. पण अलीकडे तिचं हृदय असं जोरानं का बरं धडधडत होतं? त्याला असं हवं तरी काय होतं? या मैत्रीनं तिच्या मनातील अननुभूत प्रीतीचे झरे जिवंत केले होते आणि

अंत:करणात चांगलीच खळबळ माजविली होती. एका सर्वस्वी नव्या, अनोख्या जगाची कल्पना तिच्या मनात साकारत होती. असं जग की जिथे अगदी आदर्श जीवन जगता येईल; जिथे भावनिक ऐक्याची परिपूर्ती अनुभवता येईल, परस्परांच्या भावना जाणून घेतल्या जातील आणि परस्परांचं जीवन परस्परांसाठी समर्पित असेल. तिच्या भावना काहीशा धूसर आणि संदिग्ध असल्या तरी त्यावेळी त्या चांगल्याच प्रबळ होत्या. या मधल्या काही काळात, तिचा आणि गणेशचा जो छळ झाला होता, त्यामुळे त्या दोघांतील बंध अधिक दृढ झाले होते. त्याला माहीत नव्हतं. पण तिच्या मनात त्याच्याबद्दल जिव्हाळा आणि कळकळ निर्माण झाली होती. आपल्यासारखेच भाव त्याच्याही मनात असतील काय? अशी आश्चर्यमिश्रित हुरहूरही तिला वाटत असे. त्यानंतर तिच्या मनाला मैत्रीच्या पलीकडे असलेल्या, मैत्रीहून वेगळ्या अशा भावनेची ओढ लागली. अशी कोणती भावना होती ती? तिनं स्वत:ला खूप छेडलं पण व्यर्थ! कधीतरी कोडं उलगडेल म्हणून तिनं वाट पाहिली पण तसं काही एक न घडल्यामुळे ती उदास, हताश झाली. खरं तर गणेशचा एखादा प्रेमकटाक्ष, एखादा जिव्हाळ्याचा शब्द किंवा एखादा मायेचा स्पर्शही तिच्या मनाची कवाडं उघडण्यास पुरेसा होता. पण गणेश तर अगदी अलिप्त राहू लागला होता. कमलेला आपल्या मनातल्या खळबळीची भीती वाटू लागली होती. त्याचबरोबर गणेशच्या थंड्या प्रतिसादाचं नवल वाटत होतं आणि तरीही, एखाद्या आईनं आपल्या मुलाची घ्यावी तशी त्याची काळजी घेणं, त्याला काय हवं नको पाहणं हे आपलं कर्तव्य आहे, असं तिला वाटत होतं. तिला अस्वस्थ करणाऱ्या कितीतरी लहान-मोठ्या घटना आजूबाजूला घडत आणि तिच्या मनात भीतीचं काहूर उठे. गणेश कुठल्या संकटात तर सापडलेला नाही ना? जगाचा जो अनुभव तिनं घेतला होता त्यावरून पुळणीत गाडे कसं रुतते, हे तिला चांगलंच ठाऊक झालं होतं. त्यामुळे, ज्यांना त्यातून बाहेर पडायचं आहे, त्यांनी ते टाळलेलं बरं असं तिला वाटत होतं. सईचे आगमन हे कमलाच्या अरिष्टांचं मुख्य कारण होतं.

रामपुरातील जलशाच्या वेळी ज्या सई जादुविनीला गणेश सहज जाता जाता भेटला होता ती सई शिवगंगामध्ये आली होती. तिची काही स्थावरजंगम मालमत्ता तिथे होती. संध्याकाळच्या वेळी, भोवताली सुंदर बगिचा असलेल्या आपल्या घराच्या पडवीत, सोबतिणींच्या आणि दासींच्या समवेत ती बसली होती. इतक्यात कुणाची तरी पावलं वाजली.

"अरेऽ, कोण आहे तिकडे?" तिनं मोठ्यांदा विचारलं.

"रामराम, बाईसाहेब!" वाकून नमस्कार करीत एक उंच, धिप्पाड भिल्ल पुढे आला.

"काय म्हणतोस, काही विशेष भिम्या?"

"देवाच्या दयेनं आणि आपल्या कृपेनं समदं ठीक हाय!"

"बरंऽऽ बरं, त्या दरोड्याचं काय झालं शेवटी?"

"हां! हां! त्या गरीब बिचाऱ्याला, हल्ल्यातनं कसं काय निसटावं हे कळतच नव्हतं. तो सारा नशिबाला बोल लावीत हुता आणि ह्ये सगळं सईमुळं झालं, सईमुळं झालं म्हणीत हुता. तुम्ही सांगितलं म्हून मी तितंच झाडाखाली हुबा होतो. त्याचे समदे शिव्या-शाप ऐकले. त्याच्या गवताच्या गंजीखाली हंडे आणि दागदागिने लपवले, त्ये सापडले ना. आता या असल्या टेकड्यांमदल्या भिल्लांना कोण हरीचा लाल पकडून देनार हाय?"

"बरी खोड मोडली." सई म्हणाली, "मी सांगत होते ते ऐकलं नाही. आता या दरोड्याला कोण जबाबदार? त्याचं खापर कुणावर फोडणार?"

"त्यानं काहीसुद्धा क्येलं न्हाई. त्याला नुस्तं तुमास्नी भेटून काय बाय इचारायचं हुतं. समदं गाव बी आता खडबडलंय. रस्त्यावरनं चालताना बी लोकं भ्यायलेत आणि आपलं घरदार सुरक्षित राहील की न्हाई, याचीच चिंता समद्यांना वाटतीय."

"त्यानं हे सगळं जर माझ्यावर सोडलं असतं आणि माझ्यावर विसंबून, थोडा थांबला असता तर, सगळं अगदी ठीक झालं असतं. भिल्लांचा माग काढून सापळा रचून त्यांना पकडून द्यायचा घाट घातला त्यानं आणि चोरीचा माल नेमका त्याच्याच नाकाखाली सापडावा ना! किती नाचक्की झाली त्याची, किती मान खाली गेली. पण तुम्ही सगळे खरंच मोठे कामाचे लोक आहात. तुमच्या कामाची चांगली बक्षिसी द्यायला हवी तुम्हांला! पण शंकररावाचं काय?" संभाषणाचा ओघ दुसरीकडे वळवीत सईनं विचारलं. "त्याला त्या जंगलातनं रस्ता सापडला का, मी अगदी बरोब्बर रस्ता दाखवला ना त्याला? आपली रखेल आपल्याला सोडून पळून गेलीय अशा गैरसमजुतीतच वावरतोय की काय तो भोळसट अजून? जरा बारीक नजर ठेवा त्याच्यावर आणि त्याच्या हालचालींवर. मी बक्षीस देईन चांगलं तुम्हांला. नाही, नुसतं बोलत नाहीय, खरंच देईन! तो अगदी इतका नवखा माणूस, तोच तो, जाडेला तरुण या भागात का रेंगाळतोय अजून? त्याच्याजवळ किमती जवाहीर होतं आणि त्या टेकड्यांमधून वाट काढीत तो पुढे गेला असं तू म्हणत होतास ना?"

"बाईसाहेब, अजूनपातुर तरी आमाला तेच्याबद्दल काईच कळाल्यालं न्हाई. आमच्या डोळ्यातनं धूळ फेकाया तो अदनंमदनं भिकाऱ्यावाणी फिरतो. पर आमी आता, नक्की त्याचं बिंग भाहेर काडतो आन तुमास्नी सांगतो. आमच्यापैकी येकानं त्याला टेकड्या वलांडून जाताना पाह्यलं, पर त्या येळंला त्यो अगदी वेगळ्याच कपड्यात व्हता, चांगला घोड्यावर बसलावता आणि बरोबर त्ये दागदागिनं, पैकं-अडकं होतं. नौकर-चाकरबी हुतं संगती." तेवढ्यात दुसऱ्या एका धिप्पाड भिल्लानं मध्ये तोंड घातलं आणि म्हणाला, "त्येनं आता या धोंड्यापसून जपून ऱ्हावं, कारण आता त्या बाजूच्या रस्त्यावर माजा डोळा हायं!"

"बरंऽ तर मग धोंड्या, भिम्या-निघा आता तुम्ही. एक पंधरवडा तरी मी आहे

इथे. अमावास्येच्या दिवशी मी रामपुरला परत येईन आणि मग शुक्रवारी, ओढा ओलांडून अगनाईला जाईन. अवसेच्या दुसऱ्या दिवशी सदाशिव ढोलाजवळ मला भेटा. हे पैसे त्या अप्रातीच्या म्हातारीला द्या आणि माझी खोली झाडूनपुसून स्वच्छ करून ठेवायला सांगा आणि हो, गोंडानाही सांगून ठेवा. एखादे वेळी, ढोलाच्या इथे मला माझं तट्टूही लागेल म्हणावं. राम राम! खबरदार राहा.''

वरील संभाषणातून त्या बाईच्या व्यक्तिमत्त्वाची झलक व्यक्त होते. जिल्ह्यात आणि पंचक्रोशीत घडणाऱ्या चोऱ्या, दरोडे, भांडण-तंटे यांसारख्या रहस्यमय घटनांशी तिचा अगदी घनिष्ट संबंध असे. तिचे निष्ठावंत सेवक आणि नोकरचाकर तिला पंचक्रोशीत घडणाऱ्या महत्त्वाच्या घडामोडींची इत्थंभूत माहिती देत. एक कर्तबगार आणि प्रतिष्ठित स्त्री म्हणून तिला समाजात मानमान्यता होती. चोरी-दरोड्याचा माग काढणं, लोकांची भांडणे सोडविणं अशा प्रकारच्या कामांमध्ये तिच्यावर विश्वास टाकून, पंच म्हणून बोलावलं जात असे. तिचे एजंट्स तिला भेटायला येत, तेव्हा त्यांच्याबरोबर सहज म्हणून आलेल्या नवख्या लोकांनाही काही निरोप देणं वगैरे सारखी कामं ती खुशाल सांगत असे. त्यांच्याशी अगदी सलगीनं बोलून ती त्यांना एखादी जुन्या फॅशनची साडी आणि एखादा दागिना आणायला सांगे. कुठून आणायचं, कसं आणायचं याबद्दलची माहितीही ती देई. या सगळ्या गोष्टी ती इतक्या सहज सुंदरपणे आणि खेळकर रीतीनं करे की अगदी घुमा, तुसडा माणूससुद्धा तिच्याशी अगदी अघळपघळ बोलू लागे. सरकारी अधिकारीही वेळोवेळी तिच्याशी सल्लामसलत करीत असत आणि तिनं केलेल्या सूचनांची किंवा सुचविलेल्या उपायांची अंमलबजावणीही करीत. जिथे जाईल तिथे आपला ठसा उमटविणाऱ्या या सईचा आणि अत्यंत धूर्त, व्यवहारचतुर असलेल्या रमाबाईच्या नवऱ्याचा परिचय असणं अगदी स्वाभाविकच होतं. शिवगंगा गावात आल्या आल्या सईनं लगेच ज्या ज्या माणसांना भेटायला बोलावले, त्यांत रमाबाईच्या नवऱ्याचा समावेश होता. गणेश तिला भेटायला अगदी उतावीळ होता खरा; पण तिच्या जाळ्यात अडकू की काय, अशी भीतीही त्याला वाटत होती. त्यामुळे तो तिच्याकडे जाण्याचं नाव काढत नव्हता, पण रमाबाईच्या नवऱ्यानं फारच आग्रह केल्यामुळे तो त्याच्याबरोबर सईच्या घरी गेला. तिला भेटायला लोकांनी गर्दी केली होती. त्यातच गणेशही सामील झाला आणि आत सई काय करतेयं ते डोकावून डोकावून पाहू लागला.

"अरे, हा कोण आलायं? पूर्वी कधी पाहिलं नाहीय'' ती काहीशा उत्सुकतेनं उद्गारली. ते ऐकून गणेश मागच्या मागे सरकण्याच्या बेतात होता, पण रमाबाईच्या नवऱ्यानं आपला हात त्याच्या खांद्यावर ठेवीत सांगितलं, "हा माझा मेव्हणा. काही दिवस इथे, घरच्यांबरोबर राहायला आलाय, गंगीच्या लग्नासाठी रजा थोडी वाढवून घेतलीय त्यानं.''

"अरे वा! छान!'' भुवया उंचावीत, हसतमुखानं त्याच्याकडे पाहत सई म्हणाली.

"मी दुधस्थळावर पाहिली ती देखणी मुलगी, तुझीच बायको ना! अरे लाजू नको, असा. अगदी विलक्षण मुलगी आहे ती. चारचौघींपेक्षा अगदी वेगळी. पण या भागातली नाही ती. असो, तुला तिची जेवढी माहिती आहे, त्यापेक्षा कितीतरी जास्त मला माहिती आहे तिची; आणि काय रे, तुझ्यात आणि घरच्या लोकांच्यात बेबनाव झाला होता काही दिवसांपूर्वी, त्याचं काय झालं? मिटला की नाही? तिचं शिक्षण कसं चाललंय?" या संभाषणानं गणेश गोंधळून गेल्याचं लक्षात येताच, सई म्हणाली, "अरे, इथं काही लपत नाही. आम्हाला सगळं कळतं. सईपासून कधी काही लपून राहिल का? मला खरं म्हणजे, पुन्हा तिला भेटायचंय पण, जरा जपूनच बरं, ती त्या संन्याशाची मुलगी आहे." असं म्हणत तिनं जोरजोरानं हात हलवून त्याला निरोप दिला.

बिच्चारा गणेश! तिच्या बोलण्यानं त्याचा जणू श्वासच थांबला होता! तिनं आपली दखल घेतली एवढ्यानंही तो कमालीचा उत्तेजित झाला होता आणि तिला कमलेला भेटायचंय हे कळल्यावर चांगलाच बुचकळ्यात पडला होता, निर्व्याज, निष्पाप, अडाणी कमला हिच्यासमोर कशी दिसेल आणि ही बाई पाहून कमलेला काय वाटेल, अशा विचारानं तो अगदी घाबरून गेला. त्याच्या मनातील विचारांचा अंदाज घेत, नेमका त्याच वेळी रमाबाईचा नवरा म्हणाला, "आता कळला का, सुशिक्षित आणि अडाणी यांतला फरक? कशी बायको आवडेल तुला? साधीसुधी, विनम्र, तोंड उघडून बोलण्याचंही धाडस नसलेली की या बाईसारखी धीट, हुशार, इतरांवर हुकमत चालविणारी? हिच्यात जे हे सामर्थ्य आलंय ते शिक्षणानंच बरं. सासरचे लोक आणि मूर्ख, बेजबाबदार नवरा यांच्या बाबतीत ती समाधानी नव्हती. तिनं त्याला विष घालून मारलं अशी भूमका आहे लोकांत. खरं खोटं काय ते कुणास ठाऊक, पण त्याचं पुढे काय झालं, तो कुठं असतो हे कुणालाच माहीत नाही. ती आपल्या स्वत:च्या मर्जीप्रमाणे वागते. आर्थिक व्यवहारात कुणाही पुरुषापेक्षा ती अधिक तरबेज आहे आणि माणूस ओळखण्याच्या कलेत, तर कुणी तत्त्वज्ञानीही तिच्याशी बरोबरी करू शकणार नाही. एखाद्या महाराणीप्रमाणे ती स्वतंत्र आहे. कित्येक राजपुत्र तिचे मित्र आहेत. त्यामुळे तुझ्या-माझ्यासारख्या सर्वसामान्यांची ती पत्रास बाळगत नाही. आता या सगळ्याचं मर्म लक्षात येतंय का तुझ्या? जबरदस्त यश आणि पराकोटीचं अपयश यांचा मिलाफ तिच्यात दिसतोय का तुला? मला वाटतं, तुला या गोष्टींची फिकीर वाटत नाही. तुमचं हे नवं शिक्षण स्त्रियांना स्वतंत्र व्हायला आवश्यक त्या गोष्टी शिकवतं खरं पण त्यांच्या नैतिक शिक्षणासाठी, मूल्य-शिक्षणासाठी ते काय करतं? आपली सुंदर कमला अशी झालेली तुला नाही आवडणार कदाचित. तुझ्या नुसत्या नव्या शिक्षणाच्या स्पर्शाचा अवकाश, की तिच्या अंत:करणातील सुप्त झरे एकदम उसळून बाहेर पडतील. पण मग तुझं काय होईल गणेश? ती तुला काय हवं नको ते बघेल, तुझ्या मताची पर्वा

करेल, असं वाटतं तुला? तिची आरती ओवळणाऱ्या, तिच्याभोवती गोंडा घोळणाऱ्या अनेकांपैकी एक एवढीच तुझी जागा राहील. 'ती संन्याशाची मुलगी आहे. जपून राहा.' असं जे सई म्हणाली त्यातली धोक्याची घंटा आली का ऐकू तुला?

"हॅं, तिच्या त्या सावध राहण्याच्या इशाऱ्याची मला काही पर्वा नाही आणि हे असलं काही माझ्याबरोबर बोलत जाऊ नको, मला सांगत जाऊ नको. तुला काय माहिती आहे कमला कशी आहे ते? तुझ्या बोलण्यात थोडं फार तथ्य असेलही आणि हेही मला मान्य आहे की सगळ्याच स्त्रियांना शिक्षण आणि स्वातंत्र्य देऊ नये; पण हेही तितकंच सत्य आहे, की सगळ्या स्त्रिया काही सईसारख्या नसतात. जे जे म्हणून क्षुद्र आणि हलक्या प्रतीचं आहे त्याचा तिरस्कार करणारा, त्याला दूर लोटणारा असा एक उदात्त, श्रेष्ठ भाव प्रत्येक मनुष्यमात्राच्या ठायी असतो, हे ठाऊक नाही का तुला? जेव्हा स्त्रियांची मनं इतरांच्यातील उत्कृष्ट आणि उदात्त गुणांना ओळखण्याइतकी, समजून घेण्याइतकी खुली होतील, मुक्त होतील तेव्हा त्या, मी मघाशी म्हणालो ना, तशा उदात्त, धीरगंभीर पुरुषांवर प्रेम करतील, त्यांना मानसन्मान देतील. त्यांना मदतीचा हात देणाऱ्याबद्दल त्या कृतज्ञ राहतील आणि अगदी सम्राज्ञीच्या सिंहासनपदी जरी त्या पोचल्या तरी, आपल्यावर प्रेम करणाऱ्यांची आणि मदत करणाऱ्यांची मनं दुखावणार नाहीत याची काळजी त्या पदोपदी घेतील. मला पक्की खात्री आहे, सईला प्रेम म्हणजे काय हे कधी कळलेलंच नाहीय!"

"शाब्बास! अगदी परखड आणि तावातावानं तू बोललास खरा पण मला सांग, जिचं मन द्वेषानं खदखदतंय आणि स्वत:भोवती आरती ओवाळून घेण्याची जिला सवय जडलीयं, अशी स्त्री कधी तू म्हणतोस तसं उदात्त वागू शकेल? सांग ना? ठीक आहे. एकदा प्रयोग करून पाहा, बघू या काय निष्पन्न होतंय ते. तुला किती यश येतंय ते पाहू ना. शंभरातल्या नव्याण्णव बायकांना नवऱ्याशिवाय इतर यार असतात. पण चल पुरे आता. घर आलंय, चल आत जाऊ या."

शिवगंगा गावी येण्यामागे रथोत्सव प्रसंगी हजर राहण्याचा एक हेतू सईच्या मनात होता. हा उत्सव फार महत्त्वाचा मानला जाई आणि या उत्सवासाठी अगदी दुरून-दुरून, पंचक्रोशीतून लोक मुद्दाम येत असत. आता उत्सवासाठी रथ सुशोभित केला होता आणि वेशीबाहेरच्या भगवती देवीच्या देवळाच्या चौकात तो उभा केला होता. तो एक सोन्यानं मढविलेला, जरीच्या कलाबतूनं झगमगणारा अतिविशाल, भव्य असा रथ होता. आपल्या नेहमीच्या घोड्यांपेक्षा दुप्पट आकाराचे घोडे त्याला जोडले होते. त्यांच्यावर चित्रविचित्र रंगांची खोगिरे होती आणि त्यांच्या पाठीवर माणसांच्या आणि राक्षसांच्या लाकडी मूर्ती विराजमान होत्या. साऱ्या शहरातून रथाची शोभायात्रा निघे, तेव्हा देवाला अर्पण केलेल्या चीजवस्तूंनी रथ भरून जाई. पहाटेच्या वेळी सर्वत्र उल्हासाचे वातावरण असे. अगदी कोंबडा आरवण्यापूर्वीच लोक पूजेची तबकं घेऊन एखाद्या झाडाच्या पारावर किंवा देवळाभोवतीच्या ओवऱ्यांत

उभे राहिले होते. रथयात्रेचा प्रारंभ डोळ्यांत साठविण्याची त्यांची धडपड होती. सुरुवातीला तिथे अगदी शांत-गंभीर वातावरण होतं. पण कोंबडे आरवायला लागले आणि मग लोकांमध्येही चळवळ, हालचाल सुरू झाली. काही बायका आपापल्या मुलांचं रडणं-ओरडणं थांबविण्याचा निष्फळ प्रयत्न करीत होत्या, कुणी गाणं म्हणत होत्या, तर कुणी दुरूनच बोटानं रथ दाखवित होत्या. असंख्य भाविकांच्या भक्तीचं मूर्त रूप असलेला तो प्रचंड रथ पाहून मुलं अचंबित होऊन चूप होत होती. तांबडं फुटलं आणि बरोबर त्याच वेळी हातात टाळ आणि वीणा घेऊन पुजारी रथापुढे येऊन उभे राहिले. मंजूळ सूर छेडले गेले, त्यांच्या रूपाने असंख्य लोकांच्या मस्तकावर त्यांना हव्या असलेल्या आशीर्वचनांचा वर्षाव झाला. एरवीच्या वाद्यांच्या गजराच्या गदारोळापेक्षा आणि मृदंगाच्या थापेपेक्षा त्या सुरांच्या दूरवर पसरणाऱ्या लहरी अगदी वेगळ्या भासत होत्या.

सूर्य उगवला आणि देवाला नैवेद्य अर्पण करण्याची गडबड उडाली. नाना तऱ्हेची फळं, भाज्या, फुलं, मासे, शेळ्या असं लोकांनी जे जे म्हणून आणलं होतं, ते सर्वच्या सर्व देवाला अर्पण करण्यात आलं. अगदी काहीसुद्धा मागे शिल्लक उरलं नाही. हे सगळं चालू असतानाच पुष्कळ गडबड, गोंधळ, मोठमोठे आवाज ऐकू येऊ लागले. पाठोपाठ झांजा, थाळ्या आणि मृदंगाच्या आवाजानं वातावरण भरून गेले. लोकांच्यात विलक्षण चैतन्य संचारलं, त्यांनी रथाला लावलेले दोर पकडले आणि सगळी शक्ती पणाला लावून ते दोर ओढू लागले. पण एवढ्या लोकांनी जोर लावूनही रथ जागचा हलला नाही. मग देवाची आळवणी सुरू झाली. एक बाई उठली आणि रथापुढे येऊन, 'गोविंदा गोविंदा' म्हणत घुमू लागली. 'तिच्या अंगात देव संचारलाय' अवतीभोवतीचे लोक म्हणाले. मग ती उंच कर्कश आवाजात बोलू लागली, "थांबाऽऽ, मी जागची हलणार नाही. मी तुमच्यावर प्रसन्न नाही. मला सोन्याची शेतं आहेत, त्रिखंडाचं पाणी माझ्या मालकीचं आहे, सारा प्राणिमात्र माझी करुणा भाकतो. पण मग त्या एका बाईनं मला नैवेद्य का दिला नाही? सगळं जग आनंदानं इथे उत्सवाला आलेलं असताना, ती एकटीच का बरं घरी बसलीयं आणि मुकाट्यानं टिपं गाळतीय? हंऽऽऽ तीच ती कष्टकऱ्याची आहे. नदीच्या काठी, पिंपळाच्या झाडाजवळ तिचं घर आहेऽऽ."

हे शब्द ऐकताच लोक त्या झोपडीकडे धावले. झोपडीतील अगदी घाबरून गेलेल्या बाईला त्यांनी बाहेर काढलं आणि म्हणू लागले, "असं कोणतं पुण्य गाठी बाधलंय गं बाई, की देवानं तुझी आठवण काढली आणि तू नैवेद्य द्यावास म्हणून तो आसुसलाय." त्या म्हाताऱ्या, दरिद्री आणि लुळ्या-पांगळ्या बाईला पाहून ते अचंबित झाले होते. तिच्या घरात, मीठ न घालता शिजवलेल्या कासवाखेरीज दुसरंतिसरं काहीच नव्हतं. ती म्हणाली, "मला खरं, तर नैवेद्य द्यावा असं फार वाटत होतं. या कासवाशिवाय आपल्याकडे काही नाही म्हणून मला फार वाईट

वाटलं, फार रडू आलं मला. पण आता तेच मी देवापुढे ठेवते. मी जरी दरिद्री असले, म्हातारी झालेली असले तरी, देवाची माझ्यावर कृपादृष्टी आहे, हे कळल्यामुळे मला फार संतोष झालाय." ती लगबगीनं उठली आणि आपला साधासुधा नैवेद्याचा पदार्थ केळीच्या पानावर घालून घेऊन आली. ती आल्यावर पुन्हा एकदा साऱ्या लोकांनी एकमुखानं देवाच्या नामाचा गजर केला आणि सर्वांनी मिळून रथाच्या दोराला जोर लावून ओढायला सुरुवात केली आणि मग रथ हलला. सारा दिवसभर ती रथयात्रा शहरात मुख्य रस्त्यांवरून चालली होती. संध्याकाळच्या सावल्या पडण्यापूर्वी तो रथ पुन्हा पूर्ववत आपल्या मूळ जागी येऊन थांबला. तो अख्खा दिवस कमला, भागीरथी आणि आपल्या इतर काही मैत्रिणींबरोबर बाहेर होती. लोकांची गर्दी, गोंगाट, इकडेतिकडे उत्साहानं फिरणारे घोळकेच्या घोळके पाहत असताना या गजबजाटात आपण अगदी एकटे आहोत असं तिला वाटलं. कशाचीच क्षिती नसल्यासारखी ती काही काळ निर्विकार उभी राहिली. आतापर्यंत तिनं रथयात्रांबद्दल आणि मिरवणुकांबद्दल खूप ऐकलं होतं आणि आता तर ती एका यात्रेत स्वत:च सहभागी झाली होती. हे सगळंच तिला अगदी बेगडी वाटत होतं. आपल्या कल्पनेनं तयार केलेल्या चित्रांमागे तिचं मन धावू लागलं. या देवाबद्दलच्या कितीतरी अद्भुत कहाण्या, आख्यायिका सतत तिच्या कानावर पडत होत्या. पण इतर लोकांप्रमाणे ती काही त्या देवाच्या अद्भुत सामर्थ्याने प्रभावित झाली नाही. भागीरथी म्हणाली, '"एकदा रथ रस्त्यातच अचानक थांबला. पुजारी म्हणायला लागले की, 'देव कोपलाय. काहीतरी अघटित घडलंय. त्यामुळेच तो पुढे जायला तयार नाही.' तेवढ्यात कुणीतरी सांगत आलं, की दोन गावांतली वेस चुकून ओलांडल्यामुळे रथ ओढणाऱ्या सातजणांपैकी एकजण तिथेच रथासमोर घेरी येऊन कोसळलाय. मग पुजारी पुढे गेले. त्यांनी देवाला आळविले. त्या माणसावर तीर्थ शिंपडून रथाला तीन प्रदक्षिणा घातल्या. तसा तो लगेच उठून बसला.' ही कहाणी ऐकून कमला चकित झाली खरी; पण तरीही आतून कुठूनतरी तिला वाटलं, की हा काही आपला देव नव्हे. आपल्या वडलांबरोबर असताना घेतलेल्या भव्यदिव्य अनुभवाची तिला आठवण झाली. एकदा, किर्रर्र अंधारात, पर्वतरांगांमधील एका डोंगराच्या माथ्यावर तिला एक विलक्षण अनुभूती आली आणि तिला ईश्वराच्या अस्तित्वाची खूण पटली. आपण सर्वशक्तिमान ईश्वराच्या सान्निध्यात आहोत, असं जाणवलं. खरंच, किती अनोखा अनुभव होता तो! विचार करून तिचं डोकं दुखू लागलं. काहीशा कुतूहलानं तिनं भागीरथीला विचारलं, "तू म्हणतेस, एवढे जर हे देव अद्भुत सामर्थ्य असलेले आहेत, तर मग दैत्यांची माणसांवर का बरं हुकूमत चालते?"

"दैत्य? ते तर केवळ देवांचे चाकर. त्यांचे संरक्षक शिपाई! काही माणसं क्रूर, दुष्ट असतात की नाही, तसेच काही दैत्यही क्रूर असतात. एवढंच!"

"पण मग झाडांवर, तलावात किंवा दऱ्यांत राहून माणसांना पछाडणाऱ्या दैत्यांचं काय?' कमलानं विचारलं.

'अगंऽऽ मेलेल्या दुष्ट माणसांचे आत्मे असतात ते. ते लोकांना पछाडतात, पण मांत्रिक त्यांना बरोबर बाहेर काढतात. जेव्हा मांत्रिक मंत्र-तंत्र करतो तेव्हा तो झपाटलेला माणूस, एरवी चार-चार लोकांनी उचलता यायचा नाही एवढा भला थोरला धोंडा सहज उचलतो आणि वेशीबाहेर टाकून देतो. मग ते भूत जातं. असं काढतात भूत. चांगल्या, सज्जन माणसांचे आत्मे गृहदेवता बनून स्वर्गात जातात. फार अघटित, वाईट घटना घडली पृथ्वीवर तर पुन्हा येतात. नाही तर नाही."

कमला म्हणाली, "मला वाटतं, उंच पर्वतशिखरांचा आणि पठारांचा देव एकांतात, निर्जन स्थळी राहातो. या जगातील सर्वसामान्य माणसं आणि घटना यांच्यापासून अलिप्तच असतो तो. तो ताऱ्यांवर, तारांगणावर, स्वर्गावर, वाऱ्यावादळावर, महापूर, दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या... यांच्यावर राज्य करतो. माणसांच्या आयुष्यात जे काही बरंवाईट घडतं, त्याचं कारण दैव!"

हे एकून भागीरथीला हसू फुटले. अगदी ठाम आवाजात ती म्हणाली, "हो, हेही खरंच आहे. पण पर्वतातले देव वेगळे. ते माणसांमधल्या संन्याशांसारखे असतात." कमलेला या बोलण्याचा भावार्थ उमगला नाही आणि ती अधिकच गोंधळून गेली.

✿

# १०.

संध्याकाळ झाली तशी गर्दी पांगू लागली. सोसाट्याच्या वाऱ्याला तोंड देत आपापल्या गावाकडे, वाडी-वस्तीकडे परत जाणारी माणसं कमलेला दिसली. साहजिकच तिचं मन त्यांच्याकडं ओढलं गेलं. आपल्या पाठीवर हिंदकळणाऱ्या झोळीत दोन लहान मुलं घेऊन एक पोक्त वयाचा माणूस तिच्यापुढे दोन पावलं चालत होता. त्याच्या जोडीनं चालणाऱ्या बाईच्या डोक्यावर नवी भांडी होती आणि हातात एक उसाचं कांडं आणि काही थोडी पालेभाजी होती. रात्रीच्या कालवणासाठी झकास पालेभाजी मिळाल्यामुळे ती भलतीच खुश होती. तिच्या शेजारून चाललेली चिमुरडी मुलगी त्या उसाचे टोक पकडण्याचा जणू खेळ खेळत होती. पण घर अजून खूप दूर होतं. त्या मुलीनं उसाला लोंबकळत विचारलं, "अजून किती लांब आहे माय?" कमलाचं चित्त त्या मुलीकडे खेचलं गेलं आणि तिला आपल्या टेकडीवरच्या घराशेजारच्या छोट्या छोट्या मुलांची आठवण झाली. ती मुलं झाडाखाली येत असत. कमला स्वत:च रचलेली अंगाई-गीतं गाऊन त्यांना निजवीत असे. अतिशय निर्मळ आणि मोकळ्या वातावरणात वावरताना आपल्या भोवतालच्या मोकळ्या हवेइतकेच निर्भरपण तिला अनुभवता येई. कसली भीती नाही की जातिभेदाबद्दलच्या भ्रामक कल्पना नाहीत. अशा वातावरणामुळे ती अगदी सहजपणे त्यांच्यात मिसळे. तिच्याकडे हसत झेपावणाऱ्या, तिच्या पायात घोटाळणाऱ्या सावळ्या रंगाच्या चिल्ल्या-पिल्ल्यांना कडेवर उचलून घेई. शूद्र मानले गेलेल्या किंवा अन्य मुलांना शिवल्यावर अंघोळ करायचेही ती कित्येकदा विसरून जाई. पण त्याबद्दल त्या संन्याशाच्या मुलीला कुणी दोष देत नसे. पण आता सगळंच किती बदललं होतं! जातिभेदाच्या आणि रूढी-परंपरांच्या कृत्रिम अडसरांमुळे हे लोक तिला दुरावले होते. इथली प्रत्येक गोष्ट तिच्या पूर्वीच्या जीवनाच्या अगदी विरुद्ध होती. शहरात वावरणाऱ्या तिच्या मैत्रिणींना ज्या बाबी सूर्यप्रकाशाइतक्या स्वच्छ दिसत होत्या, त्या समजून घेतानाही तिला जड जात होते, वेळ लागत होता. त्या

मुलींना रानावनांतील, दऱ्याखोऱ्यांतील स्वातंत्र्याची, खेड्यातील आनंदी जीवनाची पुसटशीही जाणीव नव्हती. त्यांचे उच्चभ्रू कृत्रिम बालपण, अकाली प्रौढ बनविणाऱ्या, लादलेल्या 'स्त्री' पणात संपत असे. भाव-भावना अथवा विचार यात काही प्रतवारी असते, भलंबुरंपण असतं, हेही त्यांना ठाऊक नव्हतं. शहरातील घराचं दार उघडले, की एकदम खुली, झगमगीत वस्तू असलेली व्यापारी पेठ लागावी, त्याप्रमाणे बालपण सरलं की त्या थेट 'स्त्री' बनत. शहरातल्या मुलींना ज्या गोष्टी स्वाभाविक किंवा रोजच्या दिनक्रमातील वाटत त्या समजून घेणंही कमलेला अवघड जाई. तिच्यापुढेच चालत असलेल्या मुलीनं आपल्या आईजवळ थंडी वाजत असल्याबद्दल कुरकुर केली आणि लगेच आईनं आपला पदर तिच्याभोवती गुंडाळून, मोठ्या प्रेमानं तिला जवळ ओढलं. आपण त्या मुलीची कीव करीत होतो खरं पण; तीच आपल्यापेक्षा अधिक श्रीमंत आहे असं कमलेला वाटलं. 'आपल्याला कुठे आहे आई? खेड्यातली झोपडी का असेना, पण तिथे जाताना आपली आई बरोबर असती, तर किती बहार आली असती,' असे विचारतरंग तिच्या मनात उमटले.

कमला आणि भागीरथी घरी पोहोचल्या नि लगेच नदीतीरावरील आपल्या आवडत्या वृक्षवाटिकेत गेल्या. झाडांची एकमेकांत गुंतलेली मुळे पाण्यात विखुरल्यामुळे पाण्याचा प्रवाह जिथे तिथे अडवला गेला होता आणि त्यामुळे काही भोवरे तयार झाले होते. पाण्यात खडे टाकत बसलेल्या कमलेला भागीरथीनं हात धरून स्वत:कडे ओढलं आणि एका दमात म्हणाली, "चल, चल, झाडामागे लपू. अख्ख्या जगानं शोधलं तरी सापडणार नाही कुणाला?" त्या दोघींनी आपल्या साड्या वर खोचल्या आणि त्या एका भल्या मोठ्या झाडामागे लपून बसल्या. "तुझ्या नवऱ्यासोबत इकडे कोण येतंय ते तुला माहीत आहे काय?" भागीरथीनं उत्तेजित स्वरात विचारलं. कमलेनं नकारार्थी मान हालवली आणि नवऱ्याला पाहताच तिच्या हृदयाची धडधड वाढली. अशा प्रकारे लपूनछपून बसणं ही चूक आहे असं वाटून "मला जाऊ दे, मला जाऊ दे" असं ती भागीरथीला म्हणू लागली.

"मी एक तसूभरही हलणार नाही इथून. तुझ्या नवऱ्याच्या त्या मित्राच्या नजरेस पडायची माझी इच्छा नाही."

"का भागीरथी, का? तो काही तुझा कोणी सगासोयरा नाही आणि असता तरी आपण थोडंच काही वाईट-वेगळं वागतोय की त्यानं तुझ्यावर रागवावं."

कमलेच्या डोळ्यांत खोलवर पाहत भागीरथी म्हणाली, "का ते माहीत नाही का तुला? तुझा नवरा त्या सईला भेटायला गेला होता ते कुणी सांगितलं होतं मला माहीतेय? यानंच, कृष्णानंच!" आणि मग कमलेचा हात आपल्या उरोजावर ठेवून ती मोठ्या दु:खानं म्हणाली, "आणि त्यानं मला जे सांगितलं ते तुला नसतं सांगितलं तर त्याचा उपयोग काय?"

"तो तुझ्याशी बोलला?"

"हो कमला! तेवढा धीट आहे तो आणि अशा बाबतीतसुद्धा निर्भय आहे. खरंच, कसं सांगू तुला? तुझ्या निर्व्याजपणामुळे माझी जीभ अडते. पण आता पुरे. इथून पुढे मी त्याच्याशी मुळीच बोलणार नाही. चुकीचं आहे ते, फार चुकीचं! पण बरं का, झाली गोष्ट तू कुणाला सांगू नको."

"नाही सांगणार. पण इतकं घाबरण्यासारखं काय आहे त्यात? जर तो तुझा नातेवाईक आहे, तर तू त्याच्याशी बोललीस म्हणून काय बिघडलं? त्यात काहीच चुकीचं नाही."

"हंऽऽ! कमला, तो काय म्हणाला माहीत आहे? हे सगळं माझ्या नवऱ्यामुळे झालं. माझा नवरा माझ्याकडे पाहत नाही, हे सगळ्या जगाला माहीत आहे आणि मग या माणसानं त्याचा फायदा घेऊन बरोबर, माझ्याशी बोलण्याची मुभा घेतली. देवळाजवळचं ठिकाण होतं ते आणि तो झुडपाच्या आडोशाला उभा होता. अक्काबाई आत पूजा करीत होती आणि तेवढ्यात हा माणूस थेट माझ्याकडे आला आणि त्यानं माझ्या हातात एक पत्र कोंबलं. मला एकदम धक्काच बसला आश्चर्याचा." इकडेतिकडे पाहत, कुणी आपल्याला पाहत नाही, याची खात्री करून घेऊन तिनं आपल्या चोळीतून ते पत्र काढलं आणि कमलेला दाखविलं. "त्या रात्री, मला झोप आली नाही. पण मी तरी काय करणार? ती काही माझी चूक नव्हती. खरंच, मला मरून जावंसं वाटत होतं. मी स्वत:ला नाही नाही ती दूषणं दिली. अशी तिरस्कारानं बघू नको कमला. त्या रात्री खरोखरच, हा माणूस सांगतोय त्याप्रमाणे त्याच्याबरोबर पळून जावं असं मला वाटत होतं. माझ्यावर प्रेम आहे असं लिहिलं होतंन त्यानं. आत्ता, हे सगळं सांगताना, अगदी अपराध्यासारखं वाटतंय. पण तेव्हा काही म्हणजे काही वाटत नव्हतं. मी स्वत:लाच समजावत होते, की माझ्या मनातील प्रतिक्रिया अगदी सहज-स्वाभाविकच आहे आणि त्यानेही पत्रात तसंच काहीसं म्हटलं होतं. पण मी काही त्याच्या पत्राला उत्तर दिलं नाही. सकाळी उठल्यावर माझी मलाच लाज वाटली आणि नवऱ्याचा रागही आला. वाटलं की, त्याच्या वागण्यामुळं आणि माझ्याकडं लक्ष न देण्यामुळंच इतरांचं फावतंय. माझ्याशी असं वागण्याचा जणू हक्कच मिळतोय त्यांना. मग पुन्हा थोड्या वेळानं अगदी दुसऱ्या टोकाचे विचार माझ्या मनात घोळू लागले. वाटू लागलं, की मी जर कुणाचा हात धरून पळून गेले, तर या नवऱ्याची चांगली खोड जिरेल! इथे, अगदी इथेच त्यानं भेटायला बोलावलं होतं मला. पण जवळजवळ पंधरावडाभर तरी मी घराबाहेरच पडले नाही. आणि त्यानंतर एके दिवशी, खरं सांगते कमला, तुझ्यामुळेच बचावले मी. योगायोगानं, तो एकटाच उभा आहे, असं मला दिसलं आणि तेवढ्यात तुझी हाक ऐकू आल्यासारखं वाटलं. आपण काशीच्या घरी जाताना ते रस्त्याचं वळण आहे ना, तिथे मी उभी होते, तुझा आवाज आल्यामुळे मी दचकले आणि 'कमला

आलीऽ' असं म्हणून मी त्याच्या जवळून सटकू लागले, तर तो म्हणाला, "कोण? गणेशची बायकोऽ सांगायची गोष्ट म्हणजे आज मी गणेशला सईच्या घरी पाहिलं." मी थांबावं म्हणूनच त्यानं हा विषय काढला होता. पण तुझ्या आवाजामुळे मी चांगलीच शुद्धीवर आले होते. या माणसाला भेटायला जाऊन आपण घोडचूक करतोय असं मला वाटलं. मी चटकन डोक्यावर पदर घेतला आणि घागर कमरेवर ठेवून झटकन तिथून दूर झाले. अक्काबाई अगदी समोरच आली तेवढ्यात. मग मी तिच्याबरोबर चालू लागले. पण माझी छाती अगदी जोरजोरात धडधडत होती. खरं सांगते, आता माझी मलाच भीती वाटते. त्याच्या त्या पत्रातल्या शब्दांचा मोह पडतो आणि माझं दुबळं मन भरकटायला लागतं!"

"बाईऽगंऽ, भागीरथी, फारच भयंकर आहे हे. आपण हे पत्र जाळून टाकू या आणि आधी या जागेपासून दूर जाऊ या. ते भेटणंही नको आणि त्याच्याशी बोलणंही नको. बरं का भागीरथी, तुला वश करायला काहीतरी औषधं दिलं असेल कशातून तरी. हे चेटुकच असणार, ते जायला काहीतरी स्तोत्रं वगैरे म्हण तू." असं म्हणत मागे वळताना तिला दूरवर रोहिणीमातेचं मंदिर दिसलं. मावळत्या सूर्यकिरणांनी ते उजळून निघालं होतं. दोन्ही हात जोडून ती म्हणाली, "रोहिणीमाते, माझ्या मैत्रिणीला या अरिष्टातून वाचव. मी पौर्णिमेच्या दिवशी सात गुणिले सात लोटांगणं घालीन."

"माते एवढे घडू दे, असा वर दे" भागीरथी म्हणाली, "मग मी असं व्रत एक वर्षभर दर पौर्णिमेला करीन." आणि दोघींनी मावळत्या सूर्याकडे तोंड करून नमस्कार केला. त्या वृक्षवाटिकेतून बाहेर पडताहेत न् पडताहेत इतक्यात शास्त्रींची मुलगी रूक्मा आश्चर्यानं ओरडत म्हणाली, "बरोब्बर सापडलात! मला वाटलंच होतं इथे असाल तुम्ही म्हणून! मी म्हटलं नव्हतं का आपल्याला एकमेकींशिवाय करमत नाही म्हणून. तिघींचं त्रिकूट आपलं आणि आता आपण चौघी झालो. चौघींचा विस्फोट. तीन तिघाडा, चार बिघाडा! असं म्हणत रूक्मिणीच्या पाठोपाठ हरणी पुढे आली "चार हा मोठा अपशकुनी अंक आहे. बरं का, तो भल्याभल्यांना, अगदी सगळ्यांना घाबरवून सोडतो. 'तीन अप्सरा' मला माहीत आहेत पण चार म्हणजे काय ते मात्र बघायला हवं."

"पुरे तुझी बडबड, तू नेहमी काही ना काही फेकत असतेस" खळी पाडून हसणाऱ्या मुलीचे खांदे पकडून हलवत भागीरथी म्हणाली, "तुझ्या घरातलं ते अखंड पुराणांचं वाचन आणि नवऱ्याचं शिकवणं यामुळे ना, तू म्हणजे केवळ मौजमजा करणारं, वाकुल्या दाखवणारं माकडाचं पिल्लू झालीयंस जणू." रूक्मानं आपले ओठ घट्ट आवळले आणि अगदी शोकमग्न झाल्याचा आविर्भाव करण्याच्या नादात ती होती, पण अचानक तिनं आपला बेत बदलला आणि ती म्हणाली, "असलं काही बोलायचं आता कारण उरणार नाही. काय करावं, कसं करावं, याचा

मी सारखा विचार करीत होते. त्यातून मला एक छान कल्पना सुचलीय. हरणीची सासू जे आणि जसं वागतीय ना, ते दिवसेंदिवस अतिच त्रासदायक होत चाललंय. दिवसभरात त्या बिचारीला उंबऱ्याच्या बाहेर पाऊल ठेवता आलं नाही. आता कुठं मी त्या सदा करवादणाऱ्या खाष्ट सासूच्या तावडीतून तिला सोडवून इकडे घेऊन आलेय.''

घनदाट वृक्षवाटिकेच्या पार्श्वभूमीवर उभ्या असलेल्या त्या मुली, शेजारी चमचम करणारा नदीचा प्रवाह आणि या सर्वांवर फाकलेली मावळत्या सूर्यकिरणांची प्रभा, असं ते मनोरम दृश्य होतं. गव्हाळ वर्णाची, खळया पाडत हसणारी, मिस्कील नजरेची रूक्मा सर्वांच्या मध्ये उभी होती, तिच्या पुढे उंच, थोराड बांध्याची भागीरथी कमलाच्या खांद्यावर हात ठेवून उभी होती. संधिप्रकाशात कमलेची मृदू, देखणी चर्या अधिक मृदू आणि सुंदर भासत होती. आपले टपोरे, स्वप्नाळू, काळेभोर डोळे एकदा एका मैत्रिणीकडे, तर दुसऱ्यांदा दुसऱ्या मैत्रिणीकडे वळवून ती त्यांच्याकडे मोठ्या आतुरतेनं पाहत होती आणि शेलाट्या बांध्याची, बालसुलभ चेहऱ्याची, काहीशी खिन्न, उदास दिसणारी हरणी रूक्माचा हात धरून तिला खेटून उभी होती. एक काशी सोडली, तर कमलेच्या सर्व मैत्रिणींमध्ये रूक्माचा संसार सुखाचा होता, सासर चांगलं होतं आणि तीही मोठी आनंदी, उत्साही होती. कोणत्याही प्रसंगाला ती अशी काही कलाटणी देई, की त्यामुळे काहीतरी मौज घडून मोठा हशा पिके. ती स्वत:ही मंजूळ हसत त्यात सामील होई. ''हे पाहा,'' ती म्हणाली, ''सासू खाष्ट असते, ही तर वस्तुस्थितीच आहे. पण म्हणून काय झालं? थट्टा करून तिला घाबरवून सोडू या का? माझ्या डोक्यात एक झक्क योजना आहे. तुम्ही ती निदान ऐकून तरी घ्या खरी. तुम्हा सगळ्यांच्या सासुरवासावर माझ्याकडे अगदी रामबाण इलाज आहे. पण सगळ्यात आधी आपण हरणीच्या दु:खावर उतारा शोधू. त्या येडपट, कजाग बाईला सगळ्यात आधी धडा शिकवला पाहिजे' असं म्हणून मोठ्यांदा हसत ती पुढे बोलू लागली, ''ती अशी अगदी घाबरून गट्ट झालेली आणि नुसती गरीब गाय झालेली मला बघायचंय आहे. शिवाय ती अंधश्रद्धाळू आहे, हे पथ्यावरच आहे.''

''पण हे सगळं आहे तरी काय की तुझा नेहमीचा वाह्यातपणा?'' भागीरथीनं विचारलं.

''थांब, जरा थांब.'' रूक्मा म्हणाली. मी सांगते सगळं नीट ऐका. काय करायचंऽऽ आपण चक्क तिघींनी अप्सरेचं किंवा हडळीचं किंवा जखिणीचं रूप घ्यायचं. नाव काय द्यायचं ते तुमचं तुम्ही ठरवा. केस मोकळे सोडलेले, चेहरे पांढरे-फट्ट, डोळे अंगारासारखे लालबुंद आणि काळे पट्टे असलेले लांब बुरखे असा वेष करायचा. उद्या रात्री गावात शोभेचं दारूकाम आहे आणि तमाशाही, त्यामुळे पुरुषमाणसं काही लवकर घरी परतायची नाहीत. आमच्या घराचा मागील दरवाजा

उघडला, की थेट हरणीचं अंगणच लागतं. रात्री झोपायच्या आधी जेव्हा हरणीची सासू अंगणात फेरी मारायला म्हणून येईल तेव्हा आपण तसा वेष करून तिच्या अंगावर धावून जाऊ. ती घाबरून किंचाळायला लागली, तर तिला आणखी थोडं घाबरवू आणि सटकू. आपण तिला म्हणायचं, "आम्हांला देवानं पाठवलंय. आम्ही तिघी मरीआईच्या बहिणी आहोत. तुझ्या गरीब बापड्या सुनेचा छळ आणि वनवास आम्ही पाहिलाय. त्याचा आम्ही बदला घेऊ." मरीची म्हणजेच कॉलऱ्याची सर्वांत मोठी आणि क्रूर बहीण मी होईन. त्यासाठी मी माझे सगळे केस पांढरे सफेद करीन. मी हातातला खराटा आणि सूप तिच्या तोंडापुढे फिरवेन तेव्हा तुम्ही माझ्यामागे उभ्या राहून नुसत्या तिच्याकडे डोळे राखून पाहा आणि जसजसे मी बोलेन तसतसे घुबडाचे चित्कार काढत रहा. मी सारखं 'सूड, सूऽऽडं घेईन." असं म्हणत राहीन. तसं तुम्ही हळूहळू मागे सरकत जाऊन, मागच्या मागे पळून जा आणि लवकरात लवकर घर गाठा. त्या वेळेपर्यंत मी खराटा हलवीत राहीन. हरणी मात्र आपल्या आपल्या घरी झोपू दे. म्हणजे ती म्हातारी जेव्हा घाबरत, किंचाळत घरात जाईल तेव्हा तिला धीर द्यायला हरणी तिथे असेल. खरंच घाबरलेल्या म्हातारीला बघायला मला किती किती मजा येईल" असं म्हणून ती आणखी एकदा मोठ्यानं हसली आणि म्हणाली, "चला गंऽऽ, तुम्हांला मजा नाही का वाटत? अशा कचरताय का?"

"गंमत वाटतीय खरी पणऽऽऽ" भागीरथी म्हणाली, "पण नंतर पडणारा मार कोण खाणार? हे आपलं बिंग कधी ना कधी फुटणार हे नक्की."

"माऽर? हट्! अगं आपल्याला कसं कोण ओळखेल? उलट त्या कजाग म्हातारीला चांगली अद्दल घडेल. ती मग दुसऱ्या दिवशी शेजारच्या बायकांना मरीच्या बहिणींबद्दल सांगेल. मग होईल सगळीकडे कुजबुज सुरू. तिच्याभोवती सगळ्या शेजारणी जमतील आणि ती जे जे सांगे त्याला माना डोलावतीत. हे असं चित्र माझ्या डोळ्यांसमोर मला स्वच्छ दिसतंय. अगदी हुबेहूब! मग मजा नाही का येणार? आणि मला वाटतं, हरणीची निदान वर्षभर तरी जाचातून सुटका होईल."

"नाही, नको" चेहरा पाडून खिन्न नजरेनं इकडेतिकडे बघत हरणी म्हणाली, "देवीच्या कोपाचे आणि मरीच्या तीन बहिणींच्या फेऱ्याच्या दोषाचं सगळं खापर ते माझ्या आणि माझ्या नवऱ्याच्या डोक्यावर फोडतील! हे ऐकून त्या तिन्ही मैत्रिणींनी पुरत्या घाबरून गेलेल्या हरणीला गमतीनं हलवलं आणि त्या मोठ्यानं हसू लागल्या. रूक्माचा सगळा बेत मात्र हवेतच विरला.

✿

# ११.

गंगीच्या विवाह-समारंभासाठी काशीच्या वडिलांनी एक उद्यान-हवेली भाड्यानं घेतली होती. तिथे शास्त्रीबुवांनी आपल्या मुलीच्या विवाहाप्रीत्यर्थ मेजवानी ठेवली होती. त्यानिमित्त रामपुरातील आणि अन्य शहरांतील गाणारणींचं गाणं ठेवलं होतं. या जलशाला अगदी जात, धर्म-पंथ यांतील भेद न बाळगता, पंचक्रोशीतील बहुसंख्य लोकांना आमंत्रित केलं होतं. सई अशा आमंत्रितांपैकी एक होती.

मध्यरात्रीची वेळ होती. आकाशात पूर्ण चंद्र विलसत होता. बगिच्यातल्या आंब्याच्या झाडाखाली काही सावल्यांची संशयास्पद हालचाल चालली होती. पानांतून घरंगळणाऱ्या प्रकाशाच्या आणि सावल्यांच्या अगदी मधोमध असलेल्या एका मोठ्या दगडावर कुणी एक स्त्री बसून आपल्या शेजारी उभ्या असलेल्या माणसाबरोबर आतुरतेनं बोलत होती. घरातून कितीतरी आवाज आणि गोंगाट ऐकू येत होता. झांजा वाजत होत्या पण त्या सगळ्यापेक्षाही उंच आवाजात विणेच्या साथीवर छेडली जाणारी कुणा स्त्रीच्या गळ्यातून निघणारी गोड, सुस्वर कंपनं ऐकू येत होती. "वा, ही एक उत्तम संधीच मिळाली म्हणायची, आपल्याला भेटण्याची" रमाबाईचा नवरा बागेत बसलेल्या सईला म्हणाला. "देव आपल्यावर सध्या फारच प्रसन्न आहेत. तू गणेशला भेटलीस ते सगळं त्या दिवशी ठीक झालं ना? घर मुलामाणसांनी अगदी गजबून गेलेलं असणार आणि कोण आलं, कोण गेलं याचा कुणाला फारसा पत्ता लागणार नाही, याची मला चांगलीच कल्पना होती. म्हणून तुला त्या दिवशी गणेशला भेटायला जायला सांगितलं मी." ती त्याला मध्येच अडवणार होती. पण त्याने तिला बोलू न देता आपलं बोलणं पुढे चालू ठेवलं, "जरा थांब, मी तुला सगळं स्पष्ट, फोड करून सांगतो. माझ्या मते, आजची तुझी भेट दोन दृष्टीनं परिणामकारक ठरेल. एक म्हणजे, अगदी आकस्मिकपणे, कमलानं तुला आणि गणेशला एकत्र असलेलं पाहिलं पाहिजे आणि मग तिच्या मनात मत्सर निर्माण झाला पाहिजे. मी त्याला जेव्हा म्हटलं की सगळ्याच बायका मनानं

हलक्या, क्षुद्र आणि मत्सरी असतात, तर त्याला फारच राग आला होता. तिच्याशी त्याचं वागणं अशा प्रकारचं असतं, की जणू तिच्याइतकं सुंदर दुसरं कोणी नाही आणि गुणवानही दुसरं कोणी नाही. बघून खरोखर चीड येते नुसती. तुझ्यापासून धोका आहे, हे कमलेला कळावं असंही मला वाटतं.'' सई मध्येच बोलू पाहत होती पण त्यानं मोठ्या कष्टानं तिला थांबवलं. शेवटी काहीशा वैतागानं ती म्हणाली, ''ती आणि मला घाबरेल म्हणता? त्या दिवशी तिनं माझ्याकडे आणि माझ्या भोवतीच्या परिसराकडे, एखाद्या सडलेल्या गोष्टीकडे पाहावं तशा तुच्छतेनं पाहिलं. महा मस्तवाल आहे ती! आणि '' 'हे' इथे नाहीत. ते काही दिवसांसाठी बाहेरगावी गेले आहेत.'' हे सांगताना तिचा असा काही आविर्भाव होता की बस्! आपल्या ठसक्यातून तिनं जाणवून दिलं, की तिला खात्री आहे की गणेशाला मी येणारेय हे माहीत नव्हतं आणि आमच्यात भेटीविषयीही काही बोलणं झालं नव्हतं! मला वाटलं किंवा मला काय वाटलं ते नाही सांगत आता, पण तो घरी आहे की नाही याबद्दल काही खात्री न करून घेताच तू मला तिथे पाठवलंस हे मला खरं तर मुळीच आवडलेलं नाही. पण आता तिचं नाक चांगलं ठेचलं जावं म्हणून त्या माणसानं माझ्या पायाशी लोळण घेताना मला पाहायचंय. ती भिक्कारडी एखाद्या राजकन्येच्या तोऱ्यात त्या दिवाणखान्यातून थेट आपल्या नवऱ्याच्या खोलीकडे माझ्याकडे पुन्हा वळूनही न पाहता निघून गेली.''

''हंऽ दे सोडून! फारसं मनावर घेऊ नको.'' रमाबाईचा नवरा हसत म्हणाला, ''तू तिला पाहिलंस आणि तुला ती मुळीच आवडली नाही, हे बरीक मला आवडलं.'' आणि त्यानंतर काही वेळ त्यांच्यात कुजबुज, गुप्तगू चालू होतं. अखेरीस सई मोठ्याने हसली आणि म्हणाली, ''हंऽऽ आत्ता लक्षात आलं, तुला वाटतंय की गणेशनं, रामपुरातल्या त्या श्रीमंत आणि तुमच्या आप्तातल्या मुलीशी लग्न करावं आणि त्यासाठी कमलेला घरातून हाकलून देण्यासाठी तुला माझा उपयोग करून घ्यायचाय. पण तुझा बेत काही यशस्वी होईलसं वाटत नाही. अपमान झाला म्हणून ती बापाच्या घरी गेली तरी फार काळ ती दूर राहील, असं मला वाटत नाही. अर्थात लोक म्हणतील म्हणा, संन्याशाच्या पोरीवर विश्वास ठेवू नये म्हणून. एका जागी थांबायचं माहीत नाही आणि भटकेपणा रक्तात मुरलेला त्यामुळे संन्याशाची मुलगी भरल्या घरातून निघून गेली आणि तिचा संसार मोडला तरी त्याचं कुणाला नवलही वाटायचं नाही. कमला स्वाभिमानी आहे. त्यामुळे आपल्याबद्दल चार लोक वाईट-वेगळं बोलतात हे समजल्यावर ती काही पुन्हा सासरी पाऊल टाकायची नाही. पण गणेशाला मात्र सुख लागायचं नाही. ते काही असो, एक गोष्ट माझ्या कानावर आलीय, ती जरी खरी असेल, तर आयतंच तुझ्या मनासारखं घडेल. पण ते काय आहे ते मी तुला पुन्हा कधीतरी सांगेन.''

सईबद्दल अनेक बायकांना कुतूहल होतं. तिच्या वागण्या-बोलण्याकडे त्या

बारीक लक्ष ठेवीत असत. असंच काहीसं घडलं होतं, त्यामुळं बागेत उघडणाऱ्या एका खिडकीशेजारी उभं राहून मघाचं संभाषणही कुणीतरी कान देऊन ऐकलं होतं.

गंगीच्या लग्नाला काही आठवडे उलटले आणि एके दिवशी अचानक काशी घरी आलेली पाहून कमला अगदी खुश झाली. काशीच्या घरी कसला तरी समारंभ होता आणि शास्त्रीबुवांच्या पत्नीला 'कमलेला बरोबर घेऊन या' असं निमंत्रण पोहोचवायला काशी आली होती. काशी आणि कमला बरेच दिवसांत एकमेकींना भेटल्या नव्हत्या. त्यामुळे आता भेटताच त्या अगदी हरखून गेल्या आणि संधी मिळताच लगेच हातात हात घालून परसदारी गप्पा मारण्यासाठी गेल्या. संध्याकाळची वेळ होती आणि मोगऱ्याच्या व चाफ्याच्या सुगंधानं आसमंत दरवळून गेले होते. दोघींची भेट होऊन पुष्कळ दिवस झाले होते. त्या दरम्यानच्या काळात कमलेच्या घरात अनेक गोष्टी-घडामोडी घडल्या होत्या. त्यांतल्या काही तिखट-मीठ लावून काशीच्या कानावरही पडल्या होत्या. त्यामुळे ते सगळं काय काय झालं ते काशीला ऐकायचं होतं. गंगीच्या लग्नासंबंधीच्या हकीकती ऐकून झाल्यावर काशीनं कमलेला तिच्या नवऱ्याबद्दल विचारलं. काशीच्या कुशीत लपून, लाजत-मुरडत तिच्या प्रश्नांना उत्तर देत कमला म्हणाली, "खरंच, ते फार चांगले आहेत. पण अगदी अलीकडे जे घडलंय ना, त्यामुळे तर मला भीतीच वाटायला लागलीय. ते बदलतील असं वाटतंय. इकडून जेव्हा एकटे माझ्याबरोबर असतात ना, तेव्हा अगदी माझ्या मनाप्रमाणे वागतात. पण का कोणास ठाऊक, मला सारखं जाणवत राहातं, की इतर लोक असताना ते माझ्याकडे मुळीच लक्ष देत नाहीत. आपण त्या गावचेच नाही, अशा आविर्भावात असतात. मला शिकवायचे तर ते नावही काढत नाहीत आता आणि अगदी नुकतंच ---- म्हणजे, तुला कसं सांगावं ते कळत नाहीय मला. मी चांगलीच अडचणीत, पेचात सापडलेय." थोडं थांबून काशीच्या डोळ्यांतील आतुरता पाहून, कमलानं सगळ्या गोष्टी सांगून टाकल्या. "तुला माहीत आहे, लग्नाच्या आधी, कितीतरी दिवस समारंभाची तयारी चालू होती. तुमचंच घर घेतलं होतं ना, पाहुण्यांसाठी तात्पुरतं राहायला म्हणून, तेही अगदी गच्च भरून गेलं होतं. त्यामुळे काही पाहुण्यांची सोय, बागेतल्या मांडवात करायला लागली. खूप लोकांची सारखी वर्दळ, ये-जा चालू होती आणि एके दिवशी थेट आमच्या खोलीकडे येताना मी कुणाला पाहिलं माहितीय? म्हणजे तेव्हा नाव माहीत नव्हतं मला, नंतर कळलंऽऽ सई होती ती."

"सई जादूगारीण?" काशीनं चकित होऊन विचारलं. "हो! ती कोण आहे हे मला ठाऊक नव्हतं. कुणीतरी आप्तस्वकीयांपैकी आहे असं मला वाटलं. ती उठवळ बाई माझ्याकडे बघून हसली आणि तिनं इकडच्यांचा ठावठिकाणा विचारला. पहिल्यांदा मला तिचा प्रश्न ऐकून आश्चर्य वाटलं. पण नंतर तिच्याशी थोडंसं बोलल्यावर माझं मन आतल्या आत विदीर्ण होऊन संपून गेलं. ती इतकी सुंदर

आणि मोहक दिसत होती की बस्! तिचं यांच्याकडे काय काम असेल? मी स्वत:शीच विचार केला. पण तिला इकडच्यांचा ठावठिकाणा माहीत नव्हता आणि ती इथे येणार आहे हे त्या दोघांनी आधी ठरविलेलं नव्हतं असं लक्षात आल्यावर मला इतका आनंद झाला, की मी आनंदानं उडीच मारली म्हण ना! माझा आनंद काही लपून राहू शकला नाही. मला तिच्याकडे बघणंसुद्धा पाप, अमंगळ वाटत होतं त्यामुळं शक्य तितक्या लवकर तिथनं निघून जाण्यासाठी मी वळले. पण खरं सांगते काशी, परत जाताना तिची जी नजर होती ना, पोटात भीतीचा गोळा उठला माझ्या! भयानं थरथरले मी. ती मला जणू धमकी देत होती, नजरेत खुन्नस होती तिच्या आणि खरं म्हणजे त्यामुळेच मी फार अस्वस्थ आहे. सासरी जरी माझ्या कितीही छळ झाला तरी त्याचं मला फारसं काही वाटत नाही. मी नाही मनावर घेत ते! कारण किती केलं तरी ती माझ्या नवऱ्याच्या घरची माणसं आहेत आणि माझ्याशी दुजाभावानं वागत असले, तरी ते सगळंजण त्यांच्याशी चांगलं वागतात. पण, बापरे! या बाईच्या नुसत्या विचारानंही थरकाप होतो माझा. काशी, तुला काय वाटतं, आमच्या दोघांच्या मध्ये येईल का ती? कधीकधी या विचाराचंही मला काही वाटत नाही आणि सगळ्यापासून एकदम अलिप्त होण्याचा प्रयत्न करते. पण सासरच्या घरातला जो माझा एकमेव मित्र आहे आणि त्याला गमावण्याचा विचारही कधीकधी असह्य होतो. पण त्याचबरोबर ना काशी, इकडून जेव्हा माझ्याशी, थंड, भावनारहित असल्यासारखं वागणं होतं किंवा बोलल्याप्रमाणे ते वागत नाहीत तेव्हा मला वाटतं की ते जुने, असह्य, सगळ्यांनी वाळीत टाकल्याचे दिवस पुन्हा परत आलेत. मग मी राब राब राबते, सगळे विचार कामात बुडवून टाकते. जितकं कष्टांचं आणि ढोर मेहनतीचं काम असेल तितकं बरंच, असं वाटतं मला. आता सांग काशी मला तू, मी करू तरी काय?" लोखंडी पंजात पकडावे तसे कमलानं काशीचे हात आपल्या दोन्ही हातांत घट्ट पकडले आणि ओक्साबोक्शी रडत ती म्हणाली, "नेहमी तुझ्याजवळच राहावं असं मला वाटतं, नको सोडून जाऊ मला."

कमलेच्या गळ्याभोवती हात टाकून काशीनं तिला जवळ ओढलं आणि थोडा वेळ तसंच थांबून म्हणाली, "मला माहीत आहे ती सई. पण तिला तुझ्या नवऱ्याकडे कुणी पाठवलं असेल? एवढं नक्की कमला, की कुणीतरी तुझा सत्यानाश करायला टपलंय. जरा जपून रहा. देवालाच तुझी काळजी. तोच तुला तारेल."

काशीचं बोलणं ऐकून कमला आणखीनच कोड्यात पडली, "कुणीतरी खरंच, तिला त्याच्याकडे पाठविलं असेल असं वाटतं तुला?" तिनं विचारलं.

"अगं, नक्कीच!" काशी म्हणाली, "अगं, महाभयंकर बाई आहे ती. राक्षसासारखी मायावी आणि दुसऱ्याला सहज वश करणारी आहे ती. तिच्यासारख्या इतर बायांसारखं तिनं अगदीच ताळतंत्र सोडलेलं नाही हे खरं, पण त्यामुळेच मला तिची

जास्त भीती वाटते. तुझ्या सासूबाईंनी पाहिलं का तिला? घरातच राहिली होती का ती?'' कमला मान हलवीत 'नाही' म्हणाली, ''अगं, पाहुण्यांची संख्या वाढली तशी बागेत मंडप आणि राहुट्या उभ्या करून त्यांची सोय केली. त्यामुळे ती राहिली होती की नाही, ते काहीच मला माहीत नाही.''

संभाषणाचा हा शेवटचा भाग त्या दोघींच्याकडेच येणाऱ्या भागीरथीच्या कानावर पडला. आता त्या तिघी मिळून नदीकडे चालू लागल्या.

''पण ही सई आहे तरी कोण? आणि तिला इकडच्यांकडे कुणी बरं पाठवलं असेल?'' नदीकाठच्या झाडांच्या दूरदूरपर्यंत पसरलेल्या रांगांकडे पाहत कमलानं पुन्हा विचारलं.

''तुझ्या सासरच्या लोकांशिवाय दुसरं कोण पाठवेल तिला तुझ्या नवऱ्याकडे?'' भागीरथी विचूकपणे बोलली. ''ती माणसं वाटोळं करतात आपलं. सांगण्यासारखं खूप आहे गं कमला पण तोंडं शिवली आहेत ना आपली. त्यांना वाटतं आम्हांला काही भावनाच नाहीत जणू. अंगातली सगळी ताकद संपून जाईल एवढं काम करायला लावून ते आपल्याला बधिर करून टाकतात. मग आपल्याला आयुष्याचाच तिरस्कार वाटायला लागतो. रोजचे काबाडकष्ट, सासरच्या लोकांची उणीदुणी आणि कुटिल कारस्थानं यामुळे सगळ्या इच्छा-आकांक्षा संपून जातात, काहीच उरत नाही त्यातलं. पण नाही म्हणायला मैत्रिणींना भेटायला मिळणं आणि त्या तुरुंगातून बाहेर पडून मैत्रिणींबरोबर फिरायला जाता येणं हाच काय तो प्रकाशाचा किरण आहे आपल्या आयुष्यात. देवाची दयाच म्हणायची.''

भागीरथी चांगली उंचनिंच होती. काळ्याभोर डोळ्यांतील चमकदार तेजस्वीपणामुळे तिच्या गोल, चाफेगौर चेहऱ्यावर एक वेगळीच तकाकी येई. ती शिडशिडीत बांध्याची होती आणि मान वेळावून बोलण्याची तिची खास लकब होती. तिच्या हालचाली इतक्या दिमाखदार असत, की कुणाला वाटावं की ती जणू कुठल्यातरी अज्ञात आदिवासी प्रदेशाची सम्राज्ञी आहे आणि आपल्या भोवतीच्या लोकांवर सूड उगवण्यासाठी जणू इथे अवतरली आहे. तिची भाषाही नेहमी चढेलपणाची, विखारी असे. काय करणार बिचारी, इतका कडवटपणा, विखार तिच्यात निर्माण होण्यासाठी कारणंही तशीच घडली होती. काय काय घडून गेलं होतं तिच्या आयुष्यात, इतरांना कदाचित कल्पनाही करता यायची नाही. तिच्या मैत्रिणींना मात्र सगळं काही ठाऊक होतं आणि त्यांना तिच्याबद्दल खूप सहानुभूती होती. ती रागीट आणि भांडखोर होती हे खरं पण त्याचबरोबर हेही तितकंच खरं होतं, की तिच्याएवढी मैत्री निभावणारी मिळणं कठीणच. आपल्याशी चांगलं वागणाऱ्यासाठी प्रसंगी जीव द्यायलाही तिनं मागं पुढं बघितलं नसतं, असा तिचा स्वभाव होता. काशी आणि कमला तिचं सगळं बोलणं अगदी शांतपणे ऐकत होत्या. बोलत बोलत त्या मुली नदीतीरावरील अशा ठिकाणी येऊन पोहोचल्या होत्या की जिथे समोरच देवळं, गुंफा, वृक्षवाटिका

होत्या आणि त्याच्या पलीकडे मोठा माळ पसरला होता. "शू: ऽऽइथे नको बोलायला काही" असं म्हणत भागीरथीनं लगेच विषय बदलला. "तिथे गुंफा दिसताहेत ना? तिथे ऋषी-मुनी राहातात आणि त्याच्यासमोरच देऊळ आहे पाहा. चला, आपण रोहिणीमातेला फुलं वाहू या. ती सारं जाणते. काळं-पांढरं, बरं-वाईट सारं ती पाहत असते. खड्डा असेल तिथे पाणी साचणारंच! आपण बोलून काय उपयोग. तुमचं काय ते तुमचं तुम्ही पाहा पण माझं मन दगडातल्या झऱ्यासारखं स्वच्छ, निर्मळ आहे. मी जरी रागाच्या भरात नाही नाही ते बोलत असले तरी माझ्या मनात काही राहत नाही."

"पण खरंच भागीरथी, सांग ना, तू ऐकलंस का काही?" कमलानं विचारलं.

"मी ऐकलं? घरात कटकटी आणि भांडणं एका सासूशिवाय दुसऱ्या कोणामुळे होणार? माझ्या सासूनं नाही का असंच किती दिवस केलंऽ? माझ्या नवऱ्याच्या मनात माझ्याबद्दल तिरस्कार निर्माण होऊन तो दुसऱ्या बाईकडे जाऊ लागेपर्यंत तिनं नाही नाही ते सगळं केलं. अर्थात, आता मी कशाला भीत नाही. जळतं कोलीत झालेय मी. मला बोलायची किंवा माझ्या अंगाला हात लावायची कोणाची हिंमत नाही. मी त्यांच्यावर आग ओकते. कारण माझं मन आता आंबून-विटून गेलंय. ते आतल्या आत जळत राहातं. करायची काय ती श्रीमंती, त्या संपत्तीचा उपयोग तरी काय? माझ्या सासूच्या नजरेत विजयाचा तोरा असतो. जणू ती म्हणते, 'बघ आपल्या मर्जीप्रमाणे वागायचं होतं ना तुला? बघ तुझ्या वागण्यामुळे तुझी काय दशा झालीय ते. स्वतंत्रतेसाठी एवढा आटापिटा केलास, काय उपयोग झाला त्याचा, आता मिळालीय ना मोकळीक? पण आता का दुःखानं तळमळतेस? आणि बोलून दाखवलं की झोंबतं तुला. लगेच अंगावर धावून येतेस!" काहीशा आवेगानं भागीरथी हे सगळं बोलली खरी पण लगेच कमलेकडे वळून अगदी मृदू आवाजात म्हणाली, 'एका गोष्टीबद्दल मात्र मी तुला निक्षून सांगते कमला. रमाबाईच्या नवऱ्यापासून जरा जपून रहा. सावध अस. सईला बघितल्यावर मला जरा चिंताच वाटायला लागली होती म्हणून मी तिच्याकडे चांगलंच लक्ष ठेवून होते. त्या दिवशी गाण्याचा कार्यक्रम होता ना, त्या रात्री मी सईला आणि रमाबाईच्या नवऱ्याला कुजबुजताना खिडकीतून पाहिलं. मला जरा संशय आला. त्यांच्या बोलण्यात अधूनमधून तुझं नाव येत हातं. नीटसं काही समजलं नाही, पण काहीतरी शिजतंय एवढं खरं. पण जाऊ दे, आता रोहिणीमातेचं मंदिर आलं. काळोख पडायला लागलाय, देवळातल्या घंटाही वाजू लागल्यात. दिवेलागण झालीय. पुजारी धुपारत्या घेऊन बाहेर आलेयत. चला, आपण रस्त्याच्या कडेकडेनं जाऊ या. तुम्हांला माहितीय का, देवांच्या फिरण्याची वेळ आहे ही. उगीच त्यांच्या वाटेत आपला मधेमधे अडथळा नको."

ढम! ढम! मंदिरातून आवाज येतो. देवीमाता देवळातून बाहेर पडते. मोठ्यांदा घंटानाद होतो. इकडून तिकडून सगळीकडून लोक देवळाकडे जाऊ लागतात.

कुणाच्या हातात फुलांनी भरलेली पितळेची तबकं आहेत; तर कुणाच्या हातात देवीला वाहण्यासाठी इतरही वस्तू आहेत. देवळासमोरच्या एका ठरावीक ठिकाणी ते माथा झुकवितात. वाद्यांच्या बदललेल्या आवाजावरून त्यांना कळते की आता देवीमाता मंदिराच्या प्रवेशद्वारात उभी आहे. मग ते तिला नवस बोलतात, मागणं मागतात, नऊ वेळा तिच्या पायावर मस्तक घासतात. मग पुढे होऊन अंगारा घेतात, तुळशीपत्र घेतात आणि तीन वेळा मंदिराला प्रदक्षिणा घालतात. पूजा होईपर्यंत मुखातून अवाक्षर काढत नाहीत. एक प्रकारची भीती असते मनात त्यांच्या. काहीजण नारळ वाढवितात, काही लोक आजारी माणसांना बरं वाटावं म्हणून कापूर लावतात, तर काही लोक नामजपाची माळ ओढतात. देवळाजवळच्या झाडीत भरभक्कम, अवाढव्य शरीराचे, अंगभर भस्माचे पट्टे ओढलेले बैरागी आणि साधू होते. ते आपल्याकडे रोखून, विचित्र नजरेनं पाहाताहेत हे ध्यानात येताच त्या मुलींनी एकमेकींचे हात पकडले.

'काशीऽ' कमला म्हणाली, "मला या लोकांची फार भीती वाटते. एकजण नेहमी येतो आमच्या घरी भिक्षेला. आणि मी काहीतरी भिक्षा घालते तेव्हा आशीर्वादही देतो पण; तो खरंच इतका भयंकर दिसतो ना!"

"असं म्हणतात, की त्यांच्या डोळ्यांत काहीतरी मायावी शक्ती असते." काशी म्हणाली, "तू ऐकलं असशीलच कधीतरी, लोक आपोआप भारल्यासारखे त्यांच्या मागे मागे जातात आणि त्यांना अगदी वश होतात. आपल्याला जे जे हवे ते ते करू शकतात, असं म्हणतात."

"बाप रे! किती भयंकर आहे हे. आमच्या घरी असाच एक साधू येतो. मला तो मुळीच आवडत नाही. माझ्याबद्दल त्याला काहीतरी सांगायचं असतं आणि मी शक्य तितकं लपून राहायचा प्रयत्न करते. पण तो बरोबर शोधून काढतो. पूजेसाठी काहीना काहीतरी वस्तू, उपकरण त्याला हवे असते. मलाच ते नेऊन द्यावे लागते. त्यावेळेला तो माझ्याकडे असं काही टक लावून पाहातो की मला कापरंच भरतं. मला तो आवडत नाही, हे त्याला कळत असेल का गं?"

"त्यांना सगळं कळतं" भागीरथी म्हणाली, "ते जेव्हा समाधी लावतात ना तेव्हा त्यांचे देव त्यांना सगळं सांगतात आणि देवांवरही त्यांची सत्ता चालते. त्यातले जे वाईट प्रवृत्तीचे असतात ना ते देवांना वाटेल ते करायला भाग पाडतात. मंत्रतंत्राचं एवढं ज्ञान त्यांनी मिळवलेलं असतं त्यामुळे ते चांगलेच सामर्थ्यशाली होतात. आता पुजारी आहे ना या देवळाचा, त्याच्या आधीचा पुजारी फार दुष्ट होता. त्याला कसं मरण आलं माहितीय? बरं का, आपली ही रोहिणीदेवी आहे ना, ती अगदी चांगली विवाहित स्त्री आहे. आपलं हे शहर पार वाहून जाणार होतं, तिनं त्याला कसं वाचवलं ते माहितीय का तुला? ऐन रात्री जेव्हा पूर आला आणि सारे बंधारे वाहून जायच्या बेतात होते, तेव्हा ती स्वत: मामलतदाराकडे गेली. तिनंच त्याला झोपेतून

जागं केलं आणि सगळ्या कामगारांना बोलावून घ्यायला सांगितलं आणि जेव्हा तो कुरकुरायला लागला आणि एका रात्रीत बंधारे नीट, सुरक्षित करणं जमणार नाही, असं म्हणायला लागला, तेव्हा त्याच्याकडे जळजळीत कटाक्ष टाकून ती म्हणाली, 'जमेल तेवढे लोक या आणि प्रत्येकजण येताना एकेक फावडं भरून वाळू आणा. बाकी सगळं मी बघून घेईन. मी कोण आहे माहीत आहे ना तुला?' त्या रात्री सगळ्यांनी पूर्वी कधीच केलं नसेल इतकं काम केलं आणि बरं का, शहर पुरापासून वाचलं. तर अशी ही रोहिणीमाता. फार दयाळू आहे ती. पण हा पुजारी जे दुर्वर्तन करतो ना, त्याचा तिला राग येतो. एकदा मध्यरात्री ती तिच्या नित्यक्रमाप्रमाणे शहरात फेरफटका मारीत होती, तेवढ्यात हा पुजारी भांगेच्या तारेत झोकांड्या खात आला. ती नुकतीच देवळातून बाहेर पडून पुढच्या चौकात आली होती. त्याच्या काही ते लक्षात आलं नाही. तो थेट आत गेला आणि एखाद्या रखेलीला किंवा नाचणारिणीला म्हणावं तसं असभ्यपणे बोलू लागला. मोठमोठ्यानं ओरडून म्हणाला, 'सुंदर मुली, बाहेर ये.' त्याचं बोलणं अगदीच असभ्यपणाचं होतं. देवीनं हे ऐकलं मात्र, ती रागानं गर्रकन वळली. ती आता मुक्त होती. त्याच्या प्रभावाखाली नव्हती. तिनं त्याच्या पाठीत अशी लाथ घातली की तो खालीच पडला, तोंडातून रक्त ओकून तिथेच मेला. तिच्यापुढे कोणाची लबाडी चालत नाही. तिला चांगल्या मनाची, चारित्र्यवान माणसं आवडतात. बायकांकडे टक लावून बघणारी आणि घाणेरडं, अर्वाच्य बोलणारी माणसं नाहीत आवडत तिला. ती इतकी अद्‌भुत शक्ती असलेली आहे ना की बस. आपल्या किमयेच्या बळावर ती पाण्यातून, एवढंच काय पुराच्या लोंढ्यातूनही अगदी कोरडी, पाण्याचा एक थेंबही अंगाला न लागता जाऊ शकते. म्हणून तर जात्यावर बसल्यावर बायका तिच्या ओव्या गातात –

*लाट पाण्याची कोरडी —*
*रोहिणीच्या ग पायापाशी।*
*म्होरल्या पायापाशी*
*लाट झालीया कोरडी।।*
*मागून येई लोंढा*
*जाई आज्ज्यात वाहूनी*
*रोहिणीच्या ग मागूनी*
*माझ्या सईची करणी।।*
*किती किती वानू तुला*
*माझे साजिरे रोहिणी*
*नदीच्या ग तीरावरी*
*तुझी किमया परोपरी।।*

---

टीप - ओव्यांचा अनुवाद डॉ. तारा भवाळकर यांच्या सौजन्याने

कितीतरी गोष्टी देवीपुढे सांगण्याचं मनातल्या मनात ठरवत कमला देवळात गेली. त्या महाप्रतापी आणि कनवाळू देवीपुढे मोकळे करण्यासाठी कितीतरी दु:ख आणि वेदना तिच्या मनात साकळल्या होत्या. देवळापुढे ती थांबली. तिची प्रार्थना म्हणजे अंत:करणाचं एक मूक आक्रंदन होतं. सगळीकडे माजलेल्या दुरवस्थेत काहीतरी व्यवस्था निर्माण करण्यासाठी अटीतटीच्या, आणीबाणीच्या व संघर्षाच्या काळात बळ देण्यासाठी अगदी मूकपणे केलेली प्रार्थना होती ती. तेवढ्यात मूर्तिमंत 'दैवा'ची विधीची मूर्ती सर्वांना दिसली.

'अरे देवा! त्या भयंकर उग्र प्रतिमेपुढे येताच कमला उद्गारली आणि अचानक झाडांमध्ये वारा सळसळू लागला, जणू वेदनेचं गीत गाऊ लागला. 'देवा, परमेश्वरा, तू आता इथे असशील तरऽऽ' भीतीची थंडगार लाट तिच्या अंगभरातून शिरशिरत गेली. तिला त्रास देण्यासाठी आखली गेलेली कितीतरी कपट-कारस्थानं तिच्या मनापुढे तरळून गेली आणि ती अगदी घाबरून गेली. पण त्याचबरोबर एक सुखद असा विचारही तिच्या मनात आला. आपल्या टेकडीवरच्या घराकडे जाणाऱ्या त्या लांबसडक रस्त्याकडे, पलीकडच्या टेकडीकडे आणि दूरच्या टोकावरच्या त्या वळणाकडे अर्धमिटल्या डोळ्यांनी पाहाताना तिला वाटलं, की आपला देव आपल्यापासून फार दूर नाही, जवळच आहे आणि आपल्या मदतीला लगेच धावून येईल तो. तिनं आजूबाजूला नजर टाकली तशी तिच्या मनाला उभारी आली आणि अगदी नकळत ती उद्गारली, 'होय. तुझं अस्तित्व इथे आहे हे निश्चित! तू मला जाणतोस, तूच मला निर्माण केलंस, तू साऱ्यांची काळजी घेतोस, त्यांचा प्रतिपाळ करतोस, दुर्जन आणि सज्जन या दोहोंकडेही तुझं लक्ष असतं, तूच दुष्टांची कारस्थानं निष्फळ करतोस. माझी आणि माझ्या नवऱ्याची संकटातून सुटका कर. माझ्याभोवती सगळंच अनिष्ट पसरलंय. तुझं साहाय्य आणि मदत मिळावी म्हणून मी तुझी प्रार्थना करते.' सोसाट्याचा वारा वाहू लागला, झाडं अगदी गदागदा हलू लागली. एका विचित्रच प्रसंगात ती सापडली. आपण प्रार्थना करताना मर्यादातिक्रम तर केला नाही? उद्धटपणानं बोललो का? असे प्रश्न तिच्या मनात उमटले. देव कदाचित संधिप्रकाशात अदृश्य रूपात वावरत असेल. कदाचित त्यानं तिला पाहिलंही असेल. पुन्हा एकदा ती तोंडावर आपटली. वाऱ्याचा एक कानठळ्या बसविणारा मोठा आवाज झाला आणि पुन्हा सारं स्तब्ध, चिडिचूप झालं. तिच्या साहसामुळे तिला काही कमी-जास्त होणार तर नाही ना? समोरची देवता क्रुद्ध होऊन तिला ठार मारून टाकणार नाही ना? ती हात जोडून, अगदी एकाग्रचित्तानं देवाचा धावा करू लागली. अगदी त्याच वेळी नवऱ्याचा आवाज तिच्या कानावर पडला आणि डोकं वर उचलून पाहिल्यावर वेगळाच चेहरा पाहून तिला मोठा धक्का बसला. शेजारी उभा राहून तिचा नवरा काहीतरी बोलत होता पण त्यातलं अक्षरही तिच्या डोक्यात शिरत नव्हतं; कारण त्या दुसऱ्या माणसानं जणू तिच्यावर नजरबंदी केली

होती. 'हा माणूस! खरंच, का येतो हा माणूस?' आपल्या नवऱ्याच्या बाजूनं चालताना तिनं आपला हात हृदयावर घट्ट दाबून धरला. तिच्यासमोर उभा असलेला माणूस दुसरा- तिसरा कुणी नसून, तिला बरं करणारा वैद्य आणि दुधस्थळातील चमत्कारिक पेच प्रसंगात भेटलेला तरुणच होता. त्याची नजर तिच्यावरून हलत नव्हती आणि त्या नजरेच्या सामर्थ्याचंही तिला नवल वाटत होतं. पण तेवढ्यात तिच्या नवऱ्यानं तिला काशीकडे जायला सांगितलं आणि म्हणाला, "वडिलांच्याकडे जाण्यासाठी बांधाबांध कर. एवढ्यातच जायचंय तुला." स्वप्नातून जाग यावी तशी कमला एकदम जागी झाली आणि विचारू लागली, "का? काय झालं?" तिचा नवरा हसला आणि तिचा गोंधळलेला चेहरा पाहून म्हणाला, "झाडीत काय झपाटलं-बिपाटलं होतं की काय तुला?" पुढे त्यानं विचारलं, "इतका वेळ मी काय म्हणतोय ते ऐकलं नाहीस का तू? तुझे वडील आठवण काढतायत तुझी, आजारी आहेत ते, तुला बोलावलंय त्यांनी. आता चटकन घरात चल आणि जायची तयारी कर."

गणेशचा स्वभाव चटकन कळण्यासारखा नव्हता. तसे त्याच्यात चांगले गुण खूप होते. पण तो आळशी, ऐदी होता आणि अप्पलपोटेपणाचा, स्वार्थीपणाचा भाग त्याच्या स्वभावात अधिक होता. प्रत्येक गोष्ट आपल्याच सुखासाठी आहे असे त्याला वाटे. त्यामुळे आपल्या सुखासाठी आणि आपल्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी असलेली मालकीची वस्तू म्हणून तो कमलाकडे पाहत होता, यात नवल नाही. आपल्या अलिप्त आणि दुराव्याच्या वागण्यामुळे कमलेला दुःख होत असेल किंवा काय याची त्याला मुळीच फिकीर नव्हती. ती त्याची बायको होती, त्याची मालमत्ता होती आणि तिच्याशी अधिक जिव्हाळ्याचं नातं निर्माण करण्यासाठी, मुद्दाम आपणहून काही प्रयत्न करावे असं त्याला वाटत नव्हतं. त्याचं आयुष्य अगदी सुखात, मजेत चाललं होतं. त्यामुळे तिचं काय चाललं होतं, ती काय करीत होती हे समजून घेण्याच्या भरीस तो मुळीच पडला नाही. ती सोबत असली की तो अगदी मृदू, आर्जवी वागे; कारण तसं वागताना त्याला मोठं समाधान वाटे आणि तिच्या डोळ्यांतील कृतज्ञतेचे भाव बघून संतोष होई. त्याला कुणाचं विव्हळणं, कण्हणं किंवा वेदनेनं तळमळणं बघवत नसे. त्यामुळे अशा प्रकारचे प्रसंग आणि तत्संबंधित कामं तो टाळीत असे. बौद्धिक चर्चा करायला त्याला आवडे आणि आईचा अगदी लाडका असल्यामुळे तिच्या सहवासात त्याचा अहंकार सुखावत असे. रमाबाईच्या नवऱ्यानं गणेशच्या स्वभावाचा बारकाईनं अभ्यास केला होता; म्हणून त्यानं सईला त्याच्या अधिकाधिक निकट आणण्याचे सर्वतोपरी प्रयत्न केले. सईच्या सहवासात वेगळाच लोभसपणा होता. तिचं संभाषणचातुर्य, प्रश्नांना उत्तरं देताना ती दाखवीत असलेलं प्रसंगावधान, हसरा-आनंदी स्वभाव, वागण्या-बोलण्यातील प्रसन्न-खेळकरपणा, बाहेरच्या जगाबद्दलचं ज्ञान आणि आपल्याशी

सहमत न होणाऱ्या लोकांची खिल्ली उडविण्याची लकब यामुळे गणेश तिच्याकडे अगदी सहजपणे आकृष्ट झाला. आपल्या नवऱ्याच्या स्वभावातील हा कच्चा धागा कमलेला माहीत नव्हता. ती स्वत: अत्यंत संवेदनशील मनाची, सद्गुणी मुलगी होती आणि आपल्या आसपासच्या माणसांतील चांगले गुण पाहण्याकडेच तिचा कल होता. ती अगदी नि:स्वार्थी होती आणि ज्यांना ती आपलं माने, त्यांच्यासाठी जीव ओवाळून टाकण्याचीही तिची तयारी असे. कमलेला शिकविण्याचं दिलेलं वचन गणेशला पाळता येईना आणि त्यासाठी पटेल असं कारण प्रत्येकवेळी शोधूनही सापडेना; अशी अवस्था झाल्यामुळे कमलेच्या सहवासात गणेशला अवघडलेपणा येऊ लागला, अपराधीपणाचा भाव त्याच्या मनात निर्माण होऊ लागला. कमलाच्या डोळ्यांतील तेजस्वितेचा त्याला धाक वाटे. तो दिसल्यावर तिच्या चेहऱ्यावर जी निर्मळ आनंदाची झाक पसरे ती पाहून, आपल्यापेक्षा कमला अधिक उमद्या, उदार मनाची आहे याची त्याला खात्री पटे आणि तो अधिकच अस्वस्थ होई. तिला शिकविण्यासाठी आपण केलेल्या आटापिट्याचा आणि आपण तिच्याकडे अधिक लक्ष पुरवायला हवं, अशा आपणच वाढवून ठेवलेल्या अपेक्षांचा त्याला आता राग येऊ लागला होता. तो स्वत:चाच रागराग करू लागला होता.

✿

## १२.

सईच्या आगमनानं गावातील एकंदर वातावरणाला मोठीच कलाटणी मिळाली. सगळ्या प्रमुख समारंभात मोक्याच्या ठिकाणी ती हमखास उपस्थित असे आणि गणेशच्या तरुण मित्रांच्या गप्पांमध्ये, तर तिचा विषय सततच निघत असे. चार-चौघांतही ती त्याला ओळख दाखविते याबद्दल ते त्याचं अभिनंदन करीत आणि त्यामुळे तोही खुशीत येई. आपल्या नवऱ्याला सईबरोबर पाहिल्याचं कुणाकुणाकडून कळलं की कमलेला काही सुचेनासं होई, ती अस्वस्थ होई आणि वडिलांच्या आजारपणामुळेही तिला निराळाच घोर लागला होता. कधी गणेशच्या तर कधी वडलांच्या काळजीनं तिचं मन सैरभैर झालं होतं. 'समजा, आपल्या नवऱ्याला काही झालंऽ' बराच वेळ विचार केल्यानंतर ती स्वत:शीच उद्‌गारली, 'तर ते काही माझ्या चुकीमुळे नाही. त्यांनी समजा काही चुका केल्या किंवा त्या बाईच्या नादाला लागले, तर त्याला मी काय करणार? आता नशिबाचे फासे दैवानं माझ्या हातून काढून घेतले आहेत. माझ्या वडिलांना आत्ता माझी खरी गरज आहे. पण तरी मला असंही वाटतंय की इकडच्यांनाही आत्ता माझी गरज आहे.'

त्या अगदी निर्वाणीच्या प्रसंगी फारसा काही उपयोग होणार नाही याची जाणीव असूनही तिनं अनेक देवदेवतांना साकडे घातले. नवऱ्याच्या ओढीमुळे आणि काळजीमुळे आपले वडिलांबद्दलचं प्रेम तिनं मनात खोलवर दाबून टाकलं होतं. पण त्यांच्या आजारपणाविषयी कळल्यावर मात्र तिला मुळी राहावलंच नाही. जमिनीवर पडून 'दादा, दादा' असं म्हणून ती रडू लागली. "मी तर इथे आहे. मग तिथे तुमचं सारं कोण करीत असेल?' त्यांच्या मृत्यूपूर्वी आपली भेट तरी होईल की नाही या आशंकेनं ती पिळवटून निघाली. रात्रभर तिच्या डोळ्याला डोळा लागला नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी ती आपल्या सासूबाईंबरोबर माहेरी-टेकडीवरच्या घरी जायच्या तयारीत होती. कितीतरी दिवसांत ती तिकडे गेली नव्हती. गणेश लवकर उठला होता. कमलेच्या दु:खाची फिकीर नसल्यामुळे त्याला झोपही छान लागली

होती. पण जेव्हा त्यानं तिचे रडून सुजलेले, लाल झालेले डोळे आणि दुर्मुखलेला चेहरा पाहिला, उगीचच धावपळ करून भावना आटोक्यात आणण्याचा तिचा केविलवाणा प्रयत्न जेव्हा त्याच्या लक्षात आला, तेव्हा त्याची सदसद्विवेकबुद्धी जागी झाली. तो चांगलाच वरमला. ती आत-बाहेर सारख्या येरझाऱ्या घालीत होती. सासूबाई आपल्या खोलीतून केव्हा बाहेर येतील असं तिला झालं होतं. गणेशनं हे सर्व पाहिले आणि न राहावून तिच्याजवळ जात म्हणाला, "रडू नको." या शब्दांनी ती हेलावून गेली. तिच्या डोळ्यांतून झरझर अश्रू ओघळू लागले आणि ते कोणाला दिसू नयेत म्हणून ती लगोलग तशीच शेजारच्या खोलीत शिरली. गणेश तिच्या पाठोपाठ गेला आणि तिनं ओंजळीत लपविलेला चेहरा वर उचलून तिला म्हणाला, "नाही, नाही, कमला अशी रडू नको." तिच्याबद्दल त्याच्या मनात अनुकंपा निर्माण झाली आणि इतके दिवस आपण तिच्याकडे लक्षच दिलं नाही, असा विचार त्याच्या मनात चमकून गेला. हा विचार आणि तिच्या विरहाची भीती या दोन्हींचा मिळून एक दु:खद भाव त्याच्या हृदयात उमटला. आपण तिला गमावून बसू अशा अतिशय धूसर कल्पनेनं तो अस्वस्थ झाला. पण लगेचच त्याने हा विचार झटकून टाकला आणि कसंनुसं हसत म्हणाला, "कमला, अगंऽ असं रडायला तू लहान आहेस का आता? तुझे वडील तितके फार काही आजारी नाहीत आता. काल मी रामचंद्रावाला नीट विचारून घेतलंय आणि तो म्हणाला की तुला भेटायला ते फार आसुसलेत इतकंच! आणि साहजिकच आहे म्हणा. कितीतरी दिवसांत तुमची भेट नाही!" एवढ्यात काही आवाजांची चाहूल लागली म्हणून पटकन, हात बाजूला घेत तो अगदी हळू आवाजात कुजबुजला, "मी तुला भेटायला येईन लवकरच. आता जा."

साऱ्या प्रवासात कमलेचे विचार टेकडीवरच्या घराभोवती घोटाळत होते. तिचं डोकं गरगरत होतं आणि तिला कसलेतरी विचित्र भास होत होते. शहराच्या अगदी दुसऱ्या टोकाला असलेला हमरस्ता तिनं ओलांडला. दादांच्या पाठकुळीवर बसून पूर्वी कितीदा तरी तिनं हा रस्ता ओलांडला होता. ते दिवस आठवताच तिच्या घशात आवंढा दाटून आला. खरंच तो मायाळू स्पर्श, 'दुसरातिसरा काही विचार मनात आणू नको, झोप बरं.' असं सांगणारा आवाज कुठं गेला? पूर्वीप्रमाणेच आताही भाताची शेतं लहरत होती, वाऱ्याच्या प्रत्येक श्वासागणिक त्यांना खळी पडत होती. ते पाहाताच, अशा शेतातून दादांबरोबर जाताना कशी मजा यायची ते तिला आठवलं. अजून तिथे सूर्यकिरणं आहेत का, आपला जुना खेळगडी वारा आहे का, हे तिनं अजमावलं. झाडांखालच्या मऊशार धुक्याला बाजूला सारून पानांना आणि दंवभरल्या शेंड्यांना सकाळी चमक आणणारे सूर्यकिरण तिने पाहिले. मग तिला ते सारे जुने दिवस आठवले आणि आता तिच्या आयुष्यात झालेला बदल जाणवून ती स्वत:शीच उद्गारली, 'खरंच, ते सारं सुख गेलं कुठे? ते पुन्हा माझ्याकडे कधीच परत येणार नाही का?' या विचारांनी ती हादरून गेली. टेकडी जवळ आल्यावर

कमलाची आतुरता ओळखून तिच्या सासूनं तिला पुढे पळत जाण्याची परवानगी दिली. टेकडीवर पोहोचताच कमलेला तिची बालमैत्रीण येशी दिसली. एक क्षणभर ती स्तब्ध झाली. 'येशी' म्हणून तिनं हाक मारली आणि तिच्यात झालेला मोठ्ठा बदल तिच्या लक्षात आला, कारण येशीच्या कडेवर तिचं बाळ होतं. पण आता बोलायला मुळी वेळच नव्हता. आपल्या प्रिय येशीच्या कुशीत शिरून ती रडू लागली. जातीच्या अभिमानाला तिथे थारा नव्हता. जुन्या सच्च्या प्रेमापुढे स्पर्शाच्या विटाळाची ब्राह्मणी कल्पना पार लोपून गेली. आपल्या मालकिणीला मिठीत घेत, खुशीनं हरखून जाऊन येशी म्हणाली, "कमलाबाई, किती बदललात तुम्ही!"

"माझे दादा कसे आहेत?" कमलेनं आतुरतेनं विचारलं.

"तुझं दादा लई आजारी होते, पर आता बरं हायती. काय, बी काळजी करू नगंस. तू आलीस का बगायलाच मी इकडं आलेवते" बोलता बोलता दोघींनी एकमेकींच्या हातांत हात गुंफले आणि त्या घराकडे चालू लागल्या. कमला पावला-पावलाला ठेचकाळत होती, पडत होती.

कमालीच्या आतुरतेनं झोपडीत शिरून कमला थेट दादांच्या बिछान्याकडे गेली. "दादा! दादा! तुम्हांला भेटावं असं मला कित्ती कित्ती वाटत होतं!" वर्षभरात दाबून ठेवलेल्या भावनांना वाट मिळाली आणि तिच्या तोंडातून हुंदके, उसासे बाहेर पडू लागले.

"कमलाऽ, कमला बाळा, तुला डोळे भरून पाहू दे मला." असं म्हणत त्या विकलांग वृद्ध व्यक्तीनं तिचं मुख वर उचललं आणि कपाळावर ओठ टेकले. हुंदके, उसासे विरून गेले. आपलं सुखाचं निधान, नंदनवन अखेर गवसल्याचा तृप्त भाव तिच्या मनभर पसरला. काहीही प्रश्न न विचारता, केवळ त्यांच्याकडे एक चौकस कटाक्ष टाकून तिनं त्यांच्या छातीवर आपलं मस्तक टेकलं. त्यांनीही अगदी वात्सल्यपूर्ण नजरेनं तिच्याकडे पहात तिला घट्ट कवटाळलं. कमला वडिलांच्या कुशीत असतानाच तिची सासू खोलीत आली. पण कमला हलली नाही. 'अगंऽऽ कमला' ती म्हातारी म्हणाली आणि तिची काहीच हालचाल, न जाणवताच म्हणाली, "अगंबाई, ही मुलगी झोपली की काय?"

"नाही! असू दे ती अशीच माझ्याजवळ" म्हातारे संन्यासीबुवा क्षीण आवाजात म्हणाले. "ती जवळ असणं हेच माझ्या दृष्टीनं सर्वाधिक महत्त्वाचं आहे. तिच्या बालपणी, आम्ही एकमेकांपासून कधीच दूर राहिलो नव्हतो." अतिश्रमानं कमलेला ग्लानी आली होती. त्यामुळे ती आपल्या वडिलांजवळ पडून राहली.

ते एक गर्द घनदाट जंगल होतं. वाळलेल्या पानांच्या, पडणाऱ्या पाचोळ्याच्या आवाजानं तिथली नीरव शांतता जेवढी भंग होई बस् तेवढीच. बाकी कसला आवाज नाही. निस्तब्ध शांतता. मात्र काहीकाही ठिकाणी पाचोळ्याचे तीन-चार फूट जाडीचे थरच्या थर जमत. त्या भल्या थोरल्या जंगलातल्या झाडांची पानं एकेक करून

झाडावरून तुटून सळसळत, आवाज करीत खाली पडत. झाडं इतकी प्रचंड होती की, वेलींनी वेढलेले त्यांचे शेंडे एकमेकांत गुंफले गेल्यामुळे आणि फांद्या एकमेकीत गुंतल्यामुळे जणू एक छतच तयार झालं होतं. इतकं दाट की त्यांतून सूर्याच्या एखाद्या किरणालाही जमिनीपर्यंत वाट काढणं मुश्कील होई. त्यामुळे दिवसाचा प्रखर सूर्यप्रकाशही अगदी मृदू, करडा निळसर भासे. इतक्या दुर्गम, बेलाग आणि अतिउंच टेकड्यांच्या मधल्या पठारावर ते जंगल पसरलं होतं, की पशु-पक्ष्यांनाही ते फारसं आवडत नव्हतं. जेव्हा दऱ्याखोऱ्यांतून धुके तरंगत वर येई किंवा कधी ते टेकड्यांच्या माथ्यावरून खाली ओघळत जाई, तेव्हा ते आपल्या मऊशार शुभ्र बाहूत सारं जंगल लपेटून घेई आणि झाडांच्या शेंड्यावर जाऊन बसे. त्यामुळे संपूर्ण वातावरणात धूसर सावल्यांचा आभास तयार होई आणि ते दूरवरचं अंतराळातलं अद्भुत जंगल आहे असं वाटे. पण जेव्हा टेकडीच्या माथ्यावरून थंड वारे घोंघावत येत आणि मोठ्यानं आवाज करीत फांद्या हलवून कडाकडा मोडीत, तेव्हा ते जागृत जंगल एखाद्या किनाऱ्यावरील खडकावर धडका देणाऱ्या महासागराच्या लाटांची आठवण करून देई.

असं होतं 'पाणबरस' जंगल. वेद आणि पुराणांचे गाढे अभ्यासक, सुप्रसिद्ध यती अरण्यदयांचे निवासस्थान. लोकांच्या मनात त्यांच्याबद्दल पूजनीय स्थान होतं. कोणत्याही आजारातून बरं करण्याची विद्या त्यांच्याकडे आहे, असं लोक म्हणत. त्यांच्याबद्दल खूप आख्यायिका प्रचलित होत्या. पण कुणी त्यांना प्रत्यक्ष पाहिलं मात्र नव्हतं. त्या यतिमहाराजांना आपला हा आश्रम फार आवडे. वेगवेगळ्या वनस्पती गोळा कराव्या आणि निवांत राहावं असा त्यांचा कार्यक्रम असे. त्यांनी आपलं सारं आयुष्य अध्ययन आणि ध्यानधारणेला वाहिलं होतं. अगदी मर्जीतल्या मोजक्या लोकांनाच फक्त ते भेटत असत. तशा मोजक्या लोकांमध्ये नारायणबुवा संन्यासी आणि तरुण वैद्य रामचंद्र या दोघांचा समावेश होता.

अरण्यातल्या आपल्या या एकांतस्थळापासून थोड्याच अंतरावर असलेल्या एका विशाल वृक्षाच्या तळी यतिमहाराज आसनस्थ झाले होते. त्यांच्या शेजारी रामचंद्र होता. काही क्षण शांततेत गेल्यावर त्यांनी मृदू आवाजात हाक मारली : "रामचंद्रऽ"

"गुरूराज!" तो तरुण अत्यंत भक्तिभावानं उत्तरला. "बोला गुरूराज, मी ऐकतो आहे."

"माझे दिवस आता फार उरले नाहीत. काळ जवळजवळ संपत आला आहे. माझा मित्र नारायण तर माझ्याही अगोदर जाणार असं दिसत आहे. मी सांगितलेली प्रत्येक गोष्ट नीट ध्यानात आहे ना? आम्ही दोघं गेल्यावरही तू ज्ञानाचा दिवा सतत तेवत ठेवू शकशील, असं वाटतंय ना तुला?

"खरं तर मी त्या बाबतीत अगदीच अडाणी आणि नवशिका आहे, तरी मी

प्रयत्न करेन. गुरुजी.'' असं म्हणत, ऋषिमहाराजांच्या पुढील सूचना नीट ऐकण्यासाठी तो तरुण शिष्य रामचंद्र गुरुजींच्या जवळ सरकला पण तोपर्यंत महाराजांची संभाषणाची ऊर्मी संपून गेली आणि ते काहीसे तंद्रीत गेले. थोड्या वेळानंतर रामचंद्र म्हणाला, ''एक वाईट बातमी आहे,'' पण या बोलण्याचाही त्या वृद्ध तपस्व्यावर काहीही परिणाम झालेला दिसला नाही. पुन्हा थोडा वेळ थांबून रामचंद्र म्हणाला, ''तुम्ही सांगितलेल्या सर्व चर्मपत्रिका मी वाचल्या. ती अतिशय दुर्लभ सर्पमुळी मला सापडली. पलीकडच्या कड्याला चिकटून बसलेली, एकटीच लोंबकळणारी ती वनस्पती अखेर मला मिळाली. थाळ्या, तबकं आणि चूर्ण - सगळं अगदी तयार आहे.'' रामचंद्राचं बोलणं तसं फुकटंच गेलं, कारण ऋषिमहाराज आपल्याच विचारांच्या तंद्रीत हरवले होते. त्यांच्या त्या ध्यानमग्न अवस्थेतून ते जागे होण्याची शक्यताच नव्हती. ते आपल्याच विचारात गर्क होऊन, एखाद्या आंधळ्या माणसानं, झाडांच्या बुध्यांचा अंदाज घेऊन, जमिनीकडे नजर करून, इतरांच्या कानांना सहसा ऐकू न येणारे आवाज ऐकण्याचा प्रयत्न करीत चालावे तसे चालू लागले. आपल्या गुरुजींचा विक्षिप्तपणा ज्ञात असल्यामुळे तो तरुण शिष्य तिथे तसाच वाट पाहत थांबला.

अखेरीस ऋषिमहाराज गर्रकन वळले आणि उत्साहानं रामचंद्राचे बाहू हलवीत, कुजबुजत्या स्वरात म्हणाले, ''माझ्या कानी पाण्याचा ध्वनी येतोय. इथे कुठंतरी गुप्त झरा आहे आणि या झऱ्याची माहिती असलेली पवित्र ग्रंथातील पृष्ठं अगदी स्पष्टपणे मला डोळ्यांसमोर दिसताहेत. प्राचीन ग्रंथात वर्णिलेला हाच तो अष्टरिणी झरा. चल पटकन शोध घे त्याचा. अरे, पुन्हा तो ध्वनी थांबला बघ. थेट पुढे जा आणि डावीकडे वळ. तिथे तुला एक खडक दिसेल. तिथेच जवळपास पालापाचोळ्यात बुडून गेलेली वनदेवाची स्वयंभू अनघड मूर्ती असेल. या काठीनं थोडं चाचपून पाहा म्हणजे मिळेल. त्या मूर्तीच्या जवळच 'आरोग्य आणि जीवन' देणारा औषधी पाण्याचा झरा आहे हे नक्की. तो आत उकळत असेल. त्याचं मुख मोकळं करताना नीट काळजी घे आणि काही पाणी बाहेर जाऊ दे. चल, पटकन शोधून काढ. माझ्या मित्राला, नारायणाला आपल्या साहाय्याची फार निकड आहे, असं माझं अंतर्मन मला सांगतंय.''

''होय, ते अगदी निश्चेष्टावस्थेत आहेत, हे तुम्हाला सांगण्यासाठीच मी आलो होतो.''

''असं होय. बरं चल, औषधी पाणी चटकन घेऊन ये आणि आपण लगेच निघू.''

रामचंद्रनं गुरुजींनी सांगितल्याबरहुकूम सर्व काही केलं. त्याला उकळत्या पाण्याचा झरा सापडला. मग तो आणि त्याचे गुरुजी त्यांच्या त्या जुन्या पर्णकुटीत गेले. तिथे एका चटईवर नारायणबुवा झोपले होते. झोपडीच्या अवतीभोवती

अरण्याचे ते आर्ष संगीत चालू होते, पण बुवांना त्याची जाणीवही होत नसावी असं वाटत होतं. ऋषिमहाराज त्याच्या जवळ गेले. त्यांनी त्यांची नाडी पाहिली आणि बसतं करून त्या प्रसिद्ध झऱ्याचं थोडं पाणी प्यायला लावलं.

"मित्रा, ज्ञान आणि विद्येचं सामर्थ्य प्राप्त करण्यासाठी तू आजपर्यंत खूप सोसलंस" ऋषिमहाराज म्हणाले, "आणि आता, असा निराश होऊ नकोस. सांग, तुझी काय इच्छा आहे?"

"माझी इच्छा" नारायणबुवा अगदी हळू, कुजबुजत्या स्वरात म्हणाले, "एकच इच्छा आहे. याच पर्णकुटीत शांत मरण यावं एवढी एकच इच्छा आहे माझी. पण माझा जीव लेकीच्या भेटीसाठी आतुर झालाय. एकदा तिला डोळे भरून पाहिलं की शांतपणे डोळे मिटेन."

"पण बाबा" रामचंद्र म्हणाला, "तिला इथे घेऊन येणं शक्य नाही व्हायचं. मी तुम्हांला तुमच्या अंजनीघरातील पूर्वीच्या घरी घेऊन जातो. तुम्ही मुळीच काळजी करू नका. आता तुम्ही ते औषधी पाणी प्यायलेलं आहे त्यामुळे एवढ्यात मृत्यू नाही यायचा तुम्हांला!"

अशा प्रकारे नारायणबुवा संन्यासी यांना त्यांच्या पूर्वीच्या घरी आणलं गेलं आणि कमलेलाही येण्याविषयी निरोप दिला गेला. कमलाचं लग्न झाल्यापासून तो वृद्ध संन्यासी अगदी एकाकी आयुष्य कंठत होता. खरं म्हणजे, तो अधिक करून अमूर्त तात्त्विक विचार करण्यात गढलेला असे. अनेक गोष्टींच्या बाबतीत त्याच्या मनात शंका-कुशंका निर्माण झाल्या होत्या. ज्ञानेंद्रियांना जाणवणाऱ्या सगळ्या संवेदना खोट्या, भ्रामक आहेत असं त्याला वाटत होतं. सारं वस्तुजात सतत परिवर्तित होत असतं आणि तरीही काहीतरी शाश्वत आणि अपरिवर्तनीय उरतं - तोच ईश्वर. पण मग संवेदनांना जाणवणारं चराचर विश्व – ते काय आहे? का ती ईश्वराचीच एक खूण आहे? तसं असेल, तर परिवर्तनाच्या स्वाभाविक अवस्थेचा तो हिस्सा कसा? की चराचर विश्व ईश्वराचाचा एक अंश आहे? ईश्वर जर सर्वत्र, साऱ्या चराचरांत भरलेला असेल तर, अनेकविध उपचार, विधी आणि प्रतिमांची पूजा याविषयी चर्चा करणाऱ्या शास्त्रांचा उपयोग तरी काय होतो; कारण मनुष्यदेहातही त्याचे अस्तित्व खात्रीनं असणारच. त्याचा निर्मिकही तोच! अशा प्रकारचे विचार त्या संन्याशाच्या मनात सतत घोळत असत. केवळ एकांतात विजनवासातच आपल्याला असे विचार करणे शक्य झाले, असे त्याला वाटत असे. तिथे त्याला आत्म्याची हाक ऐकू आली. परमानंदाचा अनुभव आला आणि परमेश्वराशी थेट संवाद करता आला. परमेश्वराशी एकरूप होणं, त्या शक्तीत विलीन होऊन जाणं ही त्याची अंतिम इच्छा होती आणि त्यासाठी सर्व विषयवासनांचा त्याग करणं त्याला आवश्यक वाटतं होतं. आपल्या ऋषीमित्राचा, अरण्याचा सहवास त्याला अतिशय प्रिय वाटे आणि जेव्हा केव्हा वैचारिक संभ्रम निर्माण होई तेव्हा तो त्या वृद्ध ऋषीकडे विचारविमर्शासाठी

जात असे. कधीकधी नारायणबुवा आपला एकांतवास सोडून बाहेर येत आणि मोठ्या उत्साहानं भोवतालच्या लोकांना शास्त्रांचं खरं मर्म समजावून देत. त्यांची वाणी अतिशय प्रभावी, प्रगल्भ होती. ते अनेक व्यावहारिक दाखले देऊन आपलं म्हणणं असं काही पटवून देत, की त्यांच्या जगाविषयीच्या आणि मानवी व्यवहाराबद्दलच्या अगाध ज्ञानाचं लोकांना मोठं नवल वाटे.

"हा तुमचा सनातन धर्म" ते म्हणत, "तुमच्या प्राचीन ऋषी-मुनींचा धर्म, तो सोडू नका, अन्य कोणत्याही कारणासाठी तो बदलू नका, तुम्ही कोणतेही नाव घेऊन पूजा केली तरी देव तो देव. तुम्ही त्याची वेगवेगळी रूपं, वैशिष्ट्यं कल्पिता आणि त्यांची प्रतीकं म्हणून मंदिरं उभी करून त्यांची उपासना करता, हे ठीक आहे. पण हेही लक्षात घ्यायला हवं, की तो टेकड्यांत नाही की हिरव्यागार वृक्षराजीत नाही आणि तरीही तो तिथे आहे, सर्वत्र आहे! तुम्हांला त्याचा आवाज ऐकू येतो पण तुम्ही त्याला पाहू शकत नाही. तुम्ही जे जे पाहता, अनुभवता त्या सगळ्यात तो असतो. कधी तो दयाळू रोहिणी असतो, कधी रक्षणकर्ती भगवती तर कधी तो सर्वांचा तारणहार, पालनकर्ता देव असतो. दुष्टांचा तो कर्दनकाळ आहे. म्हणून त्यागाचा मार्ग पत्करून आपल्या ऐंद्रिय जाणिवांना आपल्या ताब्यात ठेवलं पाहिजे. अशा प्रकारे, उच्चतर जाणीव निर्माण झाली, तर ईश्वराशी एकरूप होण्याचं, सायुज्याचं भाग्य लाभते. सुखाच्या मागे लागू नका, कारण सुख हा केवळ आभास आहे. ते भ्रामक आहे. उदात्त, परोपकारी वृत्तीनं वागून आपल्या मुक्तीचा मार्ग स्वत:च तयार करा." अशा प्रकारचा उपदेश नारायणबुवा करीत. कधी मंदिराच्या पायरीवर, कधी नदीच्या घाटावर, तर कधी शास्त्री-पंडितांच्या मेळाव्यात ते बोलत, युक्तिवाद करीत आणि आपलं म्हणणं पटवून देत, सर्वजण त्यांना मान देत, पंचक्रोशीत त्यांची विद्वान म्हणून ख्याती होती.

एकांतवास आणि ध्यानधारणा, जपतपाबद्दलच्या भारतीयांच्या मनातील आत्यंतिक प्रेमाचं परदेशवासियांना मोठं कोडं वाटतं; कारण ते विसरतात की सूक्ष्मतम जाणीव, संवेदनशीलता हे भारतीयांचं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य आहे. अन्य धर्मीयांना फारशी जाणीव नसलेल्या किंवा कल्पना नसलेल्या एक प्रकारच्या आध्यात्मिक आनंदाची ओढ हिंदू लोकांना असते. जीवनाबद्दलची अनासक्ती आणि विषाद यांनीही हिंदू धर्मीयांचं चित्त व्यग्र असतं. ध्यानधारणेत, जप-तपात उत्कट आनंदाची प्राप्ती होत असल्यामुळे त्यांना ते प्रिय असते. समाधी अवस्थेतून प्राप्त होणाऱ्या नव्या ज्ञानामुळे, प्रेरणामुळे त्यांची जणू स्वत:शीच खरी ओळख होते आणि या जाग्या झालेल्या आत्मशक्तीला संतुष्ट करण्यासाठी ते कोणत्याही गोष्टीचा त्याग करण्यास सिद्ध होतात. आपल्या उपासनेच्या, ईश्वराच्या आराधनेच्या आड येणाऱ्या जगातील आणि आयुष्यातील लहान-मोठ्या विवंचना ते बाजूला सारतात. शिव व सुंदराच्या अनुभूतीमुळे जिथे आत्मिक आनंद लाभेल, आपल्या अंतरात्म्याची हाक ऐकू येऊ

शकेल अशा ठिकाणी, विजनवासात वास्तव्य करतात. ऐंद्रिय, भौतिक आनंदात मग्न असलेल्या लोकांना अज्ञात असलेला आनंद त्यांना प्राप्त होत असतो, त्यामुळे त्यांना एकांतवास कधीच नीरस, कंटाळवाणा वाटत नाही. त्यांच्या गरजा फारच कमी, थोड्या असतात आणि त्या सहजासहजी पुऱ्या होणाऱ्या, साध्यासुध्या असतात. निसर्गात जे जे सुंदर आहे, त्याविषयी त्यांना अतिशय प्रेम वाटतं. थंड वाऱ्याची झुळूक त्यांना उत्कट आनंद देते. टेकडीवर जमलेले विविध रंगांचे आणि आकारांचे ढग, आनंदानं डोलणारी फुलं, दुधासारखे शुभ्र धबधबे, किलबिल करणारे पक्षी, चिमुकली पाखरं हे सारं आपले सोयरे, सांगाती आहेत, असे त्यांना वाटतं. डोंगरातल्या शेळ्या-मेंढ्या, गायी-गुरं आणि त्यांची पाडसं, त्यांच्याभोवती ओरडत फिरणारे कावळे त्यांच्याशी मैत्रीपूर्ण वागतात. एवढंच नव्हे तर, मनुष्य जगतातील मित्रांप्रमाणे सतावतही नाहीत. आपल्या मर्जीप्रमाणे ते त्यांच्यापासून दूर राहतात, आपलं वास्तव्याचं ठिकाण बदलतात किंवा धार्मिक स्थळी जातात, यात्रा करतात आणि मनाला वाटेल तेव्हा पुन्हा आपल्या एकांतवासात परत येतात. अशा प्रकारच्या आयुष्याची लज्जत इतरांना माहीतच नाही.

✿

## १३.

नारायणबुवांना अंजनीघरला आणल्या आणल्या रामचंद्रानं कमलेच्या नवऱ्याजवळ निरोप दिला आणि तो तातडीनं परत आला. कमला जेव्हा झोपडीत आली तेव्हा बुवांची रात्रभर शुश्रूषा करीत रामचंद्र तेथेच थांबला होता. पण कमलाचं त्याच्याकडे लक्ष गेलं नाही. ती आल्यावर लगेचच तो तिथून बाहेर पडला आणि जवळच्या मंदिरात त्यानं आपली पथारी टाकली. पण तो अंजनीघरमध्ये फार दिवस राहू शकला नाही. एक दिवशी नारायणबुवांना आणि त्याला असं दोघांनाही सिंहगडला बोलावल्याचा निरोप आला. त्यासरशी 'माझी काळजी करू नको आणि तू तिकडे जा' असं नारायणबुवांनी रामचंद्रला सांगितलं. सिंहगडला रामचंद्रची आई अत्यवस्थ होती आणि तिच्या भेटीसाठी त्या तरुण माणसाला अनेक अवघड घाट पार करावे लागणार होते. त्यातील एक तर अधिकच बिकट होता.

अत्यंत खड्या अशा टेकडीच्या उतरत्या बाजूला असलेल्या दरीतून तो चालला होता. रस्ता दुर्गम आणि प्रवास खडतर दिसत होता. त्यानं खाली पाहिलं तर, झाडांच्या फांद्या परस्परांत गुंतून उंच जाऊन पुन्हा एकमेकींना भिडल्या होत्या आणि त्यांच्या आजूबाजूला अजस्र सुळे अगदी ताठ उभे होते. कित्येक ठिकाणी पाण्याचे धबधबे कोसळत होते, त्यांचा आवाज अवघ्या दरीत घुमत होता. रामचंद्र एका घोड्यावर बसून अगदी सावकाश चालला होता. तो दमदार घोडा दगडधोंड्यातून काळजीपूर्वक आपल्या मालकाला वाहून नेत होता. माध्यान्हीचं ऊन रणरणत होतं आणि अचानक कशी कोण जाणे पण एक भयानक कल्पना त्याच्या मनात घर करून बसली. त्याला वाटलं, की शेजारच्या गर्द झाडीत कालिमातेची लालभडक, अक्राळविक्राळ मूर्ती आहे आणि आपल्या धगधगत्या अंगारासारख्या डोळ्यांनी ती आपल्याकडे रोखून पाहाते आहे, तिची नजर आपला पाठलाग करते आहे. पण तेवढा तो टापू ओलांडल्यावर त्याच्या मनातील ही भीती नाहीशी झाली. रस्त्यात एके ठिकाणी घोडा पाणी पिण्यासाठी थांबला. रामचंद्र आता अगदी खोल दरीत

पोहोचला होता. त्यानं अवतीभोवती पाहिलं. अगदी रम्य देखावा होता तो. सगळीकडे नेचऱ्याचे प्रचंड मोठे वृक्ष, रानकेळीची झाडं दिसत होती. त्याच्या मधूनमधून खळाळत जाणारे ओढे होते आणि काही झाडांना पानं कमी पण मोहोर जास्त होता. त्या पिवळ्या मोहोराचा प्रकाश सर्वत्र फाकला होता. 'जिथे नेहमी दरोडे आणि खून होत असतात तो सदाशिव ढोल आणि हे रम्य स्थळ हे दोन्ही एकच आहे, असं कोणाला खरं तरी वाटेल काय? पाषाणांना बोलता येत नाही, ते कथा सांगत नाहीत.' असा विचार करीत रामचंद्र इकडेतिकडे नजर टाकू लागला. त्याच्या एका बाजूला तो प्रचंड नगाधिप उभा होता. त्याचा एक कडा सुळक्यासारखा उंच गेलेला दिसत होता. 'किती रमणीय स्थान आहे हे! इथे बसून सुरेख स्वप्नं रंगवावी. खरंच हे सारंच स्वप्नवत घडतं आहे. इतर भक्तांप्रमाणे मला कधी निर्विकल्प होता आलं नाही. उलट टेकडीवरील सुंदर प्रकाश, पक्षी, वाऱ्याच्या शीतल लहरी यांनी माझं लक्ष विचलित केलं आणि जेव्हा पिसासारखे हलके, मृदू-मुलायम ढग खाली उतरून आले, तेव्हा त्यांची ती शुभ्र माया आपल्या दोन्ही बाहूंत कवटाळून घेत मी थेट पर्वताच्या माथ्यावर पोहोचलो, दरीतलं ते विलोभनीय दृश्य पाहण्यासाठी! मेघांच्या गर्जनेनं आणि विजेच्या लखलखाटानं मला नृत्याची प्रेरणा दिली. मी आनंदविभोर होऊन नृत्य केलं आणि त्या बेभान अवस्थेत ईश्वराला आवाहन केलं. आपलं सर्वस्व ओतून त्याची स्तुतिस्तोत्रं गाऊ लागलो,' अशा प्रकारच्या विचारमालिकेत गुंगून जात रामचंद्रानं ती अरुंद खिंड ओलांडली आणि एका रुंद, प्रशस्त आणि प्रसन्न खोऱ्यात प्रवेश केला. पर्वताचा खडकाळ मार्ग मागे पडल्यावर घोडाही आनंदानं फुरफुरला. अगदी नेमक्या त्याच वेळी, पाठीमागच्या टेकड्यांमधून घोड्यावर बसलेली एक व्यक्ती पुढे आली आणि थेट त्याच्याजवळ येऊन थांबली. तो घाबरून पळ काढण्याच्या बेतात होता; पण ती व्यक्ती स्त्री आहे हे लक्षात आल्यावर त्याला आपल्या भित्रेपणाचं हसू आलं. एका लहानखुऱ्या तट्ट्यावर ती स्वार झालेली होती. लहान चणीची, शिडशिडीत बांध्याची ती तरुणी दिसायला अत्यंत मोहक होती. तिचे काळेभोर डोळे चमकले आणि तिनं आपला गोल चेहरा मोठ्या आतुरतेनं त्या प्रवाशाकडे वळविला. आपल्या तट्टाला खडकांवरून आणि खडबडीत रस्त्यावरून वळविताना होणाऱ्या तिच्या हालचाली मोठ्या सफाईदार आणि रुबाबदार होत्या. तशी ती गोरीपान म्हणावी अशी नव्हती पण मोठ्या काठांच्या जांभळ्या साडीत ती गव्हाळ कांतीची स्त्री अत्यंत दिलखेच दिसत होती.

"आपण त्यातून अगदी सुखरूप पार पडलो, हो ना?" रामचंद्राकडे जात ती म्हणाली. त्यानं तिच्याकडे केवळ नजर टाकली. बोलला मात्र काही नाही. "माझे नोकरचाकर मागे राहिलेत. मी इतक्या वेगात जाईन अशी त्यांना कल्पनाच नसेल. आता येतील धापा टाकत." ती म्हणाली. "फार दूर जायचंय का तुम्हांला?"

"ती वस्ती ओलांडली की झालं, अजून सूर्य डोक्यावर आहे, तेव्हा मला

भ्यायचं काही कारण नाही. शिवाय तुम्ही आहात वाट दाखवायला. आणखी एका अगदी किर्रर अंधाऱ्या पांदीतून आपल्याला जावं लागेल मला वाटतं, मी तुम्हांला शिवगंगामध्ये पाहिलंय. पण तुम्ही तुमचा वेष असा बेमालूम बदललाय की कुणाला ओळखणं शक्य नाही.''

''तुम्हांला कसं कळलं ते?'' तिच्याकडे शोधकपणे पाहत रामचंद्रनं विचारलं.

''सईला माहीत नाही, असं काहीच नसतं.''

''अच्छा, म्हणजे तू सई आहेस तर?''

''हो, मग मी कोण असेन असं वाटलं होतं तुम्हांला?'' मोठ्यानं हसत ती म्हणाली. ''माझ्यापासून काहीच गुप्त राहू शकत नाही. तुम्हाला कल्पनासुद्धा करता येणार नाही इतकी सारी तुमची माहिती माझ्याकडे आहे आणि आता तुम्ही माझ्या कब्जात आहात. पण तुम्हांला भ्यायचं काहीच कारण नाही. सईला आवडणाऱ्या माणसांना ती कसलीच इजा करीत नाही.''

''हंऽऽ आणि मी त्या खिंडीतून येत असताना माझ्यावर नजर ठेवून होते, ते तुझे भिल्ल का?''

''शूऽऽ, कोणाला सांगू नको बरं. आपल्या मित्रांशी मनमोकळं वागायला मला आवडतं.''

''आणि आता मी कोण आहे तेही सांगू टाक.''

''तुम्ही रामचंद्रराव. त्या नारायणबुवा संन्याशाचे भाचे.'' त्याच्या चेहऱ्याकडे नीट निरखून पाहत ती म्हणाली. तिचं वाक्य ऐकून तो किंचित दचकला हे पाहून ती हसली आणि म्हणाली, ''हं, तुम्हांला वाटलं होतं ना, की हे तुम्ही गुप्त ठेवू शकाल म्हणून आणि कमलाबाई, ती सुंदर, देखणी मुलगी, कोणे एकेकाळी तिचं तुमच्याशी लग्न ठरलं होतं, हो ना?'' हे शब्द ऐकताच रामचंद्रचा नूरच पालटला. त्यानं आपला भिडस्तपणा सोडला आणि तिच्याकडे वळून अगदी खेळकर स्वरात तो म्हणाला, ''तुझं किती बरोबर, किती चूक हे काही मी सांगणार नाही. पण आपण परस्परांची गुपितं राखू शकतो, जपू शकतो, हो ना?''

''ठीक आहे'' ती हसत म्हणाली. हा आपला पहिला करार म्हणू या. आणि आता तुम्ही आमच्या गावी यायला हवं. तिथे एक चांगली धर्मशाळा आहे, तिथे तुमची व्यवस्था छान होईल आणि तुमच्या माणसांना काय हवं नको तेही मी पाहीन.'' कमलाचा विषय काढून, आपण पहिली फेरी जिंकली आहे, हे तिला लगेचच समजलं. आणखी थोडं पुढे रेटलं पाहिजे असं तिचं स्त्री सुलभ मन, तिला सांगत होतं. एक खडा टाकून पाहावा म्हणून तिनं विचारलं, ''तुम्ही दूधस्थळाला आला होता का एवढ्यात?''

''असेन किंवा नसेनही'' रामचंद्रानं उत्तराची उडवाउडवी केली आणि ती आपल्या मनाचा कल जोखतेय हे जाणून तो तिच्या डोळ्यास डोळे भिडवून हसू लागला.

"आणि अजूनही तुम्ही त्या मुलीतच गुंतलेले आहात. त्या म्हाताऱ्यानं घाईघाईनं तिचं लग्न उरकून टाकलं, ही गोष्ट तुमच्या मनाला अजून डिवचतेयं" त्याच्या चेहऱ्यावर आणि आविर्भावात होत असलेले सूक्ष्म बदल पाहून, आपला अंदाज खरा ठरत असल्याच्या आनंदात काहीशा तिरकसपणे ती उद्गारली.

आपलं हे बोलणं ऐकून तो संतापेल असा तिचा कयास होता पण उलट तो हसला "कशी बाई आहेस तू" असं म्हणून तो ज्या मनमोकळेपणे हसला; ते पाहून तिचे जुने कयास काहीसे बदलले. "एकदा लग्न झालं की, ती स्त्री दुसऱ्याची होऊ शकत नाही, हे तुला माहीत आहे ना? ती सुखी व्हावी असं मला वाटतं. काही वाट्टेल ते झालं, अगदी इकडचं जग तिकडं झालं तरी तिच्या सुखावर कुणाची सावली पडू नये असं मला वाटतं. एखाद्याच्या पत्नीबद्दल तुझं असं बेछूट बोलणं मला आवडलं नाही. शिवाय आमच्या नात्याबद्दल तिला तर काहीच माहीत नाही."

"आणि तरी ती तुमच्याबरोबर फिरते" मोठ्यांदा हसत सई म्हणाली. पूर्वीच्या विधानाच्या पायावर आणखी एक अंदाज बांधत सईनं आपल्या मनातील शंका बोलून दाखवली. जेव्हा तिनं रामचंद्रला किंवा त्याच्यासारख्या कुणालातरी दूधस्थळमध्ये कमलेबरोबर गर्दीतून वाट काढताना दुरून पाहिलं होतं तेव्हा तिला मोठं नवल वाटलं होतं. तेव्हाचं आपलं निरीक्षण कितपत बरोबर होतं याचा अंदाज घेत ती त्याच्या चेहऱ्याकडे बारकाईनं पाहत होती. तिच्या बोलण्याने रामचंद्र चांगलाच हबकला आणि तिचं हसू ऐकून आपल्या कानात घण पडताहेत असं त्याला वाटलं. खाडकन जोराची थप्पड बसावी तसं त्याला झालं. त्याचे ओठ आवळले गेले. सलगीनं वागून मनमोकळे बोलून आपण तिला असं बोलण्याची मुभा दिली, हे चुकलंच, असं त्याला वाटलं. अगदी शून्यवत नजरेनं एक क्षणभर त्यानं तिच्याकडं पाहिलं आणि मग शांतपणे म्हणाला, "आता तुला सगळ्या गोष्टी समजल्यात. आमच्या नात्याबद्दल कळलंय. पण हे सगळं स्वत:जवळच ठेव. त्याची वाच्यता करू नको. कमलेला यातील काहीच माहीत नाही. ती या सगळ्याबद्दल अनभिज्ञ आहे आणि तिच्या वडिलांच्या पश्चात मीच काय तो तिचा पालक उरलो आहे." सईच्या जिभेचा लगाम किती सैल सुटेल कोणास ठाऊक अशा विचारानं रामचंद्र पुरता घाबरून गेला. दूधस्थळातील ती घटना अशा प्रकारे गंभीर रूप धारण करेल असं त्याला त्यावेळी मुळीच वाटलं नव्हतं.

"हंऽऽ असं आहे का?" स्वरात बेफिकीरपणा आणीत सईनं विचारलं. तिनं त्याच्यात झालेला बदल टिपला होता आणि स्वत:शीच म्हणाली होती, 'आपण आता किती सांगितलं, तरी हा आपल्या गावात वस्ती करणार नाही हे नक्की. पण आता कमला माझ्या हातात आहे. काय करायचं ते मला पक्कं कळलंय. माझा रस्ता मला अगदी स्वच्छ दिसतोय.' मग थोडावेळ थांबून ती रामचंद्रला म्हणाली, "चला रावसाहेब असे नाराज होऊ नका. आमच्या गावात आज मुक्काम करा. त्या

मुलीबद्दल असं तसं काही बोलायचं माझ्या मनात नव्हतं. नुकतंच कुठूनतरी मला तिच्या गोतावळ्याबद्दल कळलं आणि एकदम आठवलं, की दूधस्थळमध्ये आपण जिला पाहिलं ती हीच म्हणून. तिथे काही मोठे संगीतकार यायचे होते आणि ते तीन राग आळविणार होते तेव्हा त्याबाबतीत काही नवं शिकायला मिळेल म्हणून मी तिथे गेले होते. आम्ही कलावंत आपल्या कलेच्या आधारावरच जगत असतो. त्यामुळे जेव्हा जमेल तेव्हा या बाबतीत मी स्वत:त सुधारणा करण्यासाठी धडपडत असते.''

सईचं हे नम्र बोलणं ऐकून रामचंद्र पूर्वीपेक्षाही अधिक कोड्यात पडला आणि आपण तिच्या कब्जात आहोत, तेव्हा तिला तक्रारीला जागा न ठेवता तिच्या गावात मुक्काम करावा असं त्यानं ठरवलं.

कमलेचे तिच्या वडिलांकडे जाणं हा शिवगंगामधील तिच्या मैत्रिणींत आणि इतर बायकांत मोठाच चर्चेचा आणि गप्पांचा विषय ठरला. भागीरथीच्या घरातील मधल्या चौकाला लागून असलेल्या एका खोलीत चार-पाच स्त्रिया बसल्या होत्या. त्यांच्यासमोर पानाचं तबक होतं. तबकात जास्वंदीच्या फुलांचे हारही होते. दुसऱ्या एक तबकात चंदनाची उटी होती आणि चांदीच्या वाटीत सुगंधी तेल होतं. त्या सगळ्याजणी चटईवर बसून मधूनमधून सुपारी तोंडात टाकीत होत्या. जवळच डोक्यावर पदर घेतलेल्या विकेशा विधवा उभ्या होत्या. त्यातल्या काही भिंतीला टेकून उभ्या होत्या, तर काहीजणी अर्धवट उघडलेल्या दाराच्या आडोशाला उभ्या होत्या. त्या फारसं बोलत नव्हत्या पण, सौम्य स्मित करीत होत्या आणि अधूनमधून मार्मिक शेरेबाजीही करीत होत्या. त्या सगळ्यांपासून थोडे दूर, लोडाला टेकून बसलेल्या एका वृद्ध विधवेला मात्र सगळ्याजणी मान देत होत्या.

''काय नवल आहे बाई,'' एक सवाष्णबाई म्हणाली, ''अलीकडे शास्त्रींच्या घराचा दरवाजा बंदच असतो आणि कुणी आत-बाहेर ये-जा करतानाही दिसत नाही.''

''कदाचित ते सगळेजण कुठे परगावी गेले असावेत'' मोठंच्या मोठं सुपारीचं खांड चघळीत एक सुरेख दिसणारी, स्थूल, शरीराची बाई म्हणाली, ''मला ती रमाबाई मुळीच आवडत नाही.'' ती म्हणाली, ''ती आधी गंगीच्या रामपुरातल्या नव्या घरी गेली आणि मग आपल्या स्वत:च्या सासरी!''

''हो बाई, मलासुद्धा ती मुळीच आवडत नाही.'' जरीकाठाची साडी नेसलेली सावळ्या रंगाची बाई, आपल्या घणसर सोन्याच्या बांगड्या खाली-वर करीत आणि जरीचा पदर खांद्यावर सावरीत म्हणाली, ''तोरा दाखवते मोठा श्रीमंत असल्याचा पण मला पक्कं माहीत आहे, मोजून दोन भारी साड्या आहेत तिला आणि त्या गरीब बिचाऱ्या, सालस कमलेला ती जे छळते ना, ते तर अगदीच लाज आणणारं आहे. घरातली गडीमाणसं सांगतात ना; की ते लोक तिला पोटभर जेवायलाही वाढत

नाहीत, तरी तिची मात्र काही तक्रार नसते म्हणा."

"गरीब बिचारी कमला" एक विधवा सावकाशपणे बोलू लागली. "मागे एकदा, नदीच्या काठी मी कमलेला विचारलं होतं पण तिनं टाळलंच उत्तर, द्यायचं. म्हणाली की, ती सगळी प्रेमळ माणसं आहेत. पण तिला मारहाण केली जाते, हे मला तिच्या डोळ्यांकडे पाहिल्यावर लगेच कळलं. विचारलं तर ती सांगणार नाही. म्हणेल, चूक तिचीच होती. तिला काम नीट करता आलं नाहीऽ"

"काम येत नाहीऽऽ?" लोडाला टकून बसलेली भागीरथीची सासू म्हणाली. मी तर ऐकलंय की एखाद्या बैलासारखी राब राब राबत असते ती. मला तर वाटतं की माझ्या पदरात जळतं कोलीत पडलंय ना, त्या ऐवजी मला अशी सून मिळायला हवी होती."

"काय गं, गणेशपंताबद्दल काही कानावर आलं का?" एक सवाष्ण बाई ठसक्यात म्हणाली, "त्या सईच्याच घरी असतो म्हणे तो जास्त वेळ."

"अगदी लाज सोडलीन बाईऽ" जमलेल्या सगळ्यांना विडे आणि फुलं देता देता रखमाची सासू म्हणाली. "माझ्या तर असं कानावर आलंय की हे सगळं ते लोकच घडवून आणतायत. त्या बाईला समारंभाला म्हणून बोलवायचं, त्या दोघांची भेट घडवून आणायची हे सगळं त्यांचंच करणं. अहो, लोकांना काय डोळे, कान नाहीत की काय? बिचारी कमला. आता नाहीये इथे आणि एक परीनं तिलासुद्धा ते बरंच आहे म्हणायचं. आता इथून पुढे सासरी तिला जास्तच मान मोडून काम करावं लागणार आणि खाल मानेनं वागावं लागणार. तिच्या नवऱ्याचं चित्त दुसरीकडं वळलंय म्हटल्यावर तो तिला आपल्या बरोबर दुसऱ्या गावी नेईल असं काही मला चिन्ह दिसत नाही."

"नाही. त्यांचं असं ठरलंय की मूल होईपर्यंत तिनं इथेच, सासरी राहायचं! अर्थात ती अजून लहान आहे, अननुभवी आहे. तेव्हा तिने नवऱ्याबरोबर जायला अजून काही दिवस जायला हवेत असंही म्हणतील ते. सईची ओढ आणि गणेशपंतांसाठी दुसऱ्या स्थळांचा त्यांनी विचार करणं हे सगळं पाहता मला तरी असंच वाटतं." निःश्वास टाकीत एक विधवा म्हणाली, "बिच्चारी! मला अगदी दया येते तिची. पाचव्या महिन्याची ओटीही भरली नाही तिची अजून."

"असंच, अगदी असंच ते आमचं सुख पार नासून टाकतात." भागीरथी आत येता येता उसळून म्हणाली. पण जेव्हा तिथे बऱ्याच बायका बसलेल्या दिसल्या तेव्हा आपल्या आगाऊपणाबद्दल वरमून जाऊन ती दरवाजातून पुढे सटकली.

"मला वाटलंच होतं, ती अशीच धाडकन येईल म्हणून." तिची सासू जरा घुश्शात बोलली. "या मुलीला कसं वागावं ते कळत नाही आणि दिवसेंदिवस हे वाढतच चाललंय." भागीरथीनं हातातले धुतलेल्या कपड्यांचे पिळे मधल्या मोकळ्या चौकात फेकले आणि कट्ट्यावरची घागर उचलून ती धपधप आवाज करीत तिथून

निघून गेली. कितीतरी वेळ तिच्या पायातील पैंजणांचा आवाज मागे रेंगाळत राहिला.

"आता जाते, असं म्हणून रुक्माची सासू जायला उठली आणि नेमकी त्याच वेळी कमलाची सासू आत आली. सगळ्यांनी तिचं अगदी स्वागत केलं. भागीरथीच्या सासूनं उठून तिला हातानं धरून आपल्या अगदी शेजारी बसवून घेतलं." लक्ष्मीची प्रसन्न नजर वळली म्हणायची या दिशेला, "आज सूर्य इकडं कुठं उगवला बाई? दैवानंच धाडलं म्हणायचं तुला?" अशी एकेक वाक्यं टाकून सगळ्या बायकांनी आपलं आश्चर्य व्यक्त केलं. मग त्यांनी तिला कमलेबद्दल विचारलं. "ती तिच्या वडिलांकडे गेलीय." ती म्हातारी बाई धारदार आवाजात म्हणाली, "आणि तिला आणायचं की नाही आणायचं ते ठरवायचं आम्ही तिच्या नवऱ्यावरंच सोपवलंय. माझ्याबद्दल विचाराल तर त्या मुलीचा मला अगदी वैताग आलाय. विचका होतो सगळ्याचा ती इथे असली की! काय ती तिची शिकण्याची थेरं आणि त्यात तिच्या नवऱ्याचा मूर्खपणा! तिनं मुळी परत येऊच नये, असं वाटतं मला. जबाबदारीच की हो एक. नाही म्हटलं तरी! आणि चारचौघींसारखी नाही ती. एक तर तिला कुठलंच काम धडपणे जमत नाही. इतर मुलींसारखं नाही. अगदी शांतपणे चूक मान्य करते आणि पुन्हा नीट करेन म्हणते. आता, तुम्हाला माहीत आहे ना, की मुलींना चार गोष्टी पुनः पुन्हा सुनवाव्या लागतात, थोडं रागवावंही लागतंच की."

"हो बाई" ती लठ्ठ बाई तोंड भरून हसत म्हणाली, "माझ्या बरोबर ध्यानात आलंय तुला काय म्हणायचंय ते 'वड्याचं तेल वांग्यावर' आणि त्या बिचाऱ्या मुलीला यातलं काहीच माहीत नाही. हा: हा: हा:, म्हणजे आता गणेशपंत आणायला जाईपर्यंत ती वडलांच्या घरीच राहाणार म्हणायची."

"आणि मला वाटतं, तोही आणायला जायची फारशी घाई करायचा नाही." भागीरथीची सासू म्हणाली.

"आज सकाळी भीमानं विहिरीत उडी टाकल्याचं कळलं का तुम्हांला?" विषय बदलत कमलाची सासू म्हणाली. "केवढा गहजब झाला! मी तिथूनच येतेय आता. तिला पुन्हा मारहाण नको म्हणून रुक्मानं आपल्या घरी नेलंय तिला."

"काय बाई तरी वेडेपणा या मुलीचा" सगळ्याजणी एकदम उत्स्फूर्तपणे उद्गारल्या.

"ती म्हातारी, म्हणजे भीमाची सासू हो, ती तर फारच संतापलीय." कमलाच्या सासूनं पुढे सांगायला सुरुवात केली, "तिला काहीतरी भीमाचे दागदागिने हवे होते वाटतं... गळ्यातली साखळी आणि हार असं कायसं हवं होतं मला वाटतं, म्हणून तिनं आपल्या मुलाला पढवलं, की गोड बोलून तिच्याकडून मागून घे म्हणून. त्यानंही ऐकलं लगेच. दागिने त्यानं घातलेले नव्हतेच, तरी आईचं ऐकून गेला मागायला. भीमानं देणार नाही म्हटल्यावर म्हणे लागला वाटेल तसं बोलायला,

कुणीसं सांगत होतं मला, मोठ्ठं भांडण लागलं म्हणे दोघांत आणि नवरा घरातच होता; तो बाहेर पडायच्या आधीच भीमा अगदी शांतपणे परसात गेली आणि तिनं विहिरीत दिलं झोकून स्वत:ला.''

"अगंबाई, ऐकून धस्स झालं! हादरूनच टाकलंन तर काय?'' तक्क्याला टेकून बसलेली म्हातारी म्हणाली, "त्याची आई भारी कंजूष आहे आणि तेवढीच धूर्त आहे. मी सांगते ना, घरात खर्चाला काही पैसे नाहीत असा कांगावा केला असेल तिनं आणि मग त्या मुलीकडून म्हणजे आपल्या सुनेकडून दागिने घेण्यासाठी मुलाला उसकवलं असेल. नवऱ्यालासुद्धा नंतर फार वाईट वाटलं म्हणे आणि त्यांनी त्या प्रकरणाची फारशी वाच्यताही केली नाही. पण त्या मुलीची पंचाईत झाली. ती कुठं जाणार? तिच्यापुढे दुसरा मार्ग तरी कुठला? त्यामुळे तिनं आपली विहीर जवळ केली असेल झालंऽ''

भारतीय स्त्रियांना दागिन्यांची हौस फार असते म्हणून त्या बिचाऱ्यांना बोल लावणं योग्य नाही. ती बाई, आपल्या नवऱ्यानं घरखर्चासाठी दिलेल्या पैशात काटकसर करते, त्यातलेच चार पैसे वाचविण्यासाठी जिवाचा आटापिटा करते आणि त्यातून मग जिन्नस करते. तिला खात्री असते की, नवरा गेला किंवा घरावर काही संकट कोसळलं तरी हे आपले दागिने काही कुणी काढून घेणार नाही. बाकी घरादाराचं काही का होईना, दागिने तिचे असतात. कोणत्याही मोठ्या संकटाच्या वेळी, आपल्याकडे दागिने आहेत, याचा तिला आधार वाटतो. सोनं-नाणं असलं की, पुढे कधीतरी आपल्याला मनाप्रमाणे वागता येईल अशी आशाही तिला वाटत असते. त्यामुळे आपल्या दागिन्यातला एखादा जरी गमवावा लागला तरी तिला फार दु:ख होतं. आयुष्य म्हणजे केवळ गुलामासारखी राबणूक असल्यामुळे जिवापेक्षाही तिला दागिने प्रिय असतात. असे विचार हिंदू स्त्रियांमध्येच केवळ आढळतात. पिढ्यान्‌पिढ्या त्यांच्या वाट्याला आलेल्या असुरक्षिततेमुळे आणि जाचामुळे त्यांच्या मनाचा असा कल तयार झाला आहे.

✿

# १४.

"दादा, अहो ऽऽ दादा! रात्रीची थंडी अशी सुरेख पडलीय, चंद्रही डोक्यावर आलाय आणि ते पाहा ना, झाडांच्या सावल्या हलताना दिसतायंत का तुम्हांला? ते उंच कडे, त्यावरचे खडक आणि त्या सगळ्यावर पसरलेलं चांदणंऽऽ? खरंच, सगळं वातावरणच रूपेरी आणि झगमगीत दिसतंय!"

पडवीत पाय पसरून आराम करणाऱ्या आपल्या आजारी वडिलांबरोबर कमला बोलत बसली होती. तसं त्यांना आता बरं वाटत होतं. पण अंगात अशक्तपणा होता. कमलाची सासू शिवगंगाला परत गेली होती आणि म्हातारी आजी स्वयंपाकघरात पेज करीत होती. वडिलांजवळ कमला एकटीच होती. तिचं हृदय भरून आलं होतं. सारं कसं पूर्वीसारखंच होतं. पूर्वपरिचित झऱ्याची झुळझुळ, झाडांच्या हलणाऱ्या फांद्या, वाऱ्याची खसफस - सळसळ हे सगळे आवाज तिला तिच्या अनमोल भूतकाळाची आठवण करून देत होते. दादांच्या खांद्यावर डोकं टेकताच, आपण पुन्हा एकदा बालपणात गेलो आहोत असे कमलेला वाटलं. खरंच दादा! तुम्हांला सोडून गेले तेव्हा बाहेरच्या जगाबद्दल फारसं काहीच ठाऊक नव्हतं मला. खूप गोष्टी नव्यानं शिकाव्या लागल्या मला. पण दादा शहरातल्या इतर लोकांपेक्षा तुम्ही इतके वेगळे का आहात? मला ज्यांची माहिती असायलाच हवी होती अशा गोष्टींपैकी अर्ध्याअधिक गोष्टींची तुम्ही मला कल्पनाही दिली नाहीत. मला ते बालपणच आवडतं, फार फार आवडतं. दादा, इथे तुमच्याजवळच ठेवून घ्या ना मला. मी इथेच राहीन. मग लोक काय म्हणतील, त्यांना काय वाटेल याची काही चिंताच राहाणार नाही. खरंच, आपलीच माणसं आपल्याविरुद्ध का वागतात? कुणाचं मन दुखवलं म्हणजे माझ्या अंगावर काटा येतो आणि तरीही, जे जे म्हणून कोणी माझ्याशी कुठल्या ना कुठल्या बाबतीत संबंधात येतील, त्यांचं मन माझ्याकडून दुखवलं जातं. खरंच, एखाद्या व्यक्तीलाही सुखी करणं, त्याची मर्जी संपादन करणं मला जमलेलं नाहीयं. आता, मामंजीचंच बघा ना. मी त्यांची मर्जी राखायचा इतका

प्रयत्न केला पण, काहीतरी आगळीक झाली माझ्याकडून आणि सगळंच पालटलं. आता ते माझी मुळी विचारपूसही करीत नाही. इथे यायच्या आधी मी त्यांच्या पाया पडून म्हटलं, "मला आशीर्वाद द्या बाबा. मी घरी चाललेय." वाटलं होतं आता तरी ते एखादा प्रेमाचा, गोड शब्द बोलतील. पण ते अगदी पाषाणवत झाले होते. त्यांनी अगदी शांतपणे माझ्याकडे बघितलं आणि चेहरा दुसरीकडे वळवीत म्हणाले, "माझ्या पाया कशाला पडतेस? संन्यासी बाबांना माझा नमस्कार सांग." त्यांचा तो चेहरा बघून मी झटकन डोक्यावर पदर ओढून घेतला - वाटलं की आता आपल्याला जोराचा हुंदका येणार. त्यांच्या मनाविरुद्ध काहीतरी माझ्याकडून झालं होतं की काय कोण जाणे; कारण दुःखाची, वेदनेची छटा अगदी स्पष्ट दिसत होती. त्यांच्या तोंडावर! फारच नाखूष दिसले माझ्यावर. दादा, असे ते पूर्वी नव्हते. कित्ती वेगळे होते ते.' असं म्हणून कमलेनं आपल्या वडिलांकडं पाहिलं आणि स्तब्धच झाली. तिच्या वडिलांचं मन दुसरीकडेच कुठंतरी भरकटत होतं. त्यांनी तिचं बोलणं मुळी ऐकलंच नव्हतं. इतक्यात एक ढग आला आणि त्याच्या मागे चंद्र झाकला गेला, तशी तीही कुठल्यातरी विचारात हरवून गेली. अगदी थोडावेळ अशा नीरव शांततेत गेला आणि ती मोठ्या उत्साहानं म्हणाली, "बरं का दादा, तो पाहा तो - तो पाहा चंद्र ढगांतून डोकावून पाहातोय आणि सगळं कसं एकदम अद्‌भुत आणि झगमगीत दिसतं. तुम्हांला ठाऊक आहे का दादा?" क्षणभरानं ती पुढे म्हणाली, "जेव्हा जेव्हा असं सर्वत्र पसरलेलं पिठुर चांदणं मी पाहाते तेव्हा तेव्हा माझं मन कुठल्या कुठं भरकटायला लागतं. असंच काहीतरी आपण पूर्वी कधीतरी पाहिलंय, असं वाटतं, पण काय ते मात्र नीटसं कळत नाही. डोळ्यांपुढे येणारी चित्रे अगदी अंधुक आणि अस्पष्ट असतात. मला वाटतं की आपण खूप दूरपर्यंत सारखा प्रवास करतोय आणि दुखल्याखुपल्यावर फुंकर घालणारा कुणीतरी आपल्याबरोबर आहे, असं वाटत राहातं. ती व्यक्ती तुमच्या सारखी नाही वाटत दादा. तुम्ही नसता तिथे. दुसरंच कुणीतरी असतं. ती आई असेल का? तुम्हांला काय वाटतं, आई असेल का माझी ती? मला तिच्याबद्दल काहीच कसं माहीत नाही? सांगा ना दादा. मला सारखं असं वाटतं की, तिच्याबद्दलच्या माझ्या ज्या कल्पना आहेत, तशी ती नसेल आणि म्हणून तुम्ही मला तिच्याबद्दल काही सांगत नाही आहात. पण मला आता राहवत नाहीय. मला सगळं सविस्तर सांगा. चांगली-वाईट, कशीही असली तरी ती माझी आई आहे. लोक तिच्याबद्दल भलतंसलतं बोलतात, तेव्हा माझ्या मनाला फार लागतं."

त्या म्हाताऱ्या माणसाला कशाचंच भान नव्हतं. तो कुठल्यातरी काल्पनिक जगात जाऊन पोहोचला होता. कमलेनं त्यांच्या डोळ्यांतील ती जुनी परिचित झांक पाहिली आणि ती घाबरून गेली. अखेरीस त्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडले, "तुझी आई, हंऽ तुझी आई, माझे चिमणे, तुझ्या आईबद्दल तुला कसं सांगू मी? तिची

आठवण आली की माझा ऊर फाटून जातो. पण तिची सारी हकीकत मी तुझ्यापासून लपवून ठेवली म्हणून, माझं मन मला खातं आहे. आता तुला सगळं सांगायलाच हवं. माझी तिची भेट पहिल्यांदा कशी झाली माहितीय? एखाद्या लहानशा टेकडीवरची गढी नजरेसमोर आण. आज पडलंय ना, तसंच पिठूर चांदणं पडलं होतं. गढीचे सौध, गवाक्ष आणि इतर सर्व भाग चांदण्यात न्हाऊन निघाले होते. मध्यभागी असलेल्या मंदिरांचे कळस तर नुसते झळाळून निघाले होते. गढीच्या भोवती असलेले पुष्कळ जुनेपुराणे मोठमोठे वृक्ष, त्या फिकट प्रकाशात अगदी शांत उभे असल्यासारखे दिसत होते. असं होतं तुझ्या आईचं घर! अगदी आताच्या सारखीच चांदणी रात्र होती, त्या दिवशी पहिल्यांदा मी पाहिलं ते घर. अगदी मध्यरात्रीच्या वेळी गढीच्या अगदी वरच्या सौधावर कुणीतरी फेऱ्या मारतंय असं मला दिसलं. एका अगदी उंचनिंच स्त्रीची ती डौलदार छबी पाहिल्यावर, ती गढीची रक्षणकर्ती देवी असावी असं मला वाटलं. एक क्षणभरच तिनं आपलं मुख आकाशाकडे वळविलं आणि ती जणू चंद्राचे किरण प्राशन करतेय असं मला वाटलं. मग तिनं खालच्या दिशेनं आपला हात हलविला आणि ती दिसेनाशी झाली. मी हे सगळं अगदी दुरून पाहत होतो. मग मी पळतपळत गढीच्या पायथ्याशी असलेल्या वस्तीत गेलो. गढीतली ती सुंदर मुलगी आणि तिचे जराजर्जर, विकलांग वडील, त्यांनी बांधलेलं देऊळ आणि आपल्याभोवती जमवलेले खुषमस्करे, लबाड, भोंदू लोक यांच्या कितीतरी आख्यायिका, कहाण्या लोकांत पसरल्या होत्या त्या ऐकिवात आल्या. आपली जहागीर आपल्या सर्वांत लहान भावाला देऊन या मुलीच्या संगोपनाची जबाबदारी तिच्या मावशीवर सोपवून तो म्हातारा मोकळा झाला होता. जीवनापासून विरक्त झाला होता. पुढे मला कळलं की, त्या मुलीची मावशी ही आपली सावत्र मावशी आहे. माझ्या आईची सावत्र बहीण! मग मी त्या मावशीकडे जाऊन राहायचं ठरवलं. कुणीच त्या मुलीला पाहिलेलं नव्हतं. तिची राहण्याची जागा अगदी स्वतंत्र होती. एवढंच नव्हे, तर फिरण्याची जागाही स्वतंत्र, खास एकटीची होती. गढीतलं धार्मिक वातावरण, सोवळं-ओवळं याबद्दल मला काहीच कल्पना नव्हती. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मी माझ्या मावशीला – द्रौपदीबाईला – भेटायला गेलो. पायऱ्या चढून वर गेल्यावर कुणीतरी मला 'उजवीकडे जा' म्हणून सांगितलं, तर मी एका लहानशा मंदिरापुढेच थेट जाऊन पोहोचलो. वारा थांबला होता. देवळाभोवती दाट वाढलेल्या झुडपांतील फुलांचा गंध सर्वत्र परिमळत होता. झाडांना कोवळी पालवी फुटली होती आणि मावळत्या सूर्यप्रकाशात त्यांनी जणू सोनेरी मुकुट घातलेत असं वाटत होतं. देवळासमोरील दृश्य पाहून माझं हृदय धडधडू लागलं. धूपदाणीवर ओणवं होऊन तिच्याभोवती टांगलेल्या घंटा अगदी अलगद, सावकाशपणे वाजविणाऱ्या एका वृद्ध तपस्व्याच्या शेजारी एक सुंदर मुलगी उभी होती. मला पाहून ती मुलगी बावरली. तिचा भरजरी पदर खांद्यावरून

ओघळला. आणि शिकाऱ्याच्या तावडीत सापडलेल्या हरिणीसारखी तिची चर्या भेदरलेली दिसू लागली. "माझी मावशी द्रौपदीबाई इथे आहे का?" मी विचारलं.

त्या मुलीनं चटकन आपली नजर जमिनीकडे, खाली वळविली आणि अतिशय नम्र, मंजुळ आवाजात म्हणाली, "द्रौपदीबाई तुमची मावशी आहे? माझीपण आत्या आहे ती."

"तुम्ही कोण?" मी विचारले.

"मी धाकली बाई." आणि लगेच आपली चूक सुधारत ती म्हणाली, "लक्ष्मीबाई."

आपण एका तरुणाशी बोलतो आहोत, हे ध्यानात येताच ती एकदम घाबरली आणि डोक्यावर पदर ओढून घेत आत पळून गेली. ही माझी व तुझ्या आईची पहिली भेट. मला तेव्हा काय वाटलं, ते सांगता नाही यायचं कमला. थोड्याच वेळात द्रौपदीबाई बाहेर आली आणि तिच्याबरोबर ती मुलगीसुद्धा आली. सिंहगडमधील आपल्या मावशीबद्दल ती ऐकून होती आणि तिकडे आपल्या गोतावळ्यात काय काय चाललंय, कोण कोण, कुठे कुठे आहे यासारख्या घरगुती गप्पा ऐकण्यात तिला चांगलाच रस होता. त्या मुलीच्या वडिलांनी लौकिक जीवनातून आपले मन काढून घेतल्यामुळे साहजिकच वरसंशोधनाकडे म्हणावं तसं लक्ष दिलं नव्हतं; त्यामुळे ती अजून कुमारिकाच राहिली होती. द्रौपदीबाई, स्वभावानं चांगली होती, तिनं शक्य तितके दिवस मला तिच्याजवळ ठेवून घेतलं आणि जेव्हा तिच्या भाचीबरोबर लग्न करण्याचा विचार मी तिला बोलून दाखविला, तेव्हा तो तिला लगेचच पटला. नेहमीची प्रथा मोडून तिनं मला त्या मुलीबरोबर बोलण्याची मुभा दिली. एके दिवशी गढीच्या भिंतीच्या दगडी पायरीवर ती बसलेली असताना, मी प्रथमच आपल्या मनातील प्रेम तिच्याजवळ बोलून दाखविलं. ती लाज लाजली आणि तोंडावर पदर घेऊन तिथून निघून गेली. मी जेव्हा जेव्हा तिच्याशी बोलायचा प्रयत्न करे, तेव्हा तेव्हा ती असंच करे. नजर उचलून माझ्याकडे पाहण्याचं धाडसही तिच्यात नव्हतं. एके दिवशी तिला बोलायला लावायचंच असा मी निश्चय केला. "आपण गुपचूप लग्न करावं असं ते म्हणताहेत. तुला चालेल ना? तुला पसंत पडेल ना?" मी विचारलं. तिनं जवळच असलेल्या झाडाच्या बुंध्याला आधारासाठी पकडलं आणि मीही धीर करून आपल्या प्रेमाबद्दल तिच्याशी बोललो. मी म्हणालो, की तसा मी खूप दूर राहातो. माझं घर तिकडं दूर आहे, पण माझं तुझ्यावर निरतिशय प्रेम आहे. माझ्यावर विश्वास ठेव. विश्वास ठेव माझ्यावर." मी तिला अजिजीनं म्हणालो. तिनं नजर वर करून माझ्याकडं पाहिलं आणि निभ्रांतपणे म्हणाली, "माझा विश्वास आहे."

चटकन लग्न उरकून टाकावं असा द्रौपदीबाईनं लकडा लावला. तिच्या म्हाताऱ्या वडिलांना नंतर कसं सांगायचं, त्यांची समजूत कशी घालायची अशी त्यांना फार भीती वाटत होती. त्यामुळे त्यांनी सगळं गुपचूप उरकले. पण खरं म्हणजे, ती

घोडचूक झाली. द्रौपदीबाईच्या घाईमुळे पुढे आमच्या वाट्याला फार मोठे दु:खाचे दिवस आले. ज्या दिवशी लग्न झालं नेमका त्याच दिवशी तो म्हातारा बाप द्रौपदीबाईला भेटायला आला आणि त्यानं तिला मुलीच्या लग्नाच्या तयारीला लागण्यास सांगितलं. त्या मुलीची तर भीतीनं गाळण उडाली आणि द्रौपदीबाईला आणि तिच्या नवऱ्याला काय करावं, काही सुचेना. शेजारच्या एका मातब्बर जहागीरदारानं त्या मुलीला मागणी घातली होती. आता पळून जाणं आणि नंतर कधीतरी त्या म्हाताऱ्याला सारी हकीकत सांगणं एवढा एकच संकटातून बाहेर पडण्याचा मार्ग आम्हांला दिसत होता. लग्न नात्यांतच झालंय, भाच्याबरोबर झालंय हे कळल्यावर त्याचा राग शांत होइल असे आम्हांला वाटत होतं. तुझ्या आईच्या मनात निराळंच काहीतरी घोळत होतं. पण मावशीनं आणि काकांनी त्यांच्याच म्हणण्याप्रमाणे सारं झालं पाहिजे असा आग्रह धरला आणि तिनंही ते मान्य केलं. तशी ती धाडशी होती.

मंदिराच्या ओवऱ्यांमधून, दगडी चबुतऱ्यावरून आपल्या म्हाताऱ्या काकाबरोबर ती खाली आली ती रात्र माझ्या अगदी चांगली स्मरणात आहे. ती एखाद्या राजकुमारीसारखी करारी आणि निश्चयी दिसत होती. बापाच्या घरातून पळून जाणाऱ्या मुलीसारखे भाव तिच्या चेहऱ्यावर मुळीच नव्हते. ती एखाद्या राजकुमारीसारखी रुबाबात चालत होती आणि तिचे काका तिच्यापुढे अदबशीरपणे झुकून तिला नवऱ्या घरी पोहोचविण्याची काय काय व्यवस्था केली आहे याची माहिती देत होते. गढीची शेवटची पायरी उतरताना ती काहीशी घुटमळली. एक क्षणभर तिचा श्वासही थांबल्यासारखा वाटला, कारण आता तिच्यासमोर असीम अवकाश पसरला होता, आकाशाचा आणि धरित्रीचाही अफाट विस्तार पुढे होता आणि एक निरंतर शांतता त्यांत विसावली होती. गढीची ही बाजू यापूर्वी तिनं कधी पाहिली नव्हती. तिच्या पायाशी तप-तलाव होता आणि त्याच्या काठावर अनेक हिवाळे-पावसाळे काढलेला, ऊन-वाऱ्यानं झोडपलेला, करड्या रंगाचा अतिविशाल असा पिंपळाचा वृक्ष होता. तिनं त्या वृक्षाला पकडलं आणि कोणत्यातरी विचारात गढल्यासारखी त्याकडे पाहत राहिली. क्षणभरानं भानावर येऊन तिनं काकांना पालखी आणण्यासाठी खूण केली. मी शेजारीच उभा होतो पण तिनं माझ्याकडं पाहिलं नाही. फक्त पालखीत बसताना मोठ्या विश्वासानं आणि अगदी मन:पूर्वक तिनं आपला चिमुकला हात माझ्या हाती दिला. मला अगदी कृतकृत्य झाल्यासारखं वाटलं. मग तिचे काका आपल्या घोड्यावर स्वार झाले. मावशीनं तिला आशीर्वाद दिले आणि एक दागिन्याची पेटी माझ्या हाती देत म्हणाली, "ही कधी गमावू नको. ते लक्ष्मीच्या आईनं दिलेले स्त्रीधन आहे. ते जपून ठेवण्याचं वचन दे मला." पुढे कित्येक मैल काका आमच्याबरोबर होते. घाट आल्यावर ते थांबले. समुद्रकिनाऱ्याजवळच्या घाटावर म्हणजे या घाटाच्या अगदी विरुद्ध बाजूच्या घाटावर माझं घर होतं. त्याच्या

भिंतीवर समुद्राच्या लाटा आदळत होत्या.

त्या सगळ्या टेकड्या पार करून घरी पोहोचेपर्यंत कितीतरी दिवस लोटले. मी घरी पोहोचलो आणि मोठ्या दिमाखानं आपली वधू दाखवली, तेव्हा दुर्दैवच मागं लागलंय की काय असं वाटलं, कारण आम्हांला बघून आईचा चेहरा काही खुलला नाही आणि मी घेऊन आलेल्या त्या मुलीकडे बघून माझ्या बहिणीही कुरकुरायला, गुरगुरायला लागल्या. पण त्यांचे टोमणे किंवा लागट बोलणं हे सगळं तुझ्या आईनं मोठ्या धैर्यानं सहन केलं. फक्त तिला त्या जेव्हा पांढऱ्या पायाची म्हणत तेव्हा मात्र तिला फार वाईट वाटे आणि दूर कुठंतरी एकांतात जाऊन ती रडत बसे, त्याला कारण म्हणून एक मोठं अघटितच घडलं होतं. आम्ही पोहोचलो तेव्हाच नेमकं माझे श्रीमंत वडील पैशाच्या अडचणीत आले होते. त्यांनी कितीतरी वाटांनी आपली सगळी संपत्ती, मालमत्ता उधळून टाकली होती आणि जेव्हा आम्ही घरी पोहोचलो तेव्हा ते भोंदू साधूसंन्याशांच्या आणि ज्योतिषांच्या नादाला लागले होते. त्या सगळ्यांनी त्या साध्या,सरळ माणसाला अगदी घेरलं होतं. त्यामुळे ब्राह्मणभोजनात आणि वेगवेगळ्या मंदिरांना देणग्या देण्यात उरलीसुरली संपत्ती खर्च होत होती. वंशपरंपरागत चालत आलेली जमीनच काय ती आमच्यासाठी शिल्लक उरली होती. या सगळ्या दुर्दैवाचं खापर तुझ्या आईच्या गृहप्रवेशावर फोडलं जात होतं. सारे तिला पांढऱ्या पायाची म्हणून हिणवत. तिच्या मूल्यवान जडजवाहिराचा त्यांना हेवा वाटे. पण मी तिच्या आत्याला दागिने जपून ठेवीन असा शब्द दिला असल्यानं, त्यांना दाद देत नसे. त्यांनी उघड उघड पुकारलेल्या वैराला आणि तिचे दागिने हडप करण्याच्या कारवायांना मी पुरता वैतागून, कंटाळून गेलो आणि त्या वैतागाच्या भरात एके दिवशी यात्रेला जाण्याच्या निमित्तानं मी वडिलांच्या घरातून बाहेर पडलो. तुझी आई अर्थातच बरोबर होती आणि आमचा अगदी लाडका भाचा – रामचंद्रही – बरोबर होता. तो माझ्याकडून शास्त्रांची संथा घेत होता आणि आपल्या श्रेष्ठ धर्मग्रंथांमधील आर्ष सत्य त्याच्या मनावर बिंबविण्याचा मी प्रयत्न करत होतो. काशीला जाण्याच्या उद्देशानं आम्ही प्रवास चालू केला. वाटेतही कित्येक स्थळांना भेटी दिल्या. एकदा तुझी आई फार आजारी पडली. ही तुझ्या जन्मानंतरची गोष्ट. तुझे डोळे कमळाप्रमाणे असल्यामुळे ती तुला 'कमला' म्हणत असे. त्यानंतरची दोन वर्षं आम्ही विजनवासात फार आनंदात, मोठ्या सुखात घालविली.

खरंच कमला, त्या सुखी जीवनाबद्दल कसं सांगू तुला? आम्ही जो आनंदानुभव घेतला तसा कोणा मर्त्य माणसांना क्वचितच अनुभवायला मिळत असेल, असं म्हटलं तरी वावगं होणार नाही. आम्ही पर्णकुटीत राहत होतो, झऱ्याचे निर्मळ, थंडगार पाणी पीत होतो आणि पक्ष्यांच्या किलबिलाटानं जागे होत होतो. तो पक्ष्यांचा आवाज दूरवरच्या टेकड्यांच्या दऱ्यांमधून प्रतिध्वनित होई आणि अगदी लांबपर्यंत म्हणजे जिथे टेकड्यांवरील पांढरे ढग उंच आभाळाच्या गडद निळाईत मिसळून

गेलेले असत तिथेपर्यंत पसरत, लहरत जाई. सकाळच्या आणि सायंकाळच्या सुंदर प्रहरी तुझी आई माझ्यासोबत फिरत असे, तेव्हा तिच्याभोवती जो ऊन-सावल्यांचा खेळ चाले त्यांत ती एखादी गिरीदेवतेप्रमाणे भासे. आमच्याकडे काही शेळ्या-मेंढ्या होत्या आणि शेजारच्या घनदाट जंगलातून येणारे काही पक्षीही आमच्या पर्णकुटीभोवती घिरट्या घालीत असत आणि आम्ही केलेले चारापाणी खुशीनं मटकावीत असत. पर्णकुटीच्या पिछाडीला एक झरा वाहत होता आणि एका अतिविशाल अशा पळसाच्या वृक्षानं पर्णकुटीवर आपली छत्रछाया धरली होती. तुझ्या आईचा एक जुना नोकर होता. तिच्या वडिलांचं घर सोडताना तोही आमच्या बरोबर बाहेर पडला होता. एवढ्या दूरपर्यंत तिच्याबरोबर आलेला तो सेवक आमच्यासाठी स्वयंपाक करे. जेवण साधंच असे - उकडलेली कंदमुळं, रताळी, वरण-भात, तूप आणि भाकरी असं. पण आम्ही मजेत होतो, अत्यंत सुखी होतो. तुझी आई माझ्याबरोबर ग्रंथपठण करीत असे, जे ग्रंथ स्त्रियांच्या हातात पडूसुद्धा देत नाहीत असे ग्रंथही ती मोठ्या उत्सुकतेनं वाचत असे आणि त्यातला क्लिष्ट भाग समजून घेतानाही तिला फार समाधान होई. आमच्यात कसलाच दुरावा नव्हता आणि जसजशी तिची समज वाढत गेली तसतसं माझ्यावरचं तिचं प्रेमही वृद्धिंगत होत गेलं. निरतिशय, गाढ प्रेम होतं तिचं - अगदी शब्दातीत! मग मला जंगल आणि डोंगर-पर्वत आवडावेत यांत नवल ते कसलं? माणसांपेक्षाही जिव्हाळा दाखवला त्यांनी. हंऽऽ पण आमचं सुख फार काळ टिकले नाही. लवकरच ते लयाला गेलं. तुझ्या आईचं माझ्या जीवनातील स्थान किती मोठं आहे हे पुरतेपणी कळायच्या आधीच काळानं तिला ओढून नेलं. जातानाचे तिच्या डोळ्यांतील करुणेचे आणि अपार प्रेमाचे भाव अजून माझी पाठ सोडत नाहीत. बाळा कमला, तुला माहीत आहे का? तू अगदी मातृमुखी आहेस. गेल्या वर्षी दूधस्थळी मी तुला पाहिलं आणि तुमच्या दोघीतलं साम्य पाहून थक्क झालो. मी इतका भावविवश झालो की तिथे थांबूच शकलो नाही.''

''हां, दादा तेच,'' कमला घाईघाईनं म्हणाली, ''ते दूधस्थळाचं काय?''

''त्याच्याबद्दल काय सांगायचं बाळा? काय जाणून घ्यायचंय तुला?''

''दादा मी तिथे पूर्वी कधी गेले होते का? मला ते अगदी पूर्वपरिचित वाटलं. मी तुमचा आवाज ऐकला तिथे आणि पाठोपाठ, आपण थंडगार पाण्याच्या वेगवान प्रवाहात पडलो आणि कुणीतरी आपल्याला त्यातून वाचविलं असा काहीतरी विलक्षण भास मला झाला. बांगड्या घातलेला कुणा स्त्रीचा हात होता तो. त्यानं मला बाहेर काढलं, असं दिसलं मला. सगळं इतकं, स्वच्छ-स्पष्ट होतं की मला वाटलं यापूर्वीही हे सगळं मी एकदा पाहिलंय. तुमचा आवाज ऐकल्यासारखा वाटला म्हणून मी त्या रोखानं गर्दीत शिरले.''

''असं झालं होय बाळा?'' असं म्हणत त्यांनी तिला आपल्या जवळ ओढलं

आणि पूर्वी जसं तिच्या डोळ्यांत डोळे घालून पाहत, तसं पाहू लागले. "तुझी स्मरणशक्ती चांगलीच तल्लख आहे. पण तुला चेहरामोहरा नाही आठवत?"

"नाही, दादा. मला फक्त हात दिसला."

"तू एका खोल डोहात पडली होतीस आणि तुझ्या आईनं तुला त्यांतून बाहेर काढलं होतं. चांगलंच घाबरं केलं होतंस तेव्हा तू आम्हांला. कृष्णाक्षेत्री जात असताना हे सगळं घडलं. त्याच दिवशी संध्याकाळी त्या सुनसान रस्त्यावर तुझ्या आईला आजारानं गाठलं आणि पुढे त्यातच ती गेली. अंथरुणावर अत्यवस्थ असताना ती म्हणाली, "इतकं विचलित होऊ नका, मोडून जाऊ नका. तुमचं एकुलतं एक बाळही गेलं असतं तर काय झालं असतं बरं?" मला ते सगळं अगदी स्पष्ट आठवतं. आम्हांला मदत करायला तिथे कुणी नव्हतं. डोक्यावरती झाडांवरची घुबडं ओरडत होती, आजूबाजूच्या जंगलातील कोल्हेकुई भेडसावत होती आणि दुरदुरून वेगवेगळ्या रानटी पशूंचं ओरडणं ऐकू येत होतं. मृत्यूपूर्वी तुझ्या आईला एक स्वप्न पडलं. फक्त संतमहंतानाच येते तशी एक सोन्याची पालखी तिच्यासाठी आली. पालखीच्या शेजारी तो भयंकर उग्र यमराज उभा होता. ती अगदी घाबरून गेली होती म्हणाली की, *"मी आता चालले."* रात्रीची वेळ होती. आकाशात तारे चमकत होते, आणि वारा आर्त सूर आळवीत होता. आमचं उरलंसुरलं अन्न खाण्यासाठी जमलेली कुत्री टेकडीकडे पळत जाता जाता जोरजोरात भुंकत होती. तिनं देह ठेवला हे मला कळलं. ती मला सोडून गेली, पण तिच्या चेहऱ्यावर मात्र स्वर्गीय सुख विलसत होतं. मी ते बघितलं आणि एखाद्या भ्रमिष्टाप्रमाणे तिचे अंत्यविधी केले. त्यानंतर तुला घेऊन मी तिथून बाहेर पडलो. तू-माझं एकमेव सुखनिधान!

✿

# १५.

आता आपण पुन्हा सिंहागडच्या वाटेवर प्रवास करताना सईबरोबर गप्पा मारीत असलेल्या रामचंद्रकडे वळू. ते वाटचाल करीत असताना एक अतिशय अंधारी, खोल खिंड लागली. नेमके तिथेच 'इथून माझ्या गावाकडे जाणारी एक मधली पायवाट मला माहीत आहे' असं म्हणून सई पुढे निघून गेली. 'ठीक आहे' असं म्हणून रामचंद्र आपला मळलेल्या वाटेनं हळूहळू जाऊ लागला.

दोन्ही बाजूंच्या खोऱ्यांवर नजर ठेवता येईल अशा बेतानं एका टेकडीच्या अगदी टोकाला सईचं बैठं घर होतं. तिथून पुढेच विरळ वस्तीचं खेडं अस्ताव्यस्तपणे वसलं होतं. सईच्या घरासमोरच धर्मशाळेची इमारत होती. दोन्हींच्या मध्ये एक खोल खंदक खणलेला होता. धर्मशाळेत थोडा वेळ थांबून रामचंद्र गावात फेरफटका मारण्यासाठी म्हणून बाहेर पडला. घरात आल्या आल्या लगेचच सई एका भुयारी रस्त्यानं तळघरात गेली. तिथे एक पोक्त वयाचा माणूस बसला होता. तो जपमाळेचे मणी ओढत होता खरं; पण त्याची नजर मात्र त्या लहानशा खिडकीतून दिसणाऱ्या गावावर, तसेच समोरच्या दरीवरही भिरभिरत होती. या खोलीपर्यंतचा भुयारी रस्ता एकट्या सईशिवाय दुसऱ्या कोणाला माहीत नव्हता आणि घराच्या या बाजूला लागून असलेली दरी इतकी सरळसोट आणि खोल होती, की इथे एखादी खोली असू शकेल अशी शंका कोणाच्या मनात उमटणंही दुरापास्त.

"दाजी ऽ भाऊ ऽ' भराभरा पायऱ्या चढून खोलीत येत सई म्हणाली, "हा अनोळखी पाहुणा नेमका आहे तरी कोण, हे तुम्ही मला सांगा. आपल्या भागातला माणूस वाटतो. काशीच्या वडिलांचे म्हणजे रामकृष्णपंतांचे कारभारी होते भगवानदास म्हणून त्यांच्याकडून अगदी योगायोगानं मला या माणसाच्या आणि नारायणबुवा संन्याशाच्या नात्यागोत्याबद्दल समजलं. काशी ही कमलाची मैत्रीण आणि हा भगवानदास बैरागी आहे ना, तोच घेऊन गेला होता रामचंद्रपंताला काशीच्या घरी. एक चांगला वैद्य आणि अरण्यदयांचा शिष्य अशी ओळख करून दिली त्यानं. माझी

आणि त्याची आधीची काहीच ओळख नव्हती आणि तरीही त्याची ओळख असल्यासारखं वाटतंय मला," ती मोठ्या तोऱ्यात उद्गारली, "गावातून परत येताना, तो या रस्त्यावरून जाईल आणि त्यावेळी तुम्ही त्याच्याकडे नीट पाहावं असं मला वाटतं."

"हो तसंही हल्ली, काहीतरी माहिती काढण्यासाठी किंवा दुसऱ्या एखाद्या कामासाठीच माझ्याकडे येतेस. तुझ्याइतकी चंचल, थिरथिर आणि दुष्ट बाई दुसरी कुणी नाही भेटली मला. तू जर सावधगिरी बाळगली नाहीस, तर तुझं सगळं बिंग बाहेर काढेन मी. आपल्या डोक्यावर कुठली तलवार टांगली आहे, याची कल्पना नाही तुला. राघोपंतांचे चेले तुला कधीच माफ करणार नाहीत."

"आहे ठाऊक मला." रागानं ओठ चावत ती म्हणाली. "मला सारखी सारखी आठवण करून देण्याची काही जरूर नाही. वस्तुत: तूच माझ्या अल्लडपणाचा फायदा उठवून माझ्या आयुष्याचा सत्यानाश केलास आणि आता हे असं बोलायला तुझी जीभ धजावते तरी कशी? मी तुझ्या ताटाखालचं मांजर व्हावं असं वाटतं तुला. तुझी सेवा-शुश्रूषा करायची, खुळ्यासारख्या इच्छा पूर्ण करावयाच्या आणि मत्सरापोटी तुझ्या मनात निर्माण झालेलं संशयपिशाच्चही खपवून घ्यायचं! मला कंटाळा आलाय तुझ्या या वागण्याचा आणि तुझा. तुझी-माझी भेट फारशी नाही झाली तरंच बरं. तुलाही बरं आणि मलाही." एवढं बोलून सईनं आपला पदर उचलून तोंडावर धरला. तिच्याकडे रोखून पाहत तो म्हणाला, "हो का. सदा कुरकुर आणि पिरपिर! बाकी तेवढंच काय तुला जमतं म्हणा."

"पुरे झाली तुझी वटवट" सणसणीत चपराक लावावी तसे तिच्या तोंडून शब्द निघाले. "सई तुझ्यापुढे रडते-भेकते. असं म्हणायचंय का तुला? पण हे समजून असं, की सई कुणापुढेच अश्रू गाळीत नाही की रडत-भेकत नाही."

"हो ना, कारण इतके सारे खूप यार आहेत ना तिला. त्यामुळे गरज काय कुणापुढे हात पसरायची!" आणि मग सूर बदलून अधिकारवाणीनं चढ्या आवाजात तो म्हणाला, "आतापर्यंत खूप ऐकलं आणि सहन केलं तुझं. काय ऐकतेस ना मी काय म्हणतो ते? तुझ्या चिडचिडीला आणि आकांडतांडवाला मी जरा जास्त किंमत दिली आणि गप्प बसलो. पण आता नाही. आता एक दिवस जरी माझ्यापासून दूर गेलीस ना, तरी मी गप्प बसणार नाही. सगळी तुझी कुलंगडी जगजाहीर करीन. तू कोण, कुठली, घरातून कशी पळून गेलीस आणि ब्राह्मणाची मुलगी असूनही जोगतीण असल्याची बतावणी कशी केलीस, ते सगळं जगाला ओरडून सांगेन, तुझ्या नवऱ्याचाही तपास लावीन आणि राघवापुढे नेऊन तुला उभी करेन. म्हणेन, "घे सूड तुला काय घ्यायचाय तो." हे सगळं मी करीनच करीन! मुळीसुद्धा दयामाया दाखवणार नाही."

सईनं सगळं शांतपणे ऐकून घेतलं आणि म्हणाली, "ते बघू आपण नंतर. पण

हा माणूस कोण आहे, हे मला आधी सांग आणि हेही लक्षात ठेव की, तुझे आरोप आहेत ना, त्या सगळ्यांना चोख उत्तरं आहेत माझ्याकडे. मीही माझी बाजू मांडेन आणि हेही सांगते, सईनं पैशासाठी देहाचा बाजार मांडला किंवा सई कुलटेसारखी वागते, असं कोणी म्हणून शकणार नाही.''

''नाही ना म्हणणार. कारण भरपूर माया जमविली आहेस ना तू? पण हा सगळा पैसा कुठल्या मार्गानं मिळवलास तू?'' छद्मी हसत त्यानं विचारलं.

''कसा मिळवला? विचार तुझ्या मनाला. चळ लागलाय तुला आणि बकवास बंद कर तुझा. या सगळ्यांत माझी जेवढी चूक आहे, तेवढीच तुझीही आहे आणि सूडाचं म्हणतोस ना, तर सूडाचा तडाखा तुलाही बसेलच. तेव्हा आता तुझं तूच ठरव, की तुरुंगात खडी फोडायला जायचं की, सईबरोबर एखाद्या राजपुत्रासारखं आरामात राहायचं ते.''

हे बोलणं ऐकून त्या माणसानं मान खाली घातली. त्याच्या डोळ्यांत अपराधीपणाचा भाव उमटला आणि सईनं त्याच्याकडे अत्यंत तिरस्कारानं पाहिलं. नेमका त्याच वेळी समोरच्या दरीतील नागमोडी रस्त्यावरच्या एका वळणावरून रामचंद्र पुढे चालला होता. रामचंद्र घोड्यावर बसला होता आणि दुसरा एक माणूस त्याच्या मागे बसला होता. खोलीतला तो माणूस एकाकी ताड्कन उभा राहिला आणि खिडकीतून बाहेर डोकावून कुजबुजला, ''या वाटेनं तो येणार हे माहीत होतं मला. मागेही एकदा तो या वाटेनं गेलाय. म्हणूनच जपून रहा आणि इथे माझ्याजवळ थांब असं सांगत होतो मी तुला. भेटला का तो तुला?''

''हो, अर्धीअधिक वाट तरी मी त्याच्याबरोबरच होते. आत्ता एवढ्यातच मी तिथून निघाले आणि आडवाटेनं त्याच्या आधी इथे येऊन पोहोचले. पण तो आहे तरी कोण, काही माहीत आहे का तुला?''

''त्याच्या मागे घोड्यावर बसलेल्या माणसाची ती दोन शंकूंची पगडी आणि त्याचा तो पोशाख पाहिलास का? राघवाचा चाकर आहे तो आणि पुढे बसलाय तो तुझा नवरा!''

सईनं एक क्षणभर शेजारच्या खिडकीचे लाकडी गज घट्ट पकडले आणि पायाखालची जमीन सरकतेय की काय असं वाटून ती मटकन खाली बसली. पुढे पुढे जाणाऱ्या त्या घोडेस्वाराकडे ती पाहत राहिली. त्यावेळी तिच्या मनात काय उलथापालथ चालली होती, ते सांगणं अवघड आहे. ''बरंऽऽ, हा रामचंद्र होय, माझा नवरा!'' ऐकायला किती चमत्कारिक वाटतंय नाव. कित्येक वर्षांपूर्वी या माणसानं मला माहेरी, माझ्या आईच्या घरी आणून सोडलं! मोठा उमदा माणूस आहे पण; मी त्याला गमावलं. एक अत्यंत कडवट चव तिच्या अंत:करणाला व्यापून राहिली. आपलं सगळं आयुष्य आणि त्यांतले कितीतरी भयानक अनुभव तिच्या डोळ्यांसमोर अगदी सगळ्या बारकाव्यांनिशी उभे राहिले. 'मी किती किती आणि

काय काय म्हणू गमावलंय? झालं ते घडू नये म्हणूनही मी काय कमी आटापिटा का केला?' आपण पळून गेलो हे चांगलं नाही केलं, असे पश्चात्तापाचे विचार तिच्या मनात दाटून आले. भावनावेगानं हळवं होण्याचा तिचा स्वभाव होता. तिनं जग पाहिलं होतं, त्याची तिची जाण चांगली होती आणि आता चांगल्या मार्गावरून गाडी घसरल्यावर तर समाजाच्या आणि जगातील लोकांच्या पोकळपणाचे, दांभिकतेचे तिला चांगलेच भान आले होते. एकेकाळी तिला ज्याचं अतोनात आकर्षण वाटत होतं त्या स्वातंत्र्याची तिला क्षणभर घृणा आली. आपल्या वाट्याला आलेलं आयुष्याचं रूप बदलावं, कुणातरी थोर, उमद्या पुरुषाचं प्रेम मिळवावं म्हणून मी काय काय नाही केलं? खरंच माझी केवढी फसगत झाली." एक नि:श्वास टाकून तिनं मोठ्या अगतिकीनं कठड्याला गच्च पकडलं. तिचं हे भावनाविवश वागणं तो माणूस पाहत होता आणि गालातल्या गालात गमतीनं हसत होता.

"या बातमीनं आपल्याला चांगलंच विचारात पाडलं आहे." तो म्हणाला.

त्याचं बोलणं ऐकून स्वप्नातून जाग यावी आणि प्रत्यक्ष पुढ्यात काय वाढून ठेवलं आहे त्याचं भान यावं तसं सईला झालं. "हंऽऽ संपलंऽ ते सगळं! आता यापेक्षा वेगळं जीवन नाहीच जगू शकत मी आणि तरीही मला वाटतं, की आहे यापेक्षा फार वेगळी होऊ शकले असते मी."

"असं खरंच वाटतं तुला?" तो काहीशा विक्षिप्तपणे म्हणाला, "तू आता जशी आहेस तसं मी तुला केलं नसतं तर तुला तुझं स्वातंत्र्य कुठं मिळालं असतं? तुझी चैन, करमणुकीची इतकी साधनं आणि धडाकेबाज वागणं हे सगळं कसं जमलं असतं?" "होय! तू माझ्याकडून काहीतरी काढून घेतलंस – माझं नाव आणि प्रतिष्ठा – समाजातील स्थान, शिक्षण, स्वातंत्र्य, श्रीमंती आणि इतरांवर वर्चस्व गाजविणारी सत्ता यांच्या लोभापायी मीही आनंदानं त्याला मान्यता दिली. आता हे सगळं माझ्याकडे आहे पण माझं नाव जर माझ्याकडे नाही, तर याचा काय उपयोग? असो. पण एकदा दूध सांडून गेलं की गेलं! नंतर त्याचा काय उपयोग? सईत आता बदल होणार नाही, हे निश्चित. स्वातंत्र्याशिवाय ती जगूच शकत नाही. पण चला, आता जुनं सगळं विसरून जाऊ या आणि पुन्हा एकदा पूर्वीसारखे मित्र बनूया."

हे संभाषण काहीसं चमत्कारिक वाटलं तरी, त्याला एक इतिहास होता. नारायणबुवा संन्याशाकडून निघाल्यावर जेव्हा एक-दोनदा रामचंद्र आपल्या घरी गेला होता, तेव्हा तिथे त्याचा व सईचा वाङ्‌निश्चय झाला होता. त्याच्या आईला म्हणजे नारायणाच्या बहिणीला आपल्या मुलानं आपल्याजवळ राहावं असं वाटत होतं. नारायणाप्रमाणे आपल्या मुलानं घर सोडून जाऊ नये म्हणून तिनं एकदा रामचंद्र घरी आला असताना त्याचा वाङ्‌निश्चय करून टाकला. पण रामचंद्र काही घरी फार दिवस राहू शकला नाही. नारायण आणि त्याचे गुरू अरण्यदय यांच्याकडे

त्याचं मन ओढ घेत होतं. त्यामुळे काहीतरी कारण काढून, सबब शोधून वाङ्निश्चयानंतर लगेचच तो बाहेर पडला आणि नंतरही कितीतरी दिवस आपली खबरही कानोकानी पोहोचणार नाही, याची त्यानं काळजी घेतली. नारायणाच्या सहवासाची आणि अरण्यदयाबरोबरच्या अध्ययनाची त्याला अतिशय गोडी लागली होती. घरातल्या सुखासीन, ऐदी आयुष्यक्रमाचा त्याला उबग आला होता आणि वाङ्निश्चयालाही त्याची मुळीच संमती नव्हती. अशीच काही वर्षं उलटली आणि पुन्हा एकदा जेव्हा तो घरी गेला तेव्हा त्याला समजलं, की तो मेल्याची अफवा तिथे पसरली आहे आणि जिच्या बरोबर वाङ्निश्चय झाला होता, जिला केवळ एकदाच पाहिलं होतं ती मुलगी विधवेचं जिणं जगायला लागू नये म्हणून अचानक नाहीशी झालीय. तिच्या अचानक नाहीशा होण्याबद्दल आणखीही एक कंडी पिकली होती; कारण त्याच सुमारास घरातला ब्राह्मण पुजारीही कुठेतरी गायब झाला होता. हे सगळं ऐकून तर रामचंद्रला घराच आणखीनच उबग आला आणि तो नारायणाकडे परत गेला. त्याच सुमारास कमलेचा जन्म झाला. आणि आपल्या नवऱ्याचा लाडका तो आपला लाडका असं मानून त्याच्यावर जीव लावणाऱ्या बायकोनं 'ही माझी लाडकी कमला मी तुला देईन' असं सांगून त्याची समजूत घातली होती. कमला पाच वर्षांची झाली तेव्हा वडिलांची नीट व्यवस्था लावण्यासाठी म्हणून त्याला काही दिवस तिथेच राहावं लागलं. मधल्या काळात कमलाच्या आईचा देहान्त झाला आणि आपल्या मुलीला घेऊन दु:खावेगानं इकडेतिकडे भटकत अखेरीस घाटाच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या अंजनीघरला नारायणानं वास्तव्य केलं. या सगळ्या प्रकारामुळे रामचंद्र आणि नारायणबुवांची ताटातूट झाली. अखेरीस, कमलेच्या वाङ्निश्चयाच्या दिवशी संध्याकाळी रामचंद्रला नारायणबुवांचा पत्ता लागला.

कमला सुमारे महिनाभर आपल्या वडिलांच्या घरी राहिली आणि मग गणेश तिला परत घेऊन जाण्यासाठी आला. कसे कोणास ठाऊक पण सासरी असताना त्याच्याबद्दल जे विचार तिच्या मनात येत होते, तसे काही आता येत नव्हते. आपलं सुख धोक्यात आलंय आणि त्याच्या वागण्यामुळेच ते नष्ट होतंय असा विचार आता तिच्या मनातून हद्दपार झाला होता. पूर्वी तिच्या भोवतीचं वातावरण रखरखीत आणि असमाधानी होतं अवतीभोवतीच्या कितीतरी मुलींच्या सुखासमाधानाच्या ठिकऱ्या उडालेल्या तिनं पाहिल्या होत्या आणि आपल्याही दैवात हेच लिहिलं नसेल ना, अशा विचारानं तिच्या मनाचा थरकाप उडाला होता. पण आता पुन्हा एकदा दादांच्या घरातील सुखमय, सुरक्षित वातावरण आणि भोवतालची सनातन, शाश्वत, शांततापूर्ण निसर्गदृश्यं यामुळं तिचं अंत:करणही प्रसन्नतेनं आणि समाधानानं भरून गेलं होतं. नागर जीवनातील चिंता आणि काळज्या केव्हाच मागे पडल्या होत्या. एवढंच काय, या क्षणी आपल्या स्वत:च्या आयुष्याचीही फारशी तमा वाटत नव्हती. सर्वसामान्य जीवनधारणेपेक्षा काहीशा उच्च, उदात्त पातळीवर ती आता पोहोचली होती. त्यामुळे

गणेश भेटायला आल्यावर ती अत्यंत शांतपणे आणि अलिप्तपणे त्याच्याशी बोलली. तिनं आता सासरी परत यावं हे त्याचं म्हणणंही तिनं लगोलग मान्य केलं आणि त्याच्याबरोबर जायला तयार झाली. त्याचं व्यक्तिमत्त्व नेमकं कसं आहे, हे तपासून पाहायला तिला आतापर्यंत भरपूर वेळ मिळाला होता. भावनातिरेकामुळे त्याच्याबद्दल वाटणाऱ्या काळजीचा भर एकदा ओसरून गेल्यावर ती त्याच्याकडे वेगळ्या, अलिप्त नजरेनं पाहू लागली आणि तिला त्याच्यातील दुर्गुण, उणिवा यांची स्पष्ट जाणीव झाली.

रामचंद्र आणि आपले दादा यांच्यातील दृढ नातं कळल्यावर, रामचंद्रच्या सहवासात असताना वाटणाऱ्या हुरहुरीचं आणि त्यांच्या नजरेच्या प्रभावाचं जणू गमक कळलं, याचं तिला समाधान वाटलं. आपल्या दोघांच्यात रक्ताचं नातं आहे. तो आपल्याला वडिलांसारखाच आहे, असं तिला वाटू लागलं. पुढे जेव्हा, त्यानं आपल्या वडिलांची किती सेवा-शुश्रूषा केली, केवढी काळजी घेतली हे तिला समजलं, तेव्हा तर तिच्या मनात कृतज्ञतेचे भाव दाटू आले. दूधस्थळातील त्या घटनेचं कोडंही तिला उलगडलं. आपले वडील जवळ नसताना, केवळ रामचंद्रनं विचारपूर्वक घेतलेल्या निर्णयामुळे तिचा निभाव लागला. अन्यथा तिच्या त्या वेडपट वागण्याचा केवढा गहजब झाला असता याची जाणीव तिला झाली. एकदाच, फक्त एकदाच, तिच्या अंतर्मनाच्या गाभ्यात एक धीट आकांक्षा निर्माण झाली आणि ती लाजून चूर झाली. तो धाष्टर्याचा विचार स्वत:पासूनही लपवून ठेवावा असं वाटल्यामुळे की काय, तिनं आपले दोन्ही हात वक्षांवर दाबून धरले. 'जर', ती आपल्याशीच म्हणाली, 'इकडची स्वारी रामचंद्रसारखी असती तर' हे वाटणं स्वाभाविक जरी दिसत असलं तरी एका हिंदू मुलीच्या दृष्टीनं ते फार धक्कादायक होतं. आपल्या नवऱ्याची अन्य कोणाबरोबर तुलना करण्याची कोणा हिंदू मुलीची प्राज्ञा असणं शक्य नव्हतं.

गणेश आल्यावर त्याच्या सहवासात रमून जाण्याचा कमलेनं प्रयत्न केला. पण तो काही फारसा यशस्वी झाला नाही. तिच्या वडिलांची प्रकृती आता ठीक होती आणि तिनं तिथं राहाण्याची फारशी आवश्यकता नव्हती. तरीही ते मधूनमधून अस्वस्थ का होतात हे तिला उमजत नसे.' त्यांनी सगळं सांगितलंय ना मला, मग तरीही ते असे चिंताक्रांत का दिसतात?' तिच्या मनात येई. गणेश यायच्या आधी, कमलेला एक-दोनदा बाजूला घेऊन तिचे वडील म्हणाले, "मी गेल्यावर कसं होणार तुझं? तू खरंच सुखी आहेस ना? तुला काही कमी पडत नाही ना? याबाबतीत आईपेक्षा तू जरा वेगळीच आहेस. मला तरी काही हे समजतच नाही. तुझं आणि यजमनांचं परस्परांवर खरं प्रेम असायला हवं. म्हणजे मग सगळं ठीक होईल. तुझा माझ्यावर जरा जास्त जीव आहे आणि इथे माझ्याजवळ राहण्याचा विचार तुझ्या डोक्यात शिरेल अशी भीती वाटते मला. गणेशपंतांना मी फारसा

भेटलेलो नाही, त्यामुळे मला काळजी वाटते."

"नाही दादा, तुम्ही काही मनाला लावून घेऊ नका. ते माझ्याशी फार चांगले वागतात. इतर मुलींच्या नवऱ्यांपेक्षा अगदी वेगळेच आहेत ते. म्हणून तर माझ्या मैत्रिणी चांगला नवरा मिळवल्याबद्दल नेहमी माझं अभिनंदन करतात. काही दिवसांपूर्वी माझ्या जिवाला चैन नव्हती आणि काळजीनं घोर लागला होता हे खरं; पण का कोणास ठाऊक, आता तसं नाही वाटत. ते येतील लवकरच मला भेटायला."

गणेश आल्यावर त्या वृद्ध पित्याला हायसं वाटलं आणि त्यामुळे कमलाच्या जाण्याला त्यानं मुळीच विरोध केला नाही. खरं तर गणेश रामपूरला नोकरीच्या निमित्त परत गेला होता, पण कमलेला घेऊन जाऊन शिवगंगाला आपल्या आईच्या घरी पोहोचविण्यासाठी तो मुद्दाम आला होता. कमलेला आणि तिच्या वडिलांना परस्परांना निरोप देणं जड गेलं. एकमेकांपासून दूर होणं त्यांना लवकर जमेना. कमलाची ही अवस्था पाहून तिची वाट पाहत उभ्या असलेल्या गणेशला तिच्याबद्दल फार वाईट वाटलं. ते दोघं टेकडी उतरून खाली आल्यावर, पायथ्याशी कमलाची सासू त्यांना भेटली. कमलेला तिच्या हाती सोपवून गणेश रामपूरला निघून गेला.

✿

# १६.

कमला आणि तिची सासू घराजवळ आल्या, तेव्हा भागीरथी आपल्या घरासमोर उभी राहून भिंतीवरून डोकावून पाहत होती. कमलेच्या काखेत एक गाठोडं होतं आणि तिची सासू तिच्या अंमळ बरीच पुढे होती. भागीरथीनं लगोलग शेजारीपाजारी बातमी पसरविली आणि कमला अजून घराच्या कोपऱ्यावर वळणार होती, त्या आधीच कित्येक लोक घरांच्या भिंतीच्या आणि कुंपणाच्या वरून डोकावून पाहू लागले आणि कमरेवर ओल्या कपड्यांचे पिळे किंवा भरलेल्या घागरी घेतलेल्या कितीतरी जणी मुद्दामच आपापल्या घरासमोर उभ्या राहिल्या. 'ये, ये कमला' भागीरथी तिला पाहाताक्षणी म्हणाली. 'कशी आहेस तू?', 'कुठून आलीस?', 'कुठे चाललीस?' असे अनेक प्रश्न कमलेला विचारले जात होते. आलवण नेसलेल्या विकेशा विधवा आणि सवाष्ण स्त्रियाही तिला उत्सुकतेनं काहीबाही विचारत होत्या. हरणी तर धावतच आली. नेहमी हसतमुख असलेली रूख्मा मात्र काहीशी दुर्मुखलेली आणि बरीच अशक्त झालेली दिसत होती. ती आल्या आल्या सगळे एकदम स्तब्ध झाले. कमलेनं सगळ्यांकडे विशेषत: रूख्माकडे चौकस, शोधक नजरेनं पाहिलं. तिचं उदास, मलूल डोळे पाहून कमलेच्या अंगातून भीतीची शिरशिरी उमटत गेली.

"हे काय?" कमलानं प्रश्नार्थक मुद्रेनं विचारलं, "काय झालंय? मला सांगा ना."

"नाही, काही नाही" आपापल्या घराकडे जाता जाता काही बायका उद्गारल्या. त्यांच्या चेहऱ्यावरचे स्वागताचे भाव लोप पावले आणि घाबऱ्याघुबऱ्या होऊन त्या एकमेकींशी कुजबुजु लागल्या.

"ते बरे आहेत आता" रूख्मा कांपऱ्या स्वरात म्हणाली, "आम्ही काल वैद्याला बोलावलं होतं." आणि मग दु:खाचा कढ आवरू न शकल्यामुळे कमलाच्या खांद्यावर मान टाकून ती रडू लागली.

"गप बरं बाळा रडू नये असं." तिच्या शेजारी उभ्या असलेल्या दोघीतिघीजणी

म्हणाल्या, "मरीआईचा कोप होईल. तुला ठाऊक आहे ना, ज्यांना ती ओढून नेते, त्यांच्याबद्दल अवाक्षर काढायचं नसतं की रडा-ओरडायचं नसतं आणि काही घडायच्या आधीच रडणं काही चांगलं नाही. अपशकून होतो त्यांनं."

कमला अगदी घाबरून गेली आणि नुकतेच घराबाहेर आलल्या भागीरथीला खोदून खोदून विचारू लागली. 'शू: शू:' भागीरथी म्हणाली, "अशी घाबरून जाऊ नको. आल्या आल्या लगेच हे सांगणं योग्य नाही पण, मरीआईचा फेरा आपल्या गावात आलाय आणि रूख्माचा नवरा आजारी पडलाय. आमच्या घरातला एक नोकर मुलगा आणि म्हातारा स्वयंपाकी अशी दोन माणसंही अंथरुणावर पडली आहेत. आता कुणाची पाळी आहे कुणास ठाऊक? ती कोणाचीही पर्वा करीत नाही. प्रत्यक्ष यमानं पाठविलेली काळरूपिणी आहे ती."

"बाई गऽ किती भयंकर आहे हे सगळं!" थरथर कापत आणि रूख्माला जवळ ओढत कमला म्हणाली.

त्याचवेळी कमलेच्या घराचा दर्शनी दरवाजा उघडला आणि कमलेच्या सासूनं बाहेर येऊन रस्त्यावर नजर टाकली. तिला पाहाताच त्या मुली एकमेकींना अधिकच बिलगत कुजबुजल्या, "आम्ही तुला नंतर भेटतो. खूप काही सांगायचंय. आता तू जा आणि जपून रहा बरंऽ." धुतलेल्या कपड्याचे पिळे घेऊन सवाष्ण बायका पुढच्या दारानं तर विधवा स्त्रिया मागच्या दारानं आपापल्या घरी गेल्या.

त्या रात्री कितीतरी वेगवेगळ्या प्रकारच्या आणि परस्परांशी फारसा संबंध नसलेल्या भावभावनांनी कमलाच्या मनात गर्दी केली आणि कसल्यातरी अनामिक भीतीनं तिचं अंत:करण व्यापून टाकलं. तिला झोप येत नव्हती, समोर रूख्माच्या घरातील हालचालींवर आणि धावपळीवर कान देऊन ती अंथरुणावर बळेच पडून राहिली होती. मैत्रिणींवरच्या जिवाभावाच्या प्रेमामुळे, जणू काही आपणच त्या तसल्या प्रसंगाला तोंड देतो आहोत असं तिला वाटत होतं. फार अभद्र वेळ होती आणि रात्रीच्या शांत वातावरणात कसले कसले अशुभसूचक आवाज तिच्या कानांवर पडत होते. चंद्र अगदी निस्तेज, पांढुरका दिसत होता, वारा घोंघावत होता, घुबडांचा जोरजोरात ओरडण्याचा आवाज नदीच्या काळ्याशार पाण्यावर तवंगासारखा पसरत होता आणि घराच्या पाठीमागच्या भिंतीवर पडलेल्या सावल्या भुतांसारख्या भासत होत्या. जेव्हा ढगांनी चंद्राला पूर्णपणे झाकून टाकलं तेव्हा अस्वस्थ होऊन ती खोलीच्या बाहेर आली. शेजारच्या घरात चाललेल्या घाईगडबडीने, वर्दळीने तिचं लक्ष वेधलं. "रूख्मा कुठं आहे? ती काय करतेय? अरे देवा, माझ्या हसतमुख, चुणचुणीत रूख्मावर काय वेळ आलीय ही?" का कोण जाणे, पण कमलाच्या डोळ्यांतून अश्रू ओघळले, 'नको, नको, या दु:खात लोटू तिला.' एवढ्यात भरभर चाललेल्या पावलांचे आवाज आले, त्यानंतर अचानक गलबला झाला आणि मग मोठ्ठा आक्रोश ऐकून आला. एक जोराची किंकाळी ऐकून ती ताड्कन उठून उभी

राहिली, तिच्या अंगाला कापरं भरलं. क्षीण होत चाललेल्या चित्शक्तीचा तो शेवटचा हुंकार होता, सोडून चाललेल्या, विलग होणाऱ्या आत्म्याच्या चिरवेदनेचा अविस्मरणीय उद्‌गार होता! 'जवळ ये, जवळ, आणखी जवळ. मी एकटा आहे' असा चित्कार ऐकू आला आणि त्यानंतर एकच गलबला झाला. मग हुंदके ऐकू येऊ लागले. आपण रूख्माला रडताना पाहातो आहोत, असं कमलेला वाटलं. आपल्या मैत्रिणीच्या गळ्यात हात टाकावे आणि तिचं दु:ख दूर करावं असं तिला वाटलं. पण जिथं हृदयच फाटलं होतं, तिथे ती सांत्वन तरी कसं करणार होती? तेवढ्यात आत्म्याने दुसऱ्या जगात प्रवेश करण्यापूर्वी केलेला मरणोन्मुख माणसाचा अंतिम आक्रोश ऐकू आला. तिथेसुद्धा 'जवळ ये, जवळ ये, मी एकटा आहे' असा आक्रोश ऐकून कमलेला नवल वाटलं. आवाजाचा गलबला फार काळ टिकला नाही. घनदाट झाडीत घुबडे मोठमोठ्यानं ओरडू लागली. एवढ्यात एक कुत्रा केकाटला आणि अनोळखी काहीतरी येताना पाहिल्यावर भुंकावे तसं जोरजोरात भुंकू लागला. कमलानं डोक्यावर पदर घेतला आणि आपला चेहराही झाकून घेतला. याचा अर्थ तिला माहीत होता. कुत्र्यांना आत्मे दिसतात. त्या क्रूर यमाचे दूत नक्कीच आले असणार. पण घरात सारं शांत कसं? अरे देवा, त्यांचा डोळा लागला आहे की काय? काळझोप लागलीय की काय? आपल्यापुढे काय वाढून ठेवलंय, कोण यायला लागलेय हे त्यांना माहीतही नाही की काय? त्या क्रूर यमदूतांना टाळता नाही का येणार? दारं बंद करून त्यांना थोपविता नाही का येणार? हातात हलते फांस घेऊन काही सावल्या घराच्या अगदी जवळजवळ येऊ लागलेल्या आपल्याला स्पष्ट दिसताहेत असं तिला वाटलं. ती पावलांची चाहूल खरी होती का? आणि तेवढ्यात पलीकडच्या झाडीतून एका कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज आला आणि पाठोपाठ नदीतीराकडे पळत सुटलेल्या अनेक कुत्र्यांचं भुंकणं ऐकू आलं. 'गेला! गेला!' ती म्हणाली. आत्म्याला काढून नेलं. आकाशात काळे ढग पुढे पुढे सरकत होते आणि त्यातून निस्तेज, पांढुरका चंद्र डोकावत होता. अधूनमधून होणारी झाडांची सळसळ आणि खसफस शांततेचा भंग करीत होती. घरात एक विचित्र प्रकारची स्तब्धता होती. एक आर्त किंकाळी आकाशाला भेदत गेली आणि पुन्हा सारं शांत झालं. अतिशय अनैसर्गिक वाटणारा, जड आवाज ऐकू आला. 'रडू नका. आणखी काही वाईट-वेगळं व्हायच्या आधी हे प्रेत इथून हलवा.' अंत:करण फाडून बाहेर येणारा तो आवाज त्या तरुणाच्या पित्याचा होता. डोक्यावर पदर घेऊन कमला रडू लागली. रूख्माच्या बाबतीत जे घडेल याची भीती तिला वाटली होती, तेच घडलं होतं. केव्हा पहाट होईल आणि रूख्माच्या गळ्यात पडून आपल्याला तिचं सांत्वन करता येईल असं कमलेला झालं. 'रूख्मा, रूख्मा, हे काय गं तुझ्या नशिबाला आलंऽ' तिच्या मनात शब्द उमटले.

दुसऱ्या दिवशी मैत्रिणीला भेटायला जाण्याची मुभा कमलेला मिळाली नाही.

अंधश्रद्धेतून निर्माण झालेल्या भीतीनं सर्व लोक गारठून गोठून गेले होते. आपल्या मैत्रिणीला काय काय सोसावं लागत असेल याची कमला कल्पना करू शकत होती. अगदी जवळचे आप्तस्वकीयही तिच्याकडे पाठ फिरवीत असतील, म्हणत असतील, 'भोगू दे पूर्वजन्मीच्या पापांची फळं तिला! नवऱ्याला मारणारी नतद्रष्ट पापीण कुठली. किती पापं केली असतील, कितीजणांची मनं दुखविली असतील, कुणास ठाऊक!'' आणि रूख्मा, तिला ठाऊक होतं, रूख्मा हे सगळं कसं सहन करेल ते! तोंड लपवून बसेल आणि आतल्या आत दु:ख करेल पण कुणीही तिच्याजवळ जाऊन सांत्वनाचा किंवा सहानुभूतीचा एखादा शब्दही उच्चारला नसेल. या सगळ्याचा विचार करून कमलेला दु:खानं वेड लागायची पाळी आली. पण ती जेवढ्या तळमळीनं रूख्माकडे जाण्याची परवानगी मागत होती, तेवढ्याच ठामपणे ते तिला नकार देत होते. त्यानंतर तिनं अतिवेदनामय आणि जीवघेण्या कळा दिल्या आणि तिच्या पहिल्या अर्भकानं या जगात प्रवेश केला.

कमलेला फार मोठ्या मानसिक छळवादाला तोंड द्यावं लागत होतं आणि आपल्याला नवऱ्यानं रामपूरच्या घरी घेऊन जावं असं सारखं तिच्या मनात येत होतं. तिची नणंद आणि सासू तिच्याशी पूर्वीपेक्षाही वाईट पद्धतीनं वागत होत्या. खरं तर आताच त्यांनी काळजी घेण्याची आणि तिच्याशी गोडीनं वागण्याची आवश्यकता होती पण, तसं होत मात्र नव्हतं. उलट 'ही आमच्या डोक्यावर ओझं होऊन बसलीय. खपली तर बरं होईल.' अशा प्रकारची वाक्यं त्या उघड उघड बोलू लागल्या होत्या. 'काय, बिनकामाचा धोंडा पडलाय इथे' त्या म्हणत, ''तिचा कुठेच, कुणालाच काही उपयोग नाही. नवऱ्यालाच नव्हे तर माहेरच्यांनाही नुसता भार. तिच्याशिवाय गणेश अगदी छान मजेत राहू शकला असता, पण बोलता येत नाही तसं, जगासाठी तोंड मिटून राहावं लागतं.'' आणि जेव्हा कमलेचं बाळ जन्माला आलं तेव्हा त्यालासुद्धा त्या जास्तीचं ओझं डोक्यावर पडलं असं म्हणू लागल्या. ''कुणाला इतक्या लगेचच मूल पाहिजे होतं? आणि तेही पुन्हा मुलगी!' त्या येता-जाता म्हणत. बिचारी कमला, त्या कठोर शब्दांपासून आणि शिव्या-शापांपासून आपल्या बाळाचं रक्षण करण्यासाठी, ती त्या नुकत्याच प्राप्त झालेल्या खजिन्याला छातीशी घट्ट कवटाळे. त्यांचे ते कठोर शब्द, शापाप्रमाणे आपल्या बाळावर परिणाम तर करणार नाही ना या विचारानं तिच्या अंधश्रद्ध जिवाचा थरकाप होई. पण जेव्हा त्या बाळजिवाने डोळे उघडले आणि त्या अर्भकाच्या चेहऱ्यावरील दैवी, गूढ स्मित कमलेनं पाहिले तेव्हा तिला अत्यानंद झाला आणि त्या भरात ती आपले सारे कष्ट, दु:ख विसरून गेली. ''परमेश्वरा! हा माझा ठेवा माझ्याजवळ असू दे बस्! मग त्यांनी काही म्हटलं तरी, त्याची मला पर्वा नाही.''

असेच दोन महिने उलटले आणि गणेश शिवगंगाला आला. कमलेची दु:खीकष्टी अवस्था पाहून त्याचं हृदय हेलावलं पण आश्चर्य असं, की बाळाकडे मात्र त्यानं

अगदी परक्याप्रमाणे पाहिलं आणि आपल्या बाळाकडे पाहण्यात त्याला सुख वाटत नाही, याचा कमलेला मोठा धक्का बसला. पण सगळेच बाप काही आपल्या मुलांचे लाड-प्यार, कोडकौतुक करतात असं नाही. पुरुषांचा स्वभावच असा असतो, ते असंच वागतात अशी तिनं स्वत:ची समजूतन करून घेतली. आपल्याला इकडच्यांबरोबर जाता येईल, तिथे त्यांच्याबरोबर स्वतंत्रपणे राहता येईल. अशा विचारात ती गुंग होती. 'खरंच त्यांच्या सुखासाठी आपण काय काय म्हणून नाही करणार बरं? आपण त्यांची वाट पाहत बसू. ते येण्यापूर्वीच त्यांना आवडणारे छान छान पदार्थ करून ठेवू. मग बाळाला बाहेर आणू, त्याला अंगाखांद्यावर खेळवू आणि इकडच्यांनाही कळेलच की ती हे सारं त्यांच्यासाठीच तर करतेय.' अशी मनोराज्यं करण्यात ती गुंग होई. आपली पत्नी आणि मूल यांच्या संसारात यजमान पूर्णपणे सुखी झाल्याचं स्वप्न ती रेखे. आठव्या दिवशी बाळाचं बारसं झालं. नाव ठेवताना कमलानं मोठ्या आग्रहानं, आपल्या आईच्या मावशीचं द्रौपदी हे नाव ठेवलं. आपल्या आईची जीवनकहाणी तिच्या मनात घर करून बसली होती आणि आईच्या त्या मावशीबद्दल तर तिला जास्त जिव्हाळा वाटू लागला होता. आता अजून एक विधी पूर्ण झाला की कमला रामपूरला, आपल्या नवऱ्याच्या घरी राहायला जाणार होती.

आपल्या शहरातल्या घरी राहायला आल्यावर कमलेला कितीतरी अनोख्या, विलक्षण अनुभवातून जावं लागलं. काही आठवडे सुखासमाधानात, शांततेत गेले. मग मात्र तिनं मोठ्या उमेदीनं उभारलेल्या सुखाचा किल्ला जमीनदोस्त झाला आणि एके काळी आपल्याशी गोडीनं वागणारा आपला लहरी, नेभळट नवरा भावनाशील पत्नीला किती परीनं त्रास देऊ शकतो याचा तिला चांगलाच अनुभव येत गेला. तिच्या नवऱ्याचा स्वभाव काहीसा धसमुसळा होता त्यामुळे आपलं बोलणं आणि वागणं यामुळे कमलाच्या संवेदनशील मनाला किती सूक्ष्म यातना होतात, ते त्याला मुळीच समजत नसे. सुरुवातीसुरुवातीला तो तिच्याशी प्रेमानं वागला पण नंतर त्याची लहर पालटलीय हे तिला समजून चुकलं.

कमलेच्या दोन्ही नणंदा रामपुरातच राहात होत्या. गणेशचे त्यांच्याकडे नेहमी येणे-जाणे असे. त्यांच्याकडे जाऊन आला की तो जणू वेगळाच माणूस बनलेला असे. त्या त्याचे असे काही कान भरीत, की तो एकतर घुम्यासारखा बसून राही, नाही तर या ना त्या गोष्टीवरून चिडचिड करे. सुरुवातीसुरुवातीच्या दिवसातले, म्हणजे सई अजून तिच्या डोंगरातील घरातून रामपुरात राहायला आली नव्हती, त्या काळातलं वातावरण असं होतं. एकदा रमाबाईच्या घरी जाऊन आल्यावर गणेश कमलेला म्हणाला, की माझ्या बहिणी म्हणतात की, 'तू फार कंजूष आहेस आणि हावरट, लोभी आहेस. मला पत्ताही लागू न देता, तू पैसे साठवत असली पाहिजेस, असा त्यांचा संशय आहे. तू असे पैसे काढून घेतेस त्यामुळे आपल्या बहिणींसाठी खर्च करायला माझ्याकडे पैसे उरत नाहीत, असं त्यांना वाटतं.'' हे त्यानं अगदी

मोकळेपणानं सांगितलं. त्यामुळे कमलेला वाटलं की त्याचा तिच्यावर विश्वास आहे आणि ती कशी आहे, हे त्याला माहीत आहे. पण कधीकधी तो त्यांना भेटून येई तेव्हा वैतागलेला असे आणि तिच्याशी धड बोलतही नसे, तेव्हा मात्र तिला फार वाईट वाटे आणि एकटं एकटं वाटे. आयुष्याची चव बदलून कडूझार करणाऱ्या आणखी काही छोट्या-छोट्या घटनाही घडत राहिल्या. तो पुढचा मागचा विचार न करता बोले आणि खूपदा त्याचे शब्द तिच्या मनाला चराचरा कापत जात आणि सलत राहत. पतिपत्नीच्या नात्यांत ताण उत्पन्न करणाऱ्या अशा काही लहान-लहान घटना घडत होत्या. एकदा कुणा दुकानदाराने विक्रीसाठी आणलेल्या उपरण्यासंबंधी एक प्रसंग घडला. ते अगदीच वाईट आहे असं कमलेला वाटलं. जेव्हा गणेशनं तिला पैसे चुकते करायला सांगितलं, तेव्हा त्या वस्तूबद्दल अभिप्राय व्यक्त करण्याचा आपल्याला हक्क आहे अशा समजुतीनं ती थेट गणेशकडे गेली. तो तेव्हा रमाबाईच्या कारभाऱ्याबरोबर बोलत होता. तिथे जाऊन तिनं त्याला स्पष्ट सांगितलं, की किमतीच्या मानानं कापडाचा पोत चांगला नाही. गणेशला तिची ही लुडबुड आवडली नाही. अशा प्रकारे स्वतंत्र मत व्यक्त करतेय म्हणजे ती स्वतःला चारचौघींपेक्षा जास्त शहाणी, वरचढ समजतेय आणि आपल्या बहिणीच्या घरातल्यासारख्या असणाऱ्या व्यक्तीसमोर येऊन बोलण्याइतकी ती आगाऊ, चढेल आहे अशा समजुतीनं तो झटक्यात वळला आणि म्हणाला, "पैसे चुकते कर!" ते शब्द तसे निरुपद्रवी होते. पण ज्या पद्धतीनं ते उच्चारले होते, ते तसे ऐकून ती अगदी घाबरून गेली आणि 'यांच्या डोक्यात नवीन काय शिरलं' याचं तिला आश्चर्य वाटू लागलं. पण नंतर थोड्या वेळानं येऊन तो जेव्हा तिला, "तू अगदी नीच, क्षुद्र, गवत कापणाऱ्या बायांपेक्षाही हलक्या प्रतीची बाई आहेस. तुला वठणीवर आणण्यासाठी जोड्यानं मारलं पाहिजे." असं सुनावू लागला तेव्हा साध्यासुध्या व्यवहारातलं आपलं भाग घेणंही इकडच्यांना पसंत नाही हे पाहून तिला धक्का बसला. थोडा वेळ गेल्यावर, तिच्या तोंडून शब्द आले, "किमतीची घासाघिस करण्यानं, सौदा करण्यानं काही अप्रतिष्ठा होत नाही मग, खरं बोलायला मी का भ्यावं?" बरोबर आहे! तुला कोणाचीच पर्वा नाही. अगदी नवऱ्याचीसुद्धा नाही. मी जणू तुझ्या पायाखालची धूळ. तुझ्या दृष्टीनं मला काहीच किंमत नाही." "असं का बोलता आपण? आपली माणसं बोलतात तेच खरं मानून मला टोमणे का मारता?" आपल्या नणंदांनी त्याच्या कानात ओतलेलं विष आता भिनतं आहे, हे तिला कळून चुकलं. त्या तिला सतत, "गर्विष्ठ, कंजुष, क्षुद्र आणि कुणाची भीडमुर्वत न ठेवणारी" असंच म्हणत असत ना! हे सगळं आठवून तिने 'तुमची माणसं' असा शब्दप्रयोग केला होता पण त्या शेवटच्या शब्दांनी गणेश चांगलाच उसळला आणि म्हणाला, "माझी माणसं! त्यांच्याबद्दल अशा प्रकारे बोलायला तुझी जीभ धजावते कशी? तुझ्यातला हा क्षुद्रपणा पार उपटून काढावा असं मला वाटतं. सगळे लोक

हसतात तुला. एवढंच काय, तुझा अडाणीपणा बघून तो माणूससुद्धा गालातल्या गालात हसत होता." हे शब्द एखाद्या दणक्यासारखे तिच्यावर आदळले आणि ती मटकन खाली जमिनीवर बसली. काहीतरी भयंकर, अघटित घडणार आहे, या आशंकेनं तिचं हृदय आक्रंदू लागलं.

थोड्याच दिवसांनंतर आणखी एक अशी घटना घडली, की ज्यामुळे आपल्या नवऱ्याचा आपल्यावरील विश्वास पूर्णपणे उडाला आहे, याची जाणीव कमलेला झाली. अपमानित आणि अवमानित झाल्यामुळे तिचं मन उद्विग्न, निराश झालं. ते सगळं तिच्या मोलकरणीच्या हलगर्जीपणामुळे झालं. एक स्त्री म्हणून नवऱ्याच्या दृष्टीनं एका मोलकरणीपेक्षाही आपल्याला कमी किंमत आहे या जाणिवेनं तिला अधिक वाईट वाटलं. खरं, तर तो पारंपरिक हिंदू मनात रुजलेला स्त्रीविरोधी पूर्वग्रह होता. पण कमलेचं बालपण वेगळ्या पद्धतीनं गेल्यामुळं हे तिला माहीत नव्हतं. आणि एका मूर्ख मोलकरणीची चूक तिच्या माथ्यावर मारली गेली हे समजल्यावर तर तिला फारच दु:ख झालं. गणेशनं मोलकरणीला तीन आण्यांची, तीन वेगळ्या प्रकारची मिठाई घेऊन येण्यास सांगितलं. मोलकरीण होती झोपेत त्यामुळे तिला ते नीटसं समजलं नाही. तिला नीट कळावं म्हणून कमला म्हणाली, "लक्षात ठेव. प्रत्येक प्रकारची पाव पाव हिस्सा." त्या दिवशी तिचा नवरा एरवीपेक्षा अधिकच खुशीत आणि आनंदात होता. त्या दिवशी तो कचेरीतून लवकर घरी परत आला आणि म्हणाला, की त्याच्या बहिणी येणार आहेत म्हणून. तेवढ्यात मोलकरीण सगळी मिळून फक्त पावशेरच मिठाई घेऊन आलेली पाहून कमला चकितच झाली. गणेशनं खडसावून विचारल्यावर मोलकरीण खुळ्यासारखी बघत उभी राहिली आणि "अहो, बाईसाहेबांनी सांगितलं होतं पावशेर आणायला" असं म्हणत आपली चूक लपवू लागली. ते ऐकल्यावर कमलेनं हसत हसत आपल्या नवऱ्याकडे पाहिलं व म्हणाली, "हं, काय मूर्खपणा! प्रत्येक प्रकारची मिठाई पाव-पाव शेर असं मी सांगितलं आपण ऐकलं होतं ना?" पण त्याच्या चेहऱ्यावर उद्वेगाचे भाव उमटले आणि भांडण काढण्याच्या आवेशात तो गुरगुरला, "कोणास ठाऊक?" ते ऐकून ती स्तंभित झाली. त्याचा तिच्यावर मुळीच विश्वास उरला नाही की काय? मटकन् खाली बसून ती पुटपुटली, "होय, कुणास ठाऊक? कुणास ठाऊक, नाही का?" आपल्याला आता वेड लागेल असं तिला वाटलं.

त्यानंतर गणेशचं लवकर घरी येणं कमी झालं. तो अगदी क्वचितच लवकर घरी येई. त्यामुळे कमला अस्वस्थ होऊ लागली पण तरीही आपल्या मनातील विचार तिने कोणाजवळ बोलून दाखवले नाहीत. एवढंच नव्हे, तर तिच्या अगदी विश्वासातील मोलकरीणही मुकाट्यानं सगळं पाहत होती. कमलेला सहानुभूती दाखवण्याचं धाडसही तिच्या अंगी नव्हतं, कारण आपल्यावर कुणी दया दाखवतेय किंवा आपल्या नवऱ्याबद्दल वाईटसाईट बोलतेय हे कमलेला मुळीच खपलं नसतं.

पण गावात तसं एखाद्याचं वागणं इतरांच्या शेरे-ताशेऱ्यातून सुटू शकत नाही आणि गणेशच्या चालचलणुकीकडे त्याच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांचं बारीक लक्ष होतं. एकदा एक शेजारीण कमलेला भेटायला म्हणून आली आणि तिच्याबद्दल आस्थेच्या भूमिकेतून तिनं गणेशच्या साऱ्या भानगडी कमलेला सांगितल्या. त्यानंतर तिच्या जीवनाच्या हृदयद्रावक नाटकातील मूकाभिनयाचा प्रवेश सुरू झाला. यजमानांचं दूर रहाण्याचं कारण समजल्यामुळे त्यांना कचेरीतून लवकर घरी येणं भाग पडावं यासाठी कमलेनं आपले सगळे कौशल्य पणाला लावले. पहिल्यापहिल्यांदा त्यानं तिच्याकडे संशयानं बघितलं पण नंतर 'आधीची सगळी भांडणं विसरलीस की काय' असं त्यानं हसून विचारलं. त्यावर कमलानं मान खाली घातली आणि म्हणाली, की तिचे स्वामी जर विसरले असतील तर तीही सर्व विसरली आहे. आपल्याबद्दल कोणताही अपसमज करून घेऊ नये अशी तिनं त्याला विनवणी केली. ते आपल्याला हलक्या प्रतीची समजतात हे आपल्या मनाला कसे सलत राहतं तेही सांगितलं. गणेश तसा मनानं चांगला होता. त्यामुळे दुसरे दिवशी कचेरीतून लवकर घरी येण्याचं त्यानं कबूल केलं आणि त्याप्रमाणे तो आलाही. पण अरेरे! तो किती अस्वस्थ होता. त्याचं कुठं कशात लक्ष नव्हतं. त्याची ही अवस्था पाहून, ठरलेल्या संकेतस्थळी सई त्याची वाट पाहत थांबली असेल, की काय, असा संशय कमलाच्या मनात आला. 'इकडून सईबद्दलच विचार करीत असतील का?' ती स्वत:शीच म्हणाली. 'हं, म्हणजे आपल्यालाही फसवणार आणि तिच्या मागेमागे जाणार तर.' तिला वाटलं, तो खरंच दु:खीकष्टी आहे. त्याने एखादादुसरा शब्दही तोंडातून काढला नाही. पण थोड्या गोड पुऱ्या खाऊन झाल्यावर तो उठला आणि काही कामासाठी बाहेर जायचं आहे असं म्हणून बाहेर पडला. सईच्या घराच्या दिशेनं त्याला जाताना पाहून 'कोणतं काम आहे, माहीत आहे मला.' असा विचार कमलेच्या मनात डोकावला. एक नि:श्वास टाकून ती आत गेली आणि कित्येक महिन्यांचा काळ लोटल्यावर पहिल्यांदा तिनं आरसा हातात घेऊन त्यात पाहिलं. तिच्यात खूपच भयंकर बदल झाला होता. तिचा चेहरा खप्पड दिसू लागला होता आणि दु:खानं तो झाकोळून गेला होता. 'खरंच, सई, सईऽऽ' ती कळवळून उद्‌गारली, 'तू माझ्या वाटेत का आलीस? माझ्या वाट्याला जो भोग आला तो पुरे नाही का झाला?'

दुसरे दिवशी गणेशचा चेहरा सगळी रयाच उडून गेल्यासारखा दिसत होता. तिच्याशी बोलताना एखाद्या गुन्हेगारासारखा तो खाली मान घालत होता आणि तिला खूष करण्यासाठी धडपडत होता. तो बाहेर गेल्यावर कमलाच्या मनात वेगळेच भाव उमटले. आपण आपल्या नवऱ्याला नीटपणे ओळखलं नाही याचं तिला मनस्वी दु:ख झालं. आपण त्याच्याबरोबर का बरं इतका वाद घातला आणि तंडलो आणि त्यांना वाट्टेल ते बोललो. 'माझ्या सुखात लुडबुड करणारी तू कोण?'

असं जेव्हा ते म्हणाले तेव्हा कदाचित त्यांच्या मनात तसं काही नसेलही. अभावितपणे चुकूनच त्यांच्या तोंडून ते शब्द निघाले असतील. तिनं मात्र ते जसेच्या तसे घेतले आणि एखाद्या हलक्या दर्जाच्या बाईप्रमाणे त्या शब्दांवरून भांडण काढलं आणि त्यांचं आयुष्य दु:खी करून टाकलं. सकाळी ते किती खिन्न, उदास दिसत होते आणि आता त्यांना काय बरं वाटत असेल? आता ते पूर्वीपेक्षाही जास्त दूरदूर राहतील, फटकून वागतील. बारीकसारीक गोष्टींवरून शंका घेत राहाणाऱ्या बाईशी आपण लग्न केलंय असं त्यांना वाटत असेल. खरं म्हणजे ते नेहमी आपल्याशी चांगलं वागत आलेत. ते इतर माणसांसारखे नाहीयेत. ते आपल्याला खूष ठेवण्यासाठी धडपडत असतात. असे विचार मनात घोळवल्यामुळे तिचा सगळा दिवस आपलं काय काय चुकलं ते आठवण्यात आणि स्वत:ला दोष देत टिपं गाळण्यात गेला. 'नाही. त्यांच्यासारखा नवरा मिळण्याची लायकी नाही आपली. इतके वाईटसाईट आणि निष्ठुर शब्द आपल्या तोंडून निघू तरी कसे शकले? कुणीतरी चांगलं तुडवलं पाहिजे आपल्याला पायाखाली आणि आपण किती हलक्या मनाचे आहोत, आपलं वागणं कसं नीच प्रतीचं आहे हे दाखवून दिलं पाहिजे, म्हणजे मगच आपल्या हातून पुन्हा अशा चुका होणार नाहीत. अशी काळजी घ्यायला शिकू आपण!' कमलाच्या या खिन्नतेला कारणीभूत तिचा सुस्वभाच होता. तिच्या साध्या, सरळ स्वभावामुळे ती स्वत:लाच बोल लावत होती आणि स्वत:ला नवऱ्याच्या चरणांची धूळ समजत होती.

✿

# १७.

जसजसे दिवस उलटत गेले तसतसे सईचं घरी येणं-जाणं वाढलं. ती अगदी स्नेह्यासोबत्यांप्रमाणे नेहमी येऊ-जाऊ लागली. सईच्या वारंवार येण्याबद्दल कमला जेव्हा नापसंती दाखवे किंवा आडवळणानं सुचवे तेव्हा, 'तिच्या येण्या-जाण्यानं काही बिघडत नाही. त्यांत काहीच धोका नाही. बायकांच्या स्वभावातच मत्सर असतो, त्यांना प्रत्येक गोष्टीत काहीना काही वाईट दिसतंच.' असं म्हणून तो तिचं तोंड बंद करे. इतर बायकांच्या सारखीच तूही मत्सरी आणि शंकेखोर स्वभावाची कशी? असे आश्चर्यही तो व्यक्त करे. त्यानंतर लवकरच असाही काळ आला की जेव्हा सई दररोज संध्याकाळी घरी येऊ लागली. कचेरीतून घरी आल्या आल्या तो तिला बोलावून घेऊ लागला आणि कमला मात्र अगदी रात्र होईपर्यंत परसदारीच बसून राहू लागली. सई त्याच्याशी बोलत असे, गप्पा मारे आणि तोही मोठ्या आनंदानं, हसून संभाषणात भाग घेई. कमलेकडे तो फारसं लक्ष देत नसे. 'पूर्वी कसं आपण एखादेवेळी शांत बसलो किंवा ते असताना एखादेवेळी आपलं लक्ष नसल, चित्त दुसरीकडेच लागलेले असलं की ते आपल्याला खूष करण्यासाठी कसे वेगवेगळ्या युक्त्या करीत' ते तिला आठवे आणि त्यांच्यात असं संपूर्ण परिवर्तन कां बरं झालं, याचा ती मनातल्या मनात खल करीत बसे. अलीकडे तो तिच्याकडे बघे, तेव्हा त्याची नजरही विखारी असे. तिला पाहिलं तरी त्याचा विरस होई. 'सई माझ्यापेक्षा कोणत्या बाबतीत वरचढ आहे?' कमलेच्या मनात विचार येई. 'तिच्यात दांडगा आत्मविश्वास आहे, ती धीट आहे, बिनधास्त हसते बोलते' कमला स्वतःशी विचार करे 'जरा आगाऊपणाने बोलते, वावरते. पण सुंदर म्हणावी अशी काही ती नाही. तिला ती नागिणीसारखी वाटे. विशेषतः ती कमलेकडे जेव्हा विजयी मुद्रेनं नजर टाके तेव्हा तर फारच! अशा प्रकारचं परस्वाधीन आणि यातनामय जीवन किती काळ कंठावं लागणार कोणास ठाऊक' असं कमलेला होऊन जाई.

एके दिवशी संध्याकाळी परिस्थितीला चांगलीच कलाटणी देणारी घटना घडली.

त्या दिवशी रामपुरात जत्रा होती. गणेशला कचेरीत जायचं नव्हतं आणि म्हणून तो रोजच्यापेक्षा थोडं लवकरच घराबाहेर पडला. कमलाचं त्याच्याकडे बारीक लक्ष होतं. तिचा सहवास टाळण्याची त्याची धडपड पाहून तिला फार क्लेष झाले. ती दारात उभी होती तेवढ्यातच रामचंद्र, आपल्या वडलांचा भाचा आपल्याच घराकडे यायला लागलाय हे पाहून तिला मोठं नवल वाटलं. नेहमीप्रमाणे वैद्याचा पोशाख त्याच्या अंगावर नव्हता. अगदी निराळ्या तऱ्हेचा पोशाख घालून तो थेट त्यांच्या दाराकडेच येत होता. कमलेला त्याची सगळी जीवनकथा माहीत होती, त्यामुळे त्याचा वेष आणि एकंदर अवतार बघून तिला फारसं आश्चर्य वाटलं नाही. आपण अगदी निराळ्याच तऱ्हेचं आयुष्य जगतो आहोत असं एकदम तिच्या मनात आलं. आपल्या आईची जीवनकहाणी तिला आठवली आणि आपण आईच्या घरातील उदात्त वातावरणात वावरत असल्याचा भास तिला झाला. रामचंद्रानं आधी गणेशबद्दल विचारपूस केली आणि मग, 'तिचे वडील पुन्हा आजारी पडले आहेत व ते डोंगरावरच्या घरात आहेत. तिला भेटायला रामपूरला येण्याच्या अवस्थेत ते नाहीत.' असं त्यांनं सांगितलं. त्याची आई वारली आणि त्यामुळे त्याला घरादाराची आणि इस्टेटीची व्यवस्था बघावी लागते, असे तो सांगू लागला, तो एकतर नारायणबुवांना आपल्या बरोबर घेऊन जाईल नाहीतर बुवांना वाटलं, तर तो त्यांना अरण्यदयांकडे सोडेल. आपल्याला वडिलांच्या मालमत्तेसंबंधीच्या कामांकडे लक्ष द्यावं लागेल असं स्पष्ट करून त्यानं तिला सांगितले, की "तुला वरचेवर निरोप पोहोचविण्याची व्यवस्था होईल, क्षेमकुशल कळविलं जाईल आणि तूही आपलं क्षेमकुशल – खुशीही वेळोवेळी कळवीत राहावे. नारायणबुवांच्या सांगण्यावरून तो तिच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी मुद्दाम आला होता. त्यानं काहीसं दबकत दबकत बाळाची चौकशी केली. 'अरे वा! मुलगी का? कोणासारखी दिसतं?' असं त्यानं विचारल्यावर कमला धावतच आत गेली आणि बाळाला बाहेर घेऊन आली. नवरा येईपर्यंत थांबण्याचा तिनं रामचंद्रला आग्रह केला. पण अंजनीघरला जायचं आहे असं सांगून त्यानं थांबायला नकार दिला. 'मी नुकताच शिवगंगाहून येतोय. तिथे तू असशील असं वाटलं होतं. मी तुझ्या सासऱ्यांना भेटलो. त्यांना तुझ्या वडिलांची सगळी हकीकत सांगितली, कारण तुझ्या दादांना वाटायला लागलं, की तुझं घरदार आणि नारायणबुवांची मालमत्ता तुलाच मिळणार आहे, हे तुझ्या सासरच्या माणसांना कळायला हवं. म्हणून मग मी त्यांना सगळं सविस्तर सांगितलं.' पुढे सावधगिरीची सूचना देत तो म्हणाला, 'सईपासून जपून रहा. ती इथेच आहे असं ऐकलंय.' जाता जाता त्यानं एक क्षणभर खाली पाहिलं आणि म्हणाला, "सुखी हो. आपल्या नवऱ्याच्या प्रेमात सुखानं संसार कर.' हे शब्द ऐकताच तिचे डोळे अश्रूंनी भरून आले, पण ते तिनं तसेच आत दाबले. तिच्याकडे मोठ्या जिव्हाळ्यानं पाहून रामचंद्र म्हणाला, "हे पाहा, तुझ्या वडलांच्या पश्चात मीच तुझा पालक आहे.

तुला कशाचं काही कमी पडणार नाही. रडायचं काही कारण नाही तुला. तुला काय हवं असेल ते लगेच तुझ्यासमोर हजर होईल, कारण तुझ्या वडलांकडे भरपूर संपत्ती आहे. तुझ्या नुसत्या इशाऱ्यासरशी सारं तुला मिळेल. तू सर्वांत सुखी मुलगी आहेस' असं म्हणून तो घाईघाईनं बाहेर पडला.

दारासमोरच्या अंगणातील निंबाच्या झाडाखाली उभं राहून रामचंद्र बोलत होता. त्यावेळी शेजारपाजारच्या घरातून अनेकजण डोकावून डोकावून पाहत होते. मोलकरीणसुद्धा शब्दन्‌शब्द लक्ष देऊन ऐकत होती आणि एकीकडे दुसऱ्यांशी कुजबुजत म्हणत होती, "हे कमलेचे नातेवाईक दिसतायेत. कमलेला नातेवाईक आहेत, हेच खूप झालं म्हणायचं! नवलंच वाटतंय."

संध्याकाळी गणेश सईला बरोबर घेऊन आला. कमला दुसऱ्याच विचारात गुरफटली होती. त्यामुळे सईला पाहून तिची फारशी चलबिचल झाली नाही. रामचंद्र येऊन गेल्याचं गणेशला सांगावं असं कमलेच्या फार मनात होतं पण का कोण जाणे, सईसमोर ते सांगणं तिला काही प्रशस्त वाटलं नाही. गणेशचं काहीतरी बिनसलं होतं, तो अस्वस्थ दिसत होता. नेहमीप्रमाणे झोपाळ्यावर बसून, हसत-खिदळत सईच्या गप्पागोष्टी चालल्या होत्या. पण रोजच्यापेक्षा तिचा आजचा नूर काही वेगळाच होता. तिच्या नजरेत जिंकल्याचा तोरा होता. वरवर शांत दिसणाऱ्या कमलावर त्या कुर्रेबाजीनं चांगलाच आघात केला. सईनं कमलेच्या घराची, त्यातल्या वस्तूंची आणि घर कसं ठेवलंय याची टर उडवली, कुचेष्टा केली आणि तेवढ्यावरच न थांबता, कमलेला हुकूम सोडला, "एऽऽ ते तस्त दे मला इकडे. एखादं तरी काम कर निदान. नतद्रष्ट मुलगी." तिच्या बोलण्याकडे मुळीसुद्धा लक्ष देऊ नये असं कमलेला वाटत होतं. पण गणेशच्या चेहऱ्यावरील कमालीची उद्विग्नता आणि हताशपणा पाहून तिचं मन कळवळलं. हा सगळा तमाशा लवकरात लवकर संपलेला बरा असं तिला वाटलं. मग त्यात जरी आपल्याला जीव गमवावा लागला तरी चिंता नाही. ज्याच्यामुळे ती अगदी शांत आणि निर्लिप्त होती तो अभिमान एकाकी गळून पडला. ज्या स्वातंत्र्याच्या जाणिवेमुळे तिच्या आईवडिलांना आपलं घर सोडावं लागलं, ऐषारामाऐवजी खडतर जीवन पत्करावं लागलं, ती स्वातंत्र्याची जाणीव, आर्जवी, प्रेमळ स्वभावाच्या कमलात अजिबात नव्हती असं नाही. "ऐकू नाही का येत तुला, होय गं, किंवडे, टवळे" सई म्हणाली आणि मग गणेशकडे वळून पुन्हा म्हणाली, "पाहिलंत ना माझ्याकडे मुळीच लक्ष देत नाही ती. नीट लक्ष द्यायला सांग तिला." कमला त्या दोघांकडे पाठ करून, गुडघ्यात मान घालून बसली होती. हे सगळं असं काय आणि का चाललंय याचं तिला नवल वाटत होतं. यापूर्वी सई असं कधी वागली नव्हती. तेवढ्यात नवऱ्याचा आवाज तिच्या कानांवर आदळला. "हंऽ, ऊठ आणि ती सांगतेय तसं कर!" या शब्दांपाठोपाठ एक जोराचा दणका तिच्या पाठीत बसला आणि ती पायऱ्यांवरून गडगडत खाली पडली. पण

तिच्यातील लढाऊ वृत्ती उसळून उठली. ती उठली. शरीरातून उठणारी कळ तशीच दाबून त्याच्यासमोर उभी राहून म्हणाली, "तुम्ही या नसत्या कारणासाठी मारलं मला. पण त्याच्या बदल्यात देवानं तुम्हांला चांगली ठोकर दिली नाही ना म्हणजे मिळवली. जपून असा." तो जागच्या जागी थिजून गेला. एखाद्या स्त्रीनं असं वागणं हे विलक्षण, चारचौघींपेक्षा वेगळंच होतं. पण ती मोठ्या आत्मविश्वासानं, त्याच्या समोर ठामपणे उभी राहिली. परिस्थितीवर आपला ताबा येतोय, असं ध्यानात येताच, अधिकच चेव येऊन ती तावातावानं सईला म्हणाली, "चल. चालती हो कायमची इथून. ताबडतोब चालती हो. गेली नाहीस तर हाकलून देईन मी तुला." कुठूनतरी अंगात बळ संचारल्याप्रमाणे तिनं सईला बाहेर ढकललं. सई गणेशनं मध्ये पडावं म्हणून अजिजी करीत होती. पण गणेश जणू जमिनीला खिळून बसला होता. सईच्या तोंडावर दरवाजा बंद करून कमला परत आली तर, तिचा नवरा मघाप्रमाणे जिथल्या तिथे जसाच्या तसा उभा होता. तिला एकदम अंगातलं त्राण गेल्यासारखं वाटलं. मघाचा क्षणिक आवेश संपून गेला होता. ती जमिनीवर बसली आणि हुंदके, खोल नि:श्वास उसासे, यांनी तिला गदगदल्यासारखं झालं. अखेरीस तिचा नवरा कडाडला, "अवदसे, काय केलंस हे? चार लोकांत माझी अब्रू घालवलीस. काय करू मी आता? बाहेर जगाला कसं तोंड दाखवू मी? आधी केलेल्या माझ्या मानहानीनं पोट नव्हतं भरलं, समाधान नव्हतं झालं, म्हणून त्यात ही आणखी भर घातलीस होय?"

"मी काय केलं? मी काही केलं नाही," कमला म्हणाली, "जिनं माझं स्थान बळकावलं तिला मी बाहेर काढलं इतकंच. एखाद्या नाचणारिणीचीही लायकी नाही तिची आणि पूर्वी एकदा आपण जिच्यावर प्रेम करीत होता, त्या तुमच्या धर्मपत्नीला निर्लज्जपणे, खुशाल काम सांगावं तिनं?" मग ती हळवी होऊन म्हणाली, "अहोऽ, असं का करता तुम्ही? आपल्या बाळासाठी तरी निदान, आपण पूर्वीसारखं सुखानं नांदू शकणार नाही काय?" एवढं बोलून तिनं जमिनीवर अंग टाकलं आणि गुडघे दुमडून पडून राहिली.

"हो! का?" तिच्याकडे तिरस्कारानं भरलेला थंड कटाक्ष टाकून गणेश उद्गारला आणि मग तिच्यापासून दूर जात तो म्हणाला, "माझ्याशी असं तोंड वर करून बोलण्याआधी, आपलं वागणं काय आहे ते बघ. सईपेक्षाही तू नीच कर्माची आहेस. तू आधीच माझी पुष्कळ नाचक्की केली आहेस. तुला याचा जाब द्यावा लागेल, प्रायश्चित्त घ्यावं लागेल."

"नाचक्की केली? खाली मान घालायला लावली? का, काय केलं मी?"

"उगीच निरागस असल्याचा आव कशाला आणतेस? मी तुला अगदी पुरेपूर ओळखतो. माझ्या या स्वत:च्या डोळ्यांनी त्या माणसाला इथे रेंगाळलेलं मी पाहिलंय, तेव्हा आता हा निष्पापपणाचा देखावा कशाला?"

"कोण माणूस? तुम्ही हे कुणाबद्दल बोलतायं? अरे देवा! हे काय आता आणि?"

"आश्चर्यचकित झाल्याचं कितीही ढोंग केलंस, कितीही आव आणलास तरी तू मला फसवू शकणार नाहीस, बापजादे म्हणत आलेत तेच खरं- 'स्त्रियांवर कधीही विश्वास ठेवू नये!' माझ्या डोळ्यांत धूळ फेकण्यासाठी, माझी काळजी घेण्याचं ढोंग केलंस. मी तुझ्यावर पूर्ण विश्वास टाकावा आणि तुला मोकाट सोडावं म्हणून'" दात-ओठ खात आणि पाय आपटीत तो म्हणाला, "तुला याचे परिणाम सोसावेच लागतील. माझ्या कशाला पाया पडतेस? निरागसतेचा आव आणायला चांगलं जमतं तुला. आता नुकतंच तू मला ढकलून दिलंस ना, तेव्हा मला खरंच वाटलं की तू अगदी निष्पाप आहेस. एक क्षणभर माझ्या मनात ती पूर्वीची जवळकीची भावना जागी झाली. पण आता नाही, आता सारं संपलं. तुझे खरे रंग दिसले मला. हे मूल माझं नाही हे शपथेवर सांगीन मी आणि घराबाहेर हाकलून देईन!"

"काय? हे अति होतंय! आपल्याला खरंच असं वाटतंय का की हे मूल तुमचं नाहीयं म्हणून? अरे देवा! मला मरण येईल तर बरं. तुमचा ज्याच्यावर संशय आहे त्याचं नाव कळून घेण्याचीही इच्छा नाही माझी. कुणी भरवलं इकडच्यांच्या कानांत हे सगळं? इकडच्यांच्या मनात खरोखरच असे भाव असतील, तर इकडच्यांना आणखी त्रास देण्यासाठी मला नाही जगायचं यापुढे. माझ्यावर असले कसलेतरी दोषारोप करायच्या आधी, एकदा नीट विचार करायला हवा होता!"

"अरे देवा! असं का बोलता आपण?" त्याच्या त्या गुरकावण्यामुळे आणि चमत्कारिक आविर्भावामुळे एक थंडगार कळ तिच्या शरीरात चमकली. आपल्या हृदयाला काहीतरी करकचून आवळलं जातंय आणि गुदमरायला, घुसमटायला होतंय, असं तिला वाटलं. क्षणार्धात आपण दहा वर्षांनी पोक्त झालो असं जाणवून ती उभी राहिली आणि शांतपणे म्हणाली, "मी आत्महत्या करणार नाही त्यामुळे आपण अडचणीत याल. सत्य काय आहे ते एका परमेश्वराला ठाऊक आहे आणि तो ते एकना एक दिवस उजेडात आणीलच. पण मी आता इथे राहाणार नाही." मग तिनं त्याला सांगितलं की कुणी एखाद्यानं विचारलं तर आजारी वडिलांना भेटायला गेलीय असं सांगा. "म्हणजे मग सगळ्या वळवळणाऱ्या जिभा शांत होतील आणि इकडच्यांना मान खाली घालावी लागणार नाही."

"हे थोडे पैसे ठेव तुझ्याजवळ" तिच्याकडे करुणेनं पाहत तो म्हणाला. "नको. मला पैसेबिसे काही नकोत. आपण पुन्हा मला भेटूही नका."

चालताना तिला काहीसं अडखळल्यासारखं झालं आणि भीतीनं शरीराचा थरकाप झाला. आपल्या बाळाला उराशी कवटाळून ती बाहेरच्या स्तब्ध, काळोख्या रस्त्याकडे धावत सुटली. बाहेर पडायच्या आधी तिनं आपल्याकडे काय आहे काय नाही हे तपासून पाहिलं होतं आणि मोलकरणीला पाठोपाठ येण्यास सांगितलं होतं.

हे सारं चालू असताना गणेश मात्र शांतपणे पाहात उभा होता. थोडंसं अंतर चालली असेल नसेल एवढ्यातच ती एका झाडाखाली थांबली. दाही दिशांना वारं घोंघावत होतं. झाडांच्या काळ्याभोर शेंड्यांची अभद्र सळसळ चालू होती. ते मंत्रचळ झाल्यासारखे हलत होते. तिच्यासमोर एकाकी, वैराण रस्ता पसरला होता. ती स्वत:शीच म्हणाली, "कुठं जाऊ मी? अंजनीघरला माहेरी जायचं नाही हे नक्की. मुळीच जायचं नाही तिथे. स्त्रीनं आपल्या पतीच्या घरीच देह ठेवला पाहिजे, माहेरी परत जाता कामा नये." मग तिच्या मनात एक विचार उभा राहिला आणि ती चक्क पळायलाच लागली. तिची मोलकरीण चार समजुतीचे शब्द बोलत तिच्या मागोमाग धावत होती. 'मी कुठं जातंय ते कुणाला सांगू नको' ती म्हणाली. जिथे जाण्याचा तिनं निश्चय केला होता, त्या ठिकाणाची कोणाला पुसटशी शंकाही आली नसती. ती तिच्या सासरी, शिवगंगाला परत चालली होती. "त्यांनीच ही कल्पना माझ्या नवऱ्याच्या मनात भरवली असणार. आता मी त्यांच्याकडेच जाईन आणि त्यांच्याकडेच सारं आयुष्य कंठेन."

दोन्ही बाजूंना भाताची शेतं असलेल्या, बिकट वाटेवरून ती चालली होती. रात्रीचा काळोख अधिकच गडद झाला होता. अंत:करणातील जोरकस प्रेरणेमुळे ती आपोआपच पुढे चालली होती. पाठीमागून येणारी मोलकरीण तिला हाका मारीत होती. पण त्याकडे मुळीच लक्ष न देता, बाळाला छातीशी कवटाळून ती वाट चालत होती. तिचं हृदय जोरानं धडधडत होतं आणि डोकं ठणठण ठणकत होतं. दमून, शिणून गेल्यावर अखेरीस एकदा तिनं खाली बसकण मारली. "माझ्या सगळ्या धडपडीचं अखेर हे फळ मिळालं. 'हे मूल माझं नाही,' हे शब्द तिच्या कानांत कर्कशपणे घुमू लागले आणि तिच्या तोंडातून शब्द उमटले. 'अरे, देवा आता मी काय करू? स्वत:ला कुठं लपवू? कसं संपवून टाकू? खरंच, मरण आलं तर बरं होईल. पण यमराज येणं किती कठीण आहे. यमराजा, येरे! मी तळमळून बोलवतेय तुला, लवकर ये.' पण नाहीच आलं मरण, तर मग पुढे काय? भविष्यकाळ-महाभयंकर भविष्यकाळ तिच्यापुढे आ वासून उभा ठाकला होता. मरण येणं ही एकच सुटकेची आशा होती. विमनस्क होऊन तिनं मान वर उचलली. पण आता कुठली नवीनच भावना तिच्या मनात ताबा घेत होती बरं? शब्दांत सांगता येणार नाही अशा अनोख्या अनुभवाची तिला प्रतीती येत होती. तिच्या मस्तकावर लुकलुकणाऱ्या असंख्य ताऱ्यांनी भरलेलं, असीम आकाश पसरलं होतं. अमर्याद अवकाश आणि नीरव शांतता यामुळे सर्वांगातून उत्साहाची शिरशिरी उमटली. तिच्या मनात एक विचार चमकला- 'या विशाल विश्वामध्ये मी कोण? माझं स्थान ते काय? आणि मी जगले काय आणि मेले काय, असा कोणता फरक पडणार आहे?' नेमकी त्याच वेळी तिची लहानगी मुलगी जागी झाली आणि आपली आई आकाशाकडे पाहाते आहे असं दिसताच, तिनंही आपले चिमुकले हात

आकाशाकडे उंचावले आणि 'हूऽऽ' असा आनंदाचा उद्‌गार काढला. कधीकधी अगदी किरकोळ, लहानसहान गोष्टींचाही आपल्यावर मोठा परिणाम होतो. तसं कमलाचं झालं. मुलीच्या आनंदाच्या उद्‌गारानं ती एकदम थरारली. भोवतालची विलक्षण स्तब्धता आणि त्या चिमुकलीचा हर्षोद्‌गार यांच्यात आंतरिक नातं आहे, असं तिला वाटलं आणि ती स्वत:शीच विचार करू लागली, 'आपलं बाळ देवाला प्रार्थना करीत होतं का? हा चिमुकला अजाण निष्पाप जीव कोणी जन्माला घातला? आणि ती मेल्यावर त्या जिवाची काळजी कोण घेईल? जन्माला आलेल्याची काळजी घेतली जातेच, कुणी ना कुणी ती घेतेच. शिवाय देव, तो सर्वज्ञ आणि करुणामयी देव आहेच तिथे वर बसलेला.'' तिला एकदम निश्चिंत झाल्यासारखं वाटलं. त्या अपार शक्तीपुढे नतमस्तक होऊन तिनं आपला सगळा भूतकाळ मनावेगळा केला. या विश्रब्ध अवस्थेत असतानाच कुणीतरी कुजबुजत्या स्वरात आपल्याला कानमंत्र देतेय असं तिला वाटलं. 'नाही, तू मरता कामा नये. तू जिवंत राहून, आपल्या उदाहरणानं खरं पुण्यशील, निष्पाप आयुष्य कसं असतं हे दाखवून दिलं पाहिजेस. तू प्रेमानं सर्वांचं हृदय जिंकून घे. नम्र हो. जगात क्षुद्र असं काहीच नाही, हे मनात वागव. तेव्हा आता ऊठ आणि कामाला लाग. या जगातलं तुझ्या वाटणीचं पुष्कळ काम अजून व्हायचं आहे.' ती उमेदीनं, उत्साहानं उठली. तिच्यातून एक नवंच जीवन जणू उसळी मारून वर आलं. वैयक्तिक दु:ख नष्ट झालं. आता ती केवळ दुसऱ्यांसाठी आयुष्य वेचणार होती, अगदी जे तिचा द्वेष करीत होते, त्यांच्यासाठी सुद्धा. 'प्रेम आणि निष्कपटपणा काय करू शकतो ते मी आपल्या प्रेमळ वागणुकीनं दाखवून देईन. त्यांनी अगदी खांडोळी जरी केली तरी मी ते सारं सहन करीन आणि मग एखादे दिवशी कधीतरी इकडच्यांनाही खरं काय ते उमजेल.' एका मृदु-मधुर भावनेची मोहिनी तिच्यावर पसरली आणि स्वार्थत्यागाच्या कल्पनेमुळे तिला अत्यंत समाधान वाटले. कुणा अजाण हिंदू मुलीला असा अनुभव आला असावा याचं कदाचित कुणाला नवल वाटेल. पण निसर्गाच्या भव्योदात्ततेमुळे पशूही प्रभावित होतात आणि कमला तर इतर हिंदू मुलींपेक्षा कितीतरी वेगळी होती. अतिशय सुसंस्कृत आणि बुद्धिमान मातापित्याची ती मुलगी होती आणि ती स्वत:ही विचार करायला आणि अनुभूती घ्यायला शिकली होती.

✿

# १८.

अनेक घटना-प्रसंग आणि अनेक लोकांचं कान भरवणं यांचा एकत्रित परिणाम होऊन गणेशच्या वागण्यात बदल घडून आला आणि त्यामुळेच तो कमलेशी मागील प्रकरणात वर्णन केल्याप्रमाणे वागला. त्यानंतर त्याला अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. कमलावर दोषारोप होऊ नये, तिला त्रास होऊ नये अशीही त्याची धडपड होती खरी; पण या सगळ्यात घडलं असं की तो सईच्या कचाट्यात अधिकाधिक सापडत गेला. कितीतरी वेळा, निव्वळ योगायोग वाटावा तसे सई व तो मंदिराच्या ओवरीत भेटले. कमलेवर सूड उगवण्याच्या हेतूनंच तिनं त्याच्याशी सूत जमवलं होतं. रामचंद्रनं तिच्याकडे केलेलं दुर्लक्ष तिच्या मनाला फारच झोंबलं होतं. म्हणून मग त्याला जिच्याबद्दल आपलेपणा, जिव्हाळा वाटतो त्या मुलीला या ना त्या मार्गानं त्रास देण्याचा तिनं निश्चय केला. कमलानं आपल्या घरी आनंदानं संसार करावा असं रामचंद्रला वाटत होतं आणि तिच्या सुखातच आपल्यालाही सुख वाटेल असं तो म्हणाला होता. खऱ्या प्रेमाचं हे दर्शन तिला अगदी नवं होतं. परिणामी, ती स्वत:चा रागराग करू लागली, स्वत:वरच चिडली आणि कमलाचा द्वेष करू लागली. लोकांना आपल्या पायाचे दास बनविणं तिला फार आवडायचं आणि रामचंद्रच्या वागण्यामुळे ती दुखावली गेली होती. त्याचं वागणं अत्यंत नम्र, विनयशील असलं तरी, त्यानं आपल्याला झिडकारलं आहे असंच तिला वाटत होतं. ती त्याला अनेक वेळा डोंगरातल्या गुहेत भेटली होती. पण त्या सर्वच प्रसंगी त्याचं वागणं सद्भिरुचिसंपन्न, पोक्त आणि संयमी असं होतं. गणेश तसा अजून लहान आहे, त्याच्यात भावनिक आवेग नाही असं वाटून सईनं सुरुवातीला त्याच्याकडे दुर्लक्ष केलं होतं. पण त्यानं कमलेची उपेक्षा करावी एवढंच नव्हे, तर तिला दूर हाकलून देण्यासाठी त्याला प्रवृत्त करण्यासाठी, भाग पाडण्यासाठी तिनं त्याला आपला गुलाम बनवण्याचं ठरवलं. कमलेनं तिची 'हलक्या प्रतीची' अशी जी संभावना केली होती, तीही तिच्या पूर्णपणे लक्षात होती. कमलेला पाण्यात

पाहण्याचं हे आणखी एक कारण होतं. एकाएकी तिला गणेशची ओढ वाटू लागली. तिचं हसणं, बोलणं, मोकळेपणानं वागणं गणेशला फारच आवडत असे. तो जसजसा अधिकाधिक काळ तिच्या सहवासात राहू लागला तसतशी तीही त्याला खुश करण्यासाठी नाना तऱ्हेचे उपाय करू लागली. असे होता होता अखेरीस तिच्या लक्षात आलं, की संध्याकाळ झाली की खरोखर आपण त्याची वाट पाहत राहातो आणि तो लवकर दिसला नाही की अस्वस्थ होतो. ती मोठी चाणाक्ष आणि चतुर होती; तरीही त्याच्या व्यक्तिमत्त्वाची दुसरी बाजू तिला कळून आली नाही. सगळ्यांना खुश ठेवायचं आणि संकटांना किंवा अडचणींना बगल द्यायची हा त्याचा स्वभावगुण तिच्या लक्षात आला नाही आणि म्हणून जेव्हा जेव्हा तो नेहमीपेक्षा अधिक काळ तिच्या सहवासात राहात असे, तेव्हा मृदू, सुखद असा भाव तिच्या चलाख, तीक्ष्ण नजरेत चोरटेपणानं हळूच प्रवेश करे आणि ओठही विलग होऊन लाजरं स्मित करीत असत. अत्यंत मोहक नजरबंदी करणारं रूप होतं ते. तिच्या लावण्याच्या झळाळीत गणेश अलगदपणे अडकला आणि तोही हजरजबाबीप्रमाणे बोलू लागला, परिणामकारक संभाषण करू लागला, नर्म विनोद आणि बौद्धिक चर्चेच्या बाबतीत, तर तो सईलाही मागे टाकू लागला. त्याच्या या प्रकारच्या दर्शनानं सई चकित झाली आणि पूर्वी ज्याला केवळ प्रेमाचं खेळणं बनविण्याचा तिचा उद्देश होता, त्याच्यावर आपला जीव जडल्याचं आता तिच्या लक्षात आलं. त्याला शक्यतो दूर राखण्याचा ती प्रयत्न करू लागली आणि दोघांच्या भेटी जणू योगायोगानं होताहेत असे भासेल, अशा प्रकारचा कटाक्ष ठेवू लागली. असेच एकदा ते सकृतदर्शनी योगायोगानं वाटावे असे देवळाच्या ओवरीत भेटले होते, नेमक्या त्याच दिवशी रामचंद्र कमलेला भेटायला तिच्या घरी गेला होता.

"किती उशीर केलात आज तुम्ही?" गणेश आल्यावर सई म्हणाली.

"खरंच का?"

"हो. तुमच्या ध्यानात यायलाच पाहिजे होतं खरं म्हणजे हे! बघा ना, इतका अप्रतिम देखावा बघण्याची संधी हुकली तुमची. पलीकडच्या टेकडीवरील कातळ कड्यांमधून डोकावणाऱ्या सूर्याच्या किरणस्पर्शानं देवळाचा कळस सोन्या-रूप्याची झळाळी यावी तसा चमकत होता आणि ज्याचा तळठाव अजून कोणाला सापडला नाही अशा, ज्यात अर्धं शहर बुडून जाऊ शकेल अशा समोरच्या खोल, विशाल आणि पवित्र तलावाचं स्फटिकासारखं पाणी अगदी स्तब्ध होतं. अगदी एका क्षणापूर्वीही त्यात आपल्या संपन्न शहराचं प्रतिबिंब दिसत होतं. विशेषत: त्यात देवळांचे घुमट, मोठमोठे वाडे-हवेल्या आणि प्रशस्त बांधीव रस्ते मला दिसले. ते अगदी निस्तब्ध शहर होतं. मृत अवशेषवत शहर आणि 'ज्याच्याबद्दल ऋषिमुनी सांगत आले आहेत, की एक क्षण असा येईल जेव्हा फार मोठं स्थित्यंतर घडेल,

बुडलेले पवित्र, शांत आणि परिपूर्ण शहर तळ्यातून बाहेर पडेल, पाण्याचे झरे पुन्हा धरतीच्या कुशीत जातील' तो मंतरलेला क्षण हाच असं मला वाटलं! असं काही घडेल असं तुम्हांला वाटतं? तुम्ही नव्या प्रकारचं शिक्षण घेतलंय त्याच्या साहाय्यानं अशा गोष्टी उकलून दाखवता येतील का तुम्हांला? तुम्ही आला नाहीत ना, तेव्हा वाटलं... जाऊ दे. तुम्ही एका जंगी मेजवानीला मुकलात एवढंच मी म्हणू शकते. तुम्हाला तळ्याकाठी बसायला आवडेल का? चला तर, तिथे बसू आपण."

"हो आणि आता आपल्याला दुसरं काही एक करायचं नाहीय. मी कमलेचा विचार करीत होतो. हे दृश्य पाहून तिला किती मनस्वी आनंद झाला असता." हे शब्द त्याच्या तोंडून अगदी नकळत बाहेर पडले. तो बाहेर जायला निघाल्यावर कमलाच्या चेहऱ्यावर जे भाव उमटलेले त्याने पाहिले, त्याचा हा परिणाम असावा. पण त्यानं लगेचच स्वत:ला थोपवलं. सईनं त्याच्याकडे तीक्ष्ण नजरेनं पाहिलं आणि मान उडवीत म्हणाली, "तिचं लक्षही नसतं. अशा गोष्टींमधून आनंद घेण्याची अभिरुची सर्वांनाच असते असं वाटतं का तुम्हांला? घरातच बसून राहायची सवय आहे तिला."

"होय! आपणच त्यांना असं घरात बसून राहायला भाग पाडतो. बिचाऱ्या स्त्रिया!"

"तुम्हांला असं म्हणायचंय का, की तिचा सारा जीव तुमच्यासाठी झुरत असतो आणि अशा निसर्गरम्यस्थळी तुम्ही जाता, त्यांतही तिला रुची आहे असं वाटतं का तुम्हांला? आत्ता, या घडीला तिच्या मनात कोणते विचार घोळताहेत हे माहीत आहे मला." सई रागारागानं म्हणाली, "तिच्या मनातले विचार ते कुणाबद्दल असणार असून असून?"

"तुमच्याबद्दल नाहीत हे नक्की!"

"मग कोणाबद्दल?" गणेशनं हसत, किंचित थट्टेखोरपणे तिच्याकडे बघत विचारलं.

"तुम्हांला माहीत आहे का, तिनं स्पर्शिलेली मातीही बुक्का म्हणून कपाळाला लावणारा तिचा एक आतेभाऊ आहे ते? त्याच्यापुढे तुमचा काय पाड लागणार? हुशार आहे, विद्वान आहे आणि तुम्हाला विकत घेऊ शकेल इतका धनवानही आहे."

"मला तरी अशी कोणी व्यक्ती ठाऊक नाही. तिचा तो संन्यासी बाप अगदी दरिद्री आहे आणि तो सोडून दुसऱ्या कोणाला ती ओळखतही नाही."

"तुमचं मन बसलंय तिच्यावर म्हणून तुम्ही तिच्या चुका पोटात घालता." डोळे विस्फारून सई बोलली.

"असं? काय माहीत आहे तुला? बाकी तुला असं रागावलेलं बघायला फार छान वाटतंय. सुंदर दिसतेस तू रागावल्यावर. पण काय गं, माझ्या बायकोवर एवढा

राग का तुझा? गणेश आता चेष्टा-मस्करीच्या बेतात होता. सईच्या मनात मत्सर जागा करावा, तिला जळवावं असं त्याला वाटत होतं.

"मी काही तिच्याविरुद्ध नाहीय. तुमच्यावर कोणाचं खरं प्रेम आहे आणि कोण तुम्हांला फसवतंय हे फक्त तुम्हांला दाखवून देतेय मी. कमला अगदी निष्पाप आणि निष्कलंक दिसते यात बाकी काही शंका नाही."

"हे असं नको बोलूस तू तिच्याबद्दल. प्रत्येक गोष्टीला काही एक मर्यादा असते आणि आपल्या बायकोबद्दलचं असलं बोलणं कुठल्याच नवऱ्याला खपत नाही, आवडत नाही."

"बिच्चारी! म्हणूनच तुम्ही तिला असं एकटीला सोडता ना?"

"ते तुझ्यासाठी! तुझ्यासाठी मी दूर करतो तिला."

"का बरंऽ, असं का करता तुम्ही?"

"मला नाही माहीत," असं म्हणून त्यानं तिचा हात हातात घेण्याचा प्रयत्न केला.

"हो आणि तुम्हांला असं वाटतं, की माझ्यासारख्या बाईची योग्यता नाही तुमच्या बायकोबद्दल बरं-वाईट बोलण्याची, हो ना?"

"अगं, मला तसं म्हणायचं नव्हतं. मी कुठं म्हटलं असं? अशी रागावू नको."

"आपला सगळा वेळ मी तुमच्यासाठीच निव्वळ राखून ठेवते, तुम्हाला खूष करायला धडपडते मी! आणि तुमची बायको काय करते? तुमचा विचारही तिच्या मनात नसतो कधी. तुम्हांला सांगते मी, आतासुद्धा कदाचित ती आपल्या याराबरोबर गप्पागोष्टी करीत बसली असेल. तो गावात आला आहे असं इथे यायच्या आधीच कोणीतरी म्हणालं, ते कानांवर आलं माझ्या आणि तो तुमच्या घराचा पत्ता काढत होता, तेही पाहिलंय मी."

"असं बोलायला तुझी जीभ धजावते तरी कशी? ती कोणा परक्या माणसाला ओळखतही नाही आणि नवरा नसताना कुणा पुरुष माणसाशी बोलतही नाही. उगीच मला चिथावू नको." हे तो अगदी मनापासून गंभीरपणे म्हणाला.

"चला, बघूच या आपण."

"काय बघू या? मला उल्लू बनवतेस की काय?"

"मी सांगतेय ना तुम्हांला, तिची आणि त्याची ओळख आहे म्हणून! आणखीसुद्धा काय, काय बरंच सांगू शकेन मी तुम्हांला."

"हे शक्य नाही. मुळीच शक्य नाही. चल, आपण जाऊन बघूच या."

"इतकी घाई नको, इतकी घाई नको. आपण शारंगपाणींच्या वाडीत जाऊ. ती मोकळीच आहे. तुमच्या घराच्या बाजूच्या तिच्या खिडकीतून आपण बघू या, कमला त्याच्याबरोबर गप्पा मारत बसलीय की नाही ते."

जाता जाता तिनं हसत हसत रस्त्याच्या कोपऱ्यावर खोड्यात उभा असलेला

घोडा गणेशला दाखवला, पण गणेशचं तिच्याकडं लक्ष नव्हतं. तो चांगलाच रागावला होता. त्याला डिवचण्यासाठी, उसकण्यासाठी तिची ही लबाडी चाललीय, खोटंनाटं नाटक ती करतेय असं त्याला वाटत होतं. पण अरे बापरे! खिडकीतून हे काय तो पाहत होता? सई हसली आणि त्याच्या कानात कुजबुजली 'वेडे'! त्यानं खिडकीला घट्ट धरलं आणि त्याचा श्वासही जोरजोरात वरखाली होत होता. अर्धवट उघडलेल्या दारामागे अशी चोरूनमारून उभी होती ती कमलाच होती का? त्याची बायकोच होती का? आणि त्या आडरस्त्याला घरासमोरच्या निंबाच्या झाडाखाली उभा असलेला माणूस? दरिद्री कमलेची या परक्या माणसाशी ओळख तरी केव्हा झाली? प्रश्नचिन्हांकित नजरेनं त्यानं मागं वळून पाहिलं आणि त्याच्या मनातले विचार आधीच ओळखून सईनं आपली मान दुसरीकडे वळविली. त्याची तगमग बघून तिलाही वाईट वाटलं आणि खरं काय ते स्पष्ट करून सांगावं असा विचार तिच्या मनात डोकावून गेला. पण जसा तो संतापून वळला आणि कर्कश आवाजात, "झालं समाधान तुझं?" असं ओरडला तसा तिच्या स्वभावातला विखार जागा झाला आणि तीही चिडून म्हणाली, "समाधान? मला समाधान कशाला वाटेल? तुम्ही वेडे आहात म्हणून तुम्हाला तिच्याबद्दल इतकं वाटतं. आणि हो तिला हे काही नवीन नाही. मी प्रत्यक्ष त्याच्या तोंडूनच ऐकलंय की, याच्या आधी दूधस्थळालाही तो तिला भेटला होता आणि मला खात्री आहे, हेही तुम्हाला, अंधारात ठेवून झालं असणार, कारण तुम्हाला याची काहीच कल्पना दिसत नाही. मी तुम्हाला सांगितलं होतं ना, की त्या संन्याशाच्या मुलीपासून जरा जपून, सावध रहा म्हणून, तो अरण्यदयाचा पट्टशिष्य आहे आणि नारायणाचा भाचा! त्याच्याबरोबर असतो नेहमी. एवढंच काय, कमलेचे वडील आजारी असताना तिला अंजनीघरला बोलावणं पाठविलं तेही यानंच. कमलेला औषध देणारा वैद्यही तोच होता, हे कळतंय का तुम्हाला? तो आल्यावर लगेच जादू व्हावी तसा तिला उतार पडला ना?"

आजाऱ्यासारखं कण्हत गणेश म्हणाला, "पुरे पुरे, बाकी तू म्हणतेस ते सगळं खरं आहे. पुढे काय तेही सांग." मध्ये अगदी थोडाच वेळ गेला पण युग लोटल्यासारखं वाटून तो म्हणाला, "चल मी आता सूड घेतो. तू माझ्याबरोबर रहा. मी तिच्या तोंडून खरं काय ते वदवून घेतो. चांगल्या नरकयातना भोगायला लावतो तिला. चल, घरी जाऊ या, चल."

"नको, इतक्यात नको. तुम्ही थोडं खाऊन घ्या आणि असा एकदम तमाशा नको करायला. आपल्याला काही माहीत नाही असं दाखवा. सगळं आपोआप बाहेर येईल. मला हे भांडणतंटे मुळी आवडत नाहीत. अगदी शांतपणे तुम्ही तिला बाहेर घालवू शकता. आज, तास-दोन तास तुमच्या घरी येऊन थांबेन मी."

यानंतर काय काय घडलं ते सांगितलेलंच आहे. आता वाचकाला गणेशच्या वागण्याचा उलगडा झाला असेल.

अगदी पहाटेपहाटे, अजून काळोख असतानाच कमला आपल्या सासरी पोहोचली. कुठलं तरी नवंच बळ तिच्यात संचारलं होतं, त्या नादात तिनं अगदी वैराण रस्ते ओलांडले एवढंच नव्हे, तर जिथे दरोडे-खून नेहमी होतात असं ऐकिवात होतं, ते भयंकर रस्तेही निर्भयपणे पार केले. बरोबरची मोलकरीण घाबरून गेली होती. एका रात्रीपुरतं धर्मशाळेत राहू या म्हणून तिनं कमलेला विनवलं पण कमलानं पुढे वाटचाल करण्याचा पक्का निश्चय केला होता. त्यामुळे त्या दोन स्त्रिया, कुणाच्याही नकळत, भुतांच्या सावल्यांप्रमाणे अंधारातून संथपणे पुढे सरकत होत्या. एकदा त्यांना मागून काही पावलांचे आवाज ऐकू आले. पण खरं सांगायचं, तर इतरांना धडकी भरावी, असा त्यांचाच एकूण अवतार होता. अंधाऱ्या रात्री, सुनसान जागेवर जर एखादी बाई दिसली, तर ती नक्कीच हडळ असते आणि तिच्या तावडीत एकदा सापडलं की सुटायची मुळीच आशा नाही. या विचाराची हिंदूंच्या अंधश्रद्ध मनावर जोरदार पकड असते त्यामुळे कोणालाही भीती वाटली असती. सासरी पोचल्यावर एक क्षणभर कमलेला अगदी गळून गेल्यासारखं वाटलं. 'पूर्वीपासून ते किती दुष्टाव्यानं आणि निर्दयपणे वागत आले आहेत आणि आता ते आपल्याकडे कोणत्या नजरेनं बघतील? नाही, असं घाबरून चालणार नाही मला. हीच माझी कर्मभूमी आहे.' सुस्कारा सोडत ती स्वत:शीच म्हणाली आणि मनाचा निश्चय करून तिनं दारावर टकटक केलं. इतक्या पहाटे दारावर टकटक ऐकू येणं हे अघटितच होतं. गणेशचे वडील स्वत:च हातात तेलाचा मिणमिणता दिवा घेऊन दार उघडायला गेले. त्यांना पाहाताच कमलानं त्यांच्या पायावर लोळण घेतली आणि कळवळून म्हणाली, "मला आत घ्या. फार दुरून आलेय मी."

"का? काय?" चाचरत चाचरत तो वृद्ध गृहस्थ उद्गारला, पण मागं हातांत बाळ घेऊन उभ्या असलेल्या मोलकरणीला पाहून त्यांनी आपला रोख बदलला आणि आधी तिला आत जायला सांगितलं आणि मग जरा हुकुमी स्वरात कमलेला उठायला सांगून आत येऊन सगळं सविस्तर सांग असं बजावलं. "मी इथे आहे हे तुम्ही कोणाला सांगणार नाही या एका अटीवर घरात येईन मी. मी जरी तुम्हांला शोभत नसले, दरिद्री असले तरी मला आसरा द्या आणि माझं रक्षण करा. मी तुमची दासी म्हणून राहीन. पडेल ते काम करेन. एकच मागणं आहे माझं. मला अगदी अज्ञातवासात राहायचं आहे. तुम्हांला काय सांगावं ते मला कळत नाही. इकडच्यांनी मला घराबाहेर काढलंय किंवा मीच त्यांना सोडून बाहेर पडलेय. मी आता वाळीत पडलेय. मृत्यू हा एकमेव पर्याय माझ्यासाठी आहे. माझे यजमान माझ्यावर संशय घेताहेत. कसं सांगू तुम्हांला? त्यांनी जे शब्द उच्चारले त्यांचा उच्चार तुमच्यापुढे कसा करू?"

"काय, झालंय काय? काय भानगड आहे ही?"

"हंऽ ते म्हणाले की तुम्हांला काहीच माहीत नाहीय म्हणून. पण त्यांच्या मनात

असलं काहीतरी तुम्हीच ना भरवून दिलंत! मी अगदी धुतल्या तांदळासारखी आहे, हे पटवून द्यायला आलेय मी.''

''पण काय झालंय तरी काय असं?''

''त्यांच्यात काहीएक बदल झालेला नाहीय. दातओठ खात ते माझ्या कानात, एकदा नव्हे अनेकदा ओरडले, की मी त्यांच्याशी एकनिष्ठ नाहीय, कुलटा आहे म्हणून! का, का भरवलंत त्यांच्या मनात असं? एकवेळ मला घराबाहेर काढा, नाहीतर मारूनसुद्धा टाका, पण हा व्यभिचाराचा आरोप मला नाही सहन होत. असा आरोप करावा, अशी एक तरी गोष्ट माझ्या हातून घडलीय का कधी?''

''शू:ऽऽ वेड्यासारखं बरळतेयस तू. ऊठ, तुझं मन ठिकाणावर दिसत नाही. वडिलांच्याबद्दलची वाईट बातमी ऐकून धक्का बसल्यामुळे असं झालं असेल कदाचित. तू म्हणतेस तसली कुठलीही भयंकर कल्पना कुणीही तुझ्या नवऱ्याच्या डोक्यात भरवलेली नाही. चल, तुझी सासू सांभाळून घेईल तुला. अशी दु:खीकष्टी होऊ नको बाळा. तुझ्या वडिलांसारखाच आहे ना मी?'' हे शब्द ऐकताच कमला त्यांच्याकडे पाहतच राहिली. ते अचानकपणे इतके मायेनं आणि आपुलकीनं का बरं वागताहेत? तिचे दादा तर काही वारले नव्हते, केवळ आजारी होते आणि तरीही तिचे सासरे तिच्याशी असं मायेनं वागत होते. खरंच, आपण यापूर्वी त्यांच्याबद्दल उगीचच चुकीची समजूत करून घेतली.' ते आपल्याला रागे भरतील असं तिला वाटलं होतं. वाटलं होतंऽ ते म्हणतील, 'तुझ्या नवऱ्याला तुझा संशय येतोय, म्हणजे त्याला नक्कीच काहीतरी कारण असलं पाहिजे. कुठंतरी पाणी मुरत असलं पाहिजे. आम्ही काही तुला इथे ठेवून घेऊ शकत नाही.'

पण तसं काहीच झालं नाही. हे वेगळंच काहीतरी काय चाललंय? ती जमिनीला खिळूनच राहिली अन् ते पाहून तिचं चित्त ठिकाणावर नाहीयं याची तिच्या सासऱ्यांना खात्री पटली. थोड्या वेळानंतर मामंजींकडे वळून कसंनुसं हसत तिनं विचारलं, ''म्हणजे मी वाईट आहे असं नाही ना वाटत तुम्हांला?''

''नाही, नाही बाळा, किती तऱ्हेवाईकपणे वागतेस तू?''

''विचित्र किंवा तऱ्हेवाईक म्हणा हवं तर, पण मी वेडी नाहीय.'' कमला शांतपणे उद्गारली. ''मला काल रामचंद्रपंत भेटले आणि त्यांनी दादांच्या आजारपणाबद्दलची सगळी वार्ता सांगितली. पण कुणीतरी इकडच्यांच्या मनात भरवलं की मी वाईट चालीची आहे म्हणून आणि आता मला अशी भीती वाटू लागलीय, की मला नव्हे, तर 'त्यांनाच वेड लागलंय. ती बया, ती संध्याकाळी येते आणि त्यानंतर कितीतरी वेळ ते गप्प गप्प असतात. त्यांचं वागणं इतकं जगावेगळं असतं, की हे सगळं त्या सईमुळेच होतंय असं मला वाटत राहतं. तिनं त्यांना काहीतरी जालीम मात्रा दिलेली दिसते. म्हणून मग, मी आता इथेच राहीन. तुम्ही इकडच्यांशी बोला पण मी कुठे आहे, हे मात्र सांगू नका.''

सासूबाई आणि मामंजींनी तिचं बोलणं कान देऊन ऐकलं आणि मग तिला घरात घेतलं. खोलीत गेल्यावर सासूबाई हुंदके देऊन रडू लागल्या आणि कमला त्यांचं सांत्वन करू लागली. त्याच रात्री, ती इथे येण्यापूर्वी अगदी काही तास, एक माणूस रामचंद्रला शोधायला म्हणून आला होता आणि त्यानं तिच्या वडिलांच्या मृत्यूची वार्ता सांगितली होती. पण मामंजींनी दुःखी कमलेपासून ती बातमी लपवून ठेवली. ते कमलेशी अगदी मायेनं आणि आपुलकीनं वागत होते. पण त्यांच्या वागण्यातील हा बदल रामचंद्रच्या भेटीमुळे झाला आहे, याची कमलेला कल्पना नव्हती. त्यांना वाटत होतं तशी ती दरिद्री तर नव्हतीच उलट त्यांच्याहीपेक्षा कितीतरी अधिक मालमत्तेची ती वारसदार होती. जन्मानं आणि लौकिकानं ती त्यांच्यापेक्षा वरचढ होती. हे कळल्यामुळे तिचे पूर्वीचे तथाकथित अवगुण आता केवळ हलगर्जीपणा आणि अल्लडपणा अशा सदरांत मोडत होते. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे सासूबाई आता कमलेची तोंड फाटेपर्यंत स्तुती करू लागल्या आणि मामंजी तर काय, पूर्वीपासूनच कमलेच्या बाबतीत झुकतं माप देत असत. परिस्थिती अशी निवळलेली पाहून त्यांनाही समाधान वाटलं. ते म्हणाले, "पहिल्यापासूनच मी म्हणत होतो ना तुला, की चारचौघींपेक्षा ती अधिक सरस आहे म्हणून? कमला यायच्या आधीच त्यांनी तिला घरी बोलावून घ्यायचं आणि प्रेमानं वागवायचं असं ठरवलं होतं.

'खरंच! कलियुगातही चांगल्या वागणुकीचं फळ मिळतं म्हणायचंऽ' कमला सुखानं शहारत म्हणाली. 'सगळं जग आपल्या विरोधात आहे असं आपल्याला वाटत होतं आणि इथे तर आपलं कोडकौतुक चाललंय.'

✿

# १९.

ती एक शांत, निवांत संध्याकाळ होती. लांबच लांब पसरलेली दवभरली कुरणं पिवळ्या उन्हात न्हाऊन निघाली होती. मावळत्या संध्येचं स्मितहास्य डोंगरउतारावरच्या हिरवळीवर आणि दूरवरच्या कुरणांवरती विखुरलं होतं. गवत इतकं मऊशार आणि अलवार होतं, की वाऱ्याच्या सौम्यशा झुळकीनेही ते लवत होतं. तिथे काही उंच उंच आणि जुने-पुराणे सुळके होते. त्यांच्या शेंड्यावर आणि पलीकडे दूरवर पसरलेल्या माळावर आकाशाचा स्वर्गीय रक्तिमा विसावला होता. नजरेच्या टप्प्यात येणारी प्रत्येक वस्तू त्या मायावी रंगातून स्पष्टपणे उठून दिसत होती. मंद, पिवळ्या प्रकाशात लपेटलेले काळेभोर खडक सजीव झाल्यासारखे भासत होते. माळावरती दूरवर पसरलेले डेरेदार वृक्ष सोन्यासारखे झळकत होते आणि वाळलेला पाचोळासुद्धा जिवंत असल्यासारखा चुरचुरत होता.

कमलेच्या लग्नानंतर नारायणबुवा आपल्या डोंगरावरील झोपडीत परत गेले, हे रामचंद्रनं बरोबर शोधून काढलं होतं. त्याच पर्णकुटीतील एका फळकुटावर नारायणबुवा पहुडले होते. वादळी, मुसळधार पावसाची चिन्हं दिसत होती, पण त्यांना त्याचं भान नव्हतं. ते आपल्याच विचारांत गुंग होते. जीवनातील एका नवीन आणि वेगळ्याच समस्येशी त्यांची मानसिक झटापट चालू होती. मृत्यू अगदी समोर येऊन ठेपल्यामुळे त्याच्या चिंतनातून मिळणाऱ्या आश्वासक समाधानात खंड पडला होता. नेहमीची तगमग थांबत नव्हती, शांती मिळत नव्हती. चैतन्यमय आत्मा आता मर्त्य देहाचं कवच दूर सारू पाहत होता. काय, आत्मा खरोखरच असतो का? मृत्यूनंतर माणसाचं काय होतं? काही महिन्यांपूर्वी त्यांनी या प्रश्नांची कदाचित ठाम उत्तरं दिली असती आणि त्यानं त्यांचं स्वत:चंही समाधान झालं असतं. पण आता मृत्यूची दारं उघडल्यावर, एका भयंकर भयानं त्यांचा ताबा घेतला. म्हणजे आतापर्यंत त्यांची निव्वळ फसगत झाली की काय! निर्वाण... माणसाचं ईश्वराशी एकरूप होणं या श्रेयसाच्या प्राप्तीसाठी ते आयुष्यभर तळमळले होते. पण जर जाणिवेचा संपूर्ण

नाश आणि विचाराचा, चिंतनाचा अंत हेच शेवटी होणार असेल तर काय? असं असेल, तर मग त्यांची ध्यानधारणा, उपासतापास, विकारांवरील विजय, वासनेचं दमन आणि कित्येकदा केलेले निग्रह या साऱ्यांची अन्वर्थकता काय? अरण्यदयांसारखी व्यक्ती चारचौघांपेक्षा कोणत्या बाबतीत श्रेष्ठ असते? अध्यात्मविद्येचं संपूर्ण ज्ञान प्राप्त केलेल्या, अंतर्दृष्टीनं दुसऱ्याच्या मनातील खळबळ अचूक ओळखणाऱ्या अरण्यदयांनीसुद्धा त्यांना मृत्यूचं गूढ उलगडून सांगितलं नव्हतं. काही एका मर्यादेपर्यंत त्यांना फलप्राप्ती झाली होती यांत शंका नाही; कारण ध्यानधारणेमुळे आणि चिंतनमग्नतेमुळे सर्वसामान्यांना न लाभणारे अलौकिक सुख आणि शांतता त्यांना लाभली होती. भौतिक जग त्यांना कवडीमोल होतं. धनसंपदा, कीर्ती, मानमरातब-प्रतिष्ठा यांची त्यांच्यावर मुळीच मात्रा चालली नव्हती. दु:खावर त्यांनी मात केली होती आणि चिंता-काळज्या केव्हाच मागे टाकल्या होत्या. पण अरण्यदयांच्या मनात मृत्यूनंतरच्या आत्म्याबद्दल साशंकता होती. विचार कधीच संपूर्णपणे लुप्त होत नाहीत ना! मृत्यू म्हणजे विचारमुक्त अशी दीर्घ झोप. विचारप्रक्रिया काही काळ थांबलेली आणि मग त्यानंतरची अवस्था कशा प्रकारची असेल? संपूर्णतया नष्ट होऊन जाण्याच्या विचारानं नारायणबुवांचा थरकाप उडाला.

खरोखरच अधिक प्रकाशासाठी, आत्मिक, लौकिक आणि पारलौकिक सत्याची उकल करण्यासाठी ते अंधारात चाचपडत होते. ते अतिशय थोर मनाचे होते आणि जरी त्यांना परिपूर्ण ज्ञानप्राप्ती झाली नव्हती, तरीही आपलं जीवन धीरोदात्त करण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. त्यांची तगमग थांबली व त्यांना शांत वाटलं. त्यांच्या पायाखालची जमीन जणू निसटून चालली होती. सारे बंध, सगळी बंधनं पूर्णपणे निखळून पडली होती. त्यावेळी सूर्याचा प्रकाश अगदी धूसर झाला होता आणि आकाशात तारे नुकतेच डोकावू लागले होते. वारा अगदी मंद वाहत होता आणि त्या शांत, निस्तब्ध वातावरणात सामावून गेला होता. आसमंतातील त्या गूढ शांततेत बुवांचा आत्मा निमिषभर विरघळून गेला. अशाच वेळी आपले भौतिक जगाबरोबर राहाणे संपून आपण ताऱ्याबरोबर आणि शीतल वाऱ्याबरोबर राहू लागतो की काय? पण ही मधुर शांतता फारच थोडा काळ टिकून राहिली. झोपडीत अचानक धूसर खिन्नता पसरली आणि बुवांना वाटलं, की काहीतरी निश्चित आणि स्पष्ट सत्य आकळावे यासाठी आपण तळमळतो आहोत. 'हे श्रद्धे, आता मला बळ दे' ते जोरानं ओरडले आणि मूर्च्छित झाले. त्यानंतर अगदी थोड्याच वेळानं त्यांनी शेवटचा श्वास कसाबसा घेतला आणि देह ठेवला. अरण्यदय फारच उशिरा आले. ते आले तेव्हा त्यांचा शिष्य त्यांना ओळखण्याच्या अवस्थेत नव्हता, त्यांच्याच म्हणण्याप्रमाणे त्यांनी संन्याशाचे शव पणब्रासच्या शांत जंगलात समाधिस्त केले.

कमलेच्या मामंजींनी अगदी हळुवारपणे संन्याशाच्या मृत्यूची वार्ता कमलेला सांगितली. त्यानंतर कित्येक दिवस आणि रात्री ती शोकात बुडून गेली. तिच्या प्रिय

दादांना ती आता कधीच पाहू शकणार नव्हती. पण याहीपेक्षा कठीण प्रसंग अजून तिच्या आयुष्यात येणार होते. दादांच्या मृत्यूच्या दु:खातून ती थोडीशी सावरली जाते न जाते तोच तिचं लहान बाळ आजारी पडलं. एकेकाळी ज्या टपोऱ्या, तेजस्वी डोळ्यांकडे पाहून ती सुखावत असे, ते आता मलूल, विझत आल्यासारखं दिसत होतं आणि जरी ते बाळ ओठ हलकेच विलग करून मनापासून हसत होतं तरीही ते इतर बालकांपेक्षा काहीतरी वेगळंच दिसू लागलं होतं. जेव्हा कमला हताश होई तेव्हा ते बाळ तिच्याकडे अशा काही आर्जवी नजरेनं पाही, की ती अगदी घाबरून जाई आणि आपला तो लहानसा मूल्यवान ठेवा हृदयाशी घट्ट कवटाळून धरे. आयुष्यभर तो असाच धरून ठेवण्याचा तिचा आविर्भाव असे. जसजसे दिवस उलटू लागले तसे ते बाळ अधिकाधिक कृश होत चाललं आणि बारीक तापानं त्याची सगळी शक्ती निघून जाऊ लागली. मग कमलेच्या मनातील अंधश्रद्धा जागी झाली. हिंदू लोकांना भुताखेतांचं जग वास्तविक आहे, असं वाटतं. मृत माणसांची चांगली, प्रेमळ अथवा वाईट भुतं असतात आणि ते जिवंत असताना त्यांच्यात जे बरे-वाईट गुणधर्म असतात ते तर असतातच शिवाय जोडीला भुताखेतांची जी वैशिष्ट्यं असतात, तीही असतात; असं त्यांना वाटतं.

सर्वसाधारण समजूत अशी आहे, की स्वर्गात प्रवेश करण्यापूर्वी आत्म्याला अनेक योनींतून प्रवास करावा लागतो. मानवी जीवनातील त्या व्यक्तीच्या बऱ्या-वाईट वागण्यावर या प्रवासाच्या काळाची दीर्घता अवलंबून असते. जर ती व्यक्ती परोपकारी वृत्तीनं वागलेली असेल, तिनं स्वत:वर विजय मिळवला असेल, तर ती थेटपणे स्वर्गात जाते. पण तसं नसेल तर मात्र त्याच्या आत्म्याला पुष्कळ काळपर्यंत भटकत राहावे लागते आणि काहींना तर स्वर्ग लाभतही नाही. असे आत्मे फार भयंकर असतात. विशेषत: लहान मुलांना ते पटकन झपाटतात. भोळ्याभाबड्या मातांच्या स्वप्नात अशी हडळ नेहमी येते. तिच्या हातांत दुसरं एखादं अर्भक असतं आणि ते ती तिला देऊ करते. कुलदेवता आणि ग्रामदेवता त्या दुष्ट शक्तींपासून लोकांचं रक्षण करतात असा समज आहे. अशा भूतबाधेतून आपल्या बाळाला मुक्त करण्यासाठी त्या चिंतातुर माता भूत काढून टाकण्याचे उपाय करतात. कमलासुद्धा अशा भीतीपासून मुक्त नव्हती आणि तिच्या स्वप्नांचे काहीबाही अर्थ सांगणाऱ्या तिच्या मोलकरणीनं तिचं डोकं अंधश्रद्धांनी गच्च भरून टाकलं होतं. आपल्या बाळासाठी जे जे उपाय करणं शक्य होतं ते सगळे कमलानं करून पाहिले पण तिच्या बाळाला काही बरं वाटेना.

अखेरीस भवानीच्या मंदिरासमोरच्या प्रांगणात महादेव अवतरणार आहे असं तिच्या कानावर आलं आणि म्हणून आपल्या बाळाला घेऊन तिथे जाण्याचं तिनं ठरवले. ती मंदिराजवळ पोहोचली तेव्हा समोरून एक मोठी मिरवणूक येत असलेली तिनं पाहिली. कित्येक लोक बेभान होऊन पुढे पळत होते. मंदिरापासून थोड्या

अंतरावर ती मिरवणूक थांबली आणि तिथेच देव अंगात आलेल्या भक्तांचं एक रिंगण तयार झालं. ते बघता बघता मोठं झालं. कमला एका झाडाखाली उभी होती. तिच्या अंगावर शहारे आले होते. एक हात देवापुढे पसरून आणि दुसऱ्या हातानं बाळाला छातीशी कवटाळून ती मिरवणूक पाहत होती. मोठ्या कष्टानं ती इथवर आली होती. अशा प्रकारे तिचं इथे येणं हे एक साहसच होतं. तिचं लाडकं, चिमणं बाळ तिच्या हाताला बिलगलं होतं, पण त्याचे सुंदर, टपोरे डोळे मात्र तिच्याचकडे रोखलेले होते. मिरवणूक अगदी जवळजवळ येऊ लागली आणि आवेगात नाचणाऱ्या भक्तांचे रिंगणही अगदी लहानलहान होत गेले. मग कमलेच्या पोटात अचानक भीतीचा गोळा उठला. आपली आर्जवं, प्रार्थना ऐकून घेण्यापूर्वीच या अंधदेवतेने आपल्या बाळावर मृत्यूचा घाला घातला तर? देवांना नेहमी हवि, नैवेद्य हवा असतो आणि त्यांनी जर नैवेद्यासाठी आपल्या या अमूल्य ठेव्याची मागणी केली तर? खरंच आपल्या बाळाला वाचवण्यासाठी, जपण्यासाठी अगदी जगाच्या दुसऱ्या टोकालासुद्धा निघून जाण्याची तिची तयारी होती. बाळाच्या कानावर ओरडण्याचे आवाज पडत होते आणि त्याचे डोळे मिरवणुकीवर खिळले होते. मग ते सुंदर, टपोरे डोळे मोठ्या कुतूहलानं आईकडे वळले. कमलेला या नजरेचा अर्थ चांगलाच ठाऊक होता. तिनं बाळाला छातीशी गच्च आवळलं आणि ओरडली, 'देवा कृपावंत हो! हे माझं छकुलं एवढं मागू नको. मला ने हवं तर, पण या बाळाला नको.' बाळाचा निरागस चेहरा तिच्या वक्षावर किंचित विसावला. पुन्हा एकदा त्याने आपल्या आईकडे पाहिलं आणि डोळे मिटले. तिला त्याच्या मस्तकाचा स्पर्श जाणवला. ते गरम होतं आणि अक्षरशः उडत होतं. ताप वाढत चालला होता का? तिच्या अंतःकरणात वेदनेची एक तीव्र कळ उमटली. हे तर मुळीच चांगलं झालं नाही. इथं येण्यात तिनं चूक तरी नव्हती ना केली? नाही, तिनं पुन्हा एकदा आळवणी केली, परमेश्वरा दया कर. नतमस्तक होऊन तिनं मनोमन स्तोत्र म्हणायला सुरुवात केली. लोकांना वाटलं की, ती कुणी वेडीच आहे. मिरवणूक पुढे निघून गेली. पुष्कळ वेळ निघून गेल्यानंतर ती उठली. तिचं बाळ झोपलं होतं, त्याचं सगळं अंग थरथरत होतं. ती घाईघाईनं घरी परतली.

रात्र काळोखी होती. कमला आपल्या बाळाला घेऊन बैठ्या खोलीत बसली होती. तिथे फक्त चांदण्याचा फिकट प्रकाशच काय तो होता. बाहेर मात्र तारे चमचम करीत होते आणि वारा दुःखाचे, उदासीनतेचे सूर आळवीत होता. मांडीवरच्या अशक्तपणानं पांढऱ्या फट्ट पडलेल्या बाळाच्या चेहऱ्याकडे खिन्नतेनं पाहून कमला म्हणाली, 'नीज माझे सोने, नीज!' बाळानं पुन्हा एकदा टक्क डोळे उघडले, तसे बाळाला छातीशी घट्ट आवळून ती म्हणाली, 'नको असं बघू पिल्लू, झोप माझ्या लाडके, झोप' आणि ती एक उदासवाणे अंगाई गीत गाऊ लागली. बाळ फार काळपर्यंत जगेल अशी आशा नव्हती. अंगाई गीतातील शब्द म्हणजे जणू क्रूर थट्टाच होती.

*गडगंज तुझ्या पितयाच्या राज्यात*
*सोन्याच्या पाळणियात*
*ती इडापिडा जावो दूर पळून*
*जोजविते मी म्हणून तुजला बाळा*
*गोजिऱ्या, नीज लडिवाळा ॥१॥*
*पापण्यावरील तव तेज*
*देवता घेती चुंबून*
*जोजवुनिया तुज हळुवार*
*तव भाग्य किती वानू रे मी बाळा*
*साजिऱ्या नीज लडिवाळा ॥२॥*
*झोपेचे राखणदार*
*स्वर्गीचे आत्मे थोर*
*मायेचे पसरूनी पंख*
*विंझणती ते किती किती हळुवार*
*लाडक्या नीज सुकुमारा ॥३॥*
*तो प्रकाश झरतो येथे*
*स्वर्गीय चुंबनासरसे*
*स्पर्शिती ओठ ओठाते*
*हा भाग्याचा योग असे रे बाळा*
*भाग्यवंत राजसबाळा ॥४॥*
*रसबाळे बोरी घोस*
*नव्हते कधी फुलले येथ*
*हा तुझा पायगुण खास*
*ही कला तुझी आज दाखववी बाळा*
*दैवयोगी राजसबाळा ॥५॥*

हे नेहमीच्या परिपाठातलं गीत ती गात होती खरं, पण त्यांतील प्रत्येक शब्दांतून तिला काहीतरी वेगळंच ध्वनित होत होतं. तिच्या डोळ्यांतून घळाघळा अश्रू वाहू लागले. ते अंगाईगीत असण्यापेक्षा मृत्यूगीत आहे असं वाटत होतं. आपल्या बाळाला तिनं उराशी घट्ट कवटाळून धरलं होतं. रात्र भरभर सरत होती, चांदव्याचा प्रकाश आता माय-लेकीवर पसरला होता. पण ती अश्रूभरलं अंगाईगीत गात असतानाच आपल्या बाळाच्या आत्म्याचं पंख पसरले होते हे तिला माहीत होतं का? बाळाला छातीशी कवटाळून कमला एखाद्या दगडासारखी थंड बसून राहिली.

---

टीप - पाळण्याचा अनुवाद डॉ. तारा भवाळकर यांच्या सौजन्याने.

दुसऱ्या दिवशीच्या सकाळच्या किरणांना ती मूर्च्छित पडलेली दिसली. आई आणि मूल, दोन्हीही देवाघरी गेले असं सगळ्यांना वाटलं, पण त्यातील एकजण कधीच न भरून निघणारी, भळभळती जखम, वेदना घेऊन शुद्धीवर आली आणि दुसरी आकाशात उडून गेली.

कमला जागी झाली तेव्हा तिला खूपच ताप होता. त्या तापामुळे पुढे कित्येक दिवस ती बेशुद्धावस्थेतच होती. आणखी एक संकटाची लाट तिच्यावर येऊन आदळली आहे, हे तिच्या गावीही नव्हतं. शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या मते हा दैवाचा घाला होता अणि तिच्या जन्माच्या वेळेच्या ग्रह-नक्षत्रांचा हा अनिष्ट परिणाम होता. आता तिच्या संपत्तीचा, वैभवाचा तिला काय उपयोग होता? स्त्रीचा सर्वांत मोठा अलंकार तिनं गमावला होता. कॉलऱ्याच्या प्रादुर्भावानं, अवघ्या बारा तासांत गणेश तडकाफडकी मरण पावला होता. अवघ्या घराची पाचावर धारण बसली होती. कमला तर अगदी मरणप्राय झाली होती. तिच्या सासू-सासऱ्यांना रामपूरला जाणं भाग होतं म्हणून मग तिच्या मैत्रिणी आळीपाळीनं येऊन तिची शूश्रुषा करू लागल्या. असेच काही दिवस उलटले आणि ती शुद्धीवर आली. तिचं शुद्धीवर येणं म्हणजे सहसा बायकांच्या वाट्याला न येणाऱ्या दु:खाला सामोरं जाणं होतं. 'ना आई, ना बाप, अपमानित, लाजिरवाणं जिणं, पांढऱ्या पायाची बाई'... साऱ्या जगापासून आपलं बाळ, आपला ठेवा हरवला म्हणून ती मनातल्या मनात शोक करू लागली. आपण नवऱ्याच्या घरातून बाहेर पडलो त्याची शिक्षा म्हणून त्याचा मृत्यू झाला, वैधव्य आलं असं तिच्या मनानं घेतलं होतं. तिच्या पुढे भागीरथीचं उदाहरण होतं. कुरापतखोर, भांडखोर भागीरथीची परिस्थितीही आता बदलली नव्हती का? तिच्या नवऱ्यानं रखेलीचा त्याग केला होता आणि तो आता तिच्याकडे परत आला होता. त्यामुळे ती आता खुष होती. एक गोजिरवाणा मुलगाही झाला, मग तर ती खूषच खुष झाली होती. आपला नवरा दुरावला तेव्हा त्यात आपलीच मोठी चूक होती असं भागीरथी कमलेला म्हणाली. 'मी मत्सरी आणि संशयखोर होते, संधी मिळेल तेव्हा त्यांना टाकून बोलत होते आणि अपमानही करीत होते. पण बाळाच्या जन्मानंतर मला माझी चूक कळून आली.' असं तिनं कमलेला स्पष्टपणे सांगितलं. भागीरथीच्या नवऱ्यानं तिला सांगितलं म्हणे की, 'त्यानं तिच्याखेरीज दुसऱ्या कुणा स्त्रीचा कधी विचारही केला नाही. त्याचं बाहेरख्याली वागणं हे केवळ तिला अद्दल घडवण्यासाठी होतं.' हे सारं ऐकून कमलेच्या मनात पश्चात्तापाची तीव्र कळ उमटली. तिला वाटलं, की आपणही जर नवऱ्याबरोबर राहिलो असतो, तर आपलंही सगळं सुरळीत झालं असतं, पण आता विधवेचं बोडकेपण तिच्या नशिबी आलं होतं. चांगल्या वागणुकीनं, सद्वर्तनानं आपण सर्वांची मनं जिंकून घ्यावी, आपलं निरपराधीपण सासरच्या मंडळींच्या लक्षात आणून द्यावं असं तिच्या मनात होतं. पण आता ती सर्वांत दुष्ट, पापी ठरली होती. हीच आपली लायकी आहे असं तिला वाटू लागलं. तिच्या जुन्या

मैत्रिणी आणि शेजारपाजारणी तिच्याभोवती जमून, सर्वतोपरी तिचं सांत्वन करीत होत्या. काशीनं आपलं तान्हं बाळ तिच्या कडेवर दिलं आणि म्हणाली, "हे आता माझं बाळ नाही. तू त्याला वाढव, मोठं कर." या जगात आपल्यासाठी चार-दोन सुखाचे क्षण अजूनही शिल्लक आहेत, असं कमलेला वाटलं.

✿

# २०.

दोन वर्षं उलटून गेली आणि त्यानंतर तिच्या एक गोष्ट ध्यानात आली. एका दृष्टीनं ती बाब अतिशय क्लेशकारक होती खरी. पण तिच्यामुळे तिचं खडतर आयुष्य काही प्रमाणात तरी सुसह्य बनलं आणि तिच्या जीवनपथावर प्रकाशाचा किरण पडला. नि:स्वार्थी आणि अत्यंत सामर्थ्यशाली, प्रबलतम प्रेमाचा प्रकाश होता तो. तो अक्षरश: इतका अलौकिक होता, की तिला आपण कुठल्यातरी वेगळ्याच, अनोख्या विश्वात, लौकिक जगापेक्षा वरच्या पातळीवरील विश्वात पोहोचलो आहोत असं वाटू लागलं. हे खरं की तिला असं वाटत होतं, की हे प्रेम आपलं कधीच होऊ शकणार नाही आणि तरीही ते नेहमी तिचंच होतं. तिला यात समाधान होतं. एके दिवशी सायंकाळी घराच्या मागे असलेल्या तिच्या आवडत्या ठिकाणी ती नेहमीप्रमाणे नदीकडे पाहत बसली होती त्यावेळी रामचंद्रनं ते गुपित तिला सांगितलं. भूतकाळात घडून गेलेल्या घटना आठवून ती त्यावर विचार करीत बसली होती. तेवढ्यात तिला रामचंद्र येताना दिसला. गेल्या दोन वर्षांत तो तिला भेटला नव्हता. साहजिकच एक जुना मित्र भेटल्यानं तिचा ऊर आनंदानं भरून आला. त्याने येताना तिच्या आईची दागिन्यांची संदुक बरोबर आणली होती. संपत्तीशी संबंधित नसलेल्या खऱ्या प्रीतीची आणि संसार सुखाची प्राप्ती कमलेला व्हावी असं संन्याशाला – कमलेच्या पित्याला – वाटत होतं. त्यामुळं त्यानं ही संदुक मुद्दामच लपवून ठेवली होती. रामचंद्रने ती सगळी हकीकत कमलेला सांगितली. या दरम्यान 'चला घरात जाऊ' असं कमलेनं म्हणताच रामचंद्रने तिला आणखी थोडा वेळ थांबण्याची विनंती केली. 'मला तुला विशेष काही सांगायचं आहे' असं त्यानं म्हणताच कमलेला 'असं काय विशेष असेल बरं' याचं मोठं आश्चर्य वाटलं. त्यानं लगेचच तिच्याविषयीचं आपलं प्रेम व्यक्त केलं. त्यानं अगदी प्रभावीपणे आपली बाजू मांडली. "तू मुक्तीच्या जगात यावंसं असं मला वाटतं. रूढी-परंपरांचं जोखड नाही जाणवलं तुला? अज्ञानाच्या ओझ्याखाली तू दबली

जात आहेस, अंधश्रद्धांनी तुझ्याभोवती विळखा घातला आहे आणि त्यांच्या क्रूर, महाभयंकर पाशात तुला आवळलं आहे, हे तुला जाणवत नाही का? इथली प्रत्येक गोष्ट तुझ्यासाठी काळीकुट्ट आणि भयाण आहे, हे मला तुझ्या डोळ्यांत स्पष्ट दिसतं आहे. माझ्या सहवासात तू मुक्त असशील. डोंगर-कड्यावरच्या हवेप्रमाणे, तुझ्याभोवती पसरलेल्या या सूर्यप्रकाशाइतकी मुक्त, स्वतंत्र! चल कमला, मनाची तयारी कर. तुझ्या जन्माच्याही आधीपासून तू माझी आहेस. तुझ्या आईनं मला तसं वचन दिलं होतं. मी थकलोय आता. अनुग्रहिताच्या जीवनशैलीतील या निरर्थक सोंगाचा मला मनस्वी कंटाळा आलाय. सृष्टीचे सत्त्व, अंतिम सत्य शोधण्याची माझी धडपड सतत चालू आहे, पण मला हातात काहीच सापडलेलं नाही. तू जर मला मध्यरात्रीच्या वेळी भविष्यवेत्त्यांच्या समूहात पाहिलं असतंस, मी केलेले उपवास, घेतलेली प्रायश्चित्तं पाहिली असतील, वेगवेगळ्या उत्सवांतील माझा सहभाग, माझी तपश्चर्या, मंदिरात आणि मंदिराबाहेरही विरागी वृत्तीनं राहणं, कधी गहन-घनदाट अरण्यात, तर कधी डोंगरमाथ्यावर एकाकी राहणं हे सगळं जर तू पाहिलं असतंस, तर तुला नक्कीच कळलं असतं, की सत्याच्या शोधार्थ अन्य कुणीही केला नसेल एवढा मी जिवाचा आटापिटा केला आहे. मी संन्यासीबाबांचे अनुयायित्व पत्करलं, थोर अरण्यदयऋषींच्या पायाशी बसून अध्ययन केलं, वनस्पतींच्या विश्वात वावरलो. वनस्पतीतील शक्तिशाली रसाचा अर्क काढून, त्यातील जोम, शक्ती मी मनुष्यमात्राच्या देहात स्थलांतरित करू शकतो. पण या सगळ्याचा काहीच उपयोग नाही. चांगलं आणि वाईट या साऱ्याचं उगमस्थान असलेल्या प्रकाशस्वरूप तेजोनिधी ईश्वराचं सान्निध्य मिळविण्याचे माझे श्रेयस प्राप्त करण्यासाठी यातल्या कुठल्याच गोष्टीचा मला उपयोग झाला नाही. आता तुला काय वाटतं ते सांग. आपण आपलं स्वत:चं विश्व निर्माण करू. तिथे आपल्या सुखात बिब्बा घालण्याची कुणाची हिंमत होणार नाही. तुला कल्पनाही करता येणार नाही, इतकी धनसंपदा माझ्या ताब्यात आहे. आपल्या नव्या जगात मूर्तिमंत प्रेम तुझ्या स्वागतार्थ उभे असेल. तू स्वप्नातही कल्पना केली नसशील असं माझं प्रेम आणि भक्ती तुझं स्वागत करेल तिथे. माझा आणि आपल्या स्वातंत्र्याचा स्वीकार कर आणि चल माझ्याबरोबर. या कानाचं त्या कानाला काही कळणार नाही.''

अश्रूभरल्या नेत्रांनी कमलेनं त्याच्याकडे पाहिलं. करुणेत विरघळवणारी, दगडालाही पाझर फोडू शकेल अशी आणि समोरच्या व्यक्तीच्या मनाच्या गाभ्यातील दयेचे झरे जिवंत करण्याची ताकद असलेली अशी ती नजर होती. ''तेवढं मला सांगू नका,'' थरथर कापत ती म्हणाली. ''त्याचा विचारही मी करू शकत नाही. पूर्वीच्या काळी आम्ही स्त्रिया पतीच्या शवाबरोबर सती जात नव्हतो का? पाण्याचा आणि पुराचा आश्रय नव्हतो का घेत? मग आताच आम्हाला काय झालंय? तुमच्याशी बोलताना माझं हृदय धडधड करतंय. पण हे लोभी मना, असा माझा विश्वासघात नको करू.

मला स्वत:चीच लाज वाटू लागलीय. मला वाळीत टाका किंवा दूर हाकलून द्या. माझ्या रूपाकडे, चेहऱ्याकडे पाहू नका. सगळ्या स्त्रियांमधील शापभ्रष्ट स्त्री आहे मी. माझ्या स्वभावातच काहीतरी खोट, काहीतरी वावगं आहे आणि म्हणूनच देवानं माझ्या नशिबी हे भोग दिले. त्यांनी माझ्या गळ्यातलं मंगळसूत्र वाढवलं. माझ्या पतिदेवांना माझ्यापासून दूर नेलं आणि मला हा वैधव्याचा शाप दिला. नाही. तुम्ही म्हणता ते कल्पनेच्या पलीकडचं आहे. मला माझ्या दैवावर सोडून द्या. दुसऱ्या एखाद्या नशीबवान मुलीशी लग्न करा. तुमच्यावर दैव अखंड प्रसन्न राहू दे. तुमच्या योग्यतेचं, तोलामोलाचं प्रेम आणि सुख तुम्हांला लाभेल. मी तर काय, निव्वळ एक फुटका घडा! बाजूला फेकून देणं आणि थुंकणं एवढ्याच कामाचा. हं! मी! देवा, मला वाचव यापासून. माझ्या मनात अनोख्या ऊर्मी उसळताहेत, माझ्या डोळ्यांपुढे टेकड्यांच्या अनंत रांगाच्या रांगा उभ्या राहिलेल्या दिसतायत मला. त्या दूर दूरपर्यंत पसरत जाताहेत, विस्तारताहेत. तुझ्या सामर्थ्याचे प्रतीक आहेत त्या."

"नाही! ती प्रेमाची शक्ती आहे." रामचंद्र म्हणाला, "ऊठ! त्याच्या आज्ञेचं पालन कर. त्याच्याविरुद्ध झगडू शकत नाहीस तू. या प्रवाहातून आणि पुरातून तू सहज तरून जाशील. ऊठ! माझ्या प्रियतमे ऊठ आणि माझी हो." तिच्या जवळ जाऊन त्यानं तिला धरून उठवलं. पण तिचं हृदय आक्रंदलं आणि ओठावर शब्द आले, 'गणेश' – वेड्यासारखी ती घराकडे धावत सुटली. ते हृदयाच्या अंतर्हृदयातील, खोल गाभ्यातील आक्रंदन होतं. तिच्या निष्ठुर धर्माचा विजय झाला होता. आपल्या आयुष्याला कधीही न संपणाऱ्या पश्चात्तापाची आणि अक्षय दु:खाची कळा आली असती असं तिला वाटलं आणि त्या विचाराच्या आवेगात आपल्यासमोर उभ्या असलेल्या माणसाच्या जबरदस्त प्रभावातून तिनं स्वत:ची सुटका करून घेतली. त्याच्या प्रेमपाशातून तिची सुटका झाली नाही, कारण तो पोलादासारखा शुद्ध, कणखर होता. पण त्याचं स्थान तिच्या जीवनपथावरील प्रकाशाचं होतं. त्यामुळे तिचं आयुष्य तेजस्वी बनलं होतं. खरंच! आपल्यावर कुणीतरी प्रेम करतं आहे, सगळ्या जगानं धिक्कारलेल्या, ती ज्या छोट्याशा वर्तुळात वावरत होती, त्यातील सगळ्यांनी दूर लोटलेल्या तिच्यावर कुणीतरी प्रेम केलं होतं, ही जाणीवच मोठी सुखद होती.

रामचंद्रनं आपल्या जंगलातल्या घरात स्वत:ला बंदिस्त करून घेतलं. आपल्या रुग्णांना औषधपाणी करण्यापुरताच तो गावात येऊ लागला. तेवढाच त्यानं गावाशी संबंध ठेवला होता. पण लोकांनी त्याचं विजनस्थ निवासस्थान शोधून काढलं. वेदनेनं तडफडणाऱ्या, औषधपाण्याची निकड असलेल्या लोकांनी त्याला वेढून टाकलं, त्यानंही त्यांना मन:पूर्वक मदत केली. त्याच्या दिव्यप्रेमाची गंधवार्ताही कुणाला लागली नाही. आपल्या गुरुजींच्या अरण्यदयांच्या पावलावर पाऊल ठेवून चालण्याचा तो प्रयत्न करतो आहे, असंच लोकांना वाटत राहिलं.

कुठलाही स्वार्थ न ठेवता कमलेनं आपली सगळी संपत्ती परोपकारार्थ खर्च केली. अगदी आजसुद्धा त्या गावचे लोक तिचं नाव मोठ्या श्रद्धेनं घेतात.

अशी ही कमलेची कहाणी. नदीच्या तीरावरील झाडांच्या गुंफेत बसून मी ती अनेकांच्या तोंडून ऐकली. माझ्या एका बाजूला ते पुरातन, पडकं रोहिणीचे देऊळ उभं होतं. तेच शिवगंगा होतं आणि समोर तीच प्राचीन नदी आपल्या तीरावरल्या लोकांच्या सुखदु:खाची जाणीव न ठेवता वाहत होती. काही दूर अंतरावर 'कमला' अशी अक्षरं कोरलेला चबुतरा होता. कमलेला आता संतत्व प्राप्त झालं होतं. तिचे अदृश्य हात अजूनही गरिबांना दिलासा देतात, दुर्दैवी लोकांचे रक्षण करतात, कारण तिने आपले सारे उर्वरित आयुष्य विधवांच्या आणि अनाथांच्यासाठी वेचले होते.

✿ ✿

## कृपाबाई सत्यनादन यांचा जीवनपट

| | |
|---|---|
| १४ फेब्रुवारी १८६२ | अहमदनगर येथे जन्म. |
| १८७५ | मोठ्या भावाचा, भास्करचा मृत्यू |
| १८७६ | मिशन स्कूलमध्ये प्रवेश |
| १८७७ | मुंबईतील झनाना स्कूलमध्ये दाखल. पुढील वैद्यकीय क्षेत्रातील अध्ययनासाठी शिष्यवृत्ती. प्रकृतीच्या कारणासाठी शिष्यवृत्ती रद्द. |
| १८७८ | मद्रास मेडिकल कॉलेजमध्ये दाखल. अनेक पारितोषिके प्राप्त. |
| १८७९ | पुन्हा आजारपण आणि नैराश्यग्रस्तता. अभ्यासक्रम मध्येच थांबून पुणे येथील मोठ्या बहिणीकडे रवाना. |
| १८८१ | सॅम्युएल सत्यनादनबरोबर विवाह. त्यांच्या बरोबर उटकमंडला प्रयाण. तेथील वास्तव्यात मुस्लीम मुलींसाठी शाळा काढली. तिचा पुढे सी.एम.एस. मिशनने विस्तार केला.<br>अनेक झनाना स्कूलमध्ये जाऊन शिकविण्याचा उपक्रम, 'ॲन इंडियन लेडी'या टोपणनावाने 'साउथ इंडियन ऑब्झर्वर', 'नॅशनल इंडियन जर्नल' यांसारख्या नियतकालिकांमध्ये लेखन. 'A Visit to the Todas' हा त्यांचा पहिला लेख साउथ इंडियन ऑब्झर्वरमध्ये प्रकाशित झाला. |
| १८८४ | सॅम्युएल यांची राजमुंद्रीला बदली झाल्यामुळे तिकडे प्रयाण. |
| १८८५ | कुंभकोणमला रवाना. लेखन सुरू. काही कवितांचे लेखन. |
| १८८६ | सॅम्युएल यांना डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनचे साहाय्यक म्हणून आणि पुढे प्रेसिडेन्सी कॉलेज मद्रासमध्ये तर्कशास्त्र आणि तत्त्वज्ञान विभागाचे प्रमुख म्हणून नोकरी मिळाल्यामुळं त्यांच्या बरोबर मद्रासला प्रयाण.<br>'Saguna : A Story of Native Christian Life' या आत्मचरित्रात्मक कादंबरीच्या लेखनास प्रारंभ. |

| | |
|---|---|
| १८८७-८८ | मद्रास ख्रिश्चन कॉलेज मॅगेझिनमधून 'सगुणा' क्रमशः प्रकाशित.<br>अपत्याचा जन्म आणि दुर्दैवी अपमृत्यू. 'Kamala : A Story of Hindu Life' या कादंबरीच्या लेखनास प्रारंभ. |
| १८८९ | रेव्ह. डब्ल्यू. टी सत्यनादन यांच्या धर्मांतरासंबंधीचा लेख प्रसिद्ध. 'The Story of A Conversion' 'कमला'चे लेखन चालू. |
| १८९३-९४ | हवापालटासाठी 'कनूर' येथे वास्तव्य. खूप तापामुळे अंथरुणाला खिळून असतानाही 'कमला' पूर्ण. मद्रास ख्रिश्चन मॅगेझिनमध्ये 'कमला' क्रमशः प्रसिद्ध. |
| ८ ऑगस्ट १८९४ | कृपाबाईंचा देहान्त. |
| १८९४ | 'कमला' पुस्तकरूपात प्रकाशित. |
| १८९५ | 'सगुणा' पुस्तकरूपात प्रकाशित. |
| १८९६ | 'Miscellaneous Writings of Krupabai Satthianadhan' प्रकाशित.<br>'कमला' आणि 'सगुणा' या कादंबऱ्यांचा तमिळ भाषेत अनुवाद. |

✿

प्रिय वाचक,

आपण पुस्तकविश्वाच्या केंद्रस्थानी आहात! आमचे हे पुस्तक आपल्याला कसे वाटले, किती आवडले, आवडले नसल्यास का आवडले नाही, हे जाणून घेण्याची आम्हांला उत्सुकता आहे. तरी या पुस्तकासंबंधी आपला अभिप्राय थोडक्यात कळवावा, ही विनंती.

'राजहंस' प्रकाशन

वाचकाचे नाव : ________________________________

पत्ता : ________________________________

________________________________

दूरभाष :

ई-मेल पत्ता :

☐ 'राजहंस'साठी तुम्ही काही विषय सुचवू इच्छिता का?

☐ पुस्तकाचे नाव : ________________________________

या प्रश्नांची उत्तरे या कागदावर लिहून आम्हांला कृपया पोस्टाद्वारे पाठवावी.

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

एकोणिसाव्या शतकात कृपाबाई सत्यनादन यांनी
इंग्रजी कादंबरी लिहिली, ही घटनाच महत्त्वपूर्ण.
मुंबई इलाख्यातील धर्मांतरित जोडपे हरीपंत आणि राधाबाई.
त्यांची कन्या कृपाबाई.
विवाहानंतर कृपाबाई मद्रास प्रांतात राहिल्या.
बुद्धीचे वरदान लाभलेल्या कृपाबाईंनी
प्रकृती अस्वास्थ्याला तोंड देत लेखन केले.
मुस्लिम शाळाही काढली.
'कमला' [redacted] या त्यांच्या पुस्तकरूपाने प्रकाशित झालेल्या
पहिल्या कादंबरीचा हा अनुवाद.
या कादंबरीत एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील
कौटुंबिक-सामाजिक वातावरणाचे दर्शन घडते.
पारंपरिक चौकटीतून बाहेर पडून नवे भान स्वीकारणारी ही नायिका !

रोहिणी तुकदेव यांच्या रसाळ शैलीमुळे
सहज सुंदर झालेला हा भावानुवाद...

राजहंस प्रकाशन

Kamala ₹ 150
9788174345622
Rajhans Prakashan Pvt. Ltd.